**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)**

**अर्धा-तास चर्चा**

**पृ.शी.** : मराठवाडयातील मेडिकलच्या जागा

**मु.शी.**: मराठवाडयातील मेडिकलच्या जागा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 29447 ला दिनांक 17 जुलै 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

**(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)**

...2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील बचत गटांबाबत करावयाच्या उपाययोजना

**मु.शी.**: राज्यातील बचत गटांबाबत करावयाच्या उपाययोजना यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"राज्यात मोठया प्रमाणात बचत गट तयार होणे, बी.पी.एल.व ए.पी.एल.सर्व प्रकारचे गट तयार होणे, अजूनही खूप कष्टकरी महिला बचत गापासून वंचित राहणे, त्यांना प्रवाहात जोडून घेणे, बचत गट बांधणी व रेकॉर्ड किपिंग सुलभ करणे, बचत गटात देण्यात येणा-या निरनिराळया पतपुरवठा करणा-या संस्थांमध्ये नियमितता आणून त्यांना 4 टक्के दराने कर्ज पुरवठा करणे, औद्योगिक प्रशिक्षण मार्केटिंग, पतपुरवठा यावर नियंत्रण ठेवणे, महिला बचत गटाच्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, सहकार महिला बचत गटातील शेतकरी महिलांना सामुदायिक शेतीत सहयोग वाढविणे, दुधाच्या सहकारी संस्था देणे, महिला बचत गटांना आरोग्यविषयक, कायदेविषयक प्रशिक्षण देणे, त्यांना निर्णय प्रक्रियेत आणणे, या सर्व बाबींवर शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात महिलेचा समान सहभाग ही संकल्पना शासनाने मान्य केली आहे. विकास प्रक्रियेमध्ये महिलांचा समान सहभाग हा विचार देखील शासनाने मान्य केला आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना सामावून घेण्यासाठी जी काही आयुधे वापरात आली, योजना केल्या, कायदे केले, उपाययोजना केल्या त्यामध्ये एक महत्वाची बाब आहे ती म्हणजे बचत गट. बचत गट हे महिलांच्या सक्षमीकरणासाठीचे हत्यार म्हणून वापरले आहे. 10-15 महिला एकत्रित येतात, एकत्रित निर्णय घेतात, त्यामध्ये पैसे जमा करतात.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेला उत्तर देणारे त्या विभागाचे मंत्रीमहोदय उपस्थित नाहीत. बचत गटाचा विषय हा ग्राम विकास विभागाकडे आहे.

...3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, बचत गटाची योजना ग्राम विकास विभागाकडून राबविण्यात येते, सहकार विभाग, महिला व बालकल्याण विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ अशा अनेक खात्यांशी संबंधित आहे. हा विषय कोणा एका विभागाची मक्तेदारी नाही. त्यामुळे मला माझे म्हणणे मांडू द्यावे तोपर्यन्त संबंधित मंत्री महोदय उपस्थित होतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण आल्यानंतर कार्यक्रम पत्रिकेतील पहिल्या क्रमांकाची अर्धा-तास चर्चा आपण पुकारली. संबंधित सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी हे सभागृहात उपस्थित नव्हते. त्यामुळे ती अर्धा-तास चर्चा लॅप्स झाली. त्यांनतर आपण दुसरी अर्धा-तास चर्चा पुकारली. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी त्यावरील विचार व्यक्त करण्यास सुरुवात केली आणि माननीय मंत्री श्री.धर्मरावबाबा आत्राम यांनी स्वत:च असे सांगितले की, हा विषय माझ्याकडे नाही. संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, संबंधित मंत्र्यांना आपण निरोप पाठवावा, तोपर्यन्त सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे हे आपले म्हणणे मांडतील.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.48 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये 12 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे. गृह विभागाचे प्रश्न चर्चेला येणार आहेत. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आजच्या कार्यक्रमपत्रिकेतील अनुक्रमांक 4 आणि 7 या अर्धा तास चर्चा प्राधान्याने घेतल्या तर मला खालच्या सभागृहामध्ये उपस्थित राहता येईल.

**तालिका सभापती** : मला असे वाटते की, गृहमंत्री महोदयांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या अर्धा तास चर्चा आधी घेण्यास काही हरकत नाही. ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांचे अर्धा तास चर्चेच्या सूचनेवरील भाषण सुरु आहे. परंतु माननीय गृहमंत्री महोदयांनी विनंती केल्यानुसार क्रमांक 4 व 7 वरील चर्चेच्या सूचना प्रथम घेण्यात येतील. त्यानंतर पुन्हा क्र.2 वरील चर्चा सुरु होईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील मुंबई, ठाणे यासरख्या मोठया शहरातील पोलीस स्थानकात अनेक सुविधांचा अभाव असणे

**मु. शी.** : राज्यातील मुंबई, ठाणे यासारख्या मोठया शहरातील पोलीस स्थानकात अनेक सुविधांचा अभाव असणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.पांरडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" राज्यातील मुंबई, ठाणे सारख्या मोठया शहरातील पोलीस स्थानकात देखील अनेक सुविधांचा अभाव असणे, वाहनांचा अभाव, लेखनसामुग्रीचा अभाव, वाहनदुरुस्ती वेळेवर न होणे, नादुरुस्त झालेली वाहने दिर्घकाळ तशीच असणे, श्रीकृष्ण आयोगाच्या प्रकारणांची पुनर्तपासणी सुरु झाल्याने झेरॉक्सचा खर्च वाढणे. परंतु तो खर्च कसा करावयाचा याची कोणतीही कार्यपद्धती नसल्यामुळे पोलीस स्टेशनमधील कर्मचारी व पोलिसांनी गैरमार्गाचा अवलंब करावा लागणे, पोलीस स्टेशनमधील संगणकासाठी लागणारी काट्रीज मिळत नसल्यामुळे व नादुरुस्त झालेले संगणक वेळीच दुरुस्त करण्याची कोणतीही कारवाई तातडीने होत नसल्यामुळे अनुक कामे प्रलंबित रहाणे, या सर्वांचा परिणाम न्याय प्रक्रियेवर होणे, लोकांना योग्य न्याय मिळण्यात होणारा विलंब व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, विशेष करुन मी जी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे ती राज्यातील मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे यासारख्या मोठया शहरातील पोलीस स्टेशनमध्ये अनेक सुविधांचा अभाव असणे, वाहनांचा अभाव, लेखनसामुग्रीचा अभाव, वाहनदुरुस्ती वेळेवर न होणे, नादुरुस्त झालेली वाहने दिर्घकाळ तशीच असणे, श्रीकृष्ण आयोगाच्या प्रकरणांची पुनर्तपासणी सुरु झाल्याने झेरॉक्सचा खर्च वाढणे, परंतु तो खर्च कसा करायचा याची कार्यपद्धती नसणे, त्यामुळे पोलीस स्टेशनमधील पोलिसांना गैरमार्गाचा अवलंब करावा लागणे, पोलीस स्टेशनमधील नादुरुस्त संगणक वेळीच दुरुस्त होत नसल्यामुळे कामे प्रलंबित रहाणे यासंदर्भात आहे.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

आज पोलीस स्टेशनची अवस्था फार वाईट झालेली आहे. सर्वसामान्य माणूस न्यायदानाच्या प्रक्रियेध्ये भरडला जात आहे. राज्यामधील ठिकठिकाणी असलेल्या पोलीस चौक्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. पोलीस स्टेशनच्या इमारती या फार जुन्या आहेत. त्याचप्रमाणे नादुरुस्तही झालेल्या आहेत. त्यांचे कौलेही फुटलेली आहेत. या पोलीस स्टेशनची टपरेही तुटलेल्या अवस्थेत असतात. पोलीस स्टेशनच्या अनेक इमारती पावसाळयामध्ये गळतात. काही पोलीस स्टेशनध्ये आवश्यक फर्निचरचा देखील अभाव आहे. हा विषय या ठिकाणी अर्धा - तास चर्चेच्या सूचनेच्या स्वरुपात उपस्थित करण्याचा माझा उद्देश असा आहे की, अनेक पोलीस स्टेशन्सची आज दुरावस्था झालेली आहे,अतिशय वाईट अवस्थेत ही पोलीस स्टेशन्स आहेत, ज्या पोलीस स्टेशन्सच्या इमारती नादुरुस्त आहेत, त्या लवकरात लवकर दुरुस्त झाल्या पाहिजेत. एखाद्या पोलीस स्टेशनमध्ये जर तीन लोक गेले तर त्यांना फौजदाराच्या समोर फक्त दोनच खुर्च्या बसण्यासाठी असल्यामुळे तिस-या माणसाला तेथे उभेच राहावे लागते. अनेक वेळेला ज्यावेळी लोकप्रतिनिधी पोलीस स्टेशनमध्ये जातात,त्यावेळी पोलीस स्टेशनध्ये मेंटेन केल्या जाणा-या स्टेशन डायरीची या डायरीमध्ये तक्रारी लिहून घेण्याकरिता जो कागद वापरला जातो, तो अतिशय जुना,खाकी रंगाचा जीर्ण असा कागद वापरला जातो आणि त्यावर तक्रार लिहून ज्यावेळी त्याची एखाद्या केससंदर्भात चार्जशीट कोर्टात दाखल केली जाते,त्यावेळी ती चार्जशीट वाचतांना त्या कागदावरील तक्रार वाचता येत नाही. या सर्व बाबींची दखल घेणे आवश्यक आहे. काही ठिकाणच्या नादुरुसत पोलीस स्टेशन्सच्या इमारतीबाबत मी कंपलेंट दिलेली आहे,ते दुरुस्त करण्याची व्यवस्था लवकरात लवकर होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागामध्ये तर अशी अवस्था आहे की, एखादा व्यक्ती जर आपली तक्रार नोंदविण्याकरिता पोलीस स्टेशनमध्ये गेला तर त्याला प्रथम कागद आणा मगच तुमची तक्रार नोंदवून घेतो,असे सांगितले जाते. पोलिसांची वाहने देखील अत्यंत नादुरुस्त अवस्थेत आहेत. मागचया अधिवेशनातही हा प्रश्न मी या सदनामध्ये उपस्थित केला होता. ज्या वाहनांची तुम्ही काही लोकांना सिक्योरिटी दिलेली आहे. मी विरोधी पक्ष नेता,विधानपरिषद असल्यामुळे मलाही सिक्योरिटीकरता एक वाहन देण्यात आलेले आहे. ज्यावेळी आम्ही रस्त्यावरुन जात

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

असतो,त्यावेळी पोलीस खात्याने दिलेले सिक्योरिटीचे वाहन आमच्यापासून 25 किलोमीटर लांब असते, अशा वाहनांचा काय उपयोग ? मी तर ब-याच वेळेला त्या वाहनचालकाला सांगतो की, तुम्ही जर माझ्या 25 किलोमीटर मागे राहत असणार तर मग आपल्या सिक्योरिटीचा मला काय उपयोग आहे,त्यापेखा तुम्ही माझ्याबरोबर येऊ नका. मुंबईमध्ये तर काही ठिकाणी पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे वाहन नादुरुस्त अवस्थेत पडलेले असते, त्यामुळे तक्रारदाराला स्वत:च्या पैशातून टॅक्सी करुन पोलिसांना घटनास्थळी तपास करण्याकरिता घेऊन जावे लागते. मुंबईतील व इतर ठिकाणच्या सर्व पोलीस स्टेशनमध्ये ज्या काही आवश्यक सुविधा लागतात,त्या सर्व त्यांना लवकरात लवकर पुरविण्यात आल्या पाहिजेत. उदा.फर्निचर,पाण्याच्या पिण्याची व्यवथा,स्टेशनरी,वाहने,वगैरे. काही पोलीस स्टेशनमध्ये तर पिण्याच्या पाण्यची इतकी बेकार अवस्था असते की, पोलीस स्टेशनच्या बाहेर 2-4 बाटल्या पाणी असलेले मडके असते, त्यामधूनच आरोपी,पोलीस,तेथे येणारी लोक पाणी पितात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देखील पोलीस स्टेशनची जर अशी दुरावस्था असेल तर ही खेदाची बाब आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देखील पोलीस स्टेशनची अशी दुरावस्था असेल तर ही खेदाची बाब आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 60 वर्षांनी सिक्योरिटी ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये लागणारी ऑफिशियल्स नीट असली पाहिजे. पोलीस स्टेशन सुध्दा दुरुस्त झाली पाहिजेत. पोलीस स्टेशनमधील स्टेशन डायरी मेंटेन करण्याकरिता चांगल्या प्रतीच्या कागदांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. सदर स्टेशन डायरीची प्रत ज्यावेळी कोर्टामध्ये चार्जशीट म्हणून दाखल करण्याची वेळ येते,त्यावेळी ती चार्जशीट फिर्यादी,आरोपी,फौजदार काय,मॅजिस्ट्रेटला देखील वाचता येत नाही. इतका तो कागद जुना व जीर्ण असतो. सगळीकडे आता संगणक आलेले असतांना पोलीस स्टेशनमध्ये देखील स्टेशन डायरी मेंटेन करण्यासाठी संगणकीकरण व्हावे. उपरोल्लेखित सर्व गोष्टींचा खर्च,फर्निचर,वाहनदुरुस्ती,संगणकीकरण आपण या ठिकाणी पुरवणी मागण्यांचया माध्यमातून जर मागितला तर आम्ही काही त्याला विरोध करणार नाही. ठिकठिकाणचे पोलीस स्टेशन अतिशय दुरावस्थेत असलेले आपल्याला आढळून येतील.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

PNG/ D/ KTG/ पूर्वी कु.खर्चे 11:00

श्री.पांडुरंग फुंडकर .....

काही इमारतींना 50 वर्षे झालेली आहेत, ज्या इमारती दुरुस्त झालेल्या आहेत, त्यांची डागडुजी केली जात नाही. कौले फुटलेली आहेत. जुन्या इमारतीतील आरोपी छत तोडून फरार होत आहेत, आपल्याकडे अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होत आहेत. माझा मूळ प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या राज्यात पोलीस स्टेशनच्या इमारती नीट दुरुस्त झाल्या पाहिजेत, त्यांना फर्निचर व्यवस्था, वाहनाची देखभाल, चांगली वाहने दिली पाहिजेत. कारण शेवटी आरोप पोलिसांवर होत आहेत. वाहन चांगले नसेल तर पोलीस आरोपीमागे धावू शकत नाही. याचा साकल्याने विचार करुन पोलीस स्टेशनची दुरावस्था व या त्रुटी दूर करण्याची आवश्यकता आहे. शासनाने याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती मी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने करतो.

**तालिका सभापती** : माझी माननीय सदस्यांना विनंती आहे की, एकूण 11 अर्धा-तास चर्चेच्या सूचना कामकाज पत्रिकेवर आहेत. सभागृहाची नियमित बैठक सुरु होण्यापूर्वी म्हणजे दुपारी 12.45 वाजेपर्यंत अर्धा-तास चर्चा आपणास संपवायच्या आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्दे मांडून मंत्री महोदयांनी त्यांना उत्तर द्यावे म्हणजे सर्व प्रश्नांना न्याय मिळेल. आता माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या अर्धा-तास चर्चेस उपमुख्यमंत्री, गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे उत्तर देतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री, गृहमंत्री) : सभापती महोदय, मी विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. त्यांनी एका योग्य व महत्वाच्या प्रश्नावर सभागृहाचे व माझे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

एकंदरीत गृहखात्यावरील चर्चा म्हणजे एकतर पोलिसांवरील टीका किंवा गृहमंत्र्यावर टीका याच्या पुढे अनेकवेळा सरकत नाही. परंतु पोलीस खात्याच्या प्रश्नावर नेहमी चर्चा कमी होते. अर्धा-तास चर्चा या संसदीय आयुधाच्या माध्यमातून त्यांनी आपले लक्ष वेधले आहे. याबाबत मी नम्रपणे सांगू इच्छितो की, काही बाबी करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. अर्थात जेवढया अपेक्षा आपण व्यक्त केलेल्या आहेत, तेवढया पूर्ण झाल्याचा माझा दावा असू शकत नाही. अजूनही खूप काही करण्याची नितांत आवश्यकता आहे. पोलीस स्टेशनमध्ये तपास कामाला पूरक वातावरण, चांगल्या इमारती, आधुनिक वाहने देण्यासाठी काही गोष्टी केलेल्या आहेत व काही प्रलंबित आहेत. 2000 मध्ये देशभरातील पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे. राज्य सरकार व केंद्रसरकारने संयुक्तपणे पोलिसांचे मॉडर्नायझेशन अंमलात आणण्यासाठी सुरु केलेले आहे. पोलीस स्टेशन व चौक्या बांधणे, आधुनिक वाहने, आधुनिक उपकरणे पोलिसांना उपलब्ध करुन देण्यासाठी सुरु केलेले आहे. मला आनंद वाटतो की, देशातील अन्य राज्याच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रातील पोलिसांनी निश्चितपणे चांगले काम केलेले आहे. 2000 ते 2007 पर्यत जवळपास 840 कोटी रुपये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी साधनसामुग्री व पोलीस स्टेशनवर शासनाने राज्यात खर्च केलेले आहेत. जुनी वाहने बदलून नवी वाहने घेण्यात आलेली आहेत. 3545 जुनी वाहने बदलून तेवढीच नवीन वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पोलिसांची वाढणारी संख्या लक्षात घेऊन 4446 नवीन वाहने आपण घेतलेली आहेत. अशी 7791 वाहने पोलिस दलाकरिता नव्याने उपलब्ध झालेली आहेत. यावर्षी या योजनेकरिता 100 कोटी रुपये उपलब्ध आहेत. मॉडर्नायझेशनसाठी चांगल्या पध्दतीने पैसे दिले जातात. परंतु एक गोष्ट खरी आहे की, आज पोलीस स्टेशनला किती कागद, सादील लागतात, अन्य कोणत्या सुविधा लागतात याचे अलिकडच्या काळामध्ये वाढलेल्या कामाचे स्वरुप लक्षात घेऊन आम्ही फार डिटेलमध्ये जाऊन सर्वेक्षण केलेले नाही. म्हणून प्रत्येक रिजनमधल्या पोलीस स्टेशनच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला पाठवून सर्वेक्षण करण्यात येईल. यामध्ये पोलीस स्टेशन चांगले करण्यासाठी

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

नेमक्या कोणत्या साधनसामुग्रीची आवश्यकता आहे हे पाहिले जाईल. त्याप्रमाणे येणाऱ्या बजेटमध्ये वाढीव अनुदान यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. मागच्या एका चर्चेच्या वेळी विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, पायलट गाडया पळत नाहीत. आमच्या गाडीच्या मागे हया गाडया 25 किलोमीटर मागे राहतात, अशा प्रकारची तक्रार केली होती. मी पर्सनली दोन्ही सदनाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या बाबतीत असे घडू नये असे सांगितले होते.

श्री.पांडुरग फुंडकर : सभापती महोदय, केवळ माझ्या बाबतीत नव्हे तर मंत्री महोदयांच्या बाबतीतही मी बोललो होतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी विरोध पक्ष नेत्याच्या पायलट वाहनाबाबत योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. आता मंत्री महोदयांच्या पायलट वाहनाबाबत योग्य त्या सूचना देण्यात येतील. मी विनंती करु इच्छितो की,

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

यासंदर्भात मी कधीतरी दालनामध्ये आपल्याशी चर्चा करीन. सभापती महोदय, नेते मंडळी ही व्हीआयपी आहेत. त्यामुळे त्यांना सुरक्षितता देणे महत्वाचे आहे. मुंबई, पुणे येथे एक्सप्रेस हायवे आपण केलेला आहे. तेथे 80 किमी. ही वेगाची मर्यादा आहे. परंतु अनेकदा माननीय मंत्री महोदयांच्या गाडया या 80 कि.मी या वेगापेक्षा अधिक वेगाने धावत असतात. पोलिसांनी या नियमाचे उल्लंधन करावे की त्या गाडयांच्या मागे रहावे असा प्रश्न निर्माण होतो. पोलीसांच्या गाडया देखील भरधाव पळणाऱ्या असतात. परंतु नियमांचे उल्लंघन करु नये याकरिता त्या गाडया माननीय मंत्री महोदयांच्या गाडयांच्या मागे धावत असतात. याचा अर्थ पोलिसांची गाडी पळत नाही असा काढला जातो. आपण याबाबतीत वेगावर भान ठेवण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा झालेला अपघात आपलयाला माहीतच आहे. पोलीस बंदोबस्तासाठी चांगल्या गाडया असण्याची आवश्यकता आहे त्या दिल्या जातील. पोलिसांचे ऑफीस नीटनेटके असावे, ते गळणारे असू नये याची काळजी घेण्यात येईल. मुंबईमधील अनेक पोलीस चौक्या या अनधिकृत आहेत असा न्यायालयाने निर्णय दिला आहे. यासंदर्भात मुंबई महापालिकेने खुलासा केलेला आहे. या चौक्या अनेक वेळा जनतेच्या सुरक्षिततेसाठी बांधल्या जातात. पोलीस सेवा ही जीवनावश्यक सेवा आहे. काही वेळा प्रस्थापित नियम बाजूला करुन लोकांना सेवा देण्यासाठी आणि त्यांच्या गरजा भागविण्यसाठी अशा प्रकारे पोलीस चौक्या बांधल्या जातात. महाराष्ट्रामध्ये जी महानगरे आहेत, तेथे पोलिसांची सेवा ही जीवनावश्यक सेवा झाली आहे. हे लक्षात घेऊन पोलीस चौक्या बांधण्यासाठी अधिकृत जागा उपलब्ध करुन दिली जाईल.

आज महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी पोलीस चौक्या नाहीत ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे काही ठिकाणी पोलीस खाजगी प्रायोजक नेमतात असे लक्षात आलेले आहे. मग प्रायोजक आपल्या नावाचा बोर्ड त्या चौकीवर लावतो. असे लोक पोलिसांच्या गैरसोयीचा फायदा घेऊन मिरवतात. सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी आपणास सांगू इच्छितो की, या पुढील काळामध्ये, खाजगी प्रायोजकांकडून पैसे घेऊन कोठलीही चौकी बांधली जाणार नाही. हे शासनाचे अधिकृत धोरण आहे. तसेच ज्या ठिकाणी प्रायोजकाच्या नावाचे बोर्ड लावलेले आहेत ते हटविण्यात येतील.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

पोलीस स्टेशन जनतेचे आहे. चार हजार रुपयांमध्ये चौकी बांधून द्यावयाची व 40 हजार रुपयांचा बोर्ड तेथे लावायचा या प्रसिध्दी तंत्राला यापुढे शासन बळी पडणार नाही.

माननीय श्री. फुंडकर साहेब, ही गोष्ट खरी आहे की, आज काही पोलीस स्टेशन तर आपण सोडूनच देऊ परंतु काही जिल्हयाच्या ठिकाणी, पोलीस मुख्यालये देखील नाहीत. यासाठी बजेटमधून तरतूद देऊ असे म्हटले तरी त्यास नेहमीच मर्यादा येतात.. पोलिसांच्या कामासाठी पैसे द्यावयाचे म्हटले तर राज्यातील अनेक प्रश्न समोर येतात. कधी शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो, कधी कुपोषणाचा प्रश्न असतो, तर काही वेळेला विकासाचा प्रश्न निर्माण होतो. पोलिसांसाठी केला जाणारा खर्च हा विकास कामांसाठी केला जाणाऱ्या खर्चाचा भाग मानला जात नाही. म्हणून पिढयानपिढया ,पोलीस यंत्रणा गैरसोयीमध्ये आहे. मुबईमध्ये कॅबिनेटने एक निर्णय घेतला की, पूर्वी पोलिसांच्या ताब्यात असलेल्या जागा गावाच्या बाहेर होत्या. परंतु आता गावाचा विस्तार झाल्यामुळे त्या जागा गावात आल्या व त्या अतिशय किमती झालेल्या आहेत. सर्वच विभागांनी सूत्र स्वीकारलेले आहे की, या जागांचा व्यापारी तत्वावर वापर करुन जिल्हयाच्या ठिकाणी असलेले पोलीस स्टेशन किंवा पोलीस मुख्यालय, पोलीस क्वार्टर तेथे बांधावे. आम्ही याबाबत अभ्यास करीत आहोत. याबाबत संपूर्णपणे पारदर्शी कारभार ठेवू. त्यामध्ये कोठेही शंकेला जागा राहणार नाही. संपूणपणे ट्रान्सपरन्सी ठेवण्यात येईल. अशीच भूमिका राज्याच्या अन्य विभागासाठी देखील घेण्यात येईल. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, ऑरंगाबाद येथे जनतेला वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अतिरेकी, आतंकवादी तसेच अंडरवल्ड यांच्या कारवायांना सामोरे जावे लागत आहे. जनतेच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड शासनाकडून करण्यात येणार नाही. याबाबत अतिशय गंभीरपणे विचार करण्यात येईल. मॉर्डनायझेशन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा विचार केला जाईल. येणाऱ्या बजेट सेशनमध्ये प्रत्येक पोलीस स्टेशनच्या किमान गरजा काय आहेत हे लक्षात घेऊन एक प्लान तयार करण्यात येईल. व त्यामध्ये दाखविलेल्या तरतुदी देखील मंजूर करुन घेतल्या जातील. याठिकाणी चर्चेच्या माध्यमातून , पोलिसांच्या अडचणींबाबत येथे आपण अर्धा तास चर्चा उपस्थित केली त्याबद्ल मी आपले धन्यवाद व्यक्त करतो.

यांनतर श्री. सुंबरे......

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा एकच मुद्दा राहिला आहे, किंबहुना माझ्या पहिल्या भाषणामध्येच तो मुद्दा मांडण्याचे राहून गेले होते त्यामुळे तो मुद्दा माननीय उपमुख्य मंत्र्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी आपण मला परवानगी द्यावी. सभापती महोदय, हल्ली पोलिसांना हक्काची रजा मिळणे मुष्किल झाले आहे तसेच गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे पण पोलीस ठाण्यांची संख्या मात्र आहे तेवढीच आहे. परिणामी पोलिसांना त्यांच्या हक्काची किरकोळ रजा ज्याला आपण कॅज्युअल लीव्ह म्हणतो ती रजा देखील घेता येत नाही आणि एकूणच पोलिसांवरील ताण वाढतो आहे. शेवटी पोलीस कर्मचारी हा देखील माणूसच आहे आणि त्यालाही संसार आहे याचा विचार या दृष्टीकोनातून त्यालाही हक्काची किरकोळ रजा मिळावी आणि त्याच्यावरील ताण काही प्रमाणात का होईना कमी व्हावा या दृष्टीने आपण विचार करावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी जो विषय मांडला आहे त्याला माननीय उपमुख्य मंत्री तथा गृहमंत्री यांनी चांगल्या प्रकारे उत्तर दिले आहे. पण आज मुंबई, विशेष करून ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या प्रचंड झालेली आहे. त्यामुळे तेथील गुन्हेगारीमध्ये देखील प्रचंड वाढ झालेली आहे. त्यामुळे या निमित्ताने माझ्या तीन मागण्या मी माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे करणर आहे. एक म्हणजे जो दुर्गम, डोंगराळ, आदिवासी भाग आहे त्यामध्ये देखील गुन्हेगारीत वाढ झालेली आहे. त्यामुळे तेथील पोलीस ठाण्यांकडेही आपण अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्याशिवाय पश्चिमेकडील किनारपट्टीच्या भागामध्ये सागरी आयुक्तालयाचा प्रश्नदेखील आहे. हे सागरी आयुक्तालय स्थापन होणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. तरी त्या बाबत देखील आपण अगत्याने विचार करावा. तसेच ठाण्यातील दोन पोलीस ठाण्यांबाबत मला आपल्याला सांगावयाचे आहे. ठाणे महापालिकेच्या क्षेत्रात असलेल्या, दीड लाख लोकवस्ती असलेले कळवा हे शहर आहे आणि तेथील पोलीस ठाणे मात्र त्या शहराच्या हद्दीबाहेर आहे. खरे तर संपूर्ण दीड लाख लोकवस्ती असलेल्या कळव्याच्या भागामध्येच पोलीस ठाणे असले पाहिजे. त्यांनी त्यासाठी चार एकर जमीन, खार जमीन यासाठी मागितली आहे अशी माझी माहिती आहे. तेव्हा गेली 7-8 वर्षे झाली शहराबाहेर पोलीस ठाणे हा एक वेगळाच अनुभव तेथे येतो आहे. तसेच भाईंदर येथे देखील पोलीस ठाण्यासाठी इमारत तयार आहे, पदे देखील मंजूर आहेत. याबाबत माननीय गृह राज्यमंत्र्यांनी ऑगस्ट मध्ये तेथील नवघर येथे पोलीस ठाणे सुरू होईल असे

...... एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केळकर ....

सांगितले होते. पण अद्याप त्याबाबत कार्यवाही झालेली नाही. परिणामत: आजही तेथील लोकांना साधा एफआयआर दाखल करावयाचा असला तरी दोन कि.मी. जावे लागते. तेव्हा तेथे आपण एक पोलीस ठाणे मंजूर करून त्यासाठी पोलीस स्टाफ देखील मंजूर करावा अशी मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे दोन्ही प्रश्न पोलिसांच्या संख्येशी निगडित आहेत. ठाणे येथे नवीन पोलीस ठाणी आणि पोलिसांवरील अतिरिक्त ताण या बाबत मेकेंझी समितीने जो अहवाल दिला आहे त्यामध्ये पोलिसांना 3 महिन्यात एकही सुटी मिळत नाही हे स्पष्ट नमूद केले आहे. तसेच कसलीही सुटी न घेणारे 70 टक्के लोक या विभागात आहेत आणि पोलिसांचे सरासरी कामाचे तास 14 असल्याचेही नमूद केले आहे. इतकी अमानुषता अन्य दुसरीकडे कोठेही, कोणत्याही विभागातील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत नाही. अगदी मिलिटरीमध्ये देखील नाही. त्यापेक्षाही मोठा ताण आपल्या पोलिस कर्मचारी-अधिकाऱ्यांना आज सहन करावा लागतो आहे यात शंका नाही. तेव्हा या बाबतीत मंत्रिमंडळापुढे जाऊन पोलिसांच्या बाबतीतील निकष बदलून घेणे आवश्यक आहे. आजच्या निकषानुसार देखील पोलीस वाढविले पाहिजेत. त्या सर्वांचा अभ्यास करून आणि तज्ज्ञांनी याबाबतीत व्यक्त केलेली मते लक्षात घेऊन 55 हजार पोलीस कर्मचारी वाढविले पाहिजेत हा निर्णय शासनाने घेतला. पण एकाच वेळी ही सर्व पदे भरली तर त्यांच्या प्रमोशनच्या बाबतीतही पुढे अडचणी येतात शिवाय इतक्या लोकांना प्रशिक्षण देण्याची सोय देखील आपल्याकडे नाही हे लक्षात घेऊन टप्प्याटप्प्याने पोलीस भरती करण्याचे आपण ठरविले आणि त्याप्रमाणे प्रथम 11 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची पदे भरावयाची आणि त्यांना प्रशिक्षण द्यायचे असे आपण ठरविले त्याप्रमाणे आपण पहिल्या टप्प्यात 11 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती केली आहे आणि ते पोलीस प्रशिक्षण घेऊन जेव्हा आपल्या दलात सामील होतील तेव्हा त्यांच्यासह इतरांनाही आपण किमान 8 तासांची ड्युटी आणि एक दिवस हक्काची रजा उपलब्ध करून देऊ शकू असा आम्हाला विश्वास आहे. अशा पद्धतीने टप्प्याटप्प्याने आपण 55 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करणार आहोत, त्यांना प्रशिक्षित करणार आहोत. असे हे प्रशिक्षित 55 हजार कर्मचारी आपल्या दलात भरती होतील तेव्हा साहजिकच पोलीस दलाला अधिक बळ प्राप्त होईल आणि त्यातून त्यांच्यावरील कामाचा ताण कमी होईल आणि त्यांना हक्काच्या रजा घेणे देखील

...... एफ 3 ...



KBS/ KTG/ D/ कु. गायकवाड नंतर --- 11:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शक्य होईल. पण आताच आपण पोलीस ठाणी वाढविली तर अगोदरच आहेत त्या कर्मचाऱ्यांतून त्यांना कर्मचारी द्यावे लागतील आणि अगोदरच त्यांच्यावर ओव्हर बर्डन असताना त्यांच्यातील आणखी कर्मचारी कमी केले तर ती ठाणी आणि त्यातील पोलीस हे सक्षम होणार नाहीत. म्हणून नवीन भरती केलेले अधिकारी व कर्मचारी जसजसे आपल्या दलात सामील होतील तस तसे आहेत त्या पोलिसांवरील कामाचा ताण कमी होईल आणि आपल्याला पोलीस ठाणी देखील वाढविता येऊ शकतील. ..

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : मी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, कळवा पोलीस ठाणे हे जवळपास 3 लाख लोकवस्तीच्या शहराच्या बाहेर आहे, अशी परिस्थिती अन्यत्र कोठेही नाही. तेव्हा पोलीस ठाणे हे शहराच्या हद्दीमध्ये तरी असायला पाहिजे. तरी त्याप्रमाणे आपण काही सोय करणार का ?

( यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ज्यांच्यासाठी जागा उपलब्ध नाहीत, इमारती उपलब्ध नाहीत त्यांच्याकरिता शासन कार्यक्रम आखीत आहे. समाजामध्ये पोलीस स्टेशन ही एक जीवनावश्यक, अत्यावश्यक बाब आहे. पोलीस स्टेशन हे वस्तीच्या नजिक उपलब्ध असले पाहिजे. म्हणून गावच्या हद्दीमध्ये पोलीस स्टेशन उपलब्ध होईल यासाठी एक कृती कार्यक्रम तयार करुन संपूर्ण राज्यभरामध्ये ही सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल.

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : अर्धा तास चर्चा संपलेली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करणे

मु. शी. : राज्यातील पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करणे या संबंधी
डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करते.

"राज्यातील पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करण्याबाबत त्यांच्या संघटनेने सतत मागणी करुनही ती देण्याचे शासनाने वारंवार आश्वासन देऊनही अद्याप वेतनवाढ करण्यात न येणे, तसेच राज्यातील शेकडो पोलीस पाटलांची पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याने ती तात्काळ भरण्याबाबत शासनाने आश्वासन देऊनही ती भरलेली नसणे, पोलीस पाटलांच्या मानधनात सुयोग्य वाढ व ती तात्काळ करण्याची नितांत आवश्यकता व रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने केलेली अक्षम्य टाळाटाळ, शासनाने नव्याने सुरु केलेल्या तंटामुक्त मोहिमेमुळे पोलीस पाटलांचे काम मोठया प्रमाणावर वाढणे, सध्याच्या महागाई दिवसात पोलीस पाटलांना मिळत असलेले तुटपुंजे वेतन, ते वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

सभापती महोदय, समाजातील आणि खासकरुन पोलीस विभागातील जो उपेक्षित घटक आहे त्या पोलीस पाटलांबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. दरवर्षी नागपूरचे हिवाळी अधिवेशन डिसेंबर महिन्यामध्ये होते. हा अनेक वर्षापासून प्रघात आहे. काही अधिवेशनामध्ये अशा काही घटना घडत असतांना त्याचे दूरगामी परिणाम अनेक कुटुंबावर होत असतात. त्याप्रकारची पोलीस पाटलांची ही समस्या आहे. माननीय उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांच्या स्मरणात असेल की, सन 2003 मध्ये पोलीस पाटील त्यांच्या मागण्यांची दाद मागण्यासाठी नागपूरला पोहोचत असतांना त्यांच्या जीपला अपघात झाला. त्यामध्ये 11 पोलीस पाटील दगावले. त्यांच्या कुटुंबियांना शासनाने नंतर मदत करुन त्यांची व्यवस्था केली आहे. परंतु ज्या प्रश्नासाठी ते तळमळत होते त्याकरिता त्यांना न्याय मिळावा अशा अपेक्षेत असतांना त्या पोलीस पाटलांना अजून न्याय मिळाला नाही. राज्यामध्ये पोलीस पाटलांच्या 9 हजार जागा रिक्त आहेत. त्याचे परिणाम गाव पातळीवर,पोलीस यंत्रणेवर होत असतात. पोलीस पाटील हे गावच्या रक्ताभिसरणातील फार महत्वाचे घटक आहेत. ज्याप्रमाणे शरीरात एखाद्या ठिकाणी रक्त केंद्रीत झाल्यावर संपूर्ण शरीरावर त्याचे परिणाम होतात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्याप्रमाणे गाव पातळीवर पोलीस पाटलांची यंत्रणा नसेल तर प्रत्येक वेळी त्याचे दुष्परिणाम स्थानिक पोलीस स्टेशनवर होत असतात. त्यामुळे धरणे धरण्याकरिता हे पोलीस पाटील नागपूरला पोहोचले आहेत. पोलीस पाटलांच्या संघटनेचे पदाधिकारी श्री. मनोज राऊत आणि श्री. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बीड येथे दिनांक 22 एप्रिल 2006 रोजी माननीय गृहमंत्री व इतर माननीय मंत्र्यांच्या उपस्थितीत मागणी केली होती. त्या मागण्यांमध्ये मानधन वाढवून मिळण्याची मागणी आहे. आज त्यांना अतिशय तुटपुंजे मानधन मिळते. त्याचप्रमाणे त्यांना वार्षिक प्रवास भत्ता मिळाला पाहिजे अशीही मागणी आहे. या पोलीस पाटलांच्या संघटनेने केलेल्या मागण्या न्याय्य व योग्य असून त्या अनेक वेळा केलेल्या आहेत. एका पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये जाऊन त्यांना रिपोर्ट करावा लागतो. त्यासाठी त्यांना प्रवास खर्च करावा लागतो. पोलीस पाटलांनी आपले काम नीट केले पाहिजे यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. तिसरी मागणी अशी आहे की, जर त्यांचा अपघात झाला तर त्यापासून त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. पोलीस पाटलांच्या भरतीमध्ये त्यांच्या वारसांना प्राधान्य दिले पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांनी निवृत्ती वेतनाची मागणी केली आहे. जे पोलीस अधिकारी चांगले काम करतात त्यांना माननीय राज्यपालांच्या हस्ते, माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते मोठ मोठी पदके मिळतात. ते पदक म्हणजे त्या अधिकाऱ्याच्या जीवनातील एक महत्वाचा लक्षणीय प्रसंग असतो. पोलीस खात्यामध्ये मोठमोठे महत्वाचे निर्णय होत असतांना अशा चांगले काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांकडे खात्याचेही लक्ष असते. त्याप्रमाणे चांगले काम करणाऱ्या पोलीस पाटलांना एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी याकरिता माननीय राज्यपाल, माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार मिळणे अपेक्षित आहे. त्यामधून त्यांना प्रोत्साहन मिळणे अपेक्षित आहे. महत्वाची बाब अशी की, ज्या योजनेची खूप चर्चा केली जाते, खूप गाजावाजा केला जातो त्या तंटामुक्त गाव योजनेचा कार्यक्रम राबवीत असतांना आणि गाव तंटामुक्त करीत असतांना जर तंटे निर्माण झाले तर त्याची जबाबदारी पोलीस पाटलांवर येते. गावात अधिक तंटे होऊ नये यासाठी ग्रामसभा घेणे, बैठका घेणे इत्यादीचे पोलीस पाटलांचे काम वाढले आहे. त्यांच्या या प्रश्नासंबंधी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये विचार होईल अशी अपेक्षा होती. माननीय उपमुख्यमंत्री राज्यातील पोलीस पाटील किती उपेक्षित आहेत याबाबत सदनासमोर म्हणणे मांडीत असतात. महाराष्ट्रातील झोपडपट्टीवासिय, प्रकल्पग्रस्त आणि पिडित लोकांपेक्षा जास्त पोलीस पाटील उपेक्षित आहेत अशाप्रकारचे उत्कृष्ट निवेदन माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये

डॉ. नीलम गोऱ्हे....

करतात. तेव्हा खऱ्या अर्थाने हे पोलीस पाटील उपेक्षित असून त्यांच्या मागण्या कालबध्द पध्दतीने कधी मान्य होतील याबाबत ठोस अशी घोषणा व कार्यवाही झाली पाहिजे. औरंगाबादच्या खंडपिठाकडून याबाबत निर्णय दिला गेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये अडचणी व त्रुटी काय आहेत?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

यासंदर्भात योग्य तो निर्णायक तोडगा शासनाचे प्रतिनिधी आणि गृहमंत्री यांच्यावतीने व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. पोलीस पाटलांच्या बाबतीत याच अधिवेशनात, ते घरी पोहोचण्याच्या अगोदर शासनाने ठोस असा निर्णय जाहीर करावा अशी मी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने विनंती करीत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, पोलीस पाटील हा पोलीस दलाचा गाव पातळीवरील महत्वपूर्ण दुवा आणि शेवटचा घटक आहे. प्रत्येक गावाला एक कॉन्स्टेबल किंवा पोलीस देऊ शकत नाही. शासकीय मालमत्तेचे रक्षण करणे, पोलिसांना गावात घडणाऱ्या गुन्ह्यांची माहिती देणे, काही गुन्ह्यांच्या बाबतीत आगाऊ कल्पना देणे, गावातील समंजस्य टिकवण्याच्या बाबतीत पोलीस पाटील हे महत्वपूर्ण पद आहे. आज त्यांना 800 रुपये मानधन दिले जाते. 2004 साली त्यांचे शिष्टमंडळ मला भेटले होते. त्यावेळी थोडा अधिकचा पुढाकार अन्य मंत्र्यांच्या बरोबरीने मीही घेतला होता. 2004 साली त्यांच्या मानधनामध्ये 300 रुपयांची वाढ करीत त्यांचे मानधन 800 रुपये केले. पूर्वी त्यांचे मानधन 500 रुपये होते. आज त्यांना 800 रुपये मिळतात. पोलीस स्टेशनला नवीन पोलीस इन्स्पेक्टर आला की तो पोलीस पाटलांची बैठक लावतो. नवीन पोलीस अधीक्षक आला की तो पोलीस पाटलांची बैठक लावतो. नवीन डी.वाय.एस.पी. आला की तो पोलीस पाटलांची बैठक लावतो. गावात काही प्रसंग घडला तर पोलीस पाटलाला बोलवले जाते. त्यांना खर्चाचे काहीही पैसे देत नाही. त्यांना टी.ए., डी.ए. नाही. पोलीस कर्मचारी गावात आला तर माणुसकीच्या दृष्टीने त्याच 800 रुपयामधून त्यांना चहा द्यावा लागतो. ही न परवडणारी बाब आहे. पोलीस पाटील पदाचा आब राखावा म्हणून त्याला काही करता येत नाही. गावातील चित्र मी जवळून पाहिले आहे. त्यांचा पगार थोडा वाढविला पाहिजे आणि ही सेवा अधिक सक्षम बनवली पाहिले या सन्माननीय सदस्यांच्या विचाराशी मी निश्चितपणे सहमत आहे. पगार किती वाढवावयाचा याचा मंत्रिमंडळामध्ये निश्चित विचार करु. आज आपल्या राज्यामध्ये पोलीस पाटलांची एकूण 38,208 पदे मंजूर आहेत. त्यातील 10732 पदे रिक्त आहेत. 2004 साली ज्यावेळी त्यांचे शिष्टमंडळ आले होते तसेच आपण ज्या अपघाताचा उल्लेख केला त्यावेळी मी शब्द दिला होता. त्यावेळी एकूण 8019 पदे रिक्त होती. त्याच्या एकतृतियांश म्हणजे 2673 पदे भरण्याचा निर्णय घेतला. ती पदे भरलेली आहेत. बाकीची शिल्लक राहिलेली पदे आणि नव्याने रिक्त झालेली पदे अशी एकूण 10732 पदे आज रिक्त आहेत. आमच्या विभागाकडून प्रस्ताव सुरु आहे. वित्त विभागाबरोबर याबाबतीत चर्चा सुरु आहे. 10732 पदांपैकी एकतृतीयांश पदे तातडीने भरण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. वित्त विभागाची मान्यता मिळाल्याबरोबर ही एकतृतियांश पदे भरण्यात

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

श्री. आर. आर. पाटील ....

येतील. आतापर्यंत पोलीस पाटील म्हणजे गावातील जमीनदार किंवा वंशपरंपरागत म्हणून काम करीत होते. त्याला मानाची अपेक्षा होती. त्याला मानधनाची गरज नव्हती. परंतु आज सूत्र बदलले आहे. आता 30 टक्के महिला नव्याने पोलीस पाटील व्हावयास लागल्या आहेत. व्ही.जे.एन.टी., ओ.बी.सी., मागासवर्गीय यांच्यासाठी पोलीस पाटील पदामध्ये आरक्षण ठेवले आहे. हे परंपरागत गावामध्ये नेतृत्व न करणारे गरीब घटक आहेत. त्यांना पोलीस पाटील होण्याचा सन्मान मिळत आहे. त्यामुळे परंपरेने देण्यात येणारे मानधन त्यांना पुरेसे ठरु शकत नाही. कारण उपेक्षित, आर्थिकदृष्टया दुर्बल समाज घटक आज पोलीस पाटील पदावर नियुक्त केले जात आहेत. त्यांनी आपली सेवा प्रभावीपणे द्यावी, त्यांचा योग्य सन्मान राखला जावा म्हणून निश्चितपणे या मानधनामध्ये वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल आणि अभ्यास करुन तशा पध्दतीचा प्रस्ताव वित्त विभागाला पाठविण्यात येईल आणि मंत्रिमंडळ लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : असेच आश्वासन आपण सातत्याने देता परंतु वित्त विभागाने मंजुरी दिली नसेल म्हणून की काय पण त्यांना पगारवाढ मिळत नाही. येत्या बेजेटमध्ये याचा समावेश असणार की त्याच्या आधीच निर्णय घेणार ? यासंदर्भात एक दोन महिन्यात किंवा पुढच्या बजेटपर्यंत हे होईल अशी कालमर्यादा आपण सांगावी. नाही तर चर्चाच होत राहील. अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे. हे पद वंशपरंपरागत न राहता ज्यांची पोलीस पाटील होण्याची इच्छा आहे, जे सक्षम आहेत त्यांनी पोलीस पाटील व्हावे. शिरुर तालुक्यातील गुनाट गावी लहानू अबनावे नावाची महिला 10 वर्षे काम करीत आहे. त्यांनी दहा बारा गावांमध्ये महिलांचे संघटन केले आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ पूर्वी श्री. बरवड 11:25

(डॉ. नीलम गो-हे....)

ती चर्मकार समाजाची मुलगी आहे. तिने पोलीस पाटलाच्या पदासाठी अर्ज केल्यानंतर कल्याण, नाशिक येथून जीपमधून माणसे येऊन त्यांनी तिला धमक्या दिल्या. जे लोक निस्पृह आहेत, ज्यांची क्षमता आहे, गावागावातून पुढे येणारी अशी जी माणसे आहेत त्यांना पोलीस पाटील होण्यासाठी शासनाचा पाठिंबा मिळणार नसेल तर ती माणसे पोलीस पाटील होण्यास धजावणार नाहीत. याबाबतीत राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. तेव्हा याबाबतीत शासनाने कालबध्द आश्वासन द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : 2004 साली मीच त्यांच्या मोर्चाला सामोरे जाऊन 1/3 पदे भरली जातील, मानधनामध्ये वाढ केली जाईल असे आश्वासन दिले होते. 500 रु. मानधन होते. त्यामध्ये 300 रुपयाची वाढ करुन ते 800 रुपयें करण्यासाठी मीच पुढाकार घेतला होता. 1/3 रिक्त पदे भरली जातील असे आश्वासन दिले होते. ती पदे देखील भरलेली आहे. म्हणजे शासनामार्फत दिलेली आश्वासने ही पाळली जात आहेत. त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब पुढे येते त्यावेळी त्यांचे मानधन किती वाढवले पाहिजे, त्यांना किती टी.ए.डी.ए. दिला पाहिजे, त्यांना तालुक्याला, जिल्ह्याला किती वेळा जावे-यावे लागते ह्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. अलिकडे शासनाने तंटामुक्त गावाची चांगली योजना सुरु केलेली असून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या तंटामुक्त गाव योजनेचा पोलीस पाटील हा कणा आहे....

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण तंटामुक्त गावाची योजना आणली. त्या योजनेचा भार देखील पोलीस पाटलावरच पडला. या योजनेसाठी पोलीस पाटलाला महिन्याला 200-250 रु. खर्च करावे लागतात. आपण 300 रुपयांची वाढ करुन त्यांचे मानधन 500 रुपयावरुन 800 रुपये केले. परंतु त्यातील 250 रुपये त्यांना खर्च करावे लागत असतील तर ही वाढ न केल्यासारखीच आहे. पोलीस पाटलाला देण्यात येणा-या मानधनातून त्याला जर तंटामुक्त गाव योजनेकरिता 250-300 रुपये खर्च करावे लागत असतील तर तंटामुक्त योजनेसाठी काही अतिरिक्त तरतूद करावी.

श्री. आर.आर.पाटील : ही गोष्ट खरी आहे की, पोलीस पाटलाला, सरपंचाला सादील दिला जात नाही. रजिस्टर ठेवण्यासाठी देखील त्यांना स्वत:च्या मानधनातून पैसे खर्च करावे लागतात. दिलेल्या मानधनातून पैसे खर्च होऊ नयेत यासाठी या तंटामुक्त गाव योजनेसाठी वेगळा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

खर्च उपलब्ध करुन दिला जाईल  किंवा ग्रामपंचायतीमधून हा खर्च भागविण्यासाठी परवानगी घेतली जाईल. त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा निर्णय निश्चितपणे घेतला जाईल. याबाबतीत वित्त विभागाशी चर्चा करीत आहोत. 10732 रिक्त पदे आहेत, त्याच्या 1/3 पदे भरण्याच्या बाबतीत लवकरात लवकर कारवाई केली जाईल. मानधनाच्या बाबतीत कालबध्द आश्वासन द्यावे असे सांगण्यात आले. याबाबतीत येणा-या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये महत्वाची भूमिका घेतली जाईल.

श्री. सदाशिवराव पोळ : जेथे पोलीस पाटील पद एस.एसी.,एस.टी. ओ.बी.सी.साठी आरक्षित असेल आणि  तेथे त्या समाजाची व्यक्ती उपलब्ध होत नसेल तर ते पद 15-20 वर्षे रिक्त राहाते. अशा पदांचे आरक्षण बदलून ती पदे भरली जातील काय ?

श्री. आर.आर.पाटील : असे होऊ शकते. एखाद्या गावामध्ये ओ.बी.सी.ची कुणी व्यक्ती नसेल आणि त्या गावामध्ये पोलीस पाटील किंवा सरपंचाचे पद ओ.बी.सी.साठी आरक्षित असेल किंवा एन.टी.साठी ते आरक्षित असेल आणि एन.टी.ची कुणीही व्यक्ती त्या गावामध्ये नसेल तर ते पद रिक्त रहाते. या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाचे जे पूर्वीचे निर्णय आहेत त्यांचा वापर करुन आरक्षण बदलण्याचा निर्णय घेता येईल. परंतु हे सर्व सामान्य प्रशासन विभागाच्या प्रस्थापित नियमांच्या अधीन राहून केले जाईल.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपलेली आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील बचत गटांबाबत करावयाच्या उपाययोजना

**मु. शी.** : राज्यातील बचत गटांबाबत करावयाच्या उपाययोजना यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा. (चर्चा पुढे सुरु....)

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्रीमती उर्षाताई दराडे यांनी आपल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवरील भाषण पुढे सुरु करावे.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माझे भाषण पुढे सुरु करते.

बचत गटाच्या बाबतीत एक वर्षापूर्वी आपल्या राज्याची परिस्थिती अशी होती की, आपले राज्य हे देशामध्ये 9व्या क्रमांकावर होते. परंतु मागील वर्षामध्ये झपाट्याने बचत गट बांधून आपण दुस-या क्रमांकावर आलो. बचत गटांना मोटिव्हेशन आणि गटबांधणी या विषयी शासनाने पुढाकार घेतलेला आहे. बचत गट नाही असे राज्यामध्ये एकही गाव नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ 11:35

श्रीमती उषाताई दराडे.....

शहरांमध्ये, महानगरपालिकांमध्ये, नगरपालिकांमध्ये सेवाभावी संस्था बचत गट बांधतात. निरनिराळ्या बँका बचत गट बांधतात किंवा वेगवेगळ्या खात्यांमार्फत बचत गट बांधले जातात. को-ऑ.खाते, डीसीसी बँक, आदिवासी विकास विभागामार्फतबचत गट बांधले जातात. परंतु यामध्ये कुठेही एकवाक्यता दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. मागील वर्षाची मी दोन-तीन उदाहरणे देणार आहे. सन 2006-07 या एका वर्षामध्ये पुणे जिल्हयामध्ये 94383 बचत गट बांधण्यात आले. चंद्रपूर जिल्हयामध्ये 7319, सांगली जिल्हयामध्ये 5181, सातारा जिल्हयामध्ये 4307 आणि नागपूर जिल्हयामध्ये 4364 बचत गट बांधण्यात आले. याचे कारण म्हणजे ज्या जिल्हयामध्ये डीसीसी बँकेने पुढाकार घेतला त्या जिल्हयातील बचत गटांची संख्या वाढलेली आपल्याला दिसून येते. ही वाढलेली संख्या पाहिली तर यामध्ये काही बँका बचत गट बांधणीमध्ये पुढे आल्या आहेत. त्यामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घेतली पाहिजे, बँक गट जोडून घेतात. बँका गटाची बांधणी करतात. त्यामध्ये बँकांना आपण पुरस्कार देतो. गट बांधणीमध्ये पहिला क्रमांक आला, दुसरा क्रमांक आला असा पुरस्कार देताना त्या गटांची संख्या आपण तपासून घेतली पाहिजे. किती गटांना जोडून घेतले यापेक्षा किती गटांना कर्ज दिले हे पाहिले पाहिजे. 10 गटांना मराठवाडा ग्रामीण बँकेने कर्ज दिले परंतु महाराष्ट्र बँकेने केवळ दोन गटांना कर्ज दिले. मराठवाडा बँकेचा पहिला क्रमांक आला असे दिसते. परंतु ही फसवी आकडेवारी आहे. गटांना जोडून घेतलेल्या गटापैकी किती गटांना कर्ज दिले हे तपासून घेतले पाहिजे. दुसरी महत्वाची बाब अशी की, गट बांधणीमध्ये प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्या सेवाभावी संस्था ज्या महाराष्ट्रात आहेत त्यापैकी काही सेल्फ गट म्हणून चालतात. स्वत:पुरता 10 जणांचा गट बांधतात. त्यांना अंतर्गत कर्ज वाटप करतात. परंतु त्यामध्ये व्याजाचा दर जास्त असतो. एका छताखाली आपण त्यांना आणलेले नाही. या महाराष्ट्रात आणखी एक प्रयोग मागील सहा वर्षात झाला. को-ऑपरेटिव्ह पध्दतीने बचत गट बांधण्याचा प्रयत्न केला. 33 जिल्हा को-ऑ.बचत गट तयार झाले. त्यांचे महाराष्ट्रात फेडरेशन आहे. एम.एस.सी.को.ऑप.बँकेने त्या फेडरेशनच्या विनंतीवरुन काही जिल्हयांना कर्ज पुरवठा केला. बीड आणि सांगली जिल्हयात पुरवठा झाला. बाकीच्या पतसंस्थांकडून बचत गटांना कर्ज पुरवठा न मिळाल्यामुळे त्या अडचणीत चालतात. याचे कारण को-ऑपरेटिव्ह पॅटर्नमध्ये बचत गट

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

बांधले त्यांच्याकडे नाबार्डमार्फत कर्ज पुरवठा करताना संशयाने बघितले जाते या संदर्भात शासनाने वेळोवेळी प्रयत्न करुनही सहा वर्षापासून फेडरेशनल सिस्टीम जी बाजूच्या राज्यात यशस्वी झ ााली, त्यांनी ही सिस्टीम यशस्वीपणे घेतली परंतु महाराष्ट्रात ती यशस्वी झाली नाही. एका छताखाली ते काम करीत आहेत. आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यांमध्ये ते एका छताखाली काम करीत आहेत. महाराष्ट्रात या बचत गटासाठी मंत्रालयात एक खिडकी, एक कक्ष निर्माण केला, त्यांच्याकडे या सगळ्या बचत गटांचे, डीआरडीएखाली बांधले गेलेले, एपीएल, बीपीएल, शहरांमधील बचत गट, माविमने बांधलेले बचत गट या गटांचा समन्वय करण्याचे काम या कक्षाकडे दिले पाहिजे. या बचत गटांच्या तक्रारी ऐकून उद्योगधंद्यांसाठी लागणारे प्रशिक्षण देणे याबाबतीत अभाव दिसून येतो. सगळ्या बचत गटामधील मेजॉरिटी 98 टक्के गट पारंपारिक उद्योगांमध्ये गुंतलेले आहेत. पापड, लोणची, शेवया याबाहेर कधी पडणार आहेत की नाही? म्हणून महाराष्ट्रात सर्वात महत्वाचा धंदा, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नासंबंधी चर्चा झाली त्यावेळी मी मुद्दा उपस्थित केला होता, कुणी सांगतो महाराष्ट्रात 2.86 लाख बचत गट आहेत, कुणी सांगतो 4 लाख बचत गट आहेत. ही आकडेवारी फसवी आहे. काल सन्माननीय श्री.शरद पवार यांनी स्टेटमेंट केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये वेगळा सेल निर्माण करुन प्रशिक्षणाची व्यवस्था करणार आहोत. सगळया बचत गटांची आकडेवारी शासनाकडे एकत्रित आहे ती चुकीची आहे. या महाराष्ट्रात 4 लाख बचत गट आहेत असे म्हणत असाल तर एका गटामध्ये किमान 10 लोक असतात. एका गटामध्ये 10 महिला म्हणजे 10 कुटुंबे त्याठिकाणी जोडली जातात. किती मोठी लोकसंख्या जोडली गेली आहे. म्हणून मागणी केली जाते, जनरल सेन्सिटिव्ह बजेट महाराष्ट्रात असले पाहिजे. त्या बचत गटांसाठी आर्थिक तरतूद मोठया प्रमाणात असावी. सुशिक्षित बेरोजगारांच्या सोसायट्या बांधण्यासाठी प्रोत्साहन देतो................

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे....

ग्रामीण भागातातील सुशिक्षीत महिला एकत्र आल्या आणि त्यांची सोसायटी झाली असेल तर अशा सोसायटया टिकवण्यासाठी शासन फक्त 13 हजार रुपये देते. जो गट आम्ही बांधतो त्या गटाची बांधणी करण्यासाठी, प्रशिक्षण देण्यासाठी, मंथली मिटींग घेण्यासाठी जी बाई जाते तीला डीआरडीए मार्फत बोटावर मोजता येईल इतक्या नॉन बीपीएल गटांना पैसा दिला जातो ज्या सेवाभावी संस्था आहेत त्या संस्थांना यामध्ये का सहभाग करुन घेतला जात नाही ? आमच्या कोऑपरेटीव्ह संस्थांनी जे बचत गट बांधलेले आहेत ते फार मोठया लॉसमध्ये चालले आहेत. त्यांची वसूली करण्यासाठी 100-100 कि.मी. जावे लागते त्यामुळे प्रवासाचा खर्च वाढतो. त्यामुळे या सर्व बचत गटांना एका छत्राखाली आणण्याचा कोणी प्रयत्न करणार आहे काय? महिला बचत गटांसाठी महाराष्ट्र शासनाने एक कमिटी नेमून आढावा घेतला पाहिजे, यासाठी वेगळा कक्ष निर्माण केला पाहिजे. मग ते आदिवासी, ग्रामविकास, नगरविकास खात्यामार्फत चालणारे बचत गट असो त्यांनी महिलांचे सक्षमीकरण किती केले आहे याचा विचार केला पाहिजे. यामध्ये आपल्याला काही अग्रक्रम ठरवून द्यावे लागणार आहेत, यामध्ये किती महिला गेलेल्या आहेत हे आपल्याला पहावे लागेल. जर महाराष्ट्रातील 80 टक्के वर्ग हा कृषीशी जोडला गेला असेल तर 80 टक्क्यातील 40 टक्के संख्या ही महिलांची आहे. हा महिला वर्ग बचत गटांशी जोडला गेला तर तो महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने फार महत्वाचे ठरेल. त्यामुळे शेती क्षेत्रात महिलांचा विकास यासंदर्भात कृषी खात्यामार्फत एक योजना राबवली जाते. परळी येथील कृषी क्षेत्रातून घेतलेल्या महिला बचत गटाचा मला चांगला अनुभव आलेला आहे. एका संस्थेने एका वर्षात 25-30 गट जरी बांधले आणि त्यांना कृषी विषयक प्रशिक्षण दिले की, तालुक्याचा कार्यक्रम संपला असे करणे योग्य नाही. खरे म्हणजे एवढे गट एका खेडयात तयार झाले पाहिजे. कृषी विभागार्मात जे महिला बचत गट चालविले जातात ते महिला बचत गट पुढे गेलेले आहेत. या महिला गटांना तुतीची लागवड, कुकुट पालन, नांगरणी कशी करावयाची, गांडूळ खत कसे तयार करावयाचे, बियाणे किती अंतरावर लावले पाहिजेत, फवारणी कशी करायची, पाणी किती द्यावयाचे व ते कसे द्यावयाचे याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे हे महिला बचत गट पुढे गेलेले आहेत. त्यामुळे महिला बचत गटांना कृषी विभागामार्फत प्राधान्य देऊन बचत गट चालविले तर त्याचा चांगला उपयोग होऊ

....2

श्रीमती उषाताई दराडे....

शकेल. महिला सक्षमीकरणाच्या कार्यक्रमामध्ये बचत गटांना मायक्रो फायनान्स स्किम वेगळया पध्दतीने करुन योजना राबवली पाहिजे. ही स्किम राबवित असतांना महिला बचत गटांसाठी एक वेगळी स्किम राबवली पाहिजे. अण्णासाहेब पाटील महामंडळ आहे, हे महामंडळ महिलांना वैयक्तिक 25 हजार रुपये कर्ज देते . त्यांनी हे कर्ज जर गट बांधून दिले तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. ओबीसी महामंडळाने योजना केली मग बाकीची महामंडळे महिला बचत गटासांठी का योजना तयार करीत नाहीत? त्यामुळे महाराष्ट्र शासनातील जेवढी खाती आहेत त्या सर्व खात्यांना गट बांधणी कम्पलसरी करावी ही माझी नंबर एकची मागणी आहे. महिला बचत गटांचे कोऑर्डीनेशन करण्यासाठी सगळया महिला बचत गटांना एका छत्राखाली आणले गेले पाहिजे. माविम प्रत्येक गटात सूत्रसंचालन करण्याचा प्रयत्न करीत आहे त्या माविमला गट संभाळण्यासाठी आपण किती पेसै देतो? माझा डीआरडीए वर आरोप नाही परंतु डीआरडीए आणि माविम यांच्यामध्ये कोऑर्डीनेशन शासकीय पातळीवर असणे आवश्यक आहे. सावित्रीबाई फुले यांचे महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे जे स्वप्न होते ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी, गट बांधणीसाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अर्धातास चर्चेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलण्याची संधी नसते तरी सुध्दा मी काही सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देतो. कृपया सन्माननीय सदस्यांना महिला बचत गटासंबंधीचा हा प्रश्न असल्यामुळे मी बोलण्यास परवानगी देत आहे. थोडक्यात प्रश्न विचारावेत.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेंले ) : सभापती महोदय, महिला बचत गटाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी महिला बचत गट सक्षमीकरणाच्या दृष्टीने अनेक विषयाला स्पर्ष केलेला असल्यामुळे मी ठरावीक मुद्यांच्या संदर्भात माझे विचार या ठिकाणी व्यक्त करणार आहे. महिला बचत गटाच्या संदर्भात आता केंद्रशासनाने एक निर्णय घेतलेला आहे की, पंतप्रधान रोजगार योजनेत महिला बचत गटांचा समावेश केला जाणार आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील बचत गटाचा ख-या अर्थाने फायदा होणार आहे. महाराष्ट्रामध्ये 2 लाख महिला बचत गट आहेत त्यांना या निर्णयाचा ख-या अर्थाने फायदा होणार आहे. महाराष्ट्रातील महिला बचत गटांचा पंतप्रधान रोजगार योजनेत समावेश केल्यामुळे मी माननीय पंतप्रधानांचे तसेच केंद्रशासनाचे अभिनंदन करते. माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी मुंबईमध्ये गेल्या महिन्यात घोषणा केली होती की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे महिलांना प्रशिक्षण देण्यात येईल तसेच तालुक्यातील व जिल्हयात महिलांतर्फे तयार करण्यात आलेल्या मालाचे प्रदर्शन भरवले जाईल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे... 11:45

श्रीमत मंदा म्हात्रे..........

सभापती महोदय, दु:खाची गोष्ट अशी की, महिला बचत गटांना शासनाकडून काहीच मदत केली जात नाही. शहराच्या ठिकाणी एक महिला बचत गट करायचा असेल तर त्यामध्ये अनेक अडचणी येतात. महानगरपालिका महिला बचत गटांना मानधन देतात. तेव्हा शासनानेसुध्दा महिला बचत गटांना मानधन दिले पाहिजे.

सभापती महोदय, आपल्याला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखावयाच्या असतील तर महिलांबरोबर शेतकऱ्यांना सुध्दा बचत गटात समावून घेतले पाहिजे. त्यांना बचत गटामार्फत छोट्या छोट्या उद्योगांमध्ये सामावून घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी सांगितल्याप्रमाणे महिलांना कृषि विद्यापीठांद्वारे शेतीचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास मदत होईल.

सभापती महोदय, माझ्या मतदारसंघात 400-500 बचत गट आहेत. या बचत गटांमध्ये पुरूष बचत गट सुध्दा आहेत. आपण अशाप्रकारे शेतकऱ्यांची बचत गट केल्यास शेतकऱ्यांना सुध्दा दिलासा मिळेल. शेती व्यवसायास पूरक जोडधंदा मिळेल व शेतकऱ्यांच्या आत्महत्यासुध्दा कमी होतील.

सभापती महोदय, महिलांना स्वावलंबी करायचे असेल तर त्यांनी उत्पादित केलेल्या मालासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आज त्यांच्या मालासाठी विक्री केंद्रे नाहीत, बाजारपेठा नाहीत. महिला बचत गटांनी पापड, लोणची या व्यवसायावर अवलंबून न राहता त्याच्या पुढे मजल मारली पाहिजे. त्यासाठी राज्य सरकारने मदत करण्याची आवश्यकता आहे. हे संगणकाचे युग असल्यामुळे महिला बचत गटांनी सुध्दा त्याच गतीने पुढे गेले पाहिजे. मी मागील अधिवेशनात महिला बचत गटांसाठी विक्री केंद्र आणि त्यांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण केंद्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्माण केले पाहिजे अशी मागणी केली होती ती मागणी पुन्हा करीत आहे. त्याच बरोबर राज्य महिला कोष निर्माण केला पाहिजे अशी मागणी करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, नुकतीच शिवसेना पक्षातर्फे महिला बचत गट महासंघाची निर्मिती केलेली आहे. या माध्यमातून मुंबई महानगर पालिके अंतर्गत जेवढे मॉल्स येतात त्याठिक्‍ाणी महिला बचत गटांच्या उत्पादनास मार्केट उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. या गोष्टीस माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांनी मान्यता दिलेली आहे. मी याठिकणी आवाहन करते की, अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. त्याठिकाणी महिला बचत गटाच्या उत्पादनास स्थान का देण्यात येत नाही ? असे केले असते तर महिला बचत गटांना त्यांच्या मालासाठी ठिकठिकाणी प्रदर्शन करावे लागणार नाही. माननीय अध्यक्ष व माननीय सभापतींच्या प्रयत्नामुळे या विधिमंडळ महिला बचत गट एक उपहारगृह चालवित आहे आणि त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येसुध्दा महिला बचत गटांना प्राधान्य दिल्यास त्यांना कोणावरही अवलंबून रहावे लागणार नाही. आपण फक्त व्होट बॅंक म्हणून महिला बचत गटाचा उपयोग करु नका. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी सांगितले की, आज को-ऑप. महिला बचत गट बंद पडली आहेत, देशोधडीला लागली आहेत. या महिला बचत गटांची कर्ज का माफ करीत नाहीत असा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी एक अतिशय महत्वाचा मुद्दा या अर्धातास चर्चेच्याद्वारे उपस्थित केलेला आहे. वेळ कमी असल्यामुळे मी फक्त मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, आज बचत गटांची संख्या वाढत असली तरी त्यामध्ये गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे. महिला बचत गटाची मूळ संकल्पना काय आहे याबाबत महिलांना मार्गदर्शन होण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, या नागपूर विधान भवनाच्या परिसरात एक महिला बचत गट उपहारगृह चालवित आहे. सन्माननीय सदस्यसुध्दा त्याठिकाणी जाऊन आस्वाद घेत आहेत. माझी या निमित्ताने मागणी आहे की, नागपूर येथे महिला बचत गटाचे उपहारगृह आहे त्याप्रमाणे मुंबईतील विधान भवनात सुध्दा महिला बचत गटाचे उपगृह सुरु करावे. हे संगणकाचे युग आहे. महिला बचत गटांना बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर लढायचे आहे. त्यांचे नेटवर्क मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाला मार्केट मिळाले पाहिजे. महिला बचत गटांना सक्षमीकरण करावयाचे असेल तर जागोजागी विक्री केंद्र करून त्यांना मार्केट उपलब्ध करुन दिले पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 11:50

श्री. भास्कर जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आता महिला बचत गट केल्यानंतर, त्याकडे सर्वांचे लक्ष गेले परंतु सुरुवातीच्या काळात काही महिला बचत गटांनी शालेय पोषण आहार शिजवून देण्याचे काम केलेले आहे. त्यावेळी त्यांना एका विद्यार्थ्यामागे फक्त 50 पैसे मिळत होते, तेही वेळेवर मिळत नव्हते. त्यांना तो आहार शिजवून देण्यासाठी रॉकेलही वेळेवर मिळत नव्हते. परंतु तरीही अशाप्रकारे शालेय पोषण आहार शिजवून देण्याचे काम अगोदर पासून काही महिला बचत गट करीत आलेले आहेत. परंतु आता शासनाने शिक्षण सभापतींच्या म्हणण्यानुसार शालेय पोषण आहार शिजविण्याचे काम देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता शिक्षण सभापती सांगतील त्याच महिला बचत गटांना सदरचे काम मिळणार आहे. आहार शिजविण्याचे टेंडर 10-11 महिन्यांसाठीच असते. परंतु अगोदर ज्या महिला बचत गटांनी अशाप्रकारे आहार शिजवून देण्याचे काम केले, त्या कामासाठी त्यांना नवीन भांडी घ्यावी लागतात, धान्याची खरेदी करावी लागते. एक प्रकारे त्यांना नवीन संसारच उभा करावा लागतो. परंतु आपण नव्याने शिक्षण सभापतींना जो याबाबतीतील अधिकार देत आहात, तो योग्य नाही. कारण त्यांच्या मनाप्रमाणे ते कोणत्याही बचत गटास यासंदर्भातील कंत्राट देऊ शकतील. ते अगोदरच्या महिला बचत गटांस सदरचे काम न देता दुसऱ्या बचत गटांसही देतील. परंतु अगोदर ज्या महिला बचत गटांनी सदरचा आहार शिजवून देण्यासाठी भांडयांची वा इतर खर्च केलेला आहे, त्यामुळे त्यांच्या एकप्रकारे आर्थिक प्रेशर आलेले असते. तसेच, शालेय पोषण आहाराबाबत विद्यार्थ्यांची, पालकांची किंवा शिक्षकांची त्यांच्याबाबतीत तक्रार नसेल तर आपण त्यांनाच सदरचे कंत्राट दिले पाहिजे. त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, आपण अगोदर ज्या महिला बचत गटांनी शालेय पोषण आहार शिजवून देण्याचे काम केलेले आहे, त्यांनाच ते परत द्यावे. तसेच शिक्षण सभापतींच्या मनमानीच्या दृष्टीने शासनाने बंधने घातली पाहिजेत.

---

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, यहां पर रेकॉर्ड कीपिंग सुलभ करने के बारे में कहा गया है. आज रेकॉर्ड कीपिंग की व्यवस्था अच्छी न होने के कारण बँक से कर्ज प्राप्त करने में महिला बचत गट के सामने समस्या आती है. पूरा फोकस बीपीएल के बारे में रखा गया है. इसलिए मेरा यह सुझाव है कि एपीएल के बचत गट का आपकी एजेंसी से यह काम होगा, वह एक छत के नीचे होगा तो रेकॉर्ड कीपिंग सुलभ करना संभव होगा. इसलिए इस पर विचार किया जाए.

सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री शरद पवार जी ने डॉ. मुहम्मद यूनूस को बुलाकर अपनी योजना की जानकारी देने का अवसर प्रदान किया. डॉ. मुहम्मद यूनूस ने ग्रामीण बँक के संबंध में एक संकल्पना रखी है- Bank goes to the people. बांगला देश में यह संकल्पना सफल हुई है. बांगला देश में पावरटी इरेडीकेशन के लिए इस संकल्पना को रेप्लीकेट करने की कोशिश हुई है. Bank goes to the people इस संकल्पना को पतपुरवठा करने वाली संस्थों के संबंध में लागू किया जाएगा तो बचत गट शक्तिशाली हो सकते हैं और अच्छी प्रकार से काम कर सकते हैं. इसलिए सरकार इस पर विचार करें.

सभापति महोदय, परभणी में " परिवर्तन-2006 " के अन्तर्गत सम्माननीय श्री शरद पवार के द्वारा मॉल, विक्रय केन्द्र और सेंटर की बिल्डिग का उद्घाटन हुआ था. लेकिन वह बिल्डिग बन जाने के बाद वहां पर जिला परिषद का कार्यालय शिफ्ट कर दिया गया है. जिसके कारण महिला बचत गट पर अन्याय हुआ है.महिला बचत गट के लिए एक सुन्दर बिल्डिग बनाई गई थी. लेकिन जिला परिषद ने एक ठराव पास करके वहां अपना कार्यालय शिफ्ट कर दिया. इसलिए मेरा अनुरोध है कि इस बिल्डिग से जिला परिषद का कार्यालय हटाकर वह महिला बचत गट को इस्तेमाल के लिए दिया जाए. मैं इतना कहकर अपना भाषण समाप्त करती हूं.

..........

नंतर श्री.रोझेकर...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MMP/ MAP/ प्रथम श्री.पुरी........ 11:55

श्री.रणजित कांबळे (ग्राम विकास, महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. मी सांगू इच्छितो की, ए.पी.एल.आणि बी.पी.एल.साठी बचत गटांचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. त्यांनी फक्त एक अट ठेवली आहे. कित्येक बचत गट तयार केले आहेत त्यामध्ये 30 टक्के ए.पी.एम. घेऊ शकतात. बेसिकली हा कार्यक्रम पॉवर्टी रिहॅब्लिटेशनसाठी आहे व तो बी.पी.एल.साठी आहे. ए.पी.एल.चे सभासद असतील तर त्यांना सबसिडी, मदत, अनुदान देता येत नाही. केंद्र शासनाचे 75 टक्के, राज्य शासनाचे 25 टक्के अनुदान या बचत गटांना देण्यात येते. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील बचत गटांचे व्यवस्थापन एका छत्राखाली आले पाहिजे. डी.आर.डी.ए.चे काम फक्त ग्रामीण भागामध्ये असते व ते बी.पी.एल.बचत गटासाठी असते. महिलांसाठी बचत गट आहेत, अशी संकल्पना नाही. केंद्र शासनाने असे सांगितले आहे की, 50 टक्के महिलांचा सहभाग बचत गटात असला पाहिजे. एस.सी., एस.टी.यांचा 50 टक्के, 47 टक्के महिला व 3 टक्के अपंग अशाप्रकारे सहभाग असला पाहिजे. आमच्या विभागाचे काही निकष आहेत व त्यामध्ये राहूनच काम करीत असतो. या ठिकाणी काही सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत. बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याची सूचना त्यांनी मांडली. एन.जी.ओ.मार्फत बचत गटातील लोकांना प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या एन.जी.ओ.ना शासनामार्फत अनुदान दिले जाते. तसेच मार्केटिंगची सूचना देखील सन्माननीय सदस्यांनी मांडली आहे. मॉल उभे करावे, असा एक मुद्दा पुढे आला आहे. अद्याप ग्रामीण भागामध्ये मॉल संस्कृती आलेली नाही. दिल्ली येथे सरस नावाचा कार्यक्रम दरवर्षी होत असतो. यामध्ये अनेक राज्ये सहभागी होतात. या ठिकाणी बचत गटांचे प्रॉडक्ट डिस्प्ले करण्याचे धोरण आपण स्वीकारले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शहरी भागात मॉल उभे करावेत व ग्रामीण भागात विक्री केंद्र उभे करावेत, अशा प्रकारची सूचना आम्ही केली होती.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये विक्री केंद्र उपलब्ध करुन देण्यात आले आहे. परंतु, मला येथे सांगावयाचे आहे की, शासनातर्फे मार्केटिंग होऊ शकत नाही, ते चुकीचे होऊ शकेल. परंतु, त्यांना प्लॅटफॉर्म तयार करुन देऊन मार्केट उपलब्ध करुन देणे हे

....2........

श्री.रणजित कांबळे.........

शासनाचे काम आहे. त्यांना सहकार्य करणे, हे देखील शासनाचे काम आहे परंतु मार्केटिंग शासन करु शकणार नाही. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला की, पंचायत समितीमध्ये बचत गटांसाठी एक स्टॉल उभारण्यात यावा. बाय-रोटेशन बचत गट त्या ठिकाणी सात सात दिवसांच्या कालावधीसाठी आपल्या वस्तु ठेवू शकतील व मार्केटिंग करु शकतील.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी मंत्रिमहांदयांनी सांगितले की, मार्केटिंग शासन करु शकणार नाही. हे आम्हालाही मान्य आहे. बचत गट इललिटरेट भागातील महिलांकडून चालविले जात आहेत. त्यांना मार्केटिंग कसे करावे, मालाचे उत्पादन कसे करावे, यासंबंधीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे व अशा प्रकारचे प्रशिक्षण शासनाने उपलब्ध करुन द्यावे, अशाप्रकारची मागणी आम्ही केलेली आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, पंचायत समितीमध्ये स्टॉल उभे केले. आताच शासन निर्णय काढण्यात आला आहे की, लहान बचत गटांना, जे ग्राम पातळीवर आहेत त्यांच्यासाठी ग्राम पंचायत हद्दीमध्ये उपलब्ध जागेवर स्टॉल उभे करण्यात यावेत. त्या ठिकाणी छोटे बचत गट आपला माल ठेवू शकतील. प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात देखील काम सुरु आहे. काही जिल्हयामध्ये डी.आर.डी.ए.मार्फत संस्था बनविण्यात आली आहे व त्यामार्फत बचत गटांचे मार्केटिंग होते.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ...........

पुण्यामध्ये सावित्री नावाची संस्था आहे. बचत गट सावित्री संस्थेमार्फत मार्केटिंग करतात. डी.आर.डी.ए. आणि या संस्थामार्फत पुण्यामध्ये मार्केटिंग होते. सोलापूरमध्ये रुक्मिणी नावाची संस्था आहे, त्या संस्थेमार्फत मार्केटिंग केले जाते. बचत गट आपला माल या संस्थांना आणून देतात, या संस्था आपले लेबल लावून बचत गटांचा माल विकतात. अनेक जिल्हयांमध्ये अशा मार्केटिंग संस्था आहेत. प्रत्येक डी.आर.डी.ए.कडे अशाप्रकारचा एक ब्रँड नेमून दिलेला आहे. बाजारात जे दैनंदिन प्रॉडक्ट आहेत, त्यांच्या साखळया तयार करुन या संस्थांमार्फत विक्री सुरु आहे. हा सर्व कार्यक्रम बचत गटांसाठी म्हणजेच बी.पी.एल. साठी आहे. नागरी बँका आणि इतर पतसंस्थांमार्फत जे बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत त्या बचत गटांचा डी.आर.डी.ए.शी काही संबंध नाही. बचत गटातील लोकांना प्रशिक्षण देण्याची सुविधा या खात्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मालाच्या निर्मितीपासून माल विकणे, मार्केट शोधणे, आर्थिक तरतूद करणे या सर्व बाबींचे मार्गदर्शन बचत गटातील लोकांना देण्याची गरज आहे. महाराष्ट्रात बचत गटांसाठी अनेक संस्था, एन.जी.ओ. मार्केटिंग करतात. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आंध्र प्रदेशमध्ये ज्याप्रमाणे केलेले आहे त्याप्रमाणे इंटरेस्ट रेट कमी करुन फेडरेशन उभे केले पाहिजे. आंध्र प्रदेशमध्ये बँक स्थापन करुन बचत गटांना निधी दिला जातो. केंद्र शासनाकडून जे पैसे मिळतात ते त्यांच्याकडेच ठेवले जातात, यासाठी रिव्हॉल्विंग फंड किंवा सबसिडी दिली जात नाही. मात्र महाराष्ट्रात आपण लाभार्थ्यांना सबसिडी देतो, फिरते भांडवल उपलब्ध करुन देण्यात येते. आम्ही कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये दोन अभ्यास गट पाठविले होते. आम्ही सचिवांची समिती नेमली होती. त्या समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. मायक्रो फायनान्स करण्याबाबतचा विचार शासनाच्या विचाराधीन आहे. अनेक वेळा बचत गट बँकेकडे कर्जासाठी जातात. कर्जाचा व्याज दर 9 ते 13 टक्के असतो. हा व्याज दर महिला बचट गटांना परवडत नाही. वित्त विभागाचे सचिव, महिला व बालकल्याण विभागाचे सचिव, सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांची समिती नेमण्यात आली होती. त्या समितीची अशी शिफारस आहे की, ज्या ज्या विभागाकडून बचत गट स्थापन करण्यात येतात, जसे एस.सी.,एस.टी.साठी सामाजिक न्याय विभागाकडून बचत गट स्थापन केले जातात, ओबीसी आणि इतर लोकांसाठी महिला व

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ...........

बालकल्याण विभागाकडून बचत गट स्थापन केले जातात. त्यामुळे 6 टक्क्यानुसार जे कर्ज उपलब्ध करुन द्यावयाचे आहे त्यामध्ये डिफरन्स येईल तो त्या विभागांनी उचलला पाहिजे. फेडरेशनचा विचार शासनातर्फे करण्यात येत आहे. मात्र हे सर्व आहे ते बी.पी.एल.साठी असेल जे बचत गटाचे सदस्य आहेत तेच राहू शकतील. हे सर्व शासनाच्या विचाराधीन आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, खिचडी बनविण्याचे काम ज्या बचत गटाला देण्यात आले होते त्यांच्याकडून ते काम काढून घेण्यात येते. ही सर्व बाब तपासून पहाण्यात येईल व त्यांना ते काम देण्यात येईल.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

---------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील शहरी व ग्रामीण भागात बालकामगारांना अत्यल्प मजुरी देऊन त्यांची होत असेलेली पिळवणूक

**मु. शी.** : राज्यातील शहरी व ग्रामीण भागात बालकामगारांना अत्यल्प मजुरी देऊन त्यांची होत असेलेली पिळवणूक यासंबंधी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"महाराष्ट्रात आजही राज्याच्या शहरांपासून ते ग्रामीण भागापर्यंत सर्रास बालकामगार निरनिराळया आस्थापनांमध्ये काम करीत असून त्यांना अत्यल्प मजुरी देऊन त्यांची पिळवणूक होत असणे, राज्यातील बालकामगारांची अनिष्ट प्रथा निर्मूलन करण्याच्या अधिनियमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी शासनामार्फत न होणे, बालकांच्या सुरक्षिततेसाठी अनुकूल वातावरण तयार व्हावे व बालकांचे शोषण होऊ नये यासाठी राज्य बालहक्क संरक्षण आयोग स्थापन करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेऊनही त्यांची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, बालकामगारांच्या संदर्भात मी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याचे कारण असे आहे की, आज देखील राज्याच्या शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत बालकामगार मोठयाप्रमाणावर काम करीत आहेत. बालकामगारांनी नीट काम केले नाही तर त्यांच्या छळाच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये येत असतात.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री.बोरले.......... 12:05

डॉ नीलम गो-हे......

सभापती महोदय, यशदामार्फत दिनांक 31 मे,2007 रोजी बालमजूरी रोखण्याच्या संदर्भामध्ये एक बैठक आयोजित करण्यात आली होती,त्यावेळी अशी अपेक्षा होती की, सन 2007 मधील जे पावसाळी अधिवेशन आहे,त्यामध्ये शासनाने बालमजूरी रोखण्याकरिता जो कृती दल गठित केलेला आहे,त्यांचा कार्यक्रम सभागृहासमोर मांडण्यात येईल परंतु पावासळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत बालहक्काच्या दृष्टीकोनातून घोशणा न झाल्यामुळे मी दिनांक 02 ऑगस्ट,2007 रोजी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता,त्याचे उत्तर मला शासनाकडून चालू अधिवेशनाच्या आधी मिळाले. या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, यासंदर्भात शासनाने बालहक्क आयोग नेमण्याचा निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय मंत्र्यांचे मी याकडे लक्ष वेधू इच्छितो की, यशदामध्ये बालमजूरी रोखण्याच्या संदर्भात जी बैठक झाली होती,त्यामध्ये आम्हाला एका जी.आर.ची कॉपी देण्यात आली होती. त्या शासननिर्णयामध्ये सुरुवातील असे म्हटले होते की, परराज्यातून जे बालकामगार आपल्या राज्यामध्ये येतात,त्यांना त्यांच्या गावी सोड ण्यासाठी हा जी.आर.काढलेला आहे. त्यावेळी मी असे सांगितले होते की, या राज्यातील बालकामगार देखील इतर शहरांमध्ये,जिल्हयांमध्ये,राज्यांमध्ये मजूरी करीत वावरत असतात. शासन फक्त परराज्यातील बालकामगारांना त्यांच्या गावी सोडण्यासाठी बांधील आहे,असा या जी.आर.चा अर्थ होत नाही. या राज्यातील बालकामगार दुस-या राज्यातील शहरांमध्ये जाऊन काम करत असतील तर या जी.आर.मध्ये बदल करणे आवश्यक आहे. आपले जे विभागील अधिकारी बालहक्क आयोग स्थापन करणार आहेत,त्यांनीच या संबंधित जी.आर.ची माहिती देऊन,हा जी.आर.दुरुस्त करण्यासाठी ज्या सूचना सुचविलेल्या आहेत,त्यांचा विचार करावा. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प मंडळ,बीड यांच्यातर्फे जे बालकामगारांसाठी कार्यशाळेच्या माध्यमातून वर्ग चालविले जातात,तेथील नायाब तहसिलदार श्री.शिरसाट यांनी माहिती दिली की, काही ठिकाणी फक्त अनुदान लाटण्यासाठी अशा पध्दतीने कागदोपत्री कार्यक्रम राबविल्याचे दाखविण्यात येतात. प्रत्यक्षात तेथे बालकामगारांसाठी कोणत्याही प्रकारच्या कार्यशाळा राबविण्यात येत नसतात. मला या निमित्ताने तीन प्रश्न या ठिकाणी उपस्थित करावयाचे आहेत. पहिला म्हणजे हा बालहक्क आयोग आपण जो स्थापन करणार आहात,त्याच्यावर कोणत्या प्रकारचे अधिकारी आपण नेमणार आहात. आतापर्यंत अनेक

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ नीलम गो-हे......

आयोगांचा आपण अनुभव पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, बालकांचा विषय सोडून आणि वृध्दांबद्दल आदर ठेवून मी बोलते की, आयोगाच्या उद्देशांचा आणि आयोगाच्या विषयाचा काहीही संबंध नाही. अशा पध्दतीची माणसे की,ज्यांना कोणताही विभाग सामावून ध्यावयाला तयार नसणारे नकोसे अधिकारी वर्षानुवर्ष या आयोगांवरती काम करीत असतात. त्यमुळे या आयोगांना निष्क्रिय स्वरुप प्राप्त झालेले आहे. माझा दुसरा प्रश्न असो आहे की, या बालहक्क आयोगाकरिता आपण आर्थिक तरतूद केलेली आहे का ? तिसरा प्रश्न असा आहे की, काही काही कृती कार्यक्रम म्हणजे महिला व बालविकासाच्या संदर्भातील कृती कार्यक्रम अंमलात आणण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने यशदावरती टाकलेली आहे. यशदा ही एक संशोधन संस्था आहे,ती फक्त धोरणात्मक सूचना देऊ शकते. अंमलबजावणीचे काम हे महिला व बालविकास विभागाच्या अधिका-यांनी कृ,ती कार्यक्रमाच्या माध्यमातून ठिकठिकाणी राबवून केले पाहिजे. शासनाच्या एखाद्या विभागाप्रमाणे कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून ठिकठिकाणी राबवून केले पाहिजे. शासनाच्या एखाद्या विभागाप्रमाणे कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्याचे काम हे यशदाचे नाही. कृती कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी यशदावर टाकणे योग्य नाही. मध्यंतरी आम्ही वृत्तपत्रामध्ये बातमी वाचली की,यशदाकडे पुरेसे पैसे नाहीत. आपण यशदाने दिलेल्या धोरणात्मक सूचनांची अंमलबजावणी कशी करणार आहात ? याबद्दल ठोस भूमिका शासनातर्फे घेण्यात येणार आहे का ? असे आजच्या या अर्धा - तास सूचनेच्या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छिते. बालहक्क आयोग जो शासनातर्फे स्थापन करण्यात येणार आहे,त्याकरिता येत्या अर्थसंकल्पामध्ये काही तरतूद करण्यात येणार आहे का ?

श्रीमती मंदाताई म्हात्रे : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी या अर्धा - तास सूचनेच्या निमित्ताने एक अतिशय चांगला विषय सभागृहासमोर मांडलेला आहे. यासंदर्भातच मलाही एक सूचना मांडावयाची आहे. बालमजूरी रोखण्याच्या माध्यमातून ज्या बालकामगारांना आपण पकडतो व त्यांच्या गावी सोडुन देतो त्यावेळी एका बालकामगाराला मी भेटले तेव्हा तो बालकामगार मला म्हणाला की, आम्हाला आईवडिल नाही आहेत आम्ही आमच्या काका - काकू,मामा - मामी यांच्याकडे राहतो. तेथे त्यांचा छळ होतो. मग हे बालकामगार घर सोडून

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री.बोरले.......... 12:05

डॉ नीलम गो-हे......

इतर शहरांमध्ये कोठेही काम करतात पैसे मिळवून कोठेही राहून आपल्या दोन वेळच्या जेवणाची राहण्याची व्यवस्था करतात. ते असेही म्हणतात की, आम्हाला शिकण्याची देखील इच्छा आहे. शासनातर्फे या पकडून आणलेलया बालकामगारांचा शिक्षणाचा अधिभार उचलण्याकरिता योजना आखली गेली पाहिजे,अशी मी शासनाला विनंती करते.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,मी माझ्या भाषणामध्ये ज्या जी.आर.मध्ये बदल होणे आवश्यक आहे असा उल्लेख केलेला आहे,त्या जी.आर.ची सविस्तर माहिती रेकॉर्डवर येण्यासाठी मी खालीलप्रमाणे जी.आर.ची सविस्तर माहिती वाचून दाखविते. सदर जी.आर.हा दिनांक 25 नोव्हेंबर,2006 शासन निर्णय क्रमांग सी.एल.ए.2006/299/काम-7/ अ बालकामगार हा अनिष्ट प्रथांपासून महाराष्ट्र राज्य मुक्त करणेबाबत.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन, महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी बालकामगाराबाबत सभागृहात जो प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना दिनांक 24 जुलै, 2007 रोजी करण्यात आलेली आहे. या आयोगामध्ये अध्यक्षासह एकूण 7 सदस्य आहेत. बालविकासाचे काम केलेले नामांकीत व्यक्ती या आयोगाचे अध्यक्ष आहेत. यामध्ये पुढील क्षेत्रातील नामांकीत व्यक्तींचा समावेश केलेला आहे. शिक्षण, बालकांचे आरोग्य काळजी कल्याण किंवा विकास, बाल न्याय क्षेत्र किंवा दुर्लक्षित मुले किंवा अपंग मुलांचे क्षेत्र, बाल कामगार प्रतिबंध, बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र, बालकांच्या कायद्यांविषयी क्षेत्र यांचा समावेश आहे. एकूण 7 सदस्यांमध्ये किमान दोन महिला सदस्य आहेत. ही समिती निवडण्याकरिता माननीय महिला व बालविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती तयार केलेली आहे. यामध्ये महिला व बाल विकास विभागाचे राज्यमंत्री सदस्य आहेत व बालकांच्या क्षेत्रातील नामांकित सामाजिक कार्यकर्ता हे एक सदस्य आहेत. अशा प्रकारे तीन सदस्यांची निवड समिती वरील समितीतील 6 सदस्य नेमणार आहे. यापैकी बालकांच्या क्षेत्रातील नामांकित सामाजिक कार्यकर्ता म्हणून श्री.सुर्यकांत रामराव कुलकर्णी यांना नेमले आहे. याबाबत शासनाने ठरविले आहे की, बालमजूरीची प्रथा 2010 पर्यत संपुष्टात आणावयाची आहे. त्याकरिता दिनांक 3.7.2000 रोजी 18 कोटी 65 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यादृष्टीने काम सुरु आहे. जी.आर. मध्ये आपण काही त्रुटी सांगितल्या आहेत, त्या दुरुस्त करण्यात येतील. "यशदा" बद्दल माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी राज्य शासन योग्य तो विचार करील. माननीय सदस्या माननीय श्रीमती मंदा म्हात्रे यांनी दुसरी बाब सांगितली आहे की, आई वडील नसलेल्या अनाथ बालकामगारांसाठी काय करता येईल. याबाबत मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील 8 जिल्हयामध्ये राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प सुरु केलेला आहे. यामध्ये सोलापूर, ठाणे, धुळे, नाशिक, बीड, नांदेड, यवतमाळ, जळगाव जिल्हयांचा समावेश असून तेथे राष्ट्रीय कामगार प्रकल्प सुरु आहे. या मुलांचा समावेश या प्रकल्पामध्ये करण्याची प्रोव्हीजन करता येईल. येथे 7500 बालकामगार आहेत, त्यांना व्यावसायिक शिक्षण दिले जाते. यासाठी तशा प्रकारची केंद्रे उपलब्ध आहेत.

.....2

28-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, बालहक्क आयोगातील सदस्यांची नियुक्ती कधीपर्यंत होईल, महाराष्ट्राच्या ज्या भागातून बालकामगार आलेले दिसत आहेत, तेथील शाळांमध्ये ती मुले जावीत यासाठी कोणते प्रयत्न करणार आहात. ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपणास या बालकामगारांना योग्य त्या शाळेमध्ये आपणास प्रवेश देता येईल. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे, त्यावर एक सदस्य नेमला आहे, इतर सदस्यांची लवकरच नियुक्ती करण्यात येईल.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी**.: सुशिक्षित बेरोजगारांच्या वाढत्या गंभीर समस्येवर उपाययोजना करणे

**मु.शी**.: सुशिक्षित बेरोजगारांच्या वाढत्या गंभीर समस्येवर उपाययोजना करण्याबाबत श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.राजन तेली (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या, त्यामुळे नोकरीच्या शोधात राज्यातील बेरोजगार वणवण हिंडणे, मुबलक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे बेरोजगार चिंतेत असणे, राज्य शासनाने नोकर भरतीवर बंदी घातल्यामुळे या समस्येवर भर पडली असणे, उद्योगांमध्ये स्थानिक बेरोजगारांना आणि प्रकल्पग्रस्तांना संधी न देता परप्रांतियांना संधी दिली जात असल्यामुळे राज्यातील बेरोजगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, बेरोजगारीला कंटाळून आत्महत्या करण्याच्या घटना राज्यात घडणे, या गंभीर व जटील समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने गांभीर्याने विचार करण्याची नितांत आवश्यकता."

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सध्या राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची संख्या फार मोठया प्रमाणावर वाढली आहे. याबाबत महत्वाची चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

**तालिका सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सूचना बऱ्याच मोठया आहेत परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेऊन 12.45 वाजण्यापूर्वी किमान तीन चर्चा संपवायच्या आहेत.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आमच्यासारख्या नवीन सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी. अतिशय महत्वाच्या विषयावरील ही चर्चा मागील तीन दिवसापासून पुढे ढकलली जात आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने सदस्यांना किमान 45 मिनिटे बोलण्याची संधी मिळाली पाहिजे, असे मला स्वत:ला वाटते. परंतु वेळ कमी असल्याने, मला वाईट वाटते की अशी विनंती करावी लागते, त्याला माझा नाईलाज आहे.

नंतर कु.धनश्री.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MAP/ प्रथम श्री. गागरे... 12:15

श्री. राजन तेली.....

महाराष्ट्र राज्याचा आपण विचार केला तर आपणास आढळून येईल की, 8 कोटी पेक्षा सुशिक्षित बेरोजगार तरुण राज्यामध्ये आहेत. मला याची कल्पना आहे की, एवढया मोठया संख्येने असलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आपण नोकऱ्या उपलब्ध करुन देऊ शकणार नाही. नोकरीकरीता बाहेरील राज्यामधून, आपल्या राज्यामध्ये लोकांचे लोंढे येत आहेत. या लोंढयांची संख्या वाढत चालली आहे. यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी आत्महत्या करण्यास सुरुवात केलेली आहे. यासंदर्भात शासनाने निश्चित स्वरुपाचे धोरण अवलंबिण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. 14 ऑगस्ट रोजी माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांनी "इंडिया व्हिजन फॉर मिलेनियम " या ग्रंथाचा गांभिर्याने विचार करावा. बेरोजगारीच्या प्रश्नावर आपल्याला कशा पद्धतीने मदत करता येईल याचे सविस्तर विवेचन केले आहे. त्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करायचे घटक देण्यात आलेले आहेत ते पुढीलप्रमाणे : (1) नैसर्गिक संशोधनाचा विद्यार्थ्यांकडून शोध व त्याची उपयोगिता आणणे. (2) संपूर्ण शिक्षण प्रणालीमध्ये उद्योजकीय शिक्षणाचा अंतर्भाव करणे (3) सुशिक्षित जागतिकरण्याच्या दृष्टीने समग्र विचार करणे.(4) विद्यमान शैक्षणिक सुविधांचा आढावा घेऊन उपरोक्त घटकांचा शिक्षण प्रणालीमध्ये समावेश करणे. (5) स्वयंरोजगाराबाबत काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था शेतकरी उद्योजक यांच्यामध्ये चांगल्या प्रकारचे समन्वय आणणे आणि शेतकरी उद्योजक यांच्यामध्ये समन्वय आणल्यानंतर समाजाच्या ज्या अपेक्षा आहेत, गरजा आहेत त्या पूर्ण करण्यासाठी समाजात शिक्षणाचा सहभाग करणे हे अतिशय महत्वाचे घटक त्यामध्ये नमूद केलेले आहे.

आज आपल्याला या ठिकाणी असे दिसते की, सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. आज प्रत्येक तरुणाला वाटते की, लगेच आपण श्रीमंत व्हावे या सर्व कारणांमुळे गुन्हेगारांच्या प्रमाणात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. आजच्या तरुणामध्ये कष्टाळू, चिकाटी, हिशोबी, दूरदृष्टी याची सुध्दा कमतरता आपल्याला या ठिकाणी पहावयाला मिळते. म्हणून माझी या ठिकाणी महत्वाची सूचना आहे की, आताचा जो अभ्यासक्रम आहे ता कालबाह्य झालेला आहे. या अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. याबाबत मी आपणास एक उदाहरण देऊ इच्छितो. कोकण विभागामध्ये आपण करु काय शकता ? . तिथे काजू पिकतो आहे, आंब्याचे पीक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

घेतले जाते. तेथे मासेमारी केली जाते. परंतु मत्स्य विद्यापीठ हे नागपूरला आहे. मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत सागरी किनाऱ्याचे जे चार जिल्हे आहेत, तोच कोकणाचा किनारा असून तेथे मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत असतो. यादृष्टीने कुठले उद्योग तेथे सुरु करावेत त्या लोकांना ट्रेन कसे करावे याबाबत आपण विचार केला पाहिजे. यासंदर्भात त्या त्या प्रांतिकवर विभागात काय केले पाहिजे याबाबत आपण विचार केला पाहिजे. विदर्भात काय करावे, कोकणात काय करावे, मराठवाड्यात काय करावे याचा विचार केला पाहिजे. तेथील शिक्षण हे पहिले ते सातवीपर्यंत कसे असावे, सातवीपासून ते बारावीपर्यंत कसे असावे, विद्यापीठाचे शिक्षण कसे असावे हे देखील आपण पाहिले पाहिजे. या शैक्षणिक पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल होण्याची नितांत आवश्यकता आहे. काल सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या विषयावर बोलताना सभागृहात सुंदर चित्रण केले. रोजगार हमी योजनेच्या ज्या योजना करतात या अधिकाऱ्यांना त्याची काही माहिती आहे का ? यांना त्यातील अनुभव आहे काय ? प्रात्याक्षिक त्या ठिकाणी बघितले आहे काय ? या सगळ्या गोष्टीचा विचार जेव्हा आपण केला पाहिजे. कारण शिक्षण या विषयावर प्रत्येक वेळेला सभागृहात चर्चा होते त्यावेळेला नको नको ते विषय सभागृहात चर्चेला येतात. सिंधुदुर्गाचा विषय कोठेही घातला जातो, रत्नागिरीचा विषय चालू असताना कोठेही ऐतिहासीक दाखला दिला जातो आणि मग शैक्षणिक सोयी आहे, यांच्यावर आपण विसंबून राहतो म्हणून प्रांतिकवार किंवा जिल्हावार अभ्यासक्रम तयार करुन आपण बेकारीवर मात करु शकू. अशा प्रकारचा अभ्यासक्रम त्या ठिकाणी करणे गरजेचे आहे. आमच्या कोकण कृषी विद्यापीठामध्ये दापोली विद्यापीठ आहे. अशी राज्यामध्ये जी विद्यापीठे असतील त्या सर्वांचा आढावा आपण घेतला पाहिजे. कृषी विद्यापीठाचे नेमके काम काय आहे ? कृषी विद्यापीठ नेमके काय करते ? कृषी विद्यापीठ जे संशोधन करते ते लोकांपर्यंत जाते का ? यामध्ये जर कोकणचे उदाहरण घेतले तर कोकाणामध्ये जी काही साधनसंपत्ती आहे, जी काही शेती आहे आंबा आहे, काजू आहे, कोकम आहे याचा टर्नओव्हर बघितला तर तो 2000 कोटी रुपयांपेक्षा सुध्दा जास्त असल्याचे आपल्याला दिसून येईल. शासनाने या संबंधी कधी विचार केला आहे काय , यासंदर्भात शासनाने प्रक्रिया

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

उद्योग निर्माण केले आहेत काय ? मी आपणास सांगू इच्छितो की, कोकणामध्ये एकही शासनाचा प्रक्रिया उद्योग सुरु करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ कु.गायकवाड नंतर --- 12:20

श्री. तेली ....

म्हणून या प्रकारचे प्रक्रियाउद्योग तेथे सुरू करण्याचादेखील विचार केला पाहिजे. तेव्हा शासनाने किंवा कोकण कृषी विद्यापीठाने ज्या काही नवनव्या जाती निर्माण केल्या असतील त्या सर्व सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या गेल्या नाहीत, त्या केवळ दापोलीतच आहेत. म्हणून याचा विकास आणि विचार करण्याच्या दृष्टिकोनातून तशा प्रकारचा अंतर्भाव अभ्यासक्रमात करणे गरजेचे आहे. आज आपल्याकडील 70 पेक्षा जास्त जनता ग्रामीण भागामध्ये राहते आणि त्या जनतेचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. पण असे असतानाही शेतीसाठी आपण प्रत्यक्षात किती तरतूद करतो ? शेतीसाठी शिक्षणामध्ये देखील आपण किती महत्त्व देतो ? आतापर्यंतचा जो आपला अभ्यासक्रम आहे त्यामध्ये शेतीला आपण किती महत्त्व दिले आहे याचाही विचार करणे गरजेचे आहे. म्हणून हा कालबाह्य झ ाालेला असा जो अभ्यासक्रम आहे त्यामध्ये निश्चितपणे जिल्हा, विभाग, राज्य आणि शिक्षण अशी विभागणी आपण केली पाहिजे. सभापती महोदय, स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून तशा प्रकारचे अभ्यासक्रम आपण तयार केले पाहिजेत. थोडक्यात सांगावयाचे तर आज सरस्वती आणि लक्ष्मीची एकत्रित पूजा बांधण्याची गरज आहे आणि तीही शैक्षणिक क्षेत्रातून होण्याची गरज आहे, तशा प्रकारचे काम आपण करणे अत्यावश्यक आहे. सभापती महोदय, आपल्याकडे औद्योगिकीकरण कशामध्ये झाले आहे ? तर विशेष करून सेवा क्षेत्रात झाले आहे. त्यात मग एमबीए असेल, वित्त असेल, ह्यूमन रिसोर्सेस असेल, किंवा अभियांत्रिकीमध्ये असेल, आय.टी.मध्ये असेल. अशा क्षेत्रात आपण औद्योगिकीकरणात पुढे जरूर आहोत. पण बाकीची जी क्षेत्रे आहेत त्यात मात्र आपण मागे राहिलो आहोत असे माझे मत आहे. म्हणून माझी या निमित्ताने आपल्या माध्यमातून विनंती आहे की, शासनाने या सगळ्या अभ्यासक्रमांमध्ये त्यादृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, माझी सगळ्या सन्माननीय सदस्यांना देखील विनंती आहे की, आज आपल्या राज्याच्या अनेक विभागांमध्ये औद्योगिक क्षेत्रे यायला लागली आहेत. मग ते रायगड असेल, रत्नागिरी असेल वा सिंधुदुर्ग असेल किंवा विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागात असेल, या प्रत्येक भागातील प्राधान्य विषय वेगळा जरूर असेल. पण तेथील जी जमीन आपण कधीही वापरत नाही आणि खाजगी विकासक अशी जमीन कोठे तडजोड करून घेत असेल तर त्याला देखील आपण विरोध करता, तो कृपया करू नये. मी आपल्याला या संदर्भात कोकणाचे उदाहरण देतो. कोकणामध्ये कातळाचा भाग आहे, तेथे विमानतळ होण्याला देखील काही लोक

...... एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ....

विरोध करू लागले आहेत. असेही क्षेत्र असते की, जेथे वर्षानुवर्षे आपण काहीही पिकवित नाही अशा भागामध्ये येण्यासदेखील उद्योजक आज तयार झाले आहेत, पण त्यांनाही आपण विरोध करू लागलो आहोत. पण आपण तेथे रोजगार निर्माण होणार आहे हे लक्षात घेऊन, तेथे असे कोणी उद्योजक येत असतील तर त्यांना मदत करण्याचे धोरण आपण ठेवले पाहिजे. अर्थातच हे सारे करताना पर्यावरणाचे संतुलन राहील याचीही काळजी निश्चितपणे घेतली गेली पाहिजे. पण या गोष्टीचा विचार आपण निश्चितपणे केला पाहिजे असे मला वाटते. या संदर्भात जनगणनेचा जो डाटा आहे तो बघून केवळ आपल्याला चालणार नाही. तो व्यवस्थित करायला पाहिजे, भौगोलिक स्थितीवर आधारित आपल्याला करायला पाहिजे, त्यासाठी ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेतले पाहिजेत आणि रोजगार निर्मितीसाठी देखील संपूर्ण राज्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी गरज पडल्यास कामगार कायद्यात काही उपयुक्त बदल करावयाचे झाल्यास काळाप्रमाणे त्यात बदल करण्यासही आपली तयारी असली पाहिजे. खाजगी उद्योगांना, उद्योजकांना उत्तेजन देतानाच, व्यवस्थापन व मजूर युनियन यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे असेही मला वाटते. सभापती महोदय, जाता जाता मी एकच सांगेन की, महात्मा गांधींनी ज्याप्रमाणे आपल्याला 'खेड्यांकडे चला' असे सांगितले आणि महत्त्वाचा विषय हा यात तोच आहे. खेड्यातील किंवा ग्रामीण भागातील लोंढा शहराकडे येण्याऐवजी शहरातील लोंढा ग्रामीण भागाकडे कसा येईल हे आपण पाहिले पाहिजे, त्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. घटनेने राज्यांना जी मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत त्यात गांधीजींची तत्त्वे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. त्यानुसार भारतातील 70 टक्के जनता जी खेड्यात राहते, ती खेडी आज उपजीविकेसाठी शहरांवर अवलंबून आहेत हे चित्र बदलण्यासाठी गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे खेडी स्वयंपूर्ण बनवा, त्यादृष्टीने आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे असे मला वाटते.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

......

एस-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी(वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापति महोदय, बेरोजगारों के संबंध में सरकार की जो नीति है, मैं उसके बारे में दो प्रश्न रखना चाहूंगा. 1980 से चंद्रपुर में प्रकल्पग्रस्तों को नौकरी देने की समस्या पैदा हुई है. चंद्रपुर में नई नौकरियों के अवसर उपलब्ध है लेकिन जिनकी जमीन प्रकल्प के लिए ली गई है, यानी जो प्रकल्पग्रस्त है, उनको अभी तक शासन ने नौकरी नहीं दी है.इसलिए सरकार तुरंत उन्हें नौकरी देने की व्यवस्था करें.

सभापति महोदय, विदर्भ के जिलों में जैसे गडचिरोली, चंद्रपुर, भंडारा इत्यादि जिलों में जो नौकरी के लिए परीक्षाएं होती है, उन परीक्षाओं में पश्चिम महाराष्ट्र एवम् मुंबई के विद्यार्थी 90 प्रतिशत मार्क्स प्राप्त करते हैं जिससे उन्हें इन इलाकों में नौकरी लग जाती है. चूंकि ये इलाके नक्सलग्रस्त है इसलिए वे लोग आमदार एवम् खासदारों के माध्यम से प्रेशर डालकर अपनी ट्रांसफर दूसरी जगह करवा लेते हैं. पुलिस कर्मचारी, डॉक्टर, इंजीनियर अन्य नौकरियों में कार्यरत लोग इन नक्सलग्रस्त इलाकों में काम करने के लिए तैयार नहीं होते. इसलिए मेरा यह सुझाव है कि नक्सलग्रस्त इलाकों के लोगों को ही ऐसे नक्सलग्रस्त इलाकों में नौकरी दी जाए.दूसरी बात यह है कि स्थानीय लोगों की भरती करते समय जो परीक्षा ली जाती है, उसमें गोंड भाषा का पेपर रखकर जिन्हें गोंड भाषा आती है, उन्हें ही नौकरी में प्राधान्य दिया जाए. पिछली बार जो भरती हुई थी, उस समय अमरावती में यह व्यवस्था लागू की गई थी लेकिन चंद्रपुर में लोकल भाषा जानने वालों को नौकरी में भरती नहीं किया गया. इसलिए सम्माननीय मंत्री जी इस ओर ध्यान दें. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

............

यानंतर श्री सरफरे

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मला तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. घटनेमध्ये रोजगाराच्या मूलभूत हक्काबाबत नोंद करण्यात आलेली नाही तर मार्गदर्शक तत्व म्हणून नोंद करण्यात आली आहे. तेव्हा मागेल त्याला काम अशाप्रकारे रोजगाराच्या मूलभूत हक्काची नोंद करण्याबाबत शासनाच्या माध्यमातून केंद्र शासनाला सुचविण्यात येईल काय? दुसरा प्रश्न असा की, महाराष्ट्रामध्ये बेकारी हटविण्यासाठी केल्या जात असलेल्या कार्यक्रमाची ब्लू प्रिंट बनविणार काय? तिसरा प्रश्न असा की, तामिळनाडू राज्यामध्ये ज्या उद्योगांना शासन जमीन, पाणी, वीज इत्यादी बाबी सवलतीमध्ये देते, त्या उद्योगधंद्यातील नोकऱ्यांमध्ये सेवा योजन कार्यालयाच्या माध्यमातून तरुणांना नोकऱ्या दिल्या जाव्यात यासंबंधी कायदा करण्यात आला आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नियम तयार करणार आहे काय?

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सेवा योजन कार्यालयामध्ये बेरोजगार तरुणांची झ ाालेली नोंद आणि या प्रमाणात बेकार तरुणांना मिळत असलेल्या नोकऱ्या पहाता खाजगी क्षेत्रामध्ये नोकऱ्या मिळत आहेत, परंतु सेवा योजन कार्यालयामार्फत नोकऱ्या मिळत नाहीत अशी स्थिती आहे. त्याकरिता हे शासन उपाय योजना करणार आहे काय? त्याचप्रमाणे केरळ राज्याच्या धर्तीवर पर्यटन, मत्स्य व्यवसाय आणि फळप्रक्रिया हे विषय इयत्ता पहिली पासून चौथीपर्यंत सुरु करण्याबाबत शिक्षण विभागाचा विचार आहे काय? असल्यास, त्याबाबतचा निर्णय लवकरात लवकर अंमलात येईल काय?

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (रोजगार आणि स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या आणि त्यांच्या प्रश्नासंबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. त्या चर्चेमध्ये अनेक माननीय सदस्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. खरे तर प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित होते आणि त्यावर थोडाफार ऊहापोह होतो. यासंबंधात काही कॉंक्रिट गोष्टी करण्याची आवश्यकता आहे, त्या आवर्जून याठिकाणी नमूद केल्या पाहिजेत. आपणास कल्पना आहे की, सुशिक्षित बेकारांचे 35 लाखापर्यंत लाईव्ह रजिस्ट्रेशन झाले आहे, आणि 35 हजारापर्यंत सुशिक्षित बेरोजगारांची नोंद झाली आहे. गेल्या वर्षीच्या 2006 सालचा विचार केला तर 14 हजार 700 लोकांना नोकऱ्या लावण्यात आल्या. त्यामुळे 35 लाखांपैकी 14 हजार लोकांना नोकऱ्या मिळाल्या असा त्याचा अर्थ नाही. याचा अर्थ 14 हजारापर्यंतची माहिती शासनाजवळ उपलब्ध आहे. आपणास कल्पना आहे की, रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत गांभीर्याने विचार करुन दि.17.11.2007 रोजी पुन्हा शासन निर्णय झाला आहे. ही प्रक्रिया कालबध्द करण्याचा शासनाचा निश्चित प्रयत्न रहाणार आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी एच.डी.आय. लो आहे त्याठिकाणी जर कुणी उद्योग सुरु करीत असेल तर ई.एस.आय. आणि ई.पी.एस. मध्ये कामगारांना जेव्हा लागेल तेव्हा 75 टक्के रक्कम परत देण्याचा निर्णय घेतला आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20.12.2007 ( असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही ) U-1

बरवड पूर्वी श्री. सरफरे 12.30

श्री. राणा जगजितसिंह पाटील .....

आणि शासनाला अशी खात्री वाटते की, या माध्यमातून काही मोठे प्रकल्प अविकसित, औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांमध्ये जातील. रोजगार आणि स्वयंरोजगार खात्याचा थोडक्यात आढावा घ्यावयाचा म्हटला तर साधारणत: 2872 सेवा सहकारी संस्था कार्यरत आहेत आणि जवळपास 30 जिल्ह्यात सहकारी सेवा संस्थांचा महासंघ देखील स्थापन करण्यात आलेला आहे. बेरोजगार सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून जवळजवळ 27 कोटी रुपयांची कामे शासनाच्या विविध विभागाकडून मिळालेली आहेत. या सेवा सोसायट्यांना आतापर्यंत 10 कोटी रुपयांपर्यंत सहाय्य केलेले आहे. त्याचबरोबर सध्या 440 लोक सेवा केंद्र कार्यरत आहेत आणि त्याच्या माध्यमातून महापालिकांच्या, नगरपालिकांच्या तसेच इतर नागरी भागामध्ये ज्या गरजा असतात त्या भागविण्याचा प्रयत्न चालू आहे. रोजगारासाठी प्रोत्साहन कार्यक्रम सुरु केलेला आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. ज्या प्रतिष्ठित आस्थापना आहेत उदा. महिंद्र अँड महिंद्र, जॉन्सन अँड जॉन्सन अशा कंपन्यांकडे उमेदवारांना पाठवून त्यांना काही महिने प्रशिक्षण दिले जाते. त्यांना काही स्टायफंड दिला जातो. गेल्या वर्षी 7250 उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे आणि त्यातून अनेक उमेदवारांना जॉब मिळालेला आहे. आदिवासी उमेदवारांसाठी एक वेगळा कार्यक्रम राबवितो. त्यांना एक हजार रुपये दरमहा विद्यावेतन दिले जाते. काही पुस्तके मोफत दिली जातात. त्यांना प्रशिक्षण दिले जाते जेणेकरुन त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. त्याचबरोबर जी 30 रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे आहेत त्या ठिकाणी करिअर कॉर्नर म्हणजे व्यवसाय मार्गदर्शन कक्ष उघडण्याचे ठरविले आहे. त्यासाठी 30 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या ठिकाणी पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेट कनेक्शन असेलेला संगणक उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. आपण इंटरनेटवर रोजगार व स्वयंरोजगारची साईट पाहिली तर लक्षात येईल की, जे लाईव्ह रजिस्ट्रेशन आहे त्याची माहिती इंटरनेटवर उपलब्ध करुन दिलेली आहे. ठराविक शैक्षणिक अर्हता असलेले उमेदवार शोधावयाचे असतील तर ते सहज शोधणे शक्य आहे. अनेक कंपन्या या इंटरनेट साईटचा वापर करीत आहेत. आणखी एक महत्वाचा निर्णय घेतला होता. आपण रोजगार मेळावे सुरु केलेले आहेत. सन 2006-07 मध्ये मेळावे घेतले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

मुलाखतीसाठी 9400 उमेदवार उपस्थित राहिले होते. सहा जिल्ह्यामध्ये मेळावे घेतले. जवळजवळ 1 हजार उमेदवारांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर 2007-08 मध्ये आतापर्यंत 15 जिल्ह्यांमध्ये असेच रोजगार मिळावे घेतले. जवळजवळ 20 हजार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले आणि 2500 पेक्षा जास्त उमेदवार निवडले गेले.

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजचा जो ॲक्ट आहे त्यानुसार कंपल्सरी नोटिफिकेशनची तरतूद आहे. कंपल्सरी नोटिफिकेशन द्यावयास पाहिजे. त्याची अंमलबजावणी खाजगी उद्योगांमध्ये सुरु झालेली नाही. ते कोणीही करत नाही. वेबसाईटवरुन उमेदवारांची निवड करतात. शासकीय आणि निमशासकीय संस्था या कंपल्सरी नोटिफिकेशनच्या बाबतीत अंमलबजावणी करतात पण खाजगी संस्था त्याबाबत अंमलबजावणी करीत नाही. त्यांना सुध्दा त्या ॲक्टची अंमलबजावणी करण्याचे कंपल्सरी केले पाहिजे. आम्हाला असा असा रोजगार द्यावयाचा आहे आणि जे कोणी उमेदवार उपलब्ध असतील त्यांची नावे द्यावीत असे त्यांनी सेवायोजन कार्यालयाला कळविले पाहिजे. आज बाहेरुन जो लोंढा येतो त्याचे कारण असे आहे की, त्यांना वेबसाईटवरुन किंवा थेट नोकऱ्या मिळतात. दुसरा भाग असा की, आपण एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची वेबसाईट उघडली पाहिजे. शासनाच्या वतीने वेबसाईटवर नावे द्यावीत. अमूक क्वालिफिकेशनचे उमेदवार उपलब्ध आहेत ही माहिती त्या वेबसाईटवर द्यावी.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : आपण दुसरी जी सूचना केली ती वेबसाईट प्रत्यक्षात उपलब्ध आहे.

**तालिका सभापती** : एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची वेबसाईट असली पाहिजे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : आपल्याकडे एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची वेबसाईट आहे.

**तालिका सभापती** : कंपल्सरी नोटिफिकेशन देत नाहीत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आपण जी दुसरी सूचना केली त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, रोजगार आणि स्वयंरोजगार केन्द्राची वेब साईट आहे. लाईव्ह रजिस्ट्रेशन असलेल्या लोकांची शैक्षणिक अर्हता त्या वेबसाईटद्वारे उपलब्ध होऊ शकते.

**तालिका सभापती** : ती वेबसाईट असली तरी ती त्यांना उपलब्ध होत नाही. उदा. एका कंपनीला पदवीधर मुले हवी असतील तर ती कंपनी शासनाची वेबसाईट बघेलच असे नाही. शासनाची जी अधिकृत वेबसाईट आहे तिला प्राधान्य द्यावे अशी सक्ती करण्याची आवश्यकता आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : आपण आपल्या शासनाच्याच वेबसाईटवरुन उमेदवार घ्यावेत असे म्हणणे शक्य नाही. कम्पलरी नोटिफिकेशनची अमलबजावणी होते की नाही हे पाहण्याची व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. त्याबाबतीत अनेक वेळा चर्चाही झालेली आहे. याबाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : मी आपणास माहिती देतो.

श्री. राणा जगजित सिंह पाटील : ठीक आहे. आपण या प्रश्नावर दोघे बसून चर्चा करु. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी अभ्यासक्रमामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. त्याबाबतीत शंका असण्याचे कारण नाही. त्याबाबतीत देखील काम सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी कोकणामध्ये पर्यटन आणि ॲग्रो-प्रोसेसिंगचे अभ्यासक्रम सुरु करावेत असे सांगितले. आय.टी.आय, पॉलिटेक्निकच्या माध्यमातून जास्तीत जास्त अभ्यासक्रम सुरु होतील असा आमचा प्रयत्न आहे. राज्यामध्ये एसईझेड आणि लार्जस्केल इंडस्ट्रीजच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात पोटॅन्शियल निर्माण झालेले आहे. आज परिस्थिती अशी आहे की पुण्यासारख्या ठिकाणी जॉब उपलब्ध आहेत,परंतु उमेदवार मिळत नाहीत. रोजगार मिळण्याच्या बाबतीत पुणे, मुंबईसारख्या ठिकाणी जेथे रोजगार उपलब्ध आहेत तेथे ग्रामीण भागातील किंवा इतर जिल्ह्यातील उमेदवारांना देखील रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांना रोजगार मिळावा यादृष्टीने निर्णय घेतलेला आहे. याठिकाणी कृषी विद्यापीठांचा उल्लेख करण्यात आला. आपल्या राज्यामध्ये चार कृषी विद्यापीठ आहेत. या विद्यापीठातून दरवर्षी एक कृषी विस्तार सप्ताह घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. तीन विद्यापीठातून हा कार्यक्रम राबविलेला असून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राणा जगजितसिंह पाटील...)

कोकणातील दापोली कृषी विद्यापीठामध्ये 2008मध्ये हा कृषी विस्तार सप्ताह कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमामध्ये मोठया संख्येने शेतकरी सहभागी होतात. विद्यापीठाने शेतीच्या बाबतीत केलेले संशोधन शेतक-यांपर्यन्त पोचविण्याचे काम या कार्यक्रमामध्ये केले जाते. चंद्रपूरच्या प्रकल्पग्रस्तांचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आल. प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरीमध्ये सामावून घेण्यात यावे असे सांगण्यात आले. तसेच निवड परीक्षांमध्ये लोकल सब्जेक्टचे प्रश्न विचारले जावेत अशीही सूचना करण्यात आली. याबाबतीत काही उणिवा राहिल्या असतील तर जिल्हाधिका-यांना तशा सूचना देण्यात येतील.

श्री. परशुराम उपरकर : शासकीय सेवेमध्ये किंवा अन्य संस्थांमध्ये भरती करताना सेवायोजन कार्यालयातील उमेदवारांना न बोलाविता वृत्तपत्रामध्ये जाहिराती देऊन अर्ज मागविण्यात येतात. तेव्हा भरती करताना सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार घेण्याचे बंधन घालण्यात येणार आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : याबाबतीत सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. रोजगार आणि स्वयंरोजगार केन्द्रातील उमेदवारांची यादी न मागता वृत्तपत्रातून, रेडिओ, टी.व्ही. इत्यादी प्रसार माध्यमाद्वारे उमेदवारांचे अर्ज मागवून मुलाखती घ्याव्यात असा सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला आहे.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:40

**पृ.शी.**: कोकणातील आंबा, काजू व कोकम या फळ पिकांना पीक विमा योजना लागू करणे

**मु.शी.**: कोकणातील आंबा, काजू व कोकम या फळ पिकांना पीक विमा योजना लागू करणे यासंबंधी श्री.राजन तेली यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात विशेषत: सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात आंबा, काजू व कोकम यांचे उत्पादन घेतले जाणे, सदर जिल्हयातील शेतकऱ्यांचे जीवन सर्वस्वी बागायतीवर अवलंबून असणे, तसेच बागायतींवर किडीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे पिकांचे नुकसान होणे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणे, शासनाने लागू केलेल्या पिक विमा योजनेत ऊस, कापूस इत्यादी व्यापारी पिकांचा समावेश असणे व आंबा, काजू व कोकम यांना सदर योजनेतून वगळण्यात येणे, त्यामुळे शेतकरी वर्गात पसरलेली नाराजी सबब, आंबा, काजू व कोकम यांचा पिक विमा योजनेत समावेश करुन शेतकऱ्यांचे नुकसान भरुन काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, आंबा, काजू व कोकम या कोकणातील फळ पिकांना ऊस, कापूस यांच्याप्रमाणे पीक विमा योजना लागू करावी यादृष्टीने मी ही चर्चा उपस्थित केलेली आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे आंबा, काजू व कोकम ही कोकणातील प्रमुख फळे आहेत. आपण देखील कोकणातील आहात. आपल्याला कल्पना आहे की, आंब्यासाठी किती कष्ट करावे लागतात, आंबा पिकाची कशी मशागत करावी लागते, मोहोर येण्यापासून फळ काढण्यापर्यंत चार ते पाच महिन्यांचा कालावधी लागतो. कोकणातील भौगोलिक परिस्थिती गुंठ्यामध्ये आहे. पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे एकरी शेती असते तशी परिस्थिती कोकणामध्ये नाही. किमान २० हजार रुपयांपेक्षा अधिक एकरी खर्च करावा लागतो. असे असतानाही पीक बेभरवशाचे असते. कायमस्वरुपी वर्षानुवर्षे आंबा पीक येते असे नाही. म्हणून मी आपल्या माध्यमातून मागणी करतो की, ज्याप्रमाणे ऊस आणि कापूस पिकाला पीक विमा योजना लागू केलेली आहे तशीच पीक विमा योजना आंबा, काजू आणि कोकम या फळ पिकांना लागू करण्याबाबत शासनाने प्रयत्न करावा. एकरी दोन ते

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.................

अडीच टन एवढेच आंबा पिकापासून उत्पादन मिळते. हेच प्रमाण ऑस्ट्रेलिया या देशाचे पाहिले तर एकरी किमान १३ टन इतके उत्पादन मिळते. ही जी तफावत आहे ती कमी करण्याच्या दृष्टीने शास्त्रीय प्रयत्न झाले पाहिजे. कृषि विद्यापीठाने प्रयत्न चालविले आहेत, मी नाही असे म्हणणार नाही. परंतु सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत ते प्रयत्न पोहोचले नाहीत, योग्य तो विकास झाला नाही. त्यादृष्टीकोनातून प्रयत्न झाले पाहिजेत. आंबा पिकाला आज जागतिक बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. निर्यात करण्यास मोठया प्रमाणात वाव आहे. काजू या पिकाला देखील निर्यातीस वाव आहे. काजूच्या टरफलापासून तेल काढता येते. वंगण म्हणून त्याचा वापर होतो. कोकम, काजू आणि आंबा या तीनही फळ पिकांना बाजारात चांगली मागणी आहे परंतु शासन त्यादृष्टीने विचार करीत नाही ही खंत आहे. गेल्या वर्षी आंबा पिकाची नुकसानभरपाई अद्याप दिली गेली नाही. मागील दोन-तीन वर्षाची नुकसानभरपाई अजूनही वाटली जात आहे. शासनाचा कोकणाकडे आणि कोकणातील फळ पिकांकडे बघण्याचा दृष्टीकोन उदासिनतेचा आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कोकणातील शेतकरी हा शोषिक आहे. एकदा तो पेटून उठला तर काय करील हे सांगता येणार नाही. शासन सातत्याने कोकणावर अन्याय करीत आहे. कृषि, पाटबंधारे या क्षेत्रात देखील कोकणावर अन्याय होत आहे. किमान या तीन फळ पिकांबाबत अन्याय होता कामा नये. या तीन फळ पिकांना पीक विमा योजना लागू करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कोकणात पावसाळा संपल्यानंतर जे गवत उगवलेले असते ते आताच्या काळात पूर्णत: वाळलेले असते. अचानक या गवतामुळे वणवा लागण्याच्या अनेक घटना घडत असतात. त्यामुळे मोठया प्रमाणात बागायती शेती नष्ट होतात. फळ पिकांवर रोग आल्यामुळे बाजारपेठेतील मागणीवर त्याचा परिणाम होतो. आंबा पिकावर साका रोगाचा प्रादुर्भाव होत असतो, परिणामी मागणीमध्ये घट होते. वेगवेगळया प्रकारच्या फळ पिकावर रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, फळ पिकांचे संरक्षण व्हावे यादृष्टीने शासनाने प्रयत्न केला पाहिजे. आज कोकणातील शेतकऱ्यांमध्ये शासनाविरुध्द चीड निर्माण झालेली आहे. शासन कोकणाकडे कोणत्याही प्रकारे लक्ष देत नाही. किमान काजू, आंबा व कोकम या तीन फळ पिकांना पीक विमा योजना लागू करावी. निर्यातीच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत, त्यादृष्टीने शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. या तीनही फळ पिकापासून मोठया प्रमाणात परकीय चलन मिळू शकते. कोकणातील काजू व कोकम या फळ

..३..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.................

पिकांना हमी भाव मिळाला. परंतु आंबा हे सीझनल पीक आहे. दीड ते दोन महिने चांगला भाव मिळतो. परंतु एकदा आवक मोठ्या प्रमाणात वाढली की आंबा प्रोसेसिंगसाठी किलोच्या भावाने विकत घेतला जातो. प्रोसेसिंगसाठी घेतल्या जाणाऱ्या आंब्याला हमी भाव दिला पाहिजे. ट्रक्स भरुन भरुन प्रोसेसिंगसाठी आंबा नेला जातो, त्याची वर्गवारी केली जात नाही. परंतु प्रोसेसिंगसाठी आंबा घेतला जात असताना त्याला हमी भाव दिलाच पाहिजे.

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : सभागृहाची वेळ दुपारी १२.४५ पर्यंत आहे. ही वेळ दुपारी १२.५० पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.राजन तेली : हमी भावाचा विषय मी मांडला आहे. आंबा, काजू व कोकम या तीन फळ पिकांना कृषिमंत्र्यांनी पीक विमा योजना लागू करावी आणि दापोली कृषि विद्यापीठाचे उपकेंद्र सिंधुदुर्ग जिल्हयात सुरु करावे. सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने दापोली कृषि विद्यापीठ सोयीचे नाही, अंतर फार आहे. याबाबतीत मंत्रीमहोदयांकडून विवेचन होणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, राज्यामध्ये विशेषत: सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्हयात आंबा, काजू तसेच कोकमचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. बेसिकली या भागात निर्माण होणा-या पिकांचा पीक विमा योजनेत समावेश करण्याच्या संदर्भात ही अर्धातास चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे. फळांच्या बाबतीत पीक विमा योजना आपण लागू करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विदर्भातील अमरावती जिल्हयात सन 2003-2004 मध्ये संत्रा पिकासाठी ही योजना सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या पीक विमा योजनेत फक्त 4 शेतक-यांनी आपला सहभाग नोंदविला होता. आंबा पिकासाठी हवामान पीक योजना सन 2005, 2006 आणि 2007 मध्ये अलिबाग, हर्णे, रत्नागिरी, देवगड अशा काही जिल्हयांसाठी ही योजना राबविण्याचे ठरवण्यात आले होते. हवामान केंद्रामध्ये हवामानाची जी नोंद होत असते ती ग्राहय मानून ही हवामान विमा योजना राबविण्याचे ठरविण्यात आले होते. या विमयाचा हप्ता 5 ते 8 टक्क्यापर्यंत ठरवून देण्यात आला होता. सन 2005-2006 मध्ये या योजनेत फक्त 100 झाडांचा विमा उतरवण्यात आला होता. सन 2006-2007 मध्ये 5 हजार झाडांचा विमा उतरवण्यात आला होता व त्याचा हप्ता 1.83 लक्ष रुपये ठरविण्यात आला होता संरक्षित रक्कम 30 लाख रुपयांची होती. या योजनेच्या निकषानुसार 3.38 लक्ष एवढीच नुकसान भरपाई मिळू शकली. सांगण्याचा हेतू असा आहे की, फळ पिकांच्या बाबतीत नेमके कोणते निकष लावावयाचे, उंबरठा उत्पन्न कसे काढावयाचे, नेहमीच फळांचे उत्पन्न जास्त येते अशीही वस्तुस्थिती नाही त्यामुळे नेमके उत्पन्न कसे काढावयाचे, निकष कसे काढावयाचे या सर्व गोष्टींमध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे शासनाला चांगली पीक विमा योजना देता आलेली नाही. नारळाच्या बाबतीत पीक विमा योजनेचा प्रस्ताव केला गेला. परंतु प्रत्येक झाडाचे उत्पन्न त्या झाडाच्या वयोमर्यादेनुसार कमी जास्त येत असते त्यामुळे यासंदर्भात मायक्रो डिटेलिंग करणे आवश्यक आहे. या पिकासाठी खर्च किती लागला व तो खर्च शेतक-यांना प्रिमियम मधून घ्यावा लागणार आहे. अशा गोष्टींसाठी 12-12,13-13 टक्के प्रमियम संरक्षित करुन घ्यावा लागत असतो. शासन केवळ 6 टक्क्यापर्यंत प्रिमयम भरु शकले. परंतु यासंदर्भात नेमके निकष

...2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील.....

काय ठरवायचे , उत्पन्न कसे ठरवायचे, जोखीम स्तर कसा ठरवायचा हे अजून स्पष्ट होत नाही. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली साहेबांना विनंती आहे की, याबाबतीत आपल्या काही सूचना असतील तर त्या सूचना .....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरालाच माझी हरकत आहे. अजून पर्यंत कोकणातील शेतक-यांच्या पीक विमा योजनेच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला नाही असे दिसून येते. याचा अर्थ कोकणातील शेतक-यांच्या पीकांना मदत करण्यास शासन गंभीर नाही असाच अर्थ होतो. परंतु हे शासन इतर भागात जर शेती पिकली नाही, रुजली नाही, जास्त पाऊस आला म्हणून जमीन वाहून गेली, जास्त पीक आले परंतु भाव नाही, किडीचा प्रार्दुभाव झाला तरी सुध्दा शासन मदत करीत असते. सभापती महोदय, कोकणातील शेती सुध्दा निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. त्यामुळे निसर्गाची मर्जी फिरली की, कोकणातील शेतकरी उध्वस्त होत असतो परंतु कोकणातील शेतक-यांचे कितीही नुकसान झाले तरी त्याला मदत करावयाची नाही असा शासनाने विचार करुन ठेवला आहे काय? त्यामुळे कोकणाच्या संदर्भात शासन किती गंभीर आहे, उदासीन आहे हे दिसून येते. त्यामुळे वर्षानुवर्षे कोकणातील शेतक-यांवर जो अन्याय होत आहे तो दूर करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...........

ही उदासीनता दूर केली पाहिजे.कोकणातील शेतकरी काही बोलत नाही, संघर्ष करीत नाही, पेटून उठत नाही, शासनाकडे कोणतीही मदत मागत नाही याचा अर्थ शासनाने कोकणातील शेतकऱ्यांना काही देऊ नये असे नाही. मागील अधिवेशनात कोकणातील प्रश्नावर चर्चा झाली त्यावेळी आपण सुध्दा त्या चर्चेत भाग घेऊन कोकणातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या. त्यावेळी आम्हीसुध्दा अनेक मुद्दे मांडले होते. कोकणातील पिकांना पीक विमा योजना लागू करु, कोकणात वणव्यामुळे पिकांचे नुकसान होते त्यास मदत करु असे उत्तर देताना सांगण्यात आले होते......

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव माझ्या शेजारीच बसले आहेत. पण माझे उत्तर त्यांनी कदाचित ऐकले नसेल. मी उत्तरात सांगितले की, शासन सन 2005 पासून आंबा पिकासाठी पीक विमा योजना राबवित आहे. सन 2006-07 मध्ये सुध्दा ही योजना राबविली आहे. परंतु या योजनेस म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही..... ( अडथळा ).... मला एवढेच सांगावयाचे आहे की, शासनाने पीक विमा योजना लागू केली, पण ती यशस्वी झालेली नाही. ही योजना यशस्वी करण्यासाठी सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या निश्चितपणे स्वागतार्ह राहतील.

**तालिका सभापती ( श्री.अरविंद सावंत )** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची अर्धातास चर्चेची सूचना नंतर घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 52 मिनिटांनी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**औचित्याच्या मुद्यासंबंधी.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भातील चर्चेवेळी सभागृहात सांगितले होते की, 27 तारखेला शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसंदर्भात दिल्ली येथे बैठक बोलावलेली आहे. आज 27 तारीख उलटून गेलेली आहे. सदर बैठकीमध्ये नेमके काय झाले, ते सभागृहाला समजले पाहिजे. त्यामुळे यासंदर्भातील माहिती त्यांनी सभागृहात ताबडतोबीने द्यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : यासंदर्भात वर्तमानपत्रात एक बातमी होती. परंतु याबाबतीमध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडून जरुर माहिती घेतली जाईल आणि ती माहिती संसदीय कार्यमंत्री याठिकाणी देतील.

------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्यात लागू करावयाच्या सच्चर समितीच्या शिफारशी**

**(१) * ३३५२४ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुस्लिम समाजासाठी असणाऱ्या योजनांचा लाभ त्यांना पुरेपूर मिळत नाही असे प्रतिपादन योजना आयोगाचे सदस्य, श्री.भालचंद्र मुणगेकर यांनी माहे मे, २००७ च्या सुमारास केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत वेगवेगळ्या स्तरावरुन मागण्या होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सच्चर समितीच्या शिफारशी राज्यात लागू करण्यात येणार आहेत काय, त्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास काही निर्देश दिले आहेत काय,

(४) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्यामागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय,

(२) होय,

(३) सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत भारत सरकारकडून कोणत्याही थेट सूचना महाराष्ट्र शासनास प्राप्त झाल्या नाहीत. तथापि, सच्चर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती (Merit-cum-means based scholarship) आणि प्रशिक्षण व संबध्द योजना (Coaching and Allied Scheme) या नवीन योजना तयार केल्या असून त्यांची राज्य सरकारांनी अंमलबजावणी करण्याबाबत कळविलेले आहे.

(४) व (५) उपरोक्त योजनांसंदर्भात वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देऊन अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले असून प्राप्त अर्जांची छाननी करण्यात येत आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सच्चर समितीसंदर्भातील लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. दोनच दिवसांपूर्वी सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या विषयावर अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माझे समाधान झ ाालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33524....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सच्चर आयोगाच्या संदर्भातील चर्चा अगोदर झालेली असून नंतर प्रश्नोत्तराच्या माध्यमातून हा प्रश्न येथे उपस्थित होत आहे. त्यावेळी मला या विषयावर बोलायचे होते, परंतु सभागृह उशिरापर्यंत चालत असल्यामुळे मला बोलता आले नाही. सच्चर आयोगाच्या शिफारशी हया मुस्लीम समाजासाठी आहेत, त्या सर्व अल्पसंख्यांकासाठी नाहीत. माझा प्रश्न असा आहे की,...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.03 वाजता, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

-----

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**ता.प्र. क्र. 33524 पुढे सुरु.........**

**सभापती** : कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे 10 मिनिटांसाठी सभागृह तहकूब करावे लागले व त्यामुळे महत्वाचा वेळ वाया गेला. कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित रहाणे आवश्यक आहे. आता या ठिकाणी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.अनिल देशमुख उपस्थित आहेत. सभागृह तहकूब करावे लागल्याबद्दल त्यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सभागृह सुरु असतांना कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित रहाणे आवश्यक आहे. कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याने सभागृह 10 मिनिटांसाठी तहकूब करावे लागले याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 33524 वर चर्चा सुरु होती. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे बोलत होते. त्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी समाधान झाल्याचे सांगितले. परंतु, आमचे समाधान झालेले नाही. त्याचे कारण असे आहे की, सच्चर समितीच्या अहवालावर ज्यावेळी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी आम्हालाही त्यात भाग घ्यायचा होता. परंतु, वेळेअभावी आम्हाला भाग घेता आला नाही. माझा प्रश्न असा आहे की, या समाजासाठी ज्या काही सवलती देत आहोत त्याच्या विरोधात आम्ही नाही. कोणताही समाज मागासलेला राहू नये, त्यांचे जीवनमान सुधारावे आणि त्यांचे जीवन उन्नत व्हावे या मताशी आम्ही सहमत आहोत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात काही प्रश्न उपस्थित केले होते.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर........ 13:15

**ता.प्र.क्र.33524**..........

श्री.मधुकर सरपोतदार ...........

त्यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिले गेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत किंवा अन्य निवडणुकीला उभे राहतांना मुलांचे बंधन घातले जाते. सच्चर आयोगाच्या शिफारशी अशा लोकांना लागू करा की, जे या देशाचा कायदा पाळतात, या देशावर प्रेम करतात, वंदे मातरमला विरोध करत नाहीत. सभापती महोदय, अफजल गुरुला फाशी दिली जात नाही. आम्ही त्यासंदर्भात आवाज उठवितो. ज्याने लोकसभेवर हल्ला केला त्याला अद्याप फाशी दिलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, असे प्रश्न माणणारे जे लोक आहेत, जे देशाच्या समस्यांमध्ये सहभागी होणारे आहेत अशा मुस्लिमांना आपण या सवलती देणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो प्रश्न विचारला आहे ......

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर मला काही बोलावयाचे आहे. या विषयावर चर्चा होऊन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. मला असे वाटते की, हा तारांकित प्रश्न अगोदर दिलेला असल्यामुळे तो आज सभागृहात चर्चेला आलेला आहे.

**सभापती** : माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात सविस्तर उत्तर दिलेले आहे, तरीही मी सन्माननीय सदस्यांना एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, समाज कोणताही असो, हे कायद्याचे राज्य आहे. आपला देश घटना आणि कायद्याच्या माध्यमातून चालतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, कायदा पाळणा-यांनाच या सवलती असल्या पाहिजेत. आपले राज्य हे कायद्याचेच राज्य आहे, त्या अनुषंगाने निश्चित प्रकारे या गोष्टी होणार आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कायद्याचे पालन करणा-यांना सवलती मिळतील, असे माननीय मंत्री महोदयांनी जाहीर करावे. त्याला आमची हरकत नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33524**....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कायद्याचे राज्य याचा अर्थ कायदा पाळणे कम्पलसरी आहे. मग तो राजेश टोपे असो किंवा कोणीही असो. कायदा पाळलाच पाहिजे. ज्या सवलती असतील त्या कायदा पाळणा-यांना असाव्यात, असे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे मत आहे, ते योग्य आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यात मुस्लिम समाजासाठी असणा-या योजनांचा लाभ त्यांना पुरेपूर मिळत नाही असे प्रतिपादन योजना आयोगाचे सदस्य श्री.भालचंद्र मुणगेकर यांनी माहे मे, 2007 च्या सुमारास केले, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी होय असे उत्तर दिलेले आहे. अशा कोणत्या योजना आहेत, कोणत्या योजनांपासून ते वंचित राहिलेले आहेत. आता पर्यंत योजनांचा लाभ घेण्यासाठी त्या समाजाचे किती लाभार्थी पुढे आले, ते धर्माच्या आधारावर पुढे आले काय, त्यांना योजनांचा लाभ का मिळत नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अल्पसंख्यांकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये योजना आहेत. अल्पसंख्यांक समाज प्रामुख्याने मुस्लिम समाजाच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी डॉ.राजेंद्र सच्चर समिती नेमली होती. शैक्षणिक, सामाजिक .......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदय सच्चर समिती संदर्भात बोलत आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न माननीय मंत्री महोदयांना समजला नसेल तर तो त्यांनी लिहून घ्यावा. राज्यात मुस्लिम समाजासाठी असणा-या योजनांचा लाभ त्यांना पुरेपूर मिळत नाही असे प्रतिपादन योजना आयोगाचे सदस्य श्री.भालचंद्र मुणगेकर यांनी माहे मे, 2007 च्या सुमारास केले, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी होय असे उत्तर दिलेले आहे.

यानंतर कु.जयश्री.......

अस्राधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ D/MNP प्रथम श्री.बोरले.... 13:20

ता.प्र.क्र.33524.....

श्री.दिवाकर रावते.......

या धर्माच्या आधारावर असलेल्या ज्या विविध योजना असतात, त्या योजनांच्या माध्यमातून जर कोणी मुस्लिम म्हणून मदत मागितली आणि त्यांना मिळाली नाही म्हणून त्या समाजामध्ये लाभापासून वंचित ठेवले आहे असे किती लोक आहेत ? मुस्लिम समाजातील लाभार्थींची संख्या आणि लाभ नाकारलेल्यांची संख्या किती आहे ? असा स्पेसिफिक प्रश्न मी विचारला होता.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी योजनांचा लाभ म्हणजे योजना असू शकतात किंबहुना ज्या योजना आहेत त्या अनुषंगाने मुस्लिम समाजासाठी ज्या योजना आहेत, त्या योजनांच्या माध्यमातून त्यांची फारशी उन्नती होत नाही. म्हणून मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक उन्नतीच्या दृष्टीकोनातून त्यांच्यासाठी योजना आखणे आवश्यक आहे. कारण मुस्लिम समाजासाठी असलेल्या योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीकोनातून त्या समाजाला शिक्षणाची आवश्यकता आहे. परंतु मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे तो समाज त्यांच्यासाठी असलेल्या योजनांचा लाभ योग्य रितीने घेऊ शकत नाही.

( गोंधळ )

श्री.राजेश टोपे : या सगळया गोष्टींच्या अनुषंगाने सच्चर समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या माध्यमातून जे फॅक्ट फाईंडिंग आलेले आहे. त्या अनुषंगाने पुढच्या योजना आपण दिलेल्या आहेत.

(गोंधळ)

(घोषणा )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील वालधुनी नदी प्राधिकरण स्थापन करण्याबाबत**

**(२) * ३५४०१ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.भास्कर जाधव , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , डॉ. वसंत पवार , श्री. राजेंद्र जैन : तारांकित प्रश्न क्रमांक ३००६३ ला दिनांक १ ऑगस्ट, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वालधुनी नदीचा विकास करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी व संबंधित महापालिकांकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) अद्यापी नाही.

(२) व (३) वालधुनी नाल्यावर ४ निरनिराळया ठिकाणी "ग्रिन लेक व १० ग्रिन ब्रिज" तयार करण्याचे प्रस्तावित होते. परंतू त्यामुळे पुराचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (MERI) यांनी वालधुनी मिशनचे काम उल्हास खोऱ्यातील पूर नियंत्रण व त्यावरील उपाययोजना याबाबत त्या संस्थेचा अंतिम अहवाल तयार होईपर्यंत थांबविले होते. सदर संस्थेचा अहवाल उल्हासनगर महानगरपालिकेकडे नुकताच प्राप्त झाला असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

-----

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ D/MNP प्रथम श्री.बोरले.... 13:20

## मलबार हिल (मुंबई) येथील कार्मिकाईल रोडवरील मंजूर केलेल्या भूखंडाबाबत

(3) * 33536 **श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते , श्री. सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मलबार हिल (मुंबई) येथील कार्मिकाईल रोडवरील एक भूखंड राज्य शासनाने सन 1967 मध्ये मंजूर केलेल्या विकास आराखड्यानुसार चिल्ड्रेनपार्क आरक्षण असलेला भूखंड मूळ जागा मालकाने एस.पी.बिल्डींग कॉर्पोरेशन यांनी सन 2002 मध्ये सरकारला बांधकामास परवानगी द्यावी व जागा ताब्यात घ्यावी असे कळवूनही तसेच मुंबई महानगर पालिकेने सदर जागा ताब्यात द्यावी असे राज्य शासनास कळवूनही ती ताब्यात न घेतल्याने सदर भूखंड मूळ मालकाला परत द्यावा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने माहे सप्टेंबर, 2007 मध्ये राज्य शासनास दिला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर भूखंड सन 1991 च्या अधिसूचनेनुसार राज्य शासनाने वेळेत आरक्षित भूखंडावर ताबा घेतला नाही, तर ती जागा मूळ मालकास परत मिळू शकते ह्या कलमाचा फायदा जागा मालकास झाला आहे, हे खरे आहे काय,

(3) सदर भूखंडावर आरक्षण टाकल्यापासून सन 1991 व सन 2002 मध्ये जागा मालक त्या जागेवर बांधकामाची परवानगी मागे पर्यंत व त्यानंतर सुध्दा तो ताब्यात घेण्यास हेतुपुरस्सर विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विरोधात कोणती कारवाई करण्यांत आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) अशा प्रकारे भूखंडाचे आरक्षण असूनही ताब्यात न घेतलेल्या जागा संदर्भात काय धोरण आखण्यात आले वा येत आहे,

(5) नसल्यास, का नाही ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1), (2) व (3) 1991 च्या मंजूर सुधारित विकास आराखडयानुसार मलबार हिल, मुंबई येथील भूकर क्र. 18/738 ही जमीन चिल्ड्रेन पार्क साठी आरक्षित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम 127 नुसार आरक्षणाखालील जमिनीबाबत खरेदी सूचना प्राप्त झाल्याचे दिनांकापासून 6 महिन्यांचे कालावधीत जमीन संपादन करण्यात न आल्यास किंवा ती संपादन करण्यासंबंधी कोणतीही उपाययोजना करण्यात न आल्यास ती जमीन व्यपगत झालेले मानण्यात येते.

प्रस्तुत प्रकरणी जमीन मालकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दिनांक 19.3.2002 रोजी आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम 127 अन्वये खरेदी सूचना दाखल केली होती. त्यावर महानगरपालिकेने दिनांक 17.9.2002 रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता व त्यानुसार राज्य शासनाने दिनांक 20.11.2002 रोजी भूसंपादनाची अधिसूचना जारी केली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाने दिनांक 27.8.2007 च्या आदेशान्वये, उक्त अधिनियमाच्या कलम 127 खाली आरक्षणाखालील जमीन खरेदी करण्याबाबतची नोटीस महानगरपालिकेकडे दाखल केलेचे तारखेपासून 6 महिन्यांचे कालावधीत कलम 126 सह भूसंपादन अधिनियमाचे कलम 6 अन्वये भूसंपादनाची अधिसूचना जारी न केल्यामुळे, सदर जमीन आरक्षणमुक्त झाली असल्याचा निकाल 2 विरुध्द 1 न्यायाधिशाच्या निवाडयाने दिला आहे.

.....4





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(4) व (5) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द रिव्ह्यू पिटीशन दाखल करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमामध्ये सुधारणा करणेचे शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा प्रश्न मी मागील अधिवेशनात देखील उपस्थित केला होता आणि या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की...

**सभापती** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न क्रमांक पुकारला का ?

श्री.संजय केळकर : होय, ज्याप्रमाणे मुंबईला मिठी नदीच्या संबंधी प्राधिकरण नेमले गेले त्याचप्रमाणे या ठिकाणी देखील तेवढाच मोठा हाहा:कार झाला होता. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये असे म्हटले होते की, एका बाजूला मुंबईला या प्रकरणी आवश्यक ती कारवाई स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांनी करावयाची आहे. डी.पी.डी.सी च्या बैठकीच्या वेळी माननीय जिल्हाधिका-यांनी उत्तर दिले की, मुंबईच्या मिठी नदीच्या धर्तीवर वालधुनी नदीच्या संदर्भात देखील एक प्राधिकरण नेमून या नदीची सफाई करणे आवश्यक आहे. माझा यासंदर्भात स्पेसिफिक असा एकच प्रश्न आहे की, वालधुनी नदीमधील गाळ काढणे, त्या नदीच्या पात्राचे रुंदीकरण करणे आणि त्या पात्रातील अतिक्रमण हटविणे अत्यंत आवश्यक आहे. असे जिल्हाधिका-यांनी याविषयी म्हटलेले आहे. परंतु अशा मोठया कामासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे आवश्यक तेवढया निधीची तरतूद नाही. मग कल्याण डोंबिवली महानगरपालिका असो.....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर मी तारांकित प्रश्न क्रमांक 33536 पुकारला होता. आपण तारांकित प्रश्न क्रमांक 35401 यावरील प्रश्न विचारीत आहात.

श्री.संजय केळकर : परंतु सभापती महोदय, ज्यावेळी आपण तारांकित प्रश्न क्रमांक 35401 पुकारला होता, त्यावेळी मी हात वर केला होता. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, मला या वर बोलू द्यावे कारण हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पुन्हा सभागृहात येतात.)

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 35401 हा प्रश्न पुकारला असता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे म्हणाल्या की, त्यांचे समाधान झालेले आहे. असे म्हटल्यानंतर ज्यावेळी मी

.....5

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......... तारांकित प्रश्न क्रमांक 33536......

तारांकित प्रश्न क्रमांक 33536 पुकारला त्यावेळी आपण हात वर केला आणि सदर प्रश्नामध्ये आपले नाव दुसरे असल्याकारणाने मी आपल्याला बोलण्याची संधी दिली होती. परंतु आपण दुस-या तारांकित प्रश्नावर बोलत आहात, त्यामुळे आता आपल्याला त्या प्रश्नावर बोलता येणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही या प्रश्नोत्तराच्या तासात भाग घेऊच नये अशी आपली इच्छा आहे का ? असे असेल तर सांगा आम्ही बाहेर जातो.

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर,आपल्याला जर तारांकित प्रश्न क्रमांक 33536 यावर प्रश्न विचारावयाचे असेल तर आपण त्यासंबधीच उपप्रश्न विचारावे. दुस-या तारांकित प्रश्नावर आपल्याला बोलता येणार नाही.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MMP/ MAP/ पूर्वी कु.खर्चे 13:25

ता.प्र.क्र.33536.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दुसरा प्रश्न पुकारल्यानंतर माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी हात वर केला होता.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : आता मी तिसरा प्रश्न पुकारलेला आहे. तिसऱ्या प्रश्नावर चर्चा सुरु करावी.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : मी जेव्हा दुसरा प्रश्न पुकारला त्यावेळी श्रीमती मंदा म्हात्रे उभ्या राहिल्या होत्या. याबाबत मी बोललो ते खरे आहे. आता तिसरा प्रश्न मी पुकारला आहे, त्यावर काही चर्चा करावयाची असल्यास, उपप्रश्न विचारावयाचे असल्यास विचारावेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना व विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांना मी सांगू इच्छितो की, दुसरा प्रश्न पुकारल्यानंतर श्रीमती मंदा म्हात्रे उभ्या राहिल्या होत्या. त्या उभ्या राहिल्यानंतर कोणी बोलले नाही, त्यामुळे मी तिसरा प्रश्न पुकारला आहे. तिसरा प्रश्न पुकारल्यानंतर माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे दुसऱ्या प्रश्नावर बोलायला उभे राहिले.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण अनेक वेळा आपल्या मनाचा मोठेपणा दाखविला आहे. आपण तिसरा प्रश्न पुकारल्यानंतर दुसरा प्रश्न घ्यावा असा विरोधी पक्षाने हट्ट धरण्याचे कारण काय ?

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य आपल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : मी फक्त विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना बोलण्याची परवानगी देत आहे. विरोधी पक्षाच्या बाकीच्या सदस्यांना उभे राहण्याची किंवा बोलण्याची परवानगी दिलेली नाही, त्यामुळे त्यांनी खाली बसावे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, मी दुसरा प्रश्न पुकारल्यानंतर तिसरा प्रश्न पुकारलेला आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मला कोयना प्रकल्पाबाबत मत व्यक्त करावयाचे होते परंतु मला बोलू दिले नाही. माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाला हरकतीचा मुद्दा घेता येणार नाही. मी सभागृहातील सर्व सदस्यांचे म्हणणे वेळोवेळी व कायम ऐकून घेत आहे. सदस्यांचे म्हणणे ऐकले नाही असे कधी झाले आहे का ? I am sorry, please sit down. आता मी पुढचा प्रश्न पुकारतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विरार (ता.वसई, जि.ठाणे) येथील जनावरांचे तबेले हटविण्याबाबत

**(४) * ३४७६१ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई, जि.ठाणे) येथील तबेल्यातील जनावऱ्यांच्या मल-मूत्रामुळे तेथील नदी, नाले दूषित होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने तेथील तबेले हटविण्यासाठी संघर्ष समितीने सिडको कार्यालयावर दिनांक ३१ ऑगस्ट, २००७ रोजी वा त्या दरम्यान मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणचे तबेले हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांचेकरिता** : (१) तबेला हटाव संघर्ष समितीने दिनांक ३१ ऑगस्ट, २००७ रोजी सिडको कार्यालयावर मोर्चा आणला होता, हे खरे आहे.

(२) विरार, तालुका वसई, जिल्हा ठाणे येथील अनधिकृत तबेले निष्कासीत करण्याची मोहिम हाती घेवून त्यामध्ये सिडकोने ६ व तहसिलदार यांनी १ तबेला निष्कासित केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.राजन तेली : सभापती महोदय, विरार, ता.वसई येथील जनावरांचे तबेले हटविण्यासाठी संघर्ष समितीने सिडको कार्यालयावर मोर्चा काढला होता. याबाबत मी विचारु इच्छितो की, येथे अधिकृत व अनाधिकृत किती तबेले आहेत ?. जनतेच्या मागणीचा विचार करुन शासन हे तबेले तेथून काढणार आहे की नाही ?

यानंतर कु.धनश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 34761....

श्री. राजन तेली....

माझी अशी मागणी आहे की, वसई मधील किती तबेले अधिकृत आहेत व किती तबेले अनधिकृत आहेत ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वसईमध्ये 7 तबेले अधिकृत आहेत व 63 तबेले अनधिकृत आहेत. अनधिकृत तबेले काढण्याच्यासंदर्भात शासनाची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे त्यासाठी तहसीलदार सिडको आणि एसडीओ यांचे कार्यबल गट तयार करण्यात आले आहे. त्यासंदर्भात कार्यवाही चालू आहे. डहाणू येथील शासकीय जमीन या तबेल्यांसाठी घेण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घेतलेला आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हे तबेले केव्हा काढण्यात येतील ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, काही ठिकाणी जैसे थे निर्णय असल्यामुळे काही अडचणी आहेत. यासंदर्भात लवकरात लवकर प्रयत्न केले जाईल.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात. )

**सभापती** : अशा परिस्थितीत कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 1.32 मिनिटांनी 1.42 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

..................

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 13:40

( सभागृह स्थगितीनंतर... )

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

ता.प्र.क्र. 34761 ....

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मघाशी प्रश्नावलीतील प्रश्न 2 वर चर्चा चालू होती त्याबद्दल मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. प्रश्न 2 हा महत्त्वाचा असल्यामुळे आपण हा प्रश्न चर्चेला घेतल्यास माझी हरकत नाही. तरी कृपा करून आपण हा प्रश्न चर्चेला घ्यावा.

( काही सन्माननीय सदस्य बोलण्यास परवानगी मागतात... )

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण पुढे गेलो आहोत, प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न 4 वर चर्चा चालू होती, असे असताना आपण पुन्हा मागे गेल्यास ती चुकीची पद्धत होईल.

**सभापती** : प्रथम आपण सर्वांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना मी सांगू इच्छितो की, तुम्हाला मी मघाशी बोलण्यास परवानगी दिली होती. आता मात्र मी तुम्हाला बोलण्यास परवानगी देत नाही. ... इतर कोणाही सदस्यांना मी बोलण्यास परवानगी देत नाही. ..
मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेता आणि माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख तसेच सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आणि दोन्ही बाजूचे इतर सन्माननीय सदस्य देखील मला माझ्या दालनामध्ये भेटले. त्यांनी मला जे काही सांगितले त्यानंतर मी असा निर्णय घेतला आहे की, प्रश्न 2 साठी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे प्रश्न विचारण्यासाठी उभे राहिले होते असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी प्रश्न पुकारल्यानंतर मी 15 सेकंद थांबलो पण कोणी उपप्रश्न विचारला नाही त्यामुळे कोणाला प्रश्न विचारावयाचा नाही असे समजून मी पुढील प्रश्न पुकारला. परंतु हा प्रश्न 2 महत्त्वाचा आहे हे लक्षात घेऊन मी या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी म्हणून प्रश्नोत्तराच्या तासाच्या शेवटच्या 4 मिनिटांमध्ये हा प्रश्न घेईल आणि त्यावर एक दोन प्रश्न विचारण्यास सदस्यांना परवानगी देईन. मात्र आता आपण पुढे गेलो असल्याने पुन्हा मी मागील प्रश्नावर जाऊ इच्छित नाही. तरी आता मी पुढील प्रश्न पुकारलेला आहे त्यावर सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचा असल्यास, त्यांनी तो विचारावा.

..... एफएफ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34761 ....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, तबेले हटाव समितीने 31 ऑगस्ट 2007 ला वसईला मोर्चा काढला होता आणि तेथील शेतकऱ्यांचे या तबेल्यांबाबत म्हणणे असे होते की, तेथील मलमूत्रामुळे त्या परिसरातील पाणी, विहिरी खराब झालेले आहे, तेथील मिठागरे आहेत तीही आता त्यामुळे नष्ट झालेली आहेत, त्या तबेल्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. तेव्हा या संदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, सध्या वसईमध्ये अनधिकृत तबेले किती आहेत आणि अधिकृत तबेले किती आहेत ? .....

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या कार्यालयाकडून हा प्रश्न स्वीकृत केल्याबद्दलची प्रत माझ्याकडे आहे. आम्ही देखील हाच प्रश्न दिला होता परंतु आमची नावे या प्रश्नावर आलेली नाहीत. ...

**सभापती :** ठीक आहे. याबाबतीत मी तपासून घेईन आणि तसे झाले असेल तर रेकॉर्डवर आपले नाव येईल.

( यानंतर श्री. सरफरे ..... जीजी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34761...

श्री. राजन तेली : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, वसईमध्ये एकूण किती अधिकृत तबेले आहेत आणि अनधिकृत किती तबेले आहेत? ते केव्हापासून आहेत व त्यावर आपण काय कारवाई केली आहे? जनतेच्या मागणीचा विचार करुन हे सर्व तबेले आपण त्या ठिकाणाहून केव्हा हटविणार आहात?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वसईमध्ये एकूण 8 तबेल्यांनी शासनाची परवानगी घेतली आहे, आणि 62 तबेले अनधिकृत आहेत. त्यापैकी काही तबेलेवाल्यांनी स्थानिक न्यायालयामध्ये जाऊन जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेश मिळविल्यामुळे त्यांचे अतिक्रमण आपल्याला काढता येणे शक्य नाही. परंतु ज्या तबेल्यांना कोर्टाच्या ऑर्डर्स लागू नाहीत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत सिडको, तहसिलदार, एस.डी.ओ. यांचा कार्यबल गट अतिक्रमणे काढण्यासाठी नेमला आहे. त्यांच्यामार्फत अनधिकृत तबेले काढण्याची कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे त्याठिकाणी जी संघर्ष समिती स्थापन झाली आहे. त्यांचे म्हणणे असे की, ज्या तबेल्यांचे रिझर्व्हेशन आहे ते रद्द करावे व ते तबेले इतरत्र न्यावेत. त्याबाबत सिडकोची स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी आहे. त्यांच्यामार्फत प्रस्ताव आल्यानंतर शासनाच्या वतीने गुणवत्तेवर निर्णय घेतला जाईल. डहाणू येथे तबेल्यांकरिता शासकीय जागा ठेवण्याबाबत शासन विचार करीत आहे. त्या दृष्टीने लवकरात लवकर कारवाई करुन सर्व तबेले त्याठिकाणी शिफ्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, नालासोपारा येथील भरवस्तीमध्ये 7 तबेल्यांचे अतिक्रमण आहे. त्याचप्रमाणे मौजे मलाईपाडा येथे सर्व्हे क्रमांक 62 हिस्सा क्रमांक 6 येथे असलेले तबेले अतिक्रमण करुन अवैधरित्या बांधले आहेत. ते तबेले काढण्याकरिता शासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे हे खरे आहे काय? मंत्रिमहोदयांनी आता उत्तर देतांना सांगितले की, स्थानिक न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे तबेले हटविता येत नाही. परंतु तशी परिस्थिती नाही. जाणीवपूर्वक मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन हे अतिक्रमण केलेले तबेले काढण्यात आले नाहीत हे खरे आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला उत्तर देतांना मी सांगितले होते की, स्थगिती असल्यामुळे कारवाई करता येणार नाही. माननीय सदस्यांनी सांगितलेला सर्व्हे क्रमांक 62

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र. 34761...

श्री. राजेश टोपे...

निश्चितपणे तपासून घेतला जाईल. त्याठिकाणी जर स्थानिक न्यायालयाचा स्थगिती आदेश नसेल तर तातडीने कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या जातील.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, तबेल्यांचा प्रश्न हा केवळ ठाणे जिल्ह्यापुरता मर्यादीत नसून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. त्याकरिता शासनाने प्लॅनिंग ॲथॉरिटीला गाईडलाईन्स देण्याची आवश्यकता आहे. आज शहरातील रस्त्यांवर गाई-म्हशी बसलेल्या असतात. त्यामुळे वाहनांना, लोकांना जाणे-येणे त्रासदायक होते. त्यांच्या मलमूत्रामुळे पर्यावरणाचे नुकसान होते. याकरिता आपण सर्व प्लॅनिंग ॲथॉरिटीला, महानगरपालिकांना डायरेक्शन्स देणार काय? त्यासाठी स्पेशल झोनिंगची तरतूद करणार काय?

श्री. राजेश टोपे : माननीय सदस्यांच्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, दापचरी येथे डेअरी झोन तयार केले असतांना त्याठिकाणी हे तबेले जात नाहीत याची कारणे काय आहेत? आपण फक्त 7 तबेल्यांवर निष्कासित करण्याची कारवाई केली आहे. जे 63 अनधिकृत तबेले आहेत त्यांच्यापैकी किती तबेल्यांना निष्कासित करण्याबाबत स्थगिती मिळाली आहे? ज्या तबेल्यांना स्थगिती मिळाली नाही त्यांच्यावर आपण कारवाई कां केली नाही?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व्हे क्र. 45, 71 व 20 मौजे देवथळ येथील अनधिकृत तबेल्यांबाबत वसईच्या न्यायालयाने पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 34761 ...... श्री. राजेश टोपे .....

मी संख्या सांगू शकत नाही परंतु या सर्व्हे नंबरवर जैसे थे ऑर्डर न्यायालयाने दिलेली आहे.

श्री. संजय केळकर : संघर्ष समितीने तेथील अधिकाऱ्यांना वेळोवेळी सांगितले होते की, हे अनधिकृत तबेले आहेत. कोर्टाचा स्टे नंतर आलेला आहे. जवळजवळ दोन ते अडीच वर्षापासून अधिकाऱ्यांना सांगितले जात होते की, हे अनधिकृत तबेले हटवले पाहिजेत. ज्यांनी त्या कामामध्ये दिरंगाई किंवा कुचराई केली अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ? त्यांच्यामुळे कोर्टामध्ये जाण्यासाठी मुदत मिळाली. हे तबेले दापचरीला नेण्याच्या दृष्टीने शासन सूचना करणार काय ? मुंबईचे तबेले वसईला हलविणार नाही अशा प्रकारचा निर्णय शासन करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे अधिकाऱ्यांकडून दिरंगाई किंवा निष्काळजीपणा झाला असेल तर निश्चितपणे त्यासंदर्भात चौकशी करु. तबेले हटवण्यामध्ये किंवा अनधिकृत तबेले काढण्याच्या दृष्टीकोनातून कोणी अधिकारी जाणीवपूर्वक कारवाई करीत नसतील तर जरुर चौकशी करुन कारवाई करु. त्याचबरोबर मुंबईचे जे तबेले आहेत ते त्या ठिकाणी जो डेअरी झोन आहे तेथे हलविण्याच्या संदर्भातील कार्यवाही थांबविलेली आहे. म्हणूनच डहाणू येथे शासकीय जमीन उपलब्ध करुन घेतलेली आहे. त्या ठिकाणी तबेले हलविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करु.

श्री. राजन तेली : ज्या तबेल्यांना कोर्टाने स्थगिती दिलेली आहे ती स्थगिती उठविण्यासाठी शासनाकडून काही प्रयत्न झाला काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, गव्हर्नमेंट प्लिडरला जरुर सांगण्यात येईल आणि लवकर ही स्थगिती उठविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी तसेच सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी दापचरीच्या संदर्भात प्रश्न विचारला. हे तबेले दापचरीला घेऊन जात नाहीत की दापचरीची योजना शासनाने रद्द केलेली आहे ? याची माहिती सदनाला मिळाली पाहिजे. दापचरीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले आणि त्या ठिकाणी तबेले बांधून तयार आहेत. लोक जात नाहीत असे कारण शासन देत असेल तर ती अडचणीची गोष्ट आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

ता. प्र. क्र. 34761 ......

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना डहाणू तालुका माहीत असेलच. दापचरी हे डहाणूतील ठिकाण आहे. डहाणूमध्ये हे तबेले शिफ्ट करणार आहोत. दापचरी, तालुका डहाणू येथे शासकीय जमिनीवर हलविणे योग्य असल्याचे शासनाने ठरविले आहे. त्यादृष्टीकोनातून पुढील कार्यवाही केली जाईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरवड

**परळ मुंबईच्या जुपीटर मिल्स जमीन विक्रीच्या व्यवहारात झालेला गैरव्यवहार**

**(५) * ३३५४९ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ मुंबईच्या जुपीटर मिल्स जमीन विक्रीच्या व्यवहारात किमान साडेतीन हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मेधा पाटकर यांनी केला असून युएलसी कायदा पूर्णपणे दुर्लक्षून जादा एफ.एस.आय. नियमबाह्य दिल्याने या व्यवहाराचा जाब विचारणारी कायदेशीर नोटीस, श्रीमती पाटकर यांनी माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये एनटीसीवर बजावलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय वा त्यात त्यांना काय आढळून आले, त्यानुसार शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) व (२) होय, ॲडव्होकेट श्री.वाय.पी.सिंग यांनी सामाजिक कार्यकर्त्या मेघा पाटकर यांच्यावतीने दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ रोजी नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशनला नोटीस पाठविलेली असून त्यामध्ये ज्युपिटर टेक्स्टाईल मिल जमीन विक्रीच्या व्यवहारात घोटाळा झाल्याचा आरोप केलेला आहे.

(२) व (३) नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशन ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील कंपनी असल्यामुळे विक्रीच्या तथाकथित घोटाळ्याबाबत राज्य शासनाकडून चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाला दिलेले उत्तर गंभीर आहे. यामध्ये मेधा पाटकर यांच्यावतीने त्यांच्या वकिलांनी नोटीस दिली हे मान्य केले आहे. प्रश्न क्रमांक 2 व 3 ला जे उत्तर दिलेले आहे ते गांभीर्याने दिले आहे काय असा प्रश्न पडतो. या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशन ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील कंपनी असल्यामुळे विक्रीच्या तथाकथित घोटाळ्याबाबत राज्य शासनाकडून चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही." त्या ठिकाणी एफ.एस.आय.चा घोटाळा झाला. यू.एल.सी. ची अतिरिक्त जमीन ताब्यात घेण्यासंबंधीचा प्रश्न आहे. त्या घोटाळ्याच्या संदर्भात हा प्रश्न आहे. जमिन विक्रीच्या बाबतीत शासनाने केलेला नियम केंद्र सरकारच्या मिल्सना लागू आहे. यू.एल.सी.च्या संदर्भात अतिरिक्त एफ.एस.आय. देण्यात आलेला आहे. त्याबाबत शासनाची नक्की काय भूमिका आहे ?

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरवड

ता. प्र. क्र. 33549 .....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यू.एल.सी. चा क्लिअरंस घेतला गेला आहे. यू.एल.सी. केंद्र सरकारच्या जमिनीला यासाठी लागू होतो की, केंद्र सरकारने एन.टी.सी.ची जमीन लिलावाच्या माध्यमातून विकली आहे. ती जमीन इंडिया बूल्स या कंपनीने खरेदी केली. त्यामुळे यू.एल.सी.च्या तरतुदी त्यांना लागू झालेल्या आहेत. त्यामुळे यू.एल.सी. ची पूर्ण एन.ओ.सी. किंवा क्लिअरंस घेतला गेला होता. एफ.एस.आय.चा जो विषय आहे त्यामध्ये आय.टी.च्या बाबतीत उद्योग विभागाचा जो जी.आर. आहे त्यानुसार आय.टी.ला 100 टक्के इन्सेन्टिव एफ.एस.आय. देतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 33549.. (श्री. राजेश टोपे...

त्यामुळे 1.3 इतका एफएसआय अनुज्ञेय आहे. तेथे आयटीइएस सुरु करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी 2.6 इतका म्हणजे डबल एफएसआय देण्याची कायद्यामध्ये तरतूद आहे. त्या दृष्टीकोनातून एफएसआय वाढवून देण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु बांधकामाला मात्र जुनी 1.3 एफएसआयची परवानगी दिलेली आहे.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : माननीय सभापति महोदय, हमारा प्रश्न है कि शासन इस बारे में चौकशी करेगा क्या ? यह ठीक है कि मिल केंद्र सरकार की है लेकिन जब तक्रार आयी हे तो हम केंद्र से इस बारे में पूछ सकते हैं और केंद्र सरकार को हम भी इस बारे में खुलासा दे सकते है. वहां पर 500 करोड़ रुपए की जमीन के 25 करोड़ रुपए मिलते हैं और इस तरह की तफावत आती है तो उस बारे में सरकार को सोचना चाहिए, यहां पर टैक्स की भी बात है. शासनाला याबाबतीत जो काही कर मिळणार आहे त्याबाबत शासनाने केन्द्र सरकारला विचारणा केली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : या संदर्भात जी तक्रार आली होती त्याबाबत राज्य शासनाच्या वतीने केन्द्र सरकारला कळविण्यात येईल. बाकीचे जे टॅक्सेस आहेत ते आपण घेत असतो.

श्री. विनोद तावडे : एनटीसी, वाघेला यांनी मिळून हा घोटाळा केलेला आहे. त्याची चौकशी होईल. या ठिकाणी 1.3 ऐवजी 2.6 इतका एफएसआय देण्यात आलेला आहे. इंडिया बूल्स याठिकाणी केवळ आय.टी.शी संबधित उद्योग सुरु करणार आहे की अलाईड ॲक्टिव्हिटीज रिटेल मॉलच्या पध्दतीने आणणार आहे ? याबाबतीत शासनाचे स्पष्ट धोरण आहे काय ? अशा अलाईड ॲक्टिव्हिटीज मॉलसाठी शासन 2.6 इतका एफएसआय देऊन परवानगी देणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : आय.टी.ई.एस.च्या बाबतीत उद्योग विभागाचा जी.आर. आहे. त्यामधील तरतुदी तपासून बघितल्या जातील. जी.आर.मधील तरतुदींचे शंभर टक्के पालन होत असेल तरच इन्सेटिव्ह एफएसआय दिला जाईल.

श्री. प्रकाश शेंडगे : श्रीमती मेधा पाटकर यांनी केलेले आरोप गंभीर आहेत. जवळ जवळ साडेतीन हजार कोटीचा घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केलेला आहे. जमिनीची विक्री झाली

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे...)

त्यावेळी 1.3 एफएसआय होता नंतर महाराष्ट्र शासनाने त्या ठिकाणी 2.6 एफएसआय दिलेला आहे. त्यामुळे या घोटाळयाचा महाराष्ट्र शासनाशी संबंध आहे. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने चौकशी केलेली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : ऑक्शनच्या वेळी अनुज्ञेय एफएसआय 1.3 इतका होता. लिलावाच्या वेळी उच्चतम बोली बोलणा-याला जमीन देण्याचा निर्णय झाला. हा टेक्स्टाईल डिपार्टमेण्टचा विषय आहे. यासंदर्भातील तक्रारी केन्द्रातील टेक्स्टाईल मंत्रालयाला कळविल्या जातील

---

**ता.प्र.क्र. 35328**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT 14:00

**हिंगोली नगर पालिकेच्या कार्यवृत्तांतात घेण्यात आलेल्या अनागोंदी नोंदी**

**(७) * ३३५७९ प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील नगर परिषदेच्या कार्यवृत्तांतात मुख्य अधिकाऱ्यांनी अनेक अनागोंदी नोंदी केल्याचे नुकतेच उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाचे ठिकाण एका भागात तर प्रशासकीय मान्यता दुसऱ्या भागात अशा प्रकारच्या गंभीर चुका झाल्याचे यात स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा नोंदीमुळे अनेक गैव्यवहारांना चालना मिळाली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे, व संबंधितांविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ रोजी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे नोंदी संदर्भात तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२), (३) व (४) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

----------

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ रोजी जिल्हाधिकारी, हिंगोली को नोंदी के संदर्भ में जो शिकायत अर्ज प्राप्त हुए हैं, मैं इस संबंध में यह पूछना चाहती हूं कि ये शिकायतकर्ता कौन है, उनका बॅकग्राउण्ड क्या है और शिकायत का स्वरुप क्या है ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दिनांक ३.१०.२००७ रोजी श्री.नंदकिशोर मेघराज व्यास, हिंगोली यांनी सीईओ यांच्याकडे प्रोसिडिंगवर नगराध्यक्षांची सही नाही अशी तक्रार केली. दुसरी बाब म्हणजे जो मंजूर रस्ता आहे त्याऐवजी दुसऱ्या ठिकाणी काम झाले अशा प्रकारची तक्रार केली आहे. या तक्रारीची चौकशी जिल्हाधिकारी यांच्याकडे चालू आहे. लवकरच अहवाल येईल आणि त्या अनुषंगाने पुढील कारवाई केली जाईल.

श्री.विक्रम काळे : चौकशी अहवाल आल्यानंतर संबंधित जे कोणी जबाबदार अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल का ?

श्री.राजेश टोपे : चौकशी अहवालाप्रमाणे कारवाई होईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील वालधुनी नदी प्राधिकरण स्थापन करण्याबाबत**

**(२) * ३५४०१ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.भास्कर जाधव , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , डॉ. वसंत पवार , श्री. राजेंद्र जैन : तारांकित प्रश्न क्रमांक ३००६३ ला दिनांक १ ऑगस्ट, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वालधुनी नदीचा विकास करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी व संबंधित महापालिकांकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) अद्यापी नाही.

(२) व (३) वालधुनी नाल्यावर ४ निरनिराळया ठिकाणी "ग्रिन लेक व १० ग्रिन ब्रिज" तयार करण्याचे प्रस्तावित होते. परंतू त्यामुळे पुराचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (MERI) यांनी वालधुनी मिशनचे काम उल्हास खोऱ्यातील पूर नियंत्रण व त्यावरील उपाययोजना याबाबत त्या संस्थेचा अंतिम अहवाल तयार होईपर्यंत थांबविले होते. सदर संस्थेचा अहवाल उल्हासनगर महानगरपालिकेकडे नुकताच प्राप्त झ ाला असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

----------

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. मागील अधिवेशनामध्ये देखील हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी उत्तर दिले होते की, या प्रकरणी आवश्यक ती कारवाई स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी, ठाणे यांनी करावयाची आहे. मेरी या संस्थेने जो अहवाल दिला तो अहवाल जिल्हाधिकारी आणि तेथील दोन महानगरपालिका यांना देखील पोहोचला. डीपीडीसीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे गाळ काढण्यासाठी, रुंदीकरण करण्यासाठी, अतिक्रमणे हटविण्यासाठी जो मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे तो निधी या कल्याण व उल्हासनगरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे उपलब्ध नाही. ज्याप्रमाणे मुंबईला मिठी नदी प्राधिकरण स्थापन करण्यात आले, त्याबाबत एमएमआरडीएने सहकार्य केले त्याच पध्दतीने वालधुनी नदीसाठी तरतूद केली पाहिजे. अन्यथा अतिवृष्टी झाल्यास पुन्हा हाहा:कार माजेल. या वालधुनीच्या सगळ्या कामासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद एमएमआरडीए करणार आहे का? प्राधिकरणाची अत्यंत आवश्यकता आहे. मेरी संस्थेच्या

..३..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहवालात जे निरनिराळे विषय मांडले आहेत त्याकरीता प्राधिकरण होणे आवश्यक आहे.  आपण प्राधिकरण करणार आहात का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मेरी या संस्थेकडून वालधुनी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण, सुरक्षा भिंत बांधणे, पूर नियंत्रण रेषा आणि पूर नियंत्रण भाग ठरविणे इत्यादी अभ्यास झालेला आहे. त्या अनुषंगाने साधारणपणे २२ कोटी रुपये या कामाला खर्च येणार आहे असा मेरी संस्थेचा अहवाल आहे.  जेएनएनआरयुएमचा उल्हासनगर महापालिकेबाबत जो प्रकल्प तयार करीत आहोत त्या माध्यमातून २२ कोटी रुपये खर्चाच्या या कामाचा अंतर्भाव केला आहे.  त्या संदर्भात महाराष्ट्राची स्टेअरिंग कमिटी आहे, लवकरच सीडीपी आणि डीपीआर तयार होणार आहे, तो आल्यानंतर स्टेअरिंग कमिटी, महाराष्ट्राच्या वतीने याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात येईल आणि निधी उपलब्ध करुन देऊन वालधुनी नदीचा चांगल्या पध्दतीने फ्लो रहावा, त्या क्षेत्राला कुठलीही भिती पोहोचू नये यादृष्टीनेशासनाच्या वतीने कारवाई केली जाईल.  प्रत्येक नदीचे प्राधिकरण करणे शक्य नाही.  परंतु एमएमआरडीए या संस्थेच्या अंतर्गत बाब असल्यामुळे त्यांनी या संदर्भात लक्ष देण्याच्या संदर्भात जरुर कळविण्यात येईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ प्रथम श्री. भोगले........ 14:05

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठवेणे**

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्तांचे दिनांक 23 मे, 2001, 13 मार्च, 2002, 13 ऑगस्ट, 2002, 26 डिसेंबर, 2002 व 23 मे, 2003 चा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लोक आयुक्तांचे अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---------

श्री. सतीश चतुर्वेदी ( वस्त्रोद्योग मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 व सन 2006-2007 चा अनुक्रमे छत्तीसावा व सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य सस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे एकोणचाळीसावा व चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूरचा सन 2005-2006 चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मुंबईचा सन 2001-2002 चा तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------------- ...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (खनिकर्म राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅंगनीज ओर (इंडिया) लिमिटेडचा सन 2006-2007 चा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे सन 2002-2003 व 2003-2004 चे लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------------

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2005-2006 चा तेहतिसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल आणि हिशोब सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. मधुकर सरपोतदार (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कामकाजाबाबतचा बारावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कामकाजाबाबतच्या काही खास बाबीचा येथे उल्लेख करावासा वाटतो. महोदय, हा अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील सन 2003-2004 व 2004-2005 या पवर्षातील असुन यातील महत्वाच्या बाबी 1) सल्लागार करार, 2) नागपूर-सिन्नर-घोटी-मुंबई रस्त्याचे बांधकाम 3) मोकळया आकाराचे प्रदान 4) टोल वसूली करार 5) जमीन संपादन 6) एमपीइडब्युच्या एका विभागापेक्षा अधिक विभागातील सामाईक त्रुटी 7) खंडनिहाय बोनस कलम 8) टोल वसुली व ऑगस्ट 2004 पर्यंत टोल वसुली 9) ऑगस्ट 2004 नंतरचे टोल वसुलीचे व परिरक्षा कंत्राट प्रदान करणे व चुकीची राखीव किंमत निश्चित करणे अशा 9 बाबींचा या अहवालात समावेश आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.जुन्नरे..... 14:10

श्री.मधुकर सरपोतदार........

सल्लागार कराराच्या प्रदानात महामंडळाने 666 कोटी खर्चाचा प्रकल्प रु 1306 कोटी खर्चावर नेला म्हणजे दुप्पट खर्च वाढला. स्वत:च्या कामाच्या अंदाजपत्रकातील दरा इतके दर मर्यादित करण्यातही महामंडळ अपयशी ठरले, परिणामी जास्त दराने प्रदान केल्यामुळे महामंडळाला 1.50 कोटीचा तोटा झाला.

महामंडळाने संपूर्ण क्षेत्राचे पुनर्वसन करण्याची परवानगी मिळालेली असताना ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावयास पाहिजे होती व त्यामुळे काम बंद करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. कंत्राटदाराला त्यांची संयंत्रे व यंत्रसामुग्री 3.5 महिने ( 21 जानेवारी ते 2 मे, 2007 ) निरर्थक मोकळी पडून राहिली म्हणून मोकळ्या आकाराचे रुपये 2.72 कोटीचे महामंडळाचे नुकसान झाले.

महामंडळाने जमिनीचे पूर्ण संपादन न करता बांधकाम कंत्राटदारांचे प्रदान केले होते. जमीन संपादनात विलंब झाल्यामुळे बांधकाम कंत्राटदारांना पूर्ण जागा हस्तांतरीत करण्यास विलंब झाल्यामुळे बांधकाम कंत्राटदारांना पूर्ण जागा हस्तांतरीत करण्यास विलंब झाला. त्यामुळे चार विभागाचे 16-46 कोटी किंमत वाढीचे प्रदान करावे लागले.

बांधकामाचे विविध टप्पे पूर्ण झाल्यावर रुपये 8.36 कोटी रक्कम बोनस म्हणून प्रदान करावे लागले. रुपये 8.36 कोटी रुपयांचा तोटा त्यामुळे महामंडळाला सहन करावा लागला.

एक नाही अशा अनेक प्रकरणात महामंडळाचे व शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान झाले म्हणून समिती याबाबत अत्यंत खेद व्यक्त करते.

या सर्व प्रकरणांची चौकशी करुन शासनाला समितीने काही शिफारशी केल्या आहेत.

शासनाने अशा प्रकल्पाच्या ठिकाणी कोणालाही कोणताही गैरफायदा घेता येणार नाही अशाप्रकारे सर्व कायदेशीर तरतुदी करून त्याची कडक अंमलबजावणी करावी जेणेकरुन कोणालाही असा गैरफायदा घेता येणार नाही. ह्या कामाचा निर्णय घेण्यापासून ते काम पूर्ण होईपर्यंत यामध्ये वरिष्ठ पातळीपासून जे जे अधिकारी आहेत व ज्यांनी यामध्ये उणिवा तसेच त्रुटी ठेवल्या व कायदेशीर बाबींची पूर्तता करून घेण्याकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन महामंडळाचे अनाठायी गुंतवणुकीमुळे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करावे तसेच महामंडळाचे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत काटेकोरपणे नियोजन करणे अशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार............

समिती शिफारस करते. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये तांत्रिक स्वरुपाची कामे पाहणारी अनेक तज्ज्ञ माणसे आहेत. तरीसुध्दा अशा तांत्रिक चुका होतात व त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. वास्तविक अशा चुका व्हायला नकोत. परंतु त्या होतात म्हणण्यापेक्षा करण्यात येतात असे समितीचे मत झाले आहे.

यंत्रसामुग्री निरर्थक पडून राहिली नसती तर कंत्राटदारास 2.72 कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी लागली नसती. अधिकाऱ्यांच्या या कार्यपध्दतीमुळे त्यांनी कर्तव्यामध्ये कसूर केल्याचे स्पष्ट दिसून येते म्हणून झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी आणि या प्रकरणाची पुन्हा नव्याने तपासणी करण्यात यावी व त्यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

एकंदरीत समितीला दिसून आल्याप्रमाणे, रस्ते विकास महामंडळाच्या कामकाजात सुसूत्रतेचा अभाव दिसून आला आहे. त्यामुळे अनेक क्षुल्लक तांत्रिक चुकांमुळे महामंडळाला मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागला आहे म्हणून महामंडळाने आपल्या कामकाजात सुधारणात्मक पावले उचलावीत असे समितीचे मत आहे.

सभापती महोदय, ॲक्शन टेकन रिपोर्ट सदनाला सादर करण्याचे निदेश आपण शासनाला द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा अहवाल सादर करताना ॲक्शन टेकन रिपोर्ट सदनाला सादर करण्याबाबत शासनाला निदेश द्यावेत अशी विनंती केलेली आहे. सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करताना त्या समितीने दाखविलेल्या त्रुटी, दोष याचे कंप्लायन्स झाले पाहिजे आणि हे सर्व कंप्लायन्स एके दिवशी सदनासमोर येतील या दृष्टीने संबंधित विभागाने प्रयत्न करावा.

सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

---------------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी " मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 33 अन्वये महानगरपालिका सदस्यांच्या जागेसाठी निवडून आलेली व्यक्ती महानगरपालिका सदस्य असण्यास निरर्ह असल्याचे आढळून आल्यास त्याची निवड रद्द होऊन त्या जागी दुसऱ्या क्रमांकाचे मताधिक्य प्राप्त उमेदवाराची निर्वाचित सदस्य म्हणून निवड ग्राह्य ठरविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी यांनी "दिनांक 21.10.2007 रोजी अचलपूर येथे दूर्गा विसर्जनाच्या मिरवणुकीवर शेकडो मुस्लिमांनी दगडफेक करुन लोकांची दुकाने जाळून करण्यात आलेली लूट, सदर दंगलीत सुमारे 75 कोटी रुपयांचे झालेले नुकसान, दंगलखोर घराघरात घुसणे इत्यादीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयावर मी लक्षवेधी सूचना स्वीकृत केली असून ती उद्या किंवा परवा सभागृहात चर्चेस येण्याची व्यवस्था करण्यात येईल.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे यांनी "नागपूर शहरालगत मिहान प्रकल्पांतर्गत शेतक-यांच्या भूसंपादित करण्यात आलेल्या शेतजमिनी व घरांना अत्यल्प मोबदला मिळालेला असल्याने त्या विरोधात या भागातील शेतकऱ्यांनी आंदोलन करुन मिहान प्रकल्पाचे काम बंद पाडल्यामुळे कोटयावधी रुपयांचे नुकसान होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे यांनी "गडचिरोली जिल्हयातील कुरखोडा तसेच अन्य जिल्हयांमध्ये आदिवासी विकास महामंडळातर्फे सुरु असलेल्या एकाधिकार धान्य खरेदीमध्ये प्रचंड गैरव्यवहार होत असून वर्षातून केवळ 2 महिने खरेदी केंद्र सुरु ठेवल्यामुळे शेतकऱ्यांना वर्षभर खरेदी करता येत नसल्यामुळे त्यांचा माल कमी दराने विकला जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती...**

यानंतर सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल यांनी "संभा (टंकारपाडा) ता.तलासरी, जि.ठाणे या आदिवासींची वस्ती असलेल्या गावातील लोकांची बोलीभाषा मराठी असूनही तेथील मुलांना गुजराती भाषेत शिक्षण दिले जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "राज्यातील ग्रेझींग पॉलिसीमध्ये वन विभागाच्या चराऊ कुरण जंगलात मेंढयांना चराईची तरतूद असताना त्याचा चुकीचा अर्थ लावून वन अधिका-यांनी गेली 40 वर्षे धनगर समाजाच्या मेंढपाळावर मेंढी चराई बंदी लागू केली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयाने शेतकरी आत्महत्या प्रकरणातील अनुदानाचे प्रत्येकी 70 हजार रुपयांचे धनादेश मृत शेतकऱ्यांच्या वारसाच्या नावे पोस्टात संयुक्त खाते उघडून जमा करणे आवश्यक असताना खामगांव तहसील कार्यालयात सदर रक्कम जमा न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "अमरावती जिल्हयात वरुड, मुळशी, चांदूर बाजार आदी तालुक्यात संत्र्यांची 50 लाखांवर झाडे असून यावर्षी अतिवृष्टी झाल्याने संत्र्यांची मोठया प्रमाणावर गळती झाल्याने जिल्हयात संत्र्यांवर प्रक्रिया करणारा उद्योग प्रक्रियेपूर्वीच बंद केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी "जळगांव जिल्हयात हातनूर कालवा कि.मी. 92 पासून अनवर्द-भवाळे वितरिका व शाखा कालवा गलवाडे वितरिका 2 कि.मी. कामावर शासनाचा लाखो रुपये खर्च होऊनही गेल्या 20 वर्षांपासून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याचा थेंबही न मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यांनी "मु.पो.केगाव, ता.उरण, जि.रायगड या संस्थेचे सचिव श्री.रमेश नारायण पाटील यांनी खोटया पॉवर ऑफ ॲटर्नी बनवून व त्यावर खोटया सहया करुन त्याचा उपयोग खोटे ठराव पास करण्यासाठी तसेच बँकेत खोटे व्यवहार करुन पैसे काढण्यासाठी केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे यांनी "सहकार महर्षी स्वर्गीय बापूरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना मर्या.,जि.वर्धा येथील व्यवस्थापकाने सन 2006-07 हंगामात शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या ऊसाची पूर्ण रक्कम 1 वर्ष पूर्ण होऊनही अद्याप अदा केली नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गोंधनापूर, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथे एक महिला गावातील चक्कीजवळून जात असताना श्री.दिनकर नत्थुती वेरुळकर व श्री.मधुकर नत्थुजी वेरुळकर यांनी तिचा हात धरुन तिला वाईट हेतूने चक्कीमध्ये खेचून तिचा विनयभंग केलेला आहे. या विषयासंदर्भातील मी 93 ची सूचना दिली होती. त्या सूचनेचे काय झाले ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपण सूचना दिली आहे, ती मी दालनात नाकारली आहे. तथापि, आपण विरोधी पक्षनेते असल्यामुळे मी सदर सूचनेवर शासनाने निवेदन करावे, असे निदेश देतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अपघातासंबंधी मी 93 ची सूचना दिलेली आहे.

**सभापती** : ती मी उद्या बघतो.

-----------

.....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वाशिम कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांचा माल घेण्याचे बंद केल्याने निर्माण झालेली परिस्थिती.

**मु.शी.**: वाशिम कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांचा माल घेण्याचे बंद केल्याने निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर डॉ.निलम गो-हे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे यांनी "वाशिम कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांचा माल घेण्याचे बंद केल्याने निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर जी 93 अन्वये सूचना दिली होती त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

(प्रेस : येथे निवेदन छापावे.)

---------------

...3........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, दर हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकरी आणि कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्यामध्ये तणावाचा प्रसंग निर्माण होतो. सुलभ मार्गाने शेतक-यांच्या उत्पादन विक्रीची व्यवस्था का होत नाही, असा प्रश्न आम्हाला पडतो. नियम 93 अन्वये सूचना देण्याचा हेतू असा होता की, त्यामध्ये तेथील शेतक-यांना न्याय मिळावा. शासनाने निवेदनात असे उत्तर दिले आहे की, बाजार समितीच्या आवारामध्ये प्रतिक्षेत रहावे लागले. नुसते प्रतिक्षेत नाही तर तीन दिवस ताटकळत रहावे लागले. तीन दिवस वाट बघत होते, महामार्ग बंद केला, लाठीहल्ला झाला. निवेदनातील चवथ्या ओळीत असे दिलेले आहे की, 19/11/2007 रोजी सोयाबीन व इतर उत्पादनांची अचानक आवक वाढली. यावर्षी कोणते पीक चांगले आले आहे, कोणत्या सुमारास मोठया प्रमाणावर धान्य बाजारात येऊ शकेल याबाबतचा कोणताही अंदाज कृषि उत्पन्न बाजार समितीला कसा येत नाही ? यासंबंधीचे नियोजन बाजार समितीकडून होत नसावे, असे वाटते. गेल्या अधिवेशनात वणी येथे कापूस उत्पादकांवर गोळीबार करण्याची वेळ आली होती. शेवटी निवेदनात असे म्हटले आहे की, 100 हमालांची पर्यायी व्यवस्था केली. ही व्यवस्था आधीही करता आली असती. कमीतकमी 50 हमालांची व्यवस्था झाली असती तरी शेतक-यांना ताटकळत रहावे लागले नसते. माझा प्रश्न असा आहे की, यासंबंधीचे नियोजन कृषि उत्पन्न बाजार समितीने केले नव्हते का ?

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनात म्हटले आहे की, पोलिसांमार्फत नियंत्रण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. संबंधित पोलीस अधिका-याने निघृणपणे लाठीमार केला आहे. अशा प्रकारची सूचना कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत पोलिसांना देत असाल तर असे होणार नाही. यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना केली पाहिजे. रक्त सांडल्यानंतर आम्ही या ठिकाणी प्रश्न उपस्थित करायचा व त्यानंतर शासन त्यांच्याबाबतीत सहानुभूती दाखविणार. त्यापेक्षा अगोदरच उपाययोजना करणे हे कधीही योग्य आहे. पर्यायी व्यवस्था केली नाही यास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येईल ? शेतक-यांना तीन दिवस ताटकळत रहावे लागण्यास कोण जबाबदार आहे ? त्यांच्यावर कोणती कारवाई करणार ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, वाशिम कृषि उत्पन्न बाजार समितीसंदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. या

...4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर..........

बाजार समितीमध्ये साधारणपणे सहा-साडेसहा हजार सोयाबीन व इतर कडधान्याची आवक होते. 21 तारखेला 9500 क्विंटल आवक झाली. त्यादिवशी माप उशिरापर्यन्त केल्यामुळे दुस-या दिवशी कृषि उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी उशिरा आले. दुस-या दिवशी सकाळी पुन्हा सहा-सात हजार क्विंटल आवक झाली. माप करण्यास उशिर झाला, हे मी मान्य करतो. परंतु, अशी परिस्थिती उद्‌भवल्यानंतर संबंधित अे.आर., कृषि उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी हे त्या ठिकाणी पोहोचले, त्यांनी शेतक-यांशी चर्चा केली व परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न केला. तीन दिवस माप बंद नव्हते तर एक दिवस बंद होते. 21 तारखेला पुन्हा कामकाज सुरु झाले.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:25

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर ........

एक दिवस शेतक-यांना त्रास झाला. आपण म्हटले की, गावे लावावयास पाहिजेत. कापसाच्या बाबतीत कृषी उत्पन्न बाजार समितीने साधारणत: एका दिवशी 10 गावे लावते. त्यासाठी टोकन पद्धत अवलंबिलेली आहे. सायाबीन किंवा इतर मालाच्या बाबतीत अशी पद्धत नाही. तरी पण अशा घटना घडू लागल्या तर याबाबतीत सुध्दा नियमन करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय सांगत आहेत की, 20 तारखेला एक दिवस बाजार बंद होता. परंतु प्रत्यक्षात तीन दिवस बाजार बंद ठेऊन व्यापारी तीन दिवस तेथे थांबले होते, ही सत्य घटना आहे. येथून वाशिम लांब नाही. त्या दिवशी मला तेथून फोन आला होता. मी त्यांना सांगितले की, अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे मी तेथे येऊ शकत नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांचा माल घेण्याचे बंद केल्याने शेतक-यांची कोंडी झाली. त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. पोलिसांनी त्या शेतक-यांना गुरासारखे तुडवून मारहाण केली. मी वर्तमानपत्रामध्ये फोटो बघितले. 70 वर्षाच्या लोकांना पोलिसांनी काठयांनी मारहाण केली. या पोलिसांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? त्या दिवशी आम्ही सभागृहामध्ये शेतक-यांना कर्ज माफी मिळावी म्हणून भांडत होतो. परंतु त्यावेळी वाशिम येथे पोलीस शेतक-यांना मारहाण करीत होते, त्या पोलिसांना आपण निलंबित करणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे ती मी पुन्हा एकदा रिपीट करतो. 20 तारखेला एक दिवस खरेदी बंद होती. 21 तारखेपासून खरेदी सुरु झालेली आहे. पोलिसांविरुध्द अद्याप तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. पोलिसांनी अतिरेक केला असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सभागृहाची प्रथा आहे की, सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये जी दिलेली माहिती दिली ती सत्य मानून त्याची चौकशी व्हावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदय, माझ्या जवळ माहिती आहे असे पुन्हा-पुन्हा सांगत आहेत. सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये सांगत आहेत की, तीन दिवस बाजार समिती बंद होती. माझा प्रश्न असा आहे की, याची आपण चौकशी करणार काय आणि त्यात जर तथ्य असेल तर चुकीची माहिती देणा-या अधिका-यावर कारवाई करणार काय ?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, याबाबतीत माहिती घेतली जाईल आणि चुकीची माहिती दिली असेल तर संबंधितावर कारवाई केली जाईल.

**सभापती** : मंत्री महोदय आपण याची चौकशी करा. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, शेतक-यांवर लाठीचार्ज करण्यात आला. सभागृहामध्ये या विषयावर जी चर्चा झाली त्याची माननीय गृहमंत्री महोदयांना नोंद घेण्यास सांगा.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, होय.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : आदिवासी भागातील शिक्षकांवर वेतनश्रेणीच्या बाबतीत होत असलेला अन्याय.

**मु. शी**. : आदिवासी भागातील शिक्षकांवर वेतनश्रेणीच्या बाबतीत होत असलेला अन्याय याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे, वि.प.स. यांनी "आदिवासी विभागातील शिक्षकांवर वेतनश्रेणीच्या बाबतीत होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी भागातील उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. शालेय शिक्षण विभागाने दिनांक 1 मार्च, 2000 पासून या शिक्षकांची वेतनश्रेणी बदलली. ग्राम विकास विभागाने 2005 मध्ये निर्णय घेतला. ग्राम विकास विभागाने 5 वर्षे उशिरा निर्णय घेतला व तो दिनांक 1 मार्च, 2000 पासून लागू केला. आदिवासी विभागातील आश्रमशाळा आणि उच्च माध्यमिक विभागात काम करणा-या शिक्षकांची वेतनश्रेणी बदलण्यासंदर्भात आमचा आग्रह होता. तो त्यांचा न्याय हक्क आहे. आदिवासी विभागाने यासंदर्भात आदेश काढले. परंतु सुधारीत वेतनश्रेणी जुलै, 2006 पासून लागू केलेली आहे. मागच्या अधिवेशनामध्ये हा विषय चर्चेला आला होता. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते की, आमची चुक झालेली आहे. ती चुक आमच्या लक्षात आलेली आहे. आम्ही ती चूक सुधारण्याचा तातडीने निर्णय घेऊ. परंतु अद्याप निर्णय झालेला नाही. पुन्हा या अधिवेशनामध्ये म्हणजे एक वर्षानंतर हा विषय आम्हाला येथे उपस्थित करावा लागत आहे. मध्यंतरी मी या विभागाशी अनेक वेळा पत्र व्यवहार केला. माझा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे दिनांक 1 मार्च, 2000 पासून आदिवासी आश्रमशाळांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांना रुपये 7,225 ची सुधारीत वेतनश्रेणी देण्याचा निर्णय शासन एक महिन्याच्या आत घेणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर जाऊन लवकरात लवकर न्याय देण्याचा प्रयत्न करु, असे आश्वासन मागच्या वेळी देण्यात आले होते.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

आम्ही मंत्रिमंडळासमोर गेलो होतो. अजून ज्यूनियर कॉलेजच्या लेव्हलच्या संस्थांमध्ये अशा पध्दतीचे मानधन मार्च, 2000 पासून देण्याचे राहिले असेल तर त्यांच्यासाठी मंत्रिमंडळासमोर गेलो होतो. मंत्रिमंडळाने अजून काही डिपार्टमेंटचे राहिले असे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले. या सर्व बाबतीत एकत्रित विचार मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येईल व सन 2000 पासून यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, राज्यामध्ये खाजगी उच्च माध्यमिक शाळांमध्ये हे मानधन मिळते. तसेच जिल्हापरिषदा, नगरपरिषदा आणि महानगरपालिकेच्या शाळांमध्ये देखील हे मानधन मिळते परंतु फक्त आदिवासी विभागातील शाळांमध्ये मात्र अद्याप राहिले आहे. त्या ठिकाणी त्याबाबत निर्णय घेतला होता, परंतु तो चुकीचा निर्णय घेतला गेला. आणि तो निर्णय दिनांक 01 जुलै, 2006 पासून लागू केला होता. तसेच मागच्या अधिवेशनामध्ये शासनाने आम्हाला असे आश्वासन दिले की, एक महिन्याच्या आत आम्ही यासंदर्भात निर्णय घेतो आमचा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, याबाबत आता शासन एक महिन्याच्या आत निर्णय घेणार आहात का ? हा एक भाग आणि दुसरा भाग म्हणजे या ठिकाणी उच्च माध्यमिक शिक्षकांच्या घडयाळी तासाप्रमाणे मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे, परंतु ती वाढ किती प्रमाणात झाली ? आणि ती लागू करण्यात आली का ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही मंत्रिमंडळासमोर एक महिन्याच्या आत जाऊन सन 2000 पासून आपण जी वाढ द्यावयाची असा हा निर्णय घेऊ. दिनांक 02 जानेवारी, 2007 पासून घडयाळी तासांवर काम करणा-या शिक्षकांच्या मानधनात जी वाढ द्यावयाची होती. पूर्ण अर्हता शिक्षकांना 72 रुपये घडयाळी तास, अपूर्ण अर्हता शिक्षकांना 54 रुपये घडयाळी तास आणि प्रशिक्षित पदवीधर शिक्षकाला व 43 रुपये अशा पध्दतीने जी.आर.काढलेला आहे आणि तो लागू करण्यात आलेला आहे.

श्री.संजय केळकर : आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत आश्रमशाळांची शासनाने नेमलेल्या तज्ज्ञ परीक्षक समितीने शिफारस केल्याप्रमाणे सकाळी 9.00 ते दुपारी 4.30 निश्चित केलेली आहे. परंतु या आश्रमशाळेतील मुले सकाळी सातला जेवल्यानंतर त्यांना दुस-या दिवशी

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

दुपारी 1.00 वाजता जेवण मिळते म्हणजे मध्यंतरी 18 तास त्यांना उपाशी राहावे लागते. तासिका तेवढया असतात हे मान्य आहे परंतु सध्याच्या शाळेच्या वेळेमध्ये बदल केला गेला तर या विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने देखील ते निश्चितपणाने उपयोगाचे होईल. याबाबत आपण पुनर्विचार करणार आहात का ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, तज्ज्ञ परीक्षण समितीच्या शिफारशीनुसार ठरविलेल्या या वेळेबाबत आता पुनर्विचार करता येणार नाही. या वयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दिक वाढीला आवश्यक असणा-या गोष्टींनुसारच तज्ज्ञ समितीने हा वेळेमध्ये बदल केलेला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, 15 तास जेवण न दिल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची वाढ होणार आहे का ? ही मुले सकाळी सात वाजता जेवल्यानंतर दुस-या दिवशी दुपारी एक वाजता जेवतात. या शाळेच्या वेळेच्या संदर्भात आमचे काहीही म्हणणे नाही. परंतु त्याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही, याचा विचार केला पाहिजे. अशा प्रकारची वेळ आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांवर लादत आहात. या वेळेमध्ये बदल होणे आवश्यक आहे. तो बदल शासन करणार काय ?

दुसरी गोष्ट म्हणजे राज्यामध्ये कोणताही विभाग असो, ग्रामविकास, शालेय शिक्षण विभागातील प्राथमिक शाळेतील घडयाळी तासानुसार 12 रुपये तासावर शिक्षक नेमण्याची तरतूद नाही. परंतु एकमेव आदिवासी विभाग असा आहे की, तेथील प्राथमिक आश्रम शाळांमधील शिक्षक हा 12 रुपये तासाप्रमाणे डेली वेजेसवर काम करतो. त्यांचे मासिक उत्पन्न 600 ते 1000 रुपयापर्यंतच असते. परंतु या घडयाळी तासावर काम करणा-या शिक्षकाला पूर्णवेळ शिक्षकाप्रमाणे राबवून घेतले जाते. या शिक्षकाच्या मानधनामध्ये वाढ करण्याच्या संदर्भात शासन तातडीने निर्णय घेणार आहे का ?

डॉ.विजयकुमार गावित : प्राथमिक शाळांमध्ये तासिका बेसिसवर शिक्षक नेमले जात नाहीत. पण ही गोष्ट निश्चित आहे की आदिवासी विभागामधील प्राथमिक आश्रम शाळांमध्ये घडयाळी तासांवर काम करणा-या शिक्षकाला 12 रुपये तासिका याप्रमाणे वेतन आहे म्हणून यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील. दुसरे असे आहे की, सन्माननीय सदस्यांनी

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित.....

सांगितले की, आदिवासी विभागातील प्राथमिक आश्रम शाळेतील विद्यार्थी संध्याकाळी सात वाजता जेवल्यानंतर त्यांना दुस-या दिवशी दुपारी एक वाजता दुपारचे जेवण मिळते परंतु या 18 तासांच्या दरम्यान त्यांना सकाळच्या वेळी आठ ते नऊ यादरम्यान नाश्ता देण्यात येतो.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयकुमार गावित .....

पूर्वी आपण 8-9 वाजता नाष्टा देत होतो. पुन्हा 10 वाजता जेवण देत होतो. सायंकाळचे जेवण 6 ते 6.30 वाजता द्यायचो. शिक्षकांनी मुलांबरोबर जास्त काळ राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे, म्हणून हे केलेले आहे. त्यामुळे माननीय सदस्य म्हटले आहे तसे करता येणार नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी.**: नागपूर सहकार न्यायालयातील न्यायाधीशाचे रिक्त पद भरुन आणखी एक सहकार न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता.

**मु.शी.**: नागपूर सहकार न्यायालयातील न्यायाधीशाचे रिक्त पद भरुन आणखी एक सहकार न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री.सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "नागपूर सहकार न्यायालयातील न्यायाधीशाचे रिक्त पद भरुन आणखी एक सहकार न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरुन, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भामध्ये दोन सहकारी न्यायालये आहेत. एक अमरावती विभागात व एक नागपूर विभागात आहे. नागपूर सहकार न्यायालयाला भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा हे सहा जिल्हे जोडलेले आहेत. या सहा जिल्हयाला एकच सहकारी न्यायालय आहे. मुंबईसारख्या शहरात पाच सहकारी न्यायालये आहेत. येथे सहा जिल्हे अधिक हे कार्पोरेशन यासाठी एक सहकारी न्यायालय आहे. या न्यायालयातील न्यायाधिशाची बदली झाली तर न्यायालय बंद पडते. नागपूरच्या सहकार न्यायाधिशाची बदली जून 2007 पासून कोपरगाव येथे झालेली आहे. तेव्हापासून येथे कोणताही न्यायाधिश आलेला नाही. येथील सर्व प्रकरणाचा अतिरिक्त पदभार अमरावती येथील न्यायाधिशाकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे येथे साडेपाच हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. जूनपासून आतापर्यंत हे पद रिक्त आहे. या विभागातून येथे दुसरे एक सहकारी न्यायालय असावे अशी मागणी झालेली आहे. उर्वरित जिल्हे आणि नागपूर महानगरपालिका या क्षेत्रासाठी अधिक एक सहकारी न्यायालय ही मागणी आहे. न्यायाधिशाचे पद जर सहा-सहा महिने भरले जात नसेल तर बरेच दावे व बँकाची कर्जवसूली प्रलंबित राहणार आहेत. 6-6 महिने ही पदे रिकामी राहिली तर या न्यायालयात निवाडेच होणार नाहीत. हे पद किती दिवसात भरले जाईल ? नागपूर विभागात दुसरे सहकार न्यायालय स्थापन्यासाठी सरकारची भूमिका काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सहकार न्यायालयाचे न्यायाधिश हे उच्च न्यायालयाकडून नियुक्त केले जातात. त्यामुळे सहकार न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या बदलीची बाब मी उच्च न्यायालयाच्या कक्षेतील  आहे. नागपूर येथील सहकार न्यायाधिशाची बदली दिनांक 12.5.2007 च्या नोटीफिकेशनप्रमाणे झाली आहे. त्यांच्या बदलीमुळे रिक्त झालेले पद तातडीने भरण्याबाबत महाराष्ट्र राज्य अपील न्यायालय मुंबई यांनी उच्च न्यायालय यांना दिनांक 3.8.2007 रोजी कळविलेले आहे परंतु अजून ते पद भरले गेले नाही. सर्वसाधारणपणे एखाद्या जिल्हयाच्या ठिकाणीचे एक हजार दावे शिल्लक असतील तर सहकार न्यायालयाची स्थापना केली जाते. आपण नागपूर येथे आणखी एक सहकार न्यायालयाची स्थाना करण्याची मागणी केलेली आहे, मी त्याबाबत सांगू इच्छितो की, याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात असे म्हटले आहे की, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर हे होईल. त्यांनी असे उत्तर दिले आहे की, सहकार अपील न्यायालय मुंबई यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर हे होईल. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत शासन पुढाकार घेणार नाही का ? या विभागातील लोकांना न्याय मिळणे सुकर व्हावे, एकाच सहकारी न्यायालयात त्यांना लवकर न्याय मिळू शकत नाही म्हणून सरकारने पुढाकार घेऊन नागपूर येथे दुसऱ्या सहकार न्यायालयाची स्थापना करण्याची मी विनंती केलेली आहे. ऑगस्ट महिन्यात न्यायाधीशाबाबत प्रस्ताव पाठविला आहे. सध्या नोव्हेंबर महिना चालू आहे. शासनाने याचा थोडासा पाठपुरावा केला तर न्यायाधीशाची जागा रिक्त राहणार नाही. लवकरात लवकर व कमीत कमी दिवसामध्ये या न्यायाधीशाची नियुक्ती करण्यासंबंधी आपण काय करणार आहात ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, नागपूर येथे न्यायाधीशाची लवकर नियुक्ती करण्यासाठी उच्च न्यायालयाला विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर नागपूर येथे दुसरे न्यायालय उघडण्याच्या दृष्टीने माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जी सूचना केली आहे, त्याप्रमाणे येथे प्रलंबित असलेल्या केसेसचा आढावा घेऊन आवश्यकता असेल तर याबाबतीत सरकार पुढाकार घेईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, न्यायाधिशांच्या बदल्या करण्याचे अधिकार उच्च न्यायालयाला आहेत. परंतु याबाबतचा प्रश्न खूप बिकट आहे. संपूर्ण विदर्भात अमरावती व नागपूर येथे दोनच सहकार न्यायालये आहेत. देऊळगावराजा या गावापासून अमरावती येथे म्हणजे सुमारे 300 किलोमीटर अंतरावरुन लोकांना इकडे न्यायालयात यावे लागते.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ 14:40

श्री.गोपीकिसन बाजोरीया .....

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाचे माननीय मंत्री महोदय, श्री. हसन मुश्रीफ सभागृहामध्ये आता बसले आहेत. अकोला येथील बार असोसिएशनच्या सर्व वकीलांनी यासंदर्भात सहकारी न्यायालयासाठी निवेदन दिलेले होते.त्यांचे असे म्हणणे होते की, आम्ही तेथे न्यायालय सुरु करण्यासाठी तयार आहोत. परंतु न्यायालय सुरु करण्यासाठी कोणतीही इमारत भाडयाने किंवा स्वत:च्य खर्चाने उभी केलेली नाही. अकोला आणि नागपूर मध्ये सहकारी न्यायालयासाठी भाडयाची स्वतंत्र जागा उपलब्ध करुन द्यावी. न्यायालयाचे न्यायाधीश न्याय देण्यास तयार आहेत. माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, अकोला व नागपूर जिल्हयामध्ये सहकारी न्यायालयांसाठी भाडयाची जागा उपलब्ध करुन देणार काय ? यासंदर्भात शासनाच्या माध्यमातून नवीन बिल्डींग उपलब्ध करुन दिली जाईल काय ?

श्री. जयप्रकाश दाडेगावकर : सभापती महोदय, सहकार न्यायालयाच्या जागा निवडीबाबत न्यायालयाचे न्यायाधीश निर्णय घेतात. यासंदर्भात जागा भाडयाने घेण्याच्या संदर्भात सरकारचा काही रोल असेल तर त्याबाबत निश्चित कार्यवाही करण्यात येईल.

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :राज्यातील शासकीय व निमशासकीय महाविद्यालयामध्ये अधिव्याख्यायांना वरिष्ठ श्रेणी लागू करण्याबाबत

**मु. शी.** :राज्यातील शासकीय व निमशासकीय महाविद्यालयामध्ये अधिव्याख्यायांना वरिष्ठ श्रेणी लागू करण्याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता. वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी राज्यातील शासकीय व निमशासकीय महाविद्यालयामध्ये अधिव्याख्यायांना वरिष्ठ श्रेणी लागू करण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, यासंदर्भात केस कोर्टामध्ये असल्यामुळे व नेट सेट या परीक्षा प परीक्षा पास करणारे प्राध्यापक कमी असल्यामुळे, अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे या प्रकरणाचा लवकरात लवकर निकाल लागावा यादृष्टीने शासन विशेष प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, नागपूर उच्च न्यायालयामध्ये ही केस फायनल ऑर्डर करिता पेंडींग आहे. त्यामुळे कोठल्याही प्राध्यापकांना कोठल्याही कॉलेजमधून काढलेले नाही. ते त्याच कॉलेजमध्ये काम करीत आहेत. फक्त त्यांची मूळ वेतनश्रेणी वाढविण्यात आलेली नाही. फक्त महाराष्ट्रातील एका कॉलेजमध्ये 3 अधिव्याख्यात्यांना निलंबित करण्यात आले. परंतु त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे असे आदेश संबंधित कॉलेजला देण्यात आले आहे. कोर्टाचा अंतिम निकाल आल्यानंतर यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल. जे अधिव्याख्याते नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले नाही मात्र पी.एचडी. व एम.फील केलेले आहे, त्यांचा स्टेटस रिपोर्ट पाठवून, आढावा घ्यावा किंवा युजीसीकडून डायरेक्ट रिपोर्ट पाठवावा. हा रिपोर्ट युजीसी कडून मंजूर करुन घेण्यात येईल. युजीसी कडून एप्रुव्हल आल्यानंतर त्यां अधिव्याख्यात्यांना कायम केले जाईल. यासंदर्भात सर्व विद्यापीठांना सूचना देण्यात आल्या आहेत. दोनही विद्यापीठांनी कम्प्लाय केलेले आहे. बाकीच्या विद्यापीठांशी आमचे अधिकारी संपर्कात आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाच्या सेवेमध्ये असलेल्या , पीएचडी व एमफील नसलेल्या एकूण 5 हजार अधिव्याख्यांत्यांना राज्य शासनाच्या 5 सप्टेंबर 2006 च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार नेट व सेट यामधून सूट देण्यात यावी. तसेच राज्य शासनाने अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीवर स्थगिती दिली. ती स्थगिती केव्हा उठवण्यात येणार आहे ? तसेच विद्यापीठ शिक्षण मंच यांनी केलेल्या मागणीनुसार, पी.एच.डी व एमफील या शैक्षणिक अर्हता रद्द करण्याच्या संदर्भात जे निवेदन दिले आहे त्यासंदर्भात निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने कोठल्याही प्रकारची स्थगिती दिलेली नाही. नागपूर उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. त्यामध्ये युजीसी व महाराष्ट्र शासन ही एक पार्टी आहे. कोर्टाने याबाबत स्थगिती देण्याचे आदेश दिलेले होते म्हणून शासनाने स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शासनाने स्थगिती दिलेली आहे. स्वत:हून स्थगिती दिलेली नाही.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आपण लेखी निवेदनामध्ये सर्व माहिती दिली आहे. पण माझा नेमका प्रश्न असा होता की, कोर्टाचा निकाल या संबंधात लवकरात लवकर लागेल यासाठी शासन काही विशेष प्रयत्न करणार काय ? जेणे करून या सर्व संबंधितांना लवकर न्याय मिळेल.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आम्ही तर त्यासाठी प्रयत्न करीतच आहोत. परंतु विद्यार्थी मंच जो आहे त्यांचे काही लोक आम्हाला भेटायला आले होते त्यावेळेसच आम्ही त्यांना सांगितले आहे की, तुम्हीही या प्रकरणामध्ये एंटरवेन करा. त्यासाठी त्यांनी कमीत कमी एक आपला वकील तरी नेमून त्याला कोर्टात उभे केले पाहिजे. आम्ही त्यांना निश्चितपणे यासाठी मदत करू.

श्री. जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील हजारो प्राध्यापकांचा हा प्रश्न आहे. नागपूर हायकोर्टाने या प्रकरणामध्ये जो स्टे दिला आहे तो व्यक्तीगत एका केससाठी आहे की संपूर्ण राज्यातील प्रश्नासंबंधात आहे ? म्हणजे कोर्टाचा हा निर्णय त्या एका केसपुरता बंधनकारक आहे की, राज्यातील सर्व अशा प्राध्यापकांसाठी बंधनकारक आहे ? नसेल तर मराठवाडा आणि शिवाजी विद्यापीठ या दोन विद्यापीठांनी ज्याप्रमाणे 1991 ते 1999 या काळात एलएफसी मार्फत लागलेल्या लोकांना या नेटसेट मधून सूट देऊन त्यांना कायम केले आहे तसे आपण करणार का?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याकडे कोर्टाची ऑर्डर आहे. ही ऑर्डर संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. यात बेसिक मुद्दा हा आहे की, यात दोन ग्रुप्स आहेत. एक ग्रुप म्हणजे नेटसेट पास झालेल्यांचा आहे आणि दुसरा ग्रुप नेटसेट पास न झालेले पण पीएचडी आणि एमफील परीक्षा पास झालेले आहेत अशांचा. यातील जे पीएचडी आणि एम.फिल. पास आहेत त्यांना आम्ही पुढाकार घेऊन युजीसीकडे त्यांची प्रकरणे मांडून त्यांना पटवून त्या लोकांना कायम केले होते. या संदर्भात हायकोर्टाची ऑर्डर अशी होती की, ज्यांनी नेटसेट पास केली आहे ते लोक कोर्टामध्ये गेले आणि त्यांनी कोर्टाला सांगितले की, जे नेटसेट पास झालेले नाहीत पण ते पीएचडी, एम.फिल. आहेत, त्यांनादेखील आमचे स्टेटस देता आहात, ते द्यायला नको. सभापती महोदय, मी या बाबतीतील कोर्टाची मूळ ऑर्डरच येथे आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. त्यात कोर्टाने म्हटले आहे की, "This is inequality. This is basic infringement of our

...... एसएस 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

fundamental rights" आणि अंतिमत: कोर्टाने सांगितले की, "Petitioner further contended that they had pursued their study for acquiring National Eligibility Test, in preference to the study of M. Phil or Ph.D., and now by the amendment, their reasonable expectation for which they had chosen a particular course of education is deviated and they are thereby deprived of an opportunity of employment, as until they acquire Ph.D./ M.Phil, they cannot be considered for employment as Lecturers, which they were reasonably expecting based upon prevailing regulations relating to the eligibility for appointment. This sudden change thereby violates their fundamental rights'. तसेच शेवटी असे म्हटले आहे की, 'For the background, which is recorded herein before and in the premises that University Grants Commission has failed to appear in spite of notice, this Court considers it proper and issues Rule, and grants interim relief in terms of Prayer". सभापती महोदय, संपूर्ण प्रोसिजरलाच हा स्टे कोर्टाने दिलेला आहे. महाराष्ट्रात जेवढी कॉलेजेस आहेत त्या सगळ्यांना हा स्टे दिलेला आहे.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, हा जो प्रश्न आहे तो संपूर्ण देशपातळीवरील प्रश्न आहे. तो केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. तेव्हा जे नेटसेट पास झालेले नाहीत पण त्यांनी पीएचडी, एम.फिल. केलेले आहे त्यांनादेखील कायम सेवेसाठी पात्र ठरविण्याची भूमिका शासन घेणार आहे का ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासन हे करू शकते की युजीसी करू शकते ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासाठी तीन उपाय आहेत. एक म्हणजे युजीसीने आतापर्यंत या संदर्भात कोर्टामध्ये ॲफिडेविट केलेले नाही. तेव्हा त्यांनी ते करावे यासाठी आपण



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र शासन म्हणून प्रयत्न करू. दुसरा उपाय मी अगोदर सांगितले आहे की, विद्यार्थी मंच म्हणून ती जी संस्था आहे, त्यांनी या प्रकरणी स्वत:हून एंटरवेन करायला पाहिजे, कोर्टामध्ये स्वत:ला पार्टी करून घेतले पाहिजे आणि तिसरा उपाय म्हणजे ज्या विद्यापीठांनी आपला रिपोर्ट सबमिट केला नाही त्यांनी लवकरात लवकर आपला रिपोर्ट दिला तर तो आम्ही युजीसीला पाठवून देऊ. युजीसीकडून अगोदर एक ऑर्डर होती की, कोर्टाच्या ऑर्डर प्रमाणे आपण त्यांना रेग्युलराईज करू शकतो. ....

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

परंतु युनिव्हर्सिटीकडून लवकर आल्यानंतर तो अहवाल यु.जी.सी. कडे फॉरवर्ड करण्यात येईल. अशाप्रकारे तीन ऑप्शनप्रमाणे शासन काम करीत आहे.

श्री.जी. एल. अैनापूरे : सभापती महोदय, या बाबत पिडित प्राध्यापकांना आश्वासन देण्याची शासनाची भूमिका रहाणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून जे पिडित राहिले आहेत त्यांना शासनाने आश्वासन दिले आहे, आणि मदत देखील केली जात आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, नेट सेटला पर्याय म्हणून एम.फिल. आणि पी.एच.डी. ही अर्हता महाराष्ट्र सोडून देशात सर्वत्र लागू आहे. फक्त या राज्यात एक व्यक्ती कोर्टामध्ये गेल्यामुळे कोर्टाने स्थगिती दिली आहे. ती अंतरीम स्थगिती नाही. याबाबत यु.जी.सी. ने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले काय? केले नसेल तर ते करण्यासाठी शासनाने आतापर्यंत काय प्रयत्न केले?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, यु.जी.सी. ने ॲफिडेव्हिट फाईल केले नाही. परंतु ॲफिडेव्हिट लवकरात लवकर फाईल करण्याकरिता प्रयत्न करण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनेच्या निवेदन क्रमांक 4 बाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नियम 93 च्या सूचनेच्या निवेदन क्रमांक 4 मधील विषयासंबंधी मागील अधिवेशनामध्ये एक तास चर्चा झाली. त्या चर्चेचे फलित म्हणून विधानसभा आणि विधानपरिषदेच्या माननीय सदस्यांची एक तदर्थ समिती गठीत करण्यात आली. त्या समितीच्या आतापर्यंत दोन वेळा बैठका झालेल्या आहेत. त्यामुळे निवेदनात म्हटल्याप्रमाणे "कोटयावधी रुपयांचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही" हे वाक्य जर सभागृहाच्या कामकाजामध्ये नोंद झाले तर ते कायम स्वरुपी रेकॉर्डवर राहिल. या विषयावर दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा झाली असून त्या चर्चेमध्ये शासनावर आरोप केले गेले आहेत. आणि त्यामधून तदर्थ समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. तेव्हा अशाप्रकारे जर शासनाने या निवेदनाव्दारे उतर दिले तर त्या समितीचा अवमान होईल. अशाप्रकारे उत्तर देऊन आणि ते रेकॉर्डवर आणून शासनाची नसलेली भूमिका बळकट करण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे समितीच्या कामकाजावर परिणाम होईल. या विषयासंबंधी माननीय सदस्यांना माहिती घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. तदर्थ समितीचा अहवाल सदनापुढे येईल त्याला विपर्यस्त असलेले हे निवेदन असल्यामुळे आपण हे नियम 93 चे चौथे निवेदन तहकूब करावे अशी विनंती करतो.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापमती महोदय, या ठिकाणी दोन समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. त्यापैकी एका समितीला मुदतवाढ घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे श्रीमती प्रतिमा उमरजी यांची एक समिती नियुक्त केली असून ती जुनी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचे या निवेदनासंबंधीचे उत्तर रेकॉर्डवर येऊ नये अशी माझी सूचना आहे. हा नेमण्यात आलेल्या समितीतील सन्माननीय सदस्यांचा अवमान आहे. त्या समितीमध्ये दोन्ही सभागृहातील सर्वच पक्षांच्या माननीय सदस्यांचा सहभाग आहे. म्हणून मी आपणास विनंती करतो की, आपण हे निवेदन तहकूब करावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे निवेदन तहकूब करण्यास शासनाची हरकत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाने नेमलेल्या संयुक्त समितीमध्ये दोन्ही सभागृहातील माननीय सदस्य असतात. तेव्हा त्या समितीमध्ये या विषयावर चर्चा होऊन जो निर्णय लागणार आहे त्याला छेद देणारी ही बाब आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय राज्यमंत्र्यांनी सूचनेला मान्यता दिली असल्यामुळे हे निवेदन तहकूब करण्यात येत आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय उत्तर देणार असतील तर मी प्रश्न विचारतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे निवेदन तहकुब करावे असा निर्णय आता झालेला आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दोन्ही सभागृहाच्या संदस्यांची संयुक्त समिती नेमलेली आहे आणि एवढ्या मोठ्या समितीसमोर...

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. यानंतर निवेदन क्रमांक 6 घेण्यात येईल.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरवड

**पृ. शी.** : बंद पडलेली नागपूर विणकर सहकारी सूत गिरणी सुरु होत नसल्याने कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष.

**मु. शी.** : बंद पडलेली नागपूर विणकर सहकारी सूत गिरणी सुरु होत नसल्याने कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सतीश चतुर्वेदी ( वस्त्रोद्योग मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व इतर यांनी "बंद पडलेली नागपूर विणकर सहकारी सूत गिरणी सुरु होत नसल्याने कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

**तालिका सभापती** : हे निवेदन सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे यांनतर लक्षवेधी सूचना घेण्यात घेण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 6 च्या संदर्भात आपण सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचे नाव पुकारले पण इतर सन्माननीय सदस्यांची नावे आपण वाचलेली नाहीत.

**तालिका सभापती** : माझ्याकडे जे निवेदन आलेले आहे त्यावर सर्वश्री नितीन गडकरी व इतर विधान परिषद सदस्य असा उल्लेख केलेला आहे.

श्री. जगदीश गुप्ता : इतर सन्माननीय सदस्य कोणते ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी नियम 93 ची सूचना दिली त्यावेळी जर 4 सन्माननीय सदस्यांची नावे दिली असतील तर आपल्या कार्यालयाने ती नावे का छापली नाहीत ? या ठिकाणी आलेल्या निवेदनावर इतर सदस्यांची नावे नसल्यामुळे आपण ती नावे वाचली नाहीत. निवेदनामध्ये सन्माननीय सदस्यांची नावे देण्याच्या बाबतीत आपले कार्यालय जबाबदार आहे.

**तालिका सभापती** : आता आपण पुढे गेलेलो आहोत. मी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे असतील तर माझी उत्तर देण्याची तयारी आहे.

**तालिका सभापती** : मी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या कार्यालयाच्या चुकीची शिक्षा आम्हाला कशाला ?

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन वितरित केलेले आहे त्यामध्ये बदल करु. निवेदनाच्या प्रती मंत्रालयाकडून येत असतात. निवेदनाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी दखल घ्यावी. निवेदनावर नावे लिहिताना श्री. नितीन गडकरी तसेच इतर सर्व सन्माननीय सदस्यांची नावे लिहावीत.

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, सदस्यांची नावे आपल्या कार्यालयाकडून दिली जातात.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, ही सूत गिरणी बंद झाल्यापासून त्या गिरणीतील जे कामगार आहेत त्यांची जी हक्काची देयके असतील, मग भविष्य निर्वाह निधी असेल, सेवानिवृत्तीची देयके किंवा इतर देयके असतील ती दिलेली आहेत काय ?

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...)

ती दिली नसतील तर ती केव्हा देणार आहात ? ही सूतगिरणी सुरु करण्यासंबंधी शासनाचे पुढचे धोरण काय आहे ? ही सूतगिरणी शासनाला सुरु करावयाची आहे काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : या सूतगिरणीतील कामगारांच्या देणीबद्दल कोर्टामध्ये केस सुर आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे जमिनीची विक्री करुन कामगारांची 50 टक्के देणी देण्यात आलेली आहेत. पुढील कार्यवाही कोर्टाच्या आदेशाप्रमाणे करण्यात येईल. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी वित्त विभागाचे सचिव, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी, संचालक इत्यादींची उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्या उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल दिलेला आहे. 10 वर्षापूर्वी या सूतगिरणीवर लिक्विडेटर नेमला होता. त्यावेळी कोणाचे शासन होते याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. या सूतगिरणीवर 65 कोटीची देणी आहेत. ही सूतगिरणी चालविणे शक्य नाही असा अहवाल उच्चस्तरीय समितीने दिलेला आहे. यह जमीन 43 करोड़ रुपए की है और 65 करोड़ रुपए का वहां पर पेमेंट करना है. वहां की मशीनरी आउटडेटेड हो चुकी है.वहां जमीन की बिक्री हुई है. कामगारांची देणी देण्याविषयी कोर्टाचा जो काही निकाल येईल त्याप्रमाणे ती देण्याची शासनाची तयारी आहे.

श्री. जगदीश गुप्ता : या सूतगिरणीच्या संदर्भात कोर्टाचा निकाल लवकर लागावा यासाठी शासनाने पाठपुरावा करावा. तसेच या सूतगिरणीतील कामगारांना किंवा त्यांच्या मुलांना नोकरीमध्ये सामावून घेण्याच्यादृष्टीने, त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासन विशेष प्रयत्न करील काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना मला मान्य आहे. त्याप्रमाणे आमचे प्रयत्न सुरु आहेत.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 1च्या संदर्भात माननीय राज्यमंत्री महोदय श्री. राजेश टोपे तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी केलेल्या विनंतीवरुन ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे : ही लक्षवेधी सूचना उद्या घ्यावयाची असे ठरले आहे. आज माननीय मंत्री महोदयांना विधानसभा सभागृहामध्ये काम असल्यामुळे त्यांनी तशी विनंती केलेली आहे.

**तालिका सभापती** : ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असून ती नंतर कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात येईल.

माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी लक्षवेधीवर फक्त तीन प्रश्न विचारावेत. आज निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप द्यावयाचा आहे. हा विषय कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये असताना देखील आपण निरोप देऊ शकलो नाही. आजही तसे होणे बरोबर नाही. म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी लक्षवेधीवर नियमाप्रमाणे तीन पेक्षा अधिक प्रश्न विचारु नयेत.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जयभारत महिला सेवा संस्था ओमनगर, नागपूर या संस्थेच्या शाळेतील गैरकारभाराबाबत करावयाची कारवाई

**मु. शी.** : जयभारत महिला सेवा संस्था ओमनगर, नागपूर या संस्थेच्या गैरकारभाराबाबत करावयाची कारवाई यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे व श्रीकांत जोशी, वि.प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जयभारत महिला सेवा संस्था ओमनगर, नागपूर या संस्थेच्या अध्यक्षांनी शिक्षण उपसंचालक नागपूर यांना निवेदन देऊन शाळेतील गैरकारभाराबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत विनंती करणे, संस्थेच्या उज्वल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कबीर नगर, नागपूर-9 या शाळेतील मुख्याध्यापक श्री. किशोर मासुरकर यांनी कु. मिना विश्वनाथ भांडारकार यांची `खोटी नियुक्ती दाखवून धोकेबाजी व फसवणूक करुन शासकीय अनुद ानाचा अपहार केल्याची तक्रार करणे, सेवा ज्येष्ठता यादीबाबत निर्णय घेणे्याबाबत शिक्षणाधिकारी नागपूर यांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, मुख्याध्यापकांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी प्रकरण सिध्द होणे, शाळेचे रेकॉर्ड नियमबाह्य पध्दतीने सिलबंद करुन ठेवणे, शिक्षणाधिकारी यांनी संबंधितांविरुध्द कारवाई करण्यास टाळाटाळ करणे, संस्थेने वारंवार निवेदने देऊनही शिक्षण विभागातील अधिका-यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन गुन्हेगारांना पाठीशी घालणे, शालेय व्यवस्थापनात अडचणी निर्माण करणे, याबाबत शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका "

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : जयभारत महिला सेवा संस्था ओमनगर, नागपूर या संस्थेच्या शाळेतील गैरव्यवहारासंबंधातील लक्षवेधी या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे या संस्थेची सर्व संस्थाचालक मंडळी ही एकाच कुटुंबातील आहेत. इतकेच यनव्हेतर त्या शाळेमध्ये काम करणारी मंडळी देखील एकाच कुटुंबातील आहेत. त्यांच्यामध्ये वाद सुरु आहेत. शासनाने ही बाब मान्य केलेली असून शाळेच्या प्रशासनावर आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्याचा विपरित परिणाम झालेला आहे. म्हणून या संस्थेवर काही दिवसापूर्वी शासनाने प्रशासकाची नियुक्ती केली होती. ज्या प्रयोजनासाठी ही प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली तो उद्देश जोपर्यन्त साध्य होत नाही तोपर्यन्त प्रशासक काढला जात नाही. प्रशासकाच्या नेमणुकीबाबत शाळेच्या संचालकांनी शिक्षण उपसंचालकांना अहवाल देणे, शिक्षण उपसंचालकांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करणे आणि ही सर्व प्रक्रिया झाल्यानंतर शासनाची परवानगी मिळाल्यावरच प्रशासकाची नियुक्ती केली होते. माझा प्रश्न असा आहे की, ज्या गैरकारभाराबाबत प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली, शाळेचे व्यवस्थापन प्रशासकानी आपल्या ताब्यात घेतले होते त्या गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2..........

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, जयभारत महिला सेवा संस्था ओमनगर, नागपूर या संस्थेचे जे संचालक मंडळ आहे ते एकाच कुटुंबातील आहे. बहुतांश शिक्षक आणि स्टाफ त्यांच्या कुटुंबांपैकीच आहेत. तेथे श्री.किशोर मासूरकर हे मुख्याध्यापक होते. ते त्या संस्थेचे सदस्य आहेत. श्री.ओंकार ढोले व श्री.चरणदास पाटील या दोघांची बनावट नावे दाखवून 3.10.96 ते 31.8.98 या कालावधीत बनावट सह्या करुन त्यांनी वेतनापोटी रक्कम उचलली. ही गोष्ट ज्यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांच्या लक्षात आली त्यावेळी भादंवि कलम 420, 468, 408, 471 अ, 34 अन्वये सक्करदरा पोलीस स्टेशन, नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधितांना अटक करण्यात आली व त्यांना जामीन मिळाला. कुटुंबातील भांडणामुळे नोव्हेंबर, 06 मध्ये या संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले. परंतु प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना प्रशासक उठविण्यात आला आणि त्यांच्याकडून हमी लिहून घेऊन कारभार संस्थेच्या ताब्यात दिला आहे.

श्री.रामनाथ मोते : संबंधित शाळेचे जे मुख्याध्यापक होते त्यांनी अशाप्रकारे काही गैरव्यवहार केला त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित मुख्याध्यापकांची चौकशी होऊन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. माझ्या माहितीप्रमाणे आजही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. न्यायालयाने निकाल दिलेला नाही. आजही तो माणूस त्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहे हे खरे आहे का? शासनाची फसवणूक करुन लाखो रुपयांचा अपहार केला असे निवेदनामध्ये म्हटले आहे. गैरव्यवहार केला म्हणून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. त्यांनी शासनाची किती रक्कमेची फसवणूक केली? ज्यांच्याविरुध्द केस दाखल केली ते अन्य सदस्य कोण आहेत?

श्री.हसन मुश्रीफ : एकाच कुटुंबातील प्रकरण असल्यामुळे नवीन कार्यकारिणी केली. 10.7.2007 रोजी बहिणीला अध्यक्ष केले, पत्नीला उपाध्यक्ष केले आणि स्वत: श्री.किशोर मासूरकर हे सचिव झाले. त्यांनी ठराव आणला की, किशोर मासूरकर यांना अफरातफरीखाली बडतर्फ केले होते, त्यांचे सेवासमाप्तीचे आदेश रद्द करुन 20.7.2007 पासून त्यांना पुन्हा पदस्थापना दिली आहे. रेखा चिनवतकर, अध्यक्ष, मीना भांडाकर उपाध्यक्ष, किशोर मासूरकर सचिव. कमल मासूरकर, युवराज भादाडे हे सर्व एकाच कुटुंबातील असून बहिण, नवरा, भाऊ, बायको असे सर्व सदस्य आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2..........

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ज्या उद्देशाने या संस्थेवर प्रशासक नेमले होते तो उद्देश सफल झालेला नसताना सुध्दा, प्रशासकाचा कालावधी एक वर्षाचा असताना व ती मुदत संपलेली नसताना प्रशासक का रद्द करण्यात आला? अशा पध्दतीने गुन्हेगारांना पाठिशी घालणाऱ्या अधिका-यावर निलंबनाची कारवाई करणार का?

श्री.हसन मुश्रीफ : हे संचालक आता सेवानिवृत्त झालेले आहेत. परवाच सेवानिवृत्त झाले आहेत. प्रधान सचिव, शिक्षण यांच्यामार्फत यांची चौकशी करुन त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ, पी.एफ.जे काही द्यायचे असेल ते रोखले जाऊन कारवाई केली जाईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान सुरु ठेवणे.

**मु.शी.**: राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान सुरु ठेवणे यासंबंधी श्री.विक्रम काळे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यामध्ये खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये शासन संबंधित शाळा अनुदानावर आल्या की त्या शाळांना शाळेतील शैक्षणिक साधने, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तके इत्यादी शैक्षणिक व प्रशासकीय बाबींसाठी दरवर्षी त्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या 12 टक्के इतकी रक्कम वेतनेतर अनुदान म्हणून दिली जाणे, हे अनुदान देत असताना अगोदर संबंधित शाळांना आपल्या उपलब्ध निधीतून खर्च करावा लागत असणे, त्याचे ऑडिट झाल्यावरच त्यांच्या 12 टक्के दराने आजपर्यंत वेतनेतर अनुदान दिले जात असणे, राज्यात एकूण शाळापैकी 80 टक्के शाळा या ग्रामीण भागात असणे, त्या शाळामधून गोरगरीब शेतकरी, कष्टकऱ्यांची मुले शिक्षण घेत असणे, ते कुठल्याही प्रकारची फी भरु शकत नसणे, त्यांना मोफत शिक्षण दिले जाणे, त्यामुळे या शाळांना दरवर्षी उशिरा का मिळेना परंतु मिळणारे 12 टक्के वेतनेतर अनुदान शासन बंद करण्याचा विचार करीत असल्यामुळे राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर शैक्षणिक सुविधा न मिळण्याच्या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे त्यांच्या शैक्षणिक व गुणवत्ता विकासावर होणारा विपरित परिणाम, त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकात निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, 12 टक्के वेतनेतर अनुदान खाजगी शाळांना दिले जाते. हे वेतनेतर अनुदान शाळांनी पैसे खर्च केल्यानंतर, ऑडीट झाल्यानंतर दिले जाते की, त्यांना ॲडव्हान्समध्ये दिले जाते हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, भविष्यात वेतनेतर अनुदान लौकर देऊ असे माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे. परंतु हे वेतनेतर अनुदान देण्यासाठी 12 टक्के दर आहे तो दर शासन कमी करु इच्छित आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाची आर्थिक परिस्थिती त्यावेळेला चांगली नव्हती त्यावेंळेला 24 नोव्हेंबर, 2001 मध्ये मंत्रीमंडळाने खाजगी अंगण शिक्षण संस्थांना देण्यात येणारे हे वेतनेतर अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला असून ते अनुदान 31 मार्च 2004 पासून बंद केलेले आहे. त्यापूर्वीचे आपण सर्व वेतनेतर अनुदान दिलेले आहे. यासंदर्भात संबंधित संस्थाचालक आणि कृती समिती परवा माननीय मुख्यमंत्र्यांना भेटली व हे अनुदान पुन्हा द्यावे की, देऊ नये ही बाब मंत्रीमंडळापुढे आलेली नाही. ही बाब लवकरात लवकर मंत्रीमंडळापुढे आणून याबद्दल निर्णय केला जाईल. आपण 12 टक्के वेतनेतर अनुदान देत असतो परंतु ज्या जुन्या संस्था आहेत त्यांना 6,9 आणि 12 टक्के वेतनेतर अनुदान देत असतो. ज्या बाबतीत निर्णय झालेला नाही त्या ठिकाणी वेतनेतर अनुदान कमी करण्याचा प्रश्नच येत नाही. शाळांनी खर्च केल्यानंतर वेतनेतर अनुदान देत असतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासन शिक्षणाच्या क्षेत्रातून आपले अंग काढून घेत आहे म्हणून शासनाने वेतनेतर अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. वेतनेतर अनुदान बंद केल्यामुळे ग्रामीण भागातील आणि झोपडपट्टीच्या भागातल्या शाळा आज जवळपास कोलमडलेल्या आहेत. ज्या शैक्षणिक सुविधा देण्याची आवश्यकता आहे अशा सुविधा सुध्दा शासनाने हिरावून घेतलेल्या आहेत. त्यामुळे शासन यासंदर्भातील निर्णय येत्या महिन्या भराच्या आत कॅबिनेट पुढे जाऊन निर्णय घेण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, येत्या तीन महिन्याच्या आत आपण मंत्रीमंडळाच्या समिती पुढे जाऊ.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात दोन भाग केलेले आहे. एक भाग असा आहे की, सन 2004 पर्यंत वेतनेतर अनुदान देण्याचे आपण मान्य केलेले आहे. 2004 पर्यंत सुध्दा अनेक शाळांना वेतनेतर अनुदान दिलेले नाही.त्यामुळे यासंदर्भात आपण जी कमिटमेंट केलेली आहे ती पूर्ण करणार का? तसेच 24 जुलै, 2007 रोजी सभागृहात माननीय मंत्रीमहोदयांनी आमच्या तारांकित प्रश्न क्रमांक 29432 या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे ते मी येथे वाचून दाखवितो. "एक महिन्याच्या आत वेतनेतर अनुदान द्यावयाचे किंवा कसे यासंदर्भातील प्रस्ताव कॅबिनेट पुढे सादर करु. वेतनेतर अनुदान दिले पाहिजे अशा प्रकारची सकारात्मक भूमिका विभाग घेईल आणि कॅबिनेट पुढे प्रस्ताव सादर करेल." सभापती महोदय, वेतनेतर अनुदान एक महिन्यात देण्यात येईल असे सांगितले असतांना आता आपण 3 महिन्यात कॅबिनेट पुढे यासंदर्भात जाऊ असे सांगितलेले आहे. सन 2004 पूर्वीचे देणे असलेले देण आपण तातडीने देणार काय ? त्याच्या पुढचे देण्याच्या संदर्भात 3 महिन्याच्या आत मंत्रीमंडळापुढे जाऊन, आपले वजन वापरुन मंजूर करुन घेणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सन 2004 पूर्वीचे जी देय रक्कम आहे ती माझ्या पूर्वी देण्यात आलेली आहे. ज्या संस्थांनी यासंदर्भातील निकष पूर्ण केले नसतील त्यांना हे वेतनेतर अनुदान दिले गेले नसावे. ज्यांना वेतनेतर अनुदान मिळालेले नाही त्यांना सुध्दा वेतनेतर अनुदान देण्यात येईल.

श्री. जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, तमंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितल्या प्रमाणे पूर्वी परिस्थिती होती. स्वर्गीय गोंविदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली माननीय मुख्यमंत्र्यांना एक शिष्टमंडळ भेटले होते. पूर्वी जरी अनुदान बंद करण्याचा निर्णय झाला असला तरी आता आम्ही तो निर्णय बदलून घेऊन अनुदान देण्याचा निर्णय घेऊ असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांना लेखी आश्वासन दिले होते. यासंदर्भातील पत्र सुध्दा त्यांच्याकडे आहे. त्या भूमिकेशी हे शासन आज सुध्दा कायम आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पूर्वीच्या भूमिकेशी शासन कायम आहे. हा विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर आम्ही आणू.

-------------



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली जिल्हयात विविध सहेकारी दूध संघाकडून सात लाख लिटर दुधाचे संकलन होत असतांना मिरज येथील शासकीय दूध योजना बंद असणे.

**मु. शी.** : सांगली जिल्हयात विविध सहेकारी दूध संघाकडून सात लाख लिटर दुधाचे संकलन होत असतांना मिरज येथील शासकीय दूध योजना बंद असणे यासंबंधी सर्वश्री अनिल परब, अरविंद सावंत, दिपक सावंत, श्रीमती नीलम गो-हे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, प्रकाश शेंडगे, श्रीकांत जोशी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. अनिल परब ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सांगली जिल्हयात विविध सहकारी दूध संधाकडून सुमारे सात लाख लिटर दुधाचे रोज संकलन होत असताना मिरज येथील शासकीय दूधयोजना एप्रिल, 2007 पासून बंद असणे, योजना बंद असल्याचे कारण दूध उपलब्ध नसल्याचे सांगितले जाणे, योजना बंद असली तरी तेथे कार्यरत असलेल्या सुमारे 400 कर्मचाऱ्यांच्या वेतनापेटी शासनाचे दरमहा लाखे रुपये खर्च होणे, उक्त कर्मचारी कामाविना बसून असल्याने त्यांच्यापुढे भवितव्याचा प्रश्न उभा रहाणे, कोटयावधीची यंत्रसामुग्री असलेली उक्त योजना बंद असल्याने तसेच कर्मचाऱ्यांना बसून पगार द्यावा लागत असल्याने शासनाचे प्रचंड आर्थिक नुकसान होणे, परिणामी उक्त कर्मचारी तसेच नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, उक्त प्रकरणी शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, शासनाचा एक स्तूत्य उपक्रम चालू ठेवून कार्यरत 400 कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांना दिलासा देऊन शासनाचे आर्थिक नुकसान टाळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ ( दुग्धविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

..2X4



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. अनिल परब :सभापती महोदय, शेतक-यांना दूध व्यवसायातून थोडेसे उत्पन्न व्हावे आणि प्रोत्साहन मिळावे म्हणून शासकीय दूध योजना सुरु झाल्या. सहकाराच्या माध्यमातून गाजावाजा करुन या योजना सुरु करण्यात आल्या. परंतु दूध सम्राटांचे भले व्हावे आणि त्यांची स्वत:ची पोळी फक्त शेकावी म्हणून शासकीय योजनांच्या गळयांना कशा पध्दतीने नख लावले जाते याचे हे मुर्तिमंत उदाहरण आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब..........

सांगली जिल्ह्यातून 7 लाख लीटर दूध संकलित होत असताना तेथील लोकांना दुधाचा एक थेंबही मिळत नाही. गेल्या मार्च महिन्यापासून त्यांना दुधाचा एक थेंबही मिळालेला नाही. तेथील कामागारांना अतिरिक्त ठरवून कामावरुन कमी केले जात आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहेत की, शासनाने ज्या उद्देशान दूध योजना सुरु केली ती जीवंत राहण्यासाठी तेथील कामगारांना अतिरिक्त न ठरविता ही योजना चालू राहण्यासाठी शासन कोणता प्रयत्न करणार आहे ? तसेच शेतकऱ्यांना कशाप्रकारे दिलासा देणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने तीन-चार वर्षापूर्वी जाहीर केले होते की, शासन हळूहळू या योजनेतून बाहेर पडून ही योजना सहकारामध्ये चालविण्याचा प्रयत्न करणार आहे. तालुका दूध संघ, जिल्हा दूध संघ, राज्य दूध संघ यातून पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दुधाची उलाढाल होत आहे. मिरज येथील शासकीय दूध योजनेतून कमी दूध यायला लागले म्हणून ऑक्टोबर 2006 ते मे 2007 या कालावधीत दूध भुकटी प्रकल्प दुधाच्या उपलब्धतेनुसार चालविण्यात आला. त्यानंतर तो बंद करण्यात आला. शासनाने ही योजना कायम स्वरुपी बंद केलेली नाही. या प्रकल्पास दोन लाख लीटर दुधाची आवश्यकता आहे. दूध कमी आल्यामुळे तेवढ्या कालावधीपुरता ती बंद ठेवण्यात आली. दिनांक 21.11.2007 रोजी दुधाचे संकलन जास्त झाले होते. आपण त्याठिकाणी दूध विक्री करीत नाही. त्याठिकाणी दुधाची भुकटी व पांढरे लोणी काढण्यात येते. शासनाने हा प्रकल्प पूर्णपणे बंद केलेला नाही. राज्य शासनाने पदांचा आढावा घेतला त्यावेळी तेथे 175 पदे अतिरिक्त असल्याचे दिसून आले. त्याठिकाणी एकूण 398 कर्मचारी आहेत. जो अतिरिक्त स्टाफ झालेला आहे त्यांना शासनाच्या इतर विभागामध्ये वर्ग करणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रात सांगली जिल्हा दूध संकलनात अग्रगण्य आहे. त्यामुळे त्याठिकाणी दुधाचा पुरवठा कमी होतो हे ऐकताना कसे तरी होते. या प्रकल्पास दोन लाख लीटर दुधाची आवश्यकता आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. सांगली जिल्ह्यात जवळपास 7 ते 8 लाख लीटर दुधाचे संकलन होते. असे असताना हा प्रकल्प बंद करण्याचे शासनाचे षडयंत्र नाही ना अशाप्रकारची शंका मनात उपस्थित होते. कारण या प्रकल्पावर कोणत्या तरी दूध सम्राटाची वक्रदृष्टी पडली असून तो ताब्यात घेण्याचा त्यांचा डाव आहे. तेव्हा जाणूनबुजून शासन हा प्रकल्प बंद करायच्या मागे लागला आहे असे वाटते. त्या ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी ठरवून त्यांना कामावरुन कमी करण्यात येत आहे. मी दिनांक 21.11.2007 रोजी हा प्रकल्प बंद का असा प्रश्न विचारला होता, पण तो चर्चेसाठी येऊ शकला नाही. मी प्रश्न दिल्यावर तो प्रकल्प सुरू झ ाला. सदस्यांनी प्रश्न विचारल्यावर एक दिवसात प्रकल्प सुरू कसा झाला याबाबत आम्हाला अवगत करावे. माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, 175 कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्यात आलेले आहे, तो निर्णय रद्द करुन त्यांना त्याच ठिकाणी कायमस्वरुपी सामावून घेतले जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शासन हा प्रकल्प बंद करणार नाही. या प्रकल्पाची शासनास आवश्यकता आहे. त्याठिक्‌णी दुधाची विक्री केली जात नाही. तेथे दुधाची भुकटी व पांढरे लोणी काढले जाते. त्या जिल्ह्यामध्ये राजाराम बापू पाटील दूध सहकारी संस्था, शिराळा ही दूध सहकारी संस्था बळकट झालेली आहे. सहकार चळवळ बळकट व्हावी, स्वत:च्या पायावर उभी रहावी यासाठी बजेटरी तरतूद केलेली आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांकडून दूध संकलन करण्यासाठी शासनाने दूध डेअऱ्या काढल्या. दूध संकलन करून शेतकऱ्यांना रोजगार मिळावा हा उद्देश होता.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपकर .....

माझा प्रश्न असा आहे की, अतिरिक्त कर्मचाऱ्यांना आपण पगार देणार का ? तसेच, सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकणवलीमध्ये 6 कोटी रुपये खर्च करुन एक डेरी उभी करण्यात आली. त्यामध्ये महानंदचे चेअरमन....

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना सांगली जिल्हयापुरती मार्यादित आहे. आपण वेगळा प्रश्न विचारत आहात.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी त्यानुषंगानेच विचारत आहे की, महानंदचे चेअरमन....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य त्यानुषंगानेच प्रश्न विचारत आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रश्न सहकार क्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे त्यांचा प्रश्न सहकार दूध योनजेशी संबंधित आहे. हा प्रश्न जरी सांगली जिल्हयापुरता मर्यादित असला तरी त्यानुषंगाने सन्माननीय सदस्य प्रश्न विचारु शकतात.

**तालिका सभापती** : ज्यावेळी एखादी लक्षवेधी सूचना उपस्थित केली जाते त्यावेळी त्यामध्ये विशिष्ट उद्देश व विषय असतो.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, दूध योजना तयार करण्यामागील उद्देश असा आहे की, शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा, त्यांना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीनेच वेगवेगळया जिल्हयांमध्ये अशाप्रकारच्या दूध योजना निघाल्या. परंतु शासनाच्या या योजना प्रायव्हेट संस्थांकडे देण्याच्या दृष्टीने पध्दतशीपणे प्रयत्न चालू आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा असो अथवा सांगली जिल्हा असो, दूध योजनांच्यासंदर्भात सुरुवातीला जो उद्देश होता तो शेवटपर्यंत कायम ठेवण्याच्या दृष्टीने शासन विशिष्ट असे एखादे धोरण ठेववणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने जरी सहकारीकरण करण्याचे धोरण स्वीकारले असले तरी राज्यातील शेतकऱ्यांचे एक-एक थेंब दूध घेण्याची हमी घेतलेली आहे. दूध सहकारी संस्थांच्या माध्यमातून दूध घेण्यात येत आहे, शेतकऱ्यांना उघडयावर पडू दिले जाणार नाही, त्यांचे पूर्ण दूध घेण्याची हमी शासनाने घेतलेली आहे. या माध्यमातून दूध सहकारी संस्थाही चालल्या पाहिजेत, असा यामागील उद्देश आहे. (...2...

28-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) ZZ-2
SSP/ पूर्वी श्री.अजित... 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कणकवली येथे 6 कोटी रुपये खर्च करुन एक डेअरी बांधणत आली. ज्याप्रमाणे महानंदचे दूध घेण्याच्या दृष्टीने युनिट केले त्याप्रमाणे तेथील दूध शासकीय डेअरीमध्ये जाण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न असून याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रश्न सहकार क्षेत्राशी संबंधित आहे. आज सहकार क्षेत्रामध्ये मोठयाप्रमाणात सहकारसम्राट निर्माण झालेले आहेत. ज्याप्रमाणे साखरसम्राट निर्माण झाले त्याप्रमाणे दूधसम्राट निर्माण झालेले असून त्याचा परिणाम सहकार क्षेत्रावर होत आहे. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून महानंदचा महासंघ निर्माण झाला. महानंदच्या माध्यमातून शहरामध्ये 8-9 लाख लिटर दूध वितरित होत होते, परंतु ते आता 4-5 लाखांवर आलेले आहे. आज खाजगी संस्था मोठयाप्रमाणात दूध घेत असल्यामुळे सहकार क्षेत्राचा पुरता चुराडा झालेला आहे. आपण एवढा मोठा महासंघ उभा करुन त्याचे बोर्ड अस्तित्वात आणले,

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

श्री.अजितदादा पवार यांच्यासारखे सदस्य त्या बोर्डावर आहेत, आपण स्वत: आहात. त्यामुळे महानंदा डेअरीला सहकार क्षेत्रातूनच दूर पुरवठा होऊन सहकार क्षेत्रातील दूध पुरवठा केंद्र आहेत ती जास्तीत जास्त समर्थ होतील, तोटयात न जाता, बंद पडणार नाहीत याची काळजी शासन घेणार काय ? मंत्री महोदयांनी सांगितले की, हा सांगली जिल्हयातील प्रश्न आहे. परंतु, सहकार क्षेत्रातील हा प्रश्न असल्याने मी तो विचारला आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, दूध महासंघ ॲपेक्स बॉडी म्हणून स्थापन करण्यात आला. केंद्राचा कायदा आहे, दूध संकलनाची बंदी कुणालाही घालता येत नाही. गवळी दूध गोळा करु शकतात, खाजगी संस्था, सहकारी संस्था, अमूल सारख्या खाजगी कंपन्या देखील दूध विकू शकतात. नवीन धोरणामुळे हे होऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे तेथील युनियनचे प्रमुख आहेत, त्यांना सर्व परिस्थिती माहिती आहे. आताच निवडणुका झाल्या, दोन वर्षामध्ये 12 ते 13 कोटी रुपये महानंदला फायदा मिळाला, असे चांगले काम त्या बोर्डाकडून होत आहे. या व्यवसायाला बळकटी यावी यादृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.

-----------------

...2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गर्भलिंग व प्रसवपूर्व निदान कायद्याची कठोर अंमलबजावणी होणेबाबत

**मु.शी.**: "गर्भलिंग व प्रसवपूर्व निदान कायद्याची कठोर अंमलबजावणी होणेबाबत" संबंधी सर्वश्रीमती उषाताई दराडे, फौजीया खान, मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"सन 1988 साली राज्यात गर्भलिंग व प्रसवपूर्व निदान कायदा अस्तित्वात येणे, राज्यात आतापर्यन्त गर्भलिंग निदान करणा-या 21 केंद्रांपैकी फक्त एकाच केंद्रावर शासनाने कारवाई करणे, बीड जिल्हयात गर्भलिंग परिक्षण व गर्भपाताचे प्रमाण जास्त असणे व त्यासाठी केज, अंबेजोगाई तालक्यात जास्त असणे, 1000 मुलांमागे सुमारे 800 मुली असणे, सांगली जिल्हयात 1000 मुलांमागे 800 पेक्षा कमी मुली असणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर, बीड, औरंगाबाद या भागात गर्भपाताचे प्रमाण जास्त असणे, यामुळे समाजात निर्माण झालेली अस्वस्थता व स्त्री अस्तित्वास निर्माण झालेला धोका, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----------

...3.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, सन 2003 मध्ये कायद्यामध्ये दुरुस्ती केली गेली. गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा 2003 अशा पद्धतीचा अधिनियम झाला. परंतु, अशा प्रकारचा कायदा आस्तित्वात असतांना सुध्दा राज्यामध्ये 6217 सोनाग्राफी सेंटर्सची नोंदणी करण्यात आली व आतापर्यन्त 80 सोनोग्राफी धारकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 80 प्रकरणांपैकी 22 प्रकरणी निकाल लागला असून 59 प्रकरणे प्रलंबित आहेत, अशा प्रकारचे उत्तर निवेदनात आले आहे. प्रश्न असा आहे की, ज्या प्रकरणी निकाल लागला आहे, त्यापैकी किती लोकांना शिक्षा झाली ?

सभापती महोदय, उत्तरात असेही सांगितले आहे की, गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद 2003 या कायद्याची अंमलबजावणी जिल्हास्तरांवरुन, तालुकास्तरावरुन, स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून कठोरपणे राबविण्यात येत आहे. ही अंमलबजावणी कशा पध्दतीने झाली त्याची माहिती मंत्री महोदयांनी कृपया द्यावी.

सभापती महोदय, विविध माध्यमांचा वापर झाला आहे, असे निवेदनात म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, कोणकोणत्या माध्यमांचा उपयोग करण्यात आला ?

सभापती महोदय, जिल्हावार कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. आतापर्यन्त अशा किती कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या ?

सभापती महोदय, या कायद्यांतर्गत 5 हजार रुपये दंड व शिक्षेची तरतूद आहे. दंड आणि शिक्षेची तरतूद वाढविण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, जी न्यायालयीन प्रकरणे आहेत त्यामध्ये एकही कन्व्हिक्शन झालेले नाही. 80 याचिकांपैकी 22 न्यायालयीन प्रकरणांचा निकाल लागलेला असून 58 न्यायालयीन प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. 22 निकाली लागलेल्या प्रकरणी 1 हजार रुपये दंड करुन आरोपी सुटलेले आहे. डिस्ट्रिकवाईज यादी माझ्याकडे आहे परंतु ती मोठी असल्यामुळे पटलावर ठेवते. बीड जिल्हयामध्ये 89 सोनोग्राफी सेंटर्स कार्यान्वित असून 3 सोनाग्राफी सेंटर्सविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

...4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा........

सभापती महोदय, राज्याने गर्भधारणापूर्वी आणि प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा 2003 हा कायदा केलेला आहे. दरहजार पुरुषांमागे प्रमाण 922 आहे तर 0 ते 06 वय असलेल्या मुलांमागे हे प्रमाण 913 आहे. आजच आपण लोकप्रतिनिधींसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्याचपद्धतीने पोस्टर्स, स्लाईड शो, बॅनर्स, होर्डींग, पुस्तिका याव्दारा प्रसार करण्यात येत आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा ..........

गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यानुसार कशा पद्धतीने नोंदणी केली पाहिजे, जेथे नोंदणीकृत सोनोग्राफी मशिन आहे तेथे, गर्भलिंग निदान होत नाही, अशा प्रकारचा फलक त्यांनी लावला पाहिजे, अशा प्रकारची माहिती त्यामध्ये दिलेली आहे. आपण समुचित प्राधिकारी नेमलेले आहेत त्यांच्या सुध्दा यासंदर्भात सभा होत असतात. महिला वकीलांना या कायद्याची माहिती झाली पाहिजे म्हणून आपण नागपूरमध्ये 2005 मध्ये कार्यशाळा घेतली होती. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सदस्यांना या कायद्याची माहिती झाली पाहिजे म्हणून आपण एप्रिल, 2006 मध्ये विधिमंडळामध्ये कार्यशाळा घेतली होती. आपण एक पुस्तिका काढलेली आहे. ती पुस्तीका कार्यशाळेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांना दिलेली आहे. छकुल्या-मुकुल्या नावाचे पुस्तक आपण प्रकाशीत केले होते. तालुकास्तरीय न्यायाधीश आणि सरकारी वकिलांना या कायद्याची माहिती व्हावी म्हणून आपण सोलापूर आणि धुळे जिल्हयामध्ये सप्टेंबर, 2006 मध्ये कार्यशाळा घेतलेल्या आहेत. लिगभेद करता कामा नये अशी जाहिरात आपण मुंबई शहरातील बेस्टच्या 200 बसेस आणि इतर हजारो एस.टी. बसेसवर लावलेली आहे. टी.व्ही.वर सुध्दा जाहीरात सुरु आहे. न्यायाधिशांच्या आणि सरकारी वकिलांच्या कार्यशाळा घेण्यास आपण सांगितलेले आहे. सन 2007 मध्ये आपण क्ष-किरण तज्ज्ञांच्या कार्यशाळा घेतलेल्या आहेत. जवळपास 3-4 वर्षे ॲक्टिव्हेपन अवेअरनेस कॅम्प राबविले गेले. ज्या सामाजिक संस्था पुढे येणार आहेत त्यांच्यासाठी आपण कार्यशाळा घेतलेल्या आहेत. एप्रिल, 2007 मध्ये आपण जिल्हाधिका-यांची समुचित प्राधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यामुळे आता अधिकाधिक सोनोग्राफी मशिन्सची तपासणी, त्यावर होत असलेले नियंत्रण, आता आपण कायद्यामध्ये व्हिक्टीमला जोडलेले आहे. आपण हायकोर्टाला विनंती केली आहे की, जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती लवकरात लवकर निकाली काढावी. आपल्या देशामध्ये आतापर्यंत अशा प्रकारचे एकच कन्व्हिक्शन झालेले आहे. सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छिते की, देशात महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर राज्य आहे. आज आपल्याकडे इतक्या केसेस करुन आपण काही ना काही तरी मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. हे कॅम्पेन राबवून आपण येत्या दोन-तीन वर्षात अशी अपेक्षा करु की, एक हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या अधिकाधिक होईल.

...2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा कठोरपणे राबविण्यात येत आहे." मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, स्वयंसेवी संस्था हा कायदा कठोरपणे राबविण्यासाठी कशा प्रकारे कार्यरत होऊ शकतात. अवेअरनेस वगैरे ठीक आहे. या संस्थांकडून शासनाला अजून काही अपेक्षा आहेत काय आणि त्या संस्थांना कोणते अधिकार आहेत आणि ते अधिकार त्यांना कोणी दिलेले आहेत ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, राज्यस्तरीय समितीने ज्या सामाजिक संथा, एन.जी.ओ. पुढे आलेल्या असतात त्यांना अधिकार दिलेले आहेत. गर्भवती महिलेला तेथे घेऊन जाऊन मुलगा आहे की, मुलगी आहे याची टेस्ट करावयाची असेल तर यासाठी जी एन.जी.ओ. पुढे येईल त्या एन.जी.ओ.ला आपण 15 हजार रुपयांपर्यंतचा खर्च देतो. पब्लीक ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी केलेल्या एन.जी.ओ. अधिकाधिक पुढे आल्या तर आपण अशा प्रकारच्या केसेस करु शकतो. त्यासंदर्भातील गुन्हयांची माहिती आपण जाहिरातीद्वारे, डॉक्टर्सच्या माध्यमातून किंवा जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून घेत असतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन 1988 ला आपण हा कायदा केला. माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, एकालाही शिक्षा झालेली नाही, याची कारणे शासनाने शोधली आहेत काय आणि कठोर कारवाई करण्याबाबत शासन कोणती पावले उचलणार आहे ? आज पर्यंत एकालाही शिक्षा झालेली नाही. आज पर्यंत एकही प्रकरण सापडलेले नाही अशा डॉक्टरांचे दवाखाने बंद करण्याची कारवाई होणे आवश्यक होते. परंतु ती कारवाई झालेली नाही, यासंदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. वेगवेगळया गुन्हयांच्या संदर्भात दंड आकारला जातो.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा...

मी हेच म्हटले की, एकीकडे आपण यासंदर्भात वकिलांचे वर्कशॉप घेतो. माननीय न्यायालयाला देखील आपण विनंती केलेली आहे की, याबाबत जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्या प्रकरणांच्या अंतर्गत येणाऱ्या आरोपींना रितसर शिक्षा झाली तरच या कायद्याची समाजामध्ये जरब बसेल. आणि सोनोग्राफी मशिनचा सद्या जो चुकीचा वापर केला जात आहे, त्याला आळा बसेल. तसेच या समाजात जी पुरुषप्रधान संस्कृती अजुनही सुरु आहे त्यामुळे स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान व त्यांच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते त्यामध्ये बदल होऊन स्त्रियांच्या हक्कांबद्दल एक चांगली मानसिकता या समाजामध्ये निर्माण होण्याची शक्यता आहे. हे काम आपल्याला एन.जी.ओ.च्या माध्यमातून देखील करता येईल, अथवा अशा एनजीओजची मदत होऊ शकेल.

प्रा.फौजिया खान : माननीय सभापति महोदय, 22 प्रकरणों में से बहुत कम ऐसे प्रकरण हैं जहां पर शिक्षा हुई है. इसलिए मुझे पूछना है कि क्या शासन इस संबंध में ज्यादा कठोर तरतूद करने के बारे में कोई कदम उठाएगा ? एक बात अवेअरनेस के बारे में है, मुझे पूछना है कि शासन इस बारे में क्या क्या कदम उठा रहा है. एक बात मैं कहना चाहूंगी कि डिवीजन वाइज जो लोकप्रतिनिधि हैं और एन.जी.ओ. वहां पर हैं उनको ज्यादा सेन्सिटिव बनाने के लिए सरकार कोई प्रोग्राम करने वाली है क्या ? क्योंकि लोगों की मानसिकता बदलने से ही यह काम संभव हो सकता है. एक बात मैं और पूछना चाहती हूं कि जिनको सिर्फ एक ही बेटी है और उसके बाद उन्होंने दूसरे बच्चे को जन्म नहीं दिया है तो क्या ऐसे लोगों को शासन की ओर से कोई अवार्ड या इन्सेन्टिव दिया जाएगा ?

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान यांनी विचारलेल्या न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर न्यायालयात आतापर्यंत एकूण प्रकरणांपैकी एकूण 22 प्रकारणांचा निकाल लागून त्यामधील आरोपींना प्रत्येकी 1000 रुपये दंड झालेला आहे. बाकीची 70 प्रकरणे अजुनही न्यायालयात प्रलंबित आहेत. ही माहिती मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना दिली होती. त्याचबरोबर या कायद्याच्या संदर्भात सोशन अवेअरनेस, सामाजिक जागृती निर्माण होण्यासाठी तसेच या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून सोनोग्राफी मशिन्स, एम.टी.पी केंद्रे असतील अशा ठिकाणी जी गर्भलिंग चिकित्सा केली जाते त्या ठिकाणी जो फॉर्म ठेवलेला असतो त्याफॉर्ममध्ये या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा.......

चिकित्सेबाबतचा उल्लेख नाही. मुळात तेथूनच आपल्याला या कायद्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे. वास्तविक 20 आठवडयाच्या आत गर्भपात करणे कायद्याने गुन्हा आहे परंतु या तरतूदीची अंमलबजावणी करावयाची झाल्यास अशा केंद्रांमध्ये मिळणा-या फॉर्म्समध्ये या बाबीचा अंतर्भाव केलेला नाही. म्हणून एम.टी.पी.केंद्रावर सुध्दा कशा प्रकारची काही गोष्टींमध्ये निर्बंध कसे आणता येतील तसेच आणखी काही कायदेशीर बाजू तपासून त्यामध्ये बदल करण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत. यासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींचे सुध्दा रिजनवाईज वर्कशॉप घेण्यात येत आहे. जिल्हापरिषदेचे अध्यक्ष यांची सुध्दा या संदर्भात कार्यशाळा घेतली होती. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी विचारले की, उभयतांनी एका मूलीनंतर किंवा दोन मूलीनंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेली आहे त्यांना कोणत्या प्रकारचे इन्सेन्टिव्ह शासनाकडून दिले जाते. याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, शासनाने सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत बी.पी.एल.धारक महिलेने एक अथवा दोन मुलीनंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करुन घेतलेली आहे अशा महिलेला दोन हजार रुपये रोख व आठ हजार रुपये नॅशनल क्रेडिटमध्ये त्यांच्या नावाने जमा होणार असे इन्सेन्टिव्ह या योजनेत ठेवलेले आहे. अशा प्रकारे एका मूलीनंतर शस्त्रक्रिया करणा-या जोडप्याला एकूण रुपये 10,000 रुपये बक्षीस आहे व दोन मूलीनंतर शस्त्रक्रिया करणा-या जोडप्याला ते विभागून दिले जाते.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या माध्यमातून एक अतिशय महत्वाचा प्रश्न या सभागृहामध्ये चर्चेकरिता आलेला आहे. या चर्चेला माननीय मंत्रिमहोदयांनी देखील अतिशय सविस्तरपणाने उत्तर दिलेले आहे. या ॲक्टबद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, हा ॲक्ट राज्यामध्ये सुरु आहे त्याबाबत एकच माझा प्रश्न आहे की, जे लोक गर्भपातासारखे गुन्हे करतात, ते गुन्हे दखलपात्र करण्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात येणार का?

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय सदस्य श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सांगितल्याप्रमाणे मी आताच सांगितले की, गर्भपात अधिनियमामध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे. यासंदर्भात राज्यशासनाच्या अखत्यारीमध्ये जे आहे त्यामध्ये कायदेशीर बाजू बघून निश्चितपणे तशी करण्यात येईल. जर केंद्रशासनाच्या अखत्यारीमध्ये हा नियम असेल त्याबाबत त्यांच्याकडे रेकमेंडेशन करु.

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी यावर्षी जी दिवाळीची शुभेच्छा पत्रे वाटली त्यामध्ये देखील या विषयासबंधी अतिशय चांगला भावनात्मक संदेश पाठविला होता. तसेच आताही सभागृहामध्ये त्यांनी या विषयावर चांगला प्रश्न विचारला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.गागरे.....

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले उत्तर या लक्षवेधीवरील प्रश्नांना दिलेले आहे. त्यांच्या योजनांचा प्रसार व प्रचार राज्यामध्ये चांगल्या प्रकारे चालू आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व प्रश्न विचारु इच्छितो की, हया कायद्याचे उल्लंघन करण्याऱ्याविरुध्द गुन्हा दाखल केला जातो. भविष्यात त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हा दाखल करणार आहात का ? हा माझा स्पेशिफिक प्रश्न आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सदरील कायदा केंद्र सरकारने केलेला आहे. आवश्यकता वाटल्यास त्यात बदल करण्याची शिफारस केंद्र सरकारला करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी.** : अपंग संस्थातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या.

**मु.शी.** : अपंग संस्थातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंबंधी सर्वश्री सय्यद जामा, कपिल पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सय्यद जामा (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्यायमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य अपंग संस्था शिक्षक व कर्मचारी संघटनेतर्फे वेळोवेळी अपंग शिक्षकांच्या न्याय मागण्याबाबत संबंधितांशी चर्चा होऊनही गेल्या दशकापासून त्या न सुटणे, दिनांक 24 एप्रिल, 2007 ला मुंबई येथे शिक्षक आमदार व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत शासनाने आश्वासन देऊनही प्रश्न मार्गी न लागणे, काही अपंग संस्थातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कित्येक महिन्यांचे वेतन शतप्रतिशत अनुदान मिळत असतांनाही थकीत असणे, कालब्द पदोन्नतीपासून त्यांना वंचित ठेवणे, निवृत्तीवेतन योजना लागू करणे, या व इतर अन्य मागण्यांबाबत अपंग शिखकांची होत असलेली होरपळ त्यांच्यात पसरलेला असंतोष या संबंधात शासनाने लक्ष देण्याची गरज व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्यायमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जामा : सभापती महोदय, राज्यातील अंध व अपंग संस्था शिक्षक व कर्मचारी संघटनेतर्फे वेळोवेळी अपंग शिक्षकांच्या मागण्या शासनाकडे मांडण्यात आलेल्या आहेत. योग्य बाबतीत हा प्रश्न आहे. या शिक्षकांनी याबाबत वारंवार विनंती केलेली आहे परंतु शासनाने अजूनही निर्णय घेतलेला नाही. मंत्रिमंडळासमोर त्याची मान्यता घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. याबाबत दोन वेळा बैठका झालेल्या आहेत. या बैठका होऊनही न्याय मिळाला नाही. याबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्री महोदयांनी निश्चित कालावधी सांगावा.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मान्यताप्राप्त व अनुदानप्राप्त अपंगाच्या विशेष शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत दिनांक 25 एप्रिल, 2007 रोजी बैठक घेतलेली आहे. त्यामध्ये मी त्यांना सांगितले होते की, लवकरात लवकर त्यांच्या मागण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. त्याप्रमाणे 10 मागण्या आम्ही मंत्रिमंडळासमोर प्रस्तावाच्या स्वरुपात सादर केलेल्या आहेत. त्यामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीची योजना लागू करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत, कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे, कर्मशाळेतील निदेशकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी व नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करणे, अपंगाच्या विशेष शाळेतील अंध शिक्षकांच्या विशेष वाचन भत्त्यात वाढ करणे, 75 टक्के एवढे इमारत भाडे मंजूर करणे, अनुकंपा तत्वावर नोकरी, अपंग विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक योजना, अपंग गुणवत्ता कामगार पुरस्कार, कर्मशाळा व इमारत फंड इत्यादींचा त्यामध्ये समावेश आहे.

शासकीय शाळा व अनुदानित कर्मशाळामध्ये तफावत होता कामा नये. काही अपंग संस्थांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत असलेले वेतन तसेच संस्थांना अनुज्ञेय असलेले परिपोषण, वेतनेत्तर अनुदान व इमारत भाडे यासाठी लागणारी तरतूद यासाठी 36 कोटी रुपयांची पुरवणी मागणी काल मंजूर झालेली आहे. अंध व अपंगाच्याबाबतीत शासनाचा दृष्टीकोन सहानुभूतीचा आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, अंध व अपंगांच्या शिक्षकांचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे. याबाबत मी मंत्री महोदयांना दोन स्पेशिफिक प्रश्न विचारु इच्छितो. मूक बधीर

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे.....

विद्यार्थ्यांच्या शाळांना 1998 पासून परिपोषण अनुदान मिळालेले नाही. हया शाळा 100 टक्के अनुदानावर असून मान्यताप्राप्त आहेत. यावरील खर्च 70 ते 80 टक्के आहे. ही रक्कम 1998 पासून थकीत आहे. वर्धा जिल्हयात 13 शाळांचाही हाच प्रश्न आहे. त्यामुळे परिपोषण अनुदान शासनाने एक महिन्यात द्यावे, अशी मी विनंती करतो. तसेच त्यांच्यावरील वैद्यकीय उपचारार्थ केलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीही होणे आवश्यक आहे.

..... यानंतर कु.धनश्री.

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 15:45

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे....

वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपूर्तीची बिले मंजूर करण्याचा अधिकार इतर सर्व विभागामध्ये स्थानिक अधिकाऱ्यांना आहे. या ठिकाणी मात्र ही बिले मंजुरीसाठी आयुक्ताकडे जातात . तेव्हा हा अधिकार आयुक्ताकडून काढून विभागीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची बिले मंजूर करण्याचा अधिकार देण्यात येणार काय ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे 1998 सालापासून आतापर्यंत परीपोषण आहाराच्या निधीच्या बाबतीत काय झालेले आहे ही बाब मी तपासून पाहतो. काल जवळजवळ 36 कोटी रुपयांची पुरवणी मागणी मंजूर केलेली आहे. त्यामध्ये या बाबीचा समावेश करण्यात आला आहे किंवा नाही हे तपासून घेतले जाईल . जर समावेश नसेल तर निश्चितपणे त्याबाबतीत विचार करण्यात येईल. त्याचप्रमाणे् वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या बिला संबंधीची बाब सुध्दा मी तपासून पाहतो

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, दिनांक 27 एप्रिल 2007 रोजी सन्माननीय मंत्री महोदयांबरोबर एक बैठक झाली होती. संघटनांचे पदाधिकारी, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील व आम्ही त्या बैठकीला उपस्थित होतो. त्या बैठकीमध्ये जवळजवळ , 16 गंभीर विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यात आली व त्याचे इतिवृत्त आम्हाला पाठविले. प्रत्येक विषयाच्या बाबतीत एका महिन्यात किंवा दोन महिन्यात कार्यवाही करण्यात येईल असे त्यामध्ये म्हटले आहे. माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितले की, काही विषय हे मंत्रिमंडळासमोर न्यावयाचे आहेत. त्याची यादी त्यांनी आता येथे वाचून दाखविली.

श्री.चंद्रकांत हांडोरे : सभापती महोदया, ही बाब मंत्री मंडळासमोर आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, या बाबी मंत्रिमंडळाच्या समोर आल्यानंतर त्यांना मंजुरी दिली जाईल व त्यानंतर त्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल. ज्या विषयाच्या सदर्भात मंत्रिमंडळासमोर जाण्याची आवश्यकता नाही आपल्या स्तरावर किंवा आयुक्ताच्या कार्यालयाच्या स्तरावर .ते विषय मंजूर होणारे आहेत.त्याबाबत तरी आपण लवकर निर्णय घेतला पाहिजे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, एक दोन महिन्यात त्या बाबतीत कार्यवाही करतो. 16 पैकी एकूण 9 विषय सोडले तर बाकीच्या 7 विषयाच्या संदर्भात या बैठकीच्या अनुषगाने आपल्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

कार्यालयाने कोणती कार्यवाही केली आहे.? यासंबंधीचा अहवाल आम्हाला अधिवेशन संपण्यापूर्वी देण्यात येईल काय ? सभापती महोदया, मला येथे दुसरा प्रश्न विचारावयाचा आहे की, अंध, अपंग आणि मूक, बधीर मुलांच्या ज्या शाळा आहेत, त्या शाळांकडे आपण इतरांपेक्षा वेगळया दृष्टीकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे. शासन त्यांच्यावर काही उपकार करीत नाही. या अंध, अपंग व विकलांग मुलांच्या कल्याणासाठी खास बाब म्हणून व पुरोगामी राज्य म्हणून आपण या योजना राबवत आहोत.. दिवसेंदिवस या अंध, अपंग व मूक बधीर मुलांची संख्या वाढत आहे. अशा मुलांना शाळेमध्ये प्रवेश देणे शक्य होत नाही. या मुलांना शाळेत प्रवेश द्यावयाचा असेल तर तो आपल्या हिमतीवर द्यावा, आपल्या क्षमतेवर द्यावा त्यासाठी शासन कोणतेही अनुदान देणार नाही. अशी शासनाची भूमिका आहे. म्हणून मी आपणास येथे विचारु इच्छितो की, वाढीव विद्यार्थी संख्येला शासन अनुदान तत्वावर मान्यता देणार आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, ही गोष्ट खरी आहे की, या संदर्भात 27 एप्रिल 2007 रोजी एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीच्या वेळी, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील. समाननीय सदस्य श्री. रामनाथ मोते उपस्थित होते आणि त्यांनी 16 मागण्या मांडल्या होत्या. त्यापैकी काही मागण्या इतर विभागाशी संबंधित असल्यामुळे त्याबाबत स्क्रुटिन करण्यासाठी व त्याचा अहवाल तयार करण्यासाठी वेळ लागला होता. त्यामुळे माझ्या लेव्हलवर ज्या मागण्या संबंधी निर्णय घेणे शक्य होते त्या 9 -10 मागण्या मी मंत्रिमंडळासमोर आणलेल्या आहेत. उर्वरित मागण्यांच्या संदर्भात देखील लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यईल. अंध , अपंग, मूक बधीर मुलांच्यां बाबतीत शासनाचे सहानुभूतीचे धोरण आहे. कर्तव्याच्या भावनेतून शासन त्यांच्या प्रश्नांकडे पाहील. आपण जो मुद्दा उपस्थित केला होता त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, 97 -98 सालापासून परिपोषण योजनेतील पैसे , 36 कोटी निधीमध्ये इनक्लुड आहेत.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदया, माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेतील जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना कालबध्द पदोन्नती मिळत नाही. तेव्हा शासन या शिक्षकांना कालबध्द पदोन्नती लागू करणार आहे काय ? तसेच त्यांचे पगार एक तारखेला होत नाही. नेहमी उशीरा होतात. त्यांचे पगार वेळेवर होईल काय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती दिली जाणार आहे ?



DVG/ प्रथम श्री. गागरे... 15:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, कालबध्द पदोन्नती देण्याची बाब मंत्री मंडळा समोर आहे. ती मान्य होईल तसेच जिल्हा परिषदेच्या मार्फत या शिक्षकांना दर महिन्याच्या एक तारखेला पगार मिळेल....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदया, धडधाकट मुलांना शिकविणे ही सोपी बाब आहे. परंतु ज्या मुलांना दिसत नाही. ऐकू येत नाही अशा मुलांना शिकविणे कठीण आहे. अशा शाळेमधील शिक्षकांचा 3-3, 4-4 महिने पगार होत नाही. दिवाळीच्या अगोदर नांदेड जिल्हा परिषदेसमोर या शिक्षकांना या संदर्भात उपोषण करावे लागले होते.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

श्री. विक्रम काळे ....

मी स्वत: त्या ठिकाणी गेलो, त्यांना विनंती केली. पण परिस्थितीत काही बदल नाही. ही परिस्थिती एकीकडे आहे. म्हणून या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, भविष्य काळामध्ये वर्षभरात या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी म्हणून जो काही निधी लागणार आहे त्याची तरतूद अगोदरच करून दर महिन्याच्या 1 तारखेला, नाही तर किमान 10 तारखेच्या आत तरी आपण या शिक्षकांचे पगार करणार काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आज सकाळपासून शिक्षकांना पगार न मिळणे या विषयावरील जवळपास 17-18 प्रश्न या सदनामध्ये आलेले आहेत. मला हे कळत नाही की, या राज्यामध्ये मुसलमानांना काही द्यायचे म्हटले की, अगदी हिरीरीने पैसे देणारे आमचे मुख्यमंत्री या शिक्षकांचे पगार का वेळेवर देत नाहीत.

तालिका सभापती : यामध्ये हरकतीचा मुद्दा काहीही नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदया, माझा आणखी एक प्रश्न आहे, ज्याप्रमाणे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांसाठी शाळा संहिता आहे, ज्याला एसएस कोड असेही म्हटले जाते. तसे या विशेष शाळा आहेत त्यांच्यासाठी, मग त्या अपंगांच्या शाळा असतील वा अंध, मूक-बधीरांच्या शाळा असतील, त्यांच्या शाळांसाठी शाळा संहिता तयार केलेली आहे काय ? नसल्यास, किती दिवसात आपण ती तयार करणार आहात ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, अशा शाळांनाही शाळ संहिता असली पाहिजे. तेव्हा याबद्दल माहिती मी घेतो, मात्र त्याबाबत काम चालू आहे अशी माझी माहिती आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : माननीय सभापति महोदय, गडचिरोली तथा चंद्रपुर में समाज कल्याण अधिकारी अपना मनमानी कारभार चला रहे हैं. मुझे पूछना है कि यहां का कारभार अधिकारी चला रहे हैं या मंत्री महोदय चला रहे हैं. वहां के समाज कल्याण अधिकारी सरकार को गलत रिपोर्ट देकर वहां की अपंग संस्थाओं को बंद करा रहे हैं. वहां के समाज कल्याण अधिकारियों की बदली होने के बाद भी, बिना किसी लिखित आर्डर के उनकी बदली रोक दी जाती है. मुझे पूछना है कि इन सब बातों को रोकने के लिए क्या शासन कुछ आवश्यक कार्रवाई करेगा ?

...... 3एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, असे कोणी जाणून बुजून एखादा अधिकारी करीत असेल तर निश्चितपणे ते तपासून घेतले जाईल आणि तो चुकत असेल तर त्याचेवर कडक कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, हा अत्यंत नाजूक प्रश्न आहे. समाजातील एक दुर्लक्षित घटकाविषयीचा हा प्रश्न आहे. अंध, अपंग, मूक-बधीर, मतिमंद असे अनेक लोक आज समाजापासून दूर राहिले आहेत. त्यांना हे व्यंग जन्मत:च मिळाले आहे आणि म्हणूनच त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ सहानुभूतीचा न राहता त्यांना कर्तव्य भावनेतून मदत केलीच पाहिजे. आता जो प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी येथे उपस्थित केला आहे की, या अपंगांच्या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनासाठी किंवा त्यांच्या मुलांसाठी अधिक खर्च होत असेल तर त्यासाठीचा निधी या वेळच्या पुरवणी मागण्यांमध्ये का समाविष्ट आपण केला नाही आणि या शाळांना उपलब्ध करून दिला नाही ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, या वेळच्या पुरवणी मागण्यांमध्ये या शिक्षकांच्या वेतनासाठीचे तसेच पूरकपोषण आहारासाठीचे पैसे आपण मागितले आहेत. हा जो समाजातील घटक आहे, मग तो अपंग असेल, मूक-बधीर असेल, अंध असेल, समाजाने त्यांच्या बाबतीत पाहण्याचा दृष्टिकोन हा अतिशय डोळस असाच असला पाहिजे. त्या दृष्टिकोनातून गेल्या 2-3 वर्षामध्ये माझ्याकडे जेव्हा हा विभाग आला आहे तेव्हा पासूनच मी लक्ष घातले आहे. मग ते आपल्या विरारचे प्रशिक्षण केंद्र असेल ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे...

सभापती महोदया, मी याबाबतीत कालच्या पुरवणी मागण्यांमध्ये परिपोषण आहाराकरिता तरतूद केली आहे. तसेच, शिक्षकांना भविष्यात वेतनापासून वंचित ठेवले जाणार नाही. पुरवणी मागण्यातील बाब क्रमांक 199 मध्ये ही तरतूद केली आहे. तरीसुध्दा याबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

----

## लक्षवेधी सूचनेसंबंधी

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, क्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्यात आली. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी दूध प्रकल्प चालू असल्याचे सांगितले. कालच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील आठव्या क्रमांकावरील प्रश्नाला उत्तर देतांना मिरज येथील दूध प्रकल्प बंद असल्याचे सांगितले. तेव्हा दोन्ही उत्तरामध्ये विसंगती असून या दोन्ही प्रती मी आपणाजवळ पाठवीत आहे. यासंबंधी संबंधित मंत्रिमहोदयांकडून खुलासा होणे आवश्यक आहे. नाही तर यासंबंधी मला मंत्रिमहोदयांविरुध्द विशेष हक्कभंगाची नोटिस द्यावी लागेल.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सदरहू लक्षवेधी सूचनेच्या वेळीच जर दोन्ही उत्तरामधील फरक आपण लक्षात आणून दिला असता तर ही बाब संबंधित मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देता आली असती. तरीसुध्दा संबंधित दुग्ध विकास मंत्र्यांनी यासंबंधी खुलासा करावा.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

पृ.शी. : अध्यापक विद्यालयांसाठी स्वतंत्र कायदा करणे

मु.शी. : अध्यापक विद्यालयांसाठी स्वतंत्र कायदा करणे याबाबत
श्री. जी. एल. ऐनापूरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जी. एल. ऐनापूरे, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जी. एल. ऐनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रातील अध्यापक विद्यालयांच्या बाबतीत वेळोवेळी खूप बदल झाले. एन.सी.टी.ई. च्या आदेशानंतर पूर्ण फारकत झाली 10 वी च्या ऐवजी 12 वी नंतर प्रवेश अभ्यासक्रम बदलला. प्रात्यक्षिक कार्य बदलले आणि अध्यापकांची शैक्षणिक पात्रता बदलली. पूर्वी बी.ए.बी.एड. शिक्षक होते, आता एम.ए.एम.एड. शिक्षक आहेत अशाप्रकारचे अनेक बदल झाले.माध्यमिक विद्यालयांपासून ही अध्यापक विद्यालये वेगळी करण्यात आली असली तरी कोणताही कायदा अजूनपर्यंत वेगळा झालेला नाही. फक्त वेळोवेळी जी.आर. आणि परिपत्रके निघाली आहेत. ट्रेंनिंग कॉलेज हे अध्यापक विद्यालयाचे प्रशासन झाले आहे. त्यामुळे अध्यापक विद्यालयाचे खरे मालक कोण आणि प्रशासक कोण हे कळत नाही. त्यामुळे "ना घर का ना घाटका" अशी अध्यापक विद्यालयांची अवस्था झाली आहे. याकरिता अध्यापक विद्यालयाच्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन करण्याची पध्दत आणि शिक्षकांची वेतनश्रेणी याबाबत वेगळा कायदा करण्याची गरज आहे असे शासनाने वेळोवेळी आश्वासन दिले होते. अनेक वेळा शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळांनी भेटून सुध्दा याबाबत अजूनपर्यंत कार्यवाही झाली नाही ही बाब गंभीर आहे. याकरिता अध्यापक विद्यालयांकरिता स्वतंत्र कोड, कायदा करण्याबाबत शासनाकडे अनेक वेळा प्रस्ताव दिला आहे, त्यावर अजून कार्यवाही झाली नाही. याकरिता माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी गंभीरपणे व तातडीने लक्ष द्यावे याकरिता मी याठिकाणी विशेष उल्लेखाची सूचना सादर करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या संदर्भात अनेक वेळा बैठका झ ालेल्या आहेत. शासनाने देखील काही बाबी तत्वत: मान्य केल्या आहेत. त्या संदर्भात निश्चितपणे तातडीने कारवाई केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : दक्षिण सोलापूर तालुक्यातील 46 गावांना उजनीच्या पाण्याचे समान वाटप न होणे

मु.शी. : दक्षिण सोलापूर तालुक्यातील 46 गावांना उजनीच्या पाण्याचे समान वाटप न होणे याबाबत श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदया, दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी भागातील 46 गावांपैकी उळे, उळेवाडी, गंगेवाडी, कासेगाव, वडजी, वरळेगाव, बक्षीहिपरगे, मुळेगाव, दोडडी, मुळेगाव, तांडा, बोरामणी, संगदरी, तांदूळवाडी, पिंजारवाडी, मुस्ती, दर्गहळ्ळी या 14 गावांना उजनीचे पाणी मिळत नसल्याने तेथील शेतकरी सतत 12 वर्षे संघर्ष करीत असूनही त्यांचा प्रस्ताव जाणीवपूर्वक बाजूला ठेवला जात आहे. बोरामणीतील 46 गावांमध्ये उजनीच्या पाण्याचे समान वाटप होत नसल्याने तेथील शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष व चिडीची निर्माण झालेली भावना लक्षात घेता, शासनाने तातडीची कार्यवाही व उपाय योजना करावी. याकरिता विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधीत आहे".

--

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोटे परशुराम (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रासायनिक प्रक्रिया उद्योगांमुळे पाणी पिण्यास अयोग्य झाल्यामुळे जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका

**मु. शी.** : लोटे परशुराम (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रासायनिक प्रक्रिया उद्योगांमुळे पाणी पिण्यास अयोग्य झाल्यामुळे जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"लोटे परशुराम (ता.खेड, जि. रत्नागिरी) येथे गत दहा वर्षापूर्वी केमिकल झोन जाहीर करुन शासनाच्या परवानगीने रासायनिक प्रक्रिया करणारे औद्योगिक प्रकल्प या परिसरात सुरु केले परंतु कारखाने सुरु करतेवेळी रासायनिक पाणी व रासायनिक कचरा यावर प्रक्रिया न करता तसेच जमिनीत मुरु दिले त्याचा परिणाम म्हणजे दहा वर्षानंतर लोटे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत तसेच विंधन विहिरी यामध्ये पिवळसर रंगाचे पाणी येऊन ते पिण्यास अयोग्य असे झाले. परिसरातील जनतेस याची सुरुवातीस कल्पना नसल्याने सदरचे पिण्यास अयोग्य असे पाणी पिऊन हजारो जनावरे दगावली. तर आजमितीस किमान 200 लोक कॅन्सर या दुर्धर रोगाने आजारी असून शेवटच्या घटका मोजत आहेत. सदरची बाब वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून देऊनही शासनाच्या उदासीन धोरणामुळे व दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीमुळे परिसरातील जनतेमध्ये घबराट निर्माण होऊन शासनाबद्दल तीव्र संतापाची लाट निर्माण झालेली आहे. सदरची बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे."

-----

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा 58 वर्षावरुन 62 वर्षे करणे

**मु. शी.** : राज्यातील कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा 58 वर्षावरुन 62 वर्षे करणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी 58 वर्ष अशी सेवानिवृत्तीची वयोमर्यादा आहे. केंद्र शासनाने दि. 31 ऑक्टोबर, 2003 च्या आदेशान्वये राज्य कृषी विद्यापीठ व मध्यवर्ती कृषी विद्यापीठ इम्फाळ, मणिपूर येथील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीची वयोमर्यादा 62 वर्षे करण्यात आली आहे व राज्यातील पारंपारिक (बिगरकृषी) विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा 58 वर्षावरुन 62 वर्षे करण्यात यावी अशी मागणी राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील विविध प्राध्यापक संघटना सातत्याने शासनाकडे करीत असणे, म्हणून शासनाने निर्णय घेतला व दिनांक 31 ऑक्टोबर, 2007 च्या आदेशान्वये राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती वयोमर्यादा 58 वर्षाखेरीज 60 वर्षे करण्यात आली परंतु याच चारही विद्यापीठात सुरु व संलग्न असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ यांची सेवानिवृत्तीची वयोमर्यादा 58 वर्षाऐवजी 60 वर्षे करण्याचा निर्णय घेऊनही शासन आदेशात पशुवैद्यकीयचा उल्लेख नसल्यामुळे सर्व प्राध्यापक, शास्त्रज्ञांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपायोजना."

-----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील मौजे आरेवाडी येथील श्री. शिरोबा देवस्थानास तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन या क्षेत्राचा विकास करण्यासाठी कमीत कमी 2 कोटी निधी त्वरित देण्याबाबत

**मु. शी.** : सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील मौजे आरेवाडी येथील श्री. शिरोबा देवस्थानास तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन या क्षेत्राचा विकास करण्यासाठी कमीत कमी 2 कोटी निधी त्वरित देण्याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील मौजे आरेवाडी येथील श्री. शिरोबा देवस्थान हे तमाम महाराष्ट्रातील धनगर समाजाचे प्रमुख दैवत असून यात्रेनिमित्त या ठिकाणी लाखो भाविक जमा होत असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अमावस्येला या ठिकाणी यात्रा भरत असून या दिवशी 25 हजार ते 30 हजार भाविक या ठिकाणी जमा होत असतात. परंतु गेली अनेक वर्षे मागणी करुन सुध्दा सर्व नागरी सुविधांपासून वंचित आहेत. या ठिकाणी यापूर्वी माननीय उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री यांनी वारंवार भेट देऊन तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन जास्तीत जास्त विकास निधी देण्याची घोषणा केली. परंतु अद्याप त्याची अंमलबजावणी केली नाही. तरी शासनाने या श्री. शिरोबा देवस्थानास तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन या क्षेत्राचा विकास करण्यासाठी कमीत कमी 2 कोटी रुपये निधी त्वरित देण्यात यावा तसेच विकास आराखडा मंजूर करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्राचा चरित्रग्रंथ प्रकाशित करण्याबाबत

**मु. शी.** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायचित्राचा चरित्रग्रंथ प्रकाशित करण्याबाबत श्री. विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्य शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या दुर्मिळ छायाचित्रांच्या चरित्रग्रंथाचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती यांच्या मार्गदर्शनाखाली 3 डिसेंबर, 1996 रोजी हाती घेतले होते. या फोटो अल्बम समितीमध्ये अनेक मान्यवर फोटो संग्राहक, छायाचित्रकार व जे. जे. कला महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा समावेश होता. सदर समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकराची काही छायाचित्रे संग्रहित केली होती. परंतु शासनाने दिल्लीला जाण्यासाठी खर्चाला परवानगी न दिल्यामुळे अधिकची छायाचित्रे मिळू शकली नाहीत. त्यामुळे समितीने 464 छायाचित्रे असलेल्या ग्रंथांची डमी तयार करुन 1999 साली शासकीय मुद्रणालयात छपाईसाठी पाठविली. त्यामुळे सदर चरित्रग्रंथाचे काम अकरा वर्षे उलटून गेली तरीही पूर्ण झालेले नाही. सदर बाब मी या सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो व शासनाला या विशेष उल्लेखाच्या मार्फत विनंती करतो की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्राच्या चरित्रग्रंथाचे काम त्वरित हाती घेऊन तो प्रकाशित होण्यासाठी प्रयत्न करावेत."

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्रांची फोटोबायोग्राफी तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्या समितीमध्ये श्री. केवलदास बनसोड सारख्या नामवंत आणि राष्ट्रीय पुरस्काप्राप्त व्यक्तींचा समावेश आहे. या समितीने प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दुर्मिळ अशी छायाचित्रे गोळा केली. गावोगावी फिरुन ही छायाचित्रे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे..)

गोळा करण्यात आली. लोकांनी आपल्या घरामध्ये जपून ठेवलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो या समितीने मिळविले. असे 464 फोटो जमा केले. त्यामध् चार-पाच वर्षे गेली. 1999मध्ये श्री. रा.सू.गवई यांच्या मागणीखातर ती फोटोबायोग्राफी प्रिंटींगसाठी पाठविली. मुद्दा हा आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दुर्मिळ फोटो संकलित करण्यासाठी या समितीने दिल्लीला जाण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली. परंतु ती परवानगी शासनाने दिली नाही. सभापती महोदय, ही फोटोबायोग्राफी प्रकाशित करण्याचा निर्णय शिवसेना-भाजप युतीने घेतला म्हणून ते करावयाचे नसेल तर ते एक वेळ समजण्यासारखे आहे. परंतु हा आघाडी सरकारनेच घेतलेला निर्णय आहे. हे आघाडी सरकार डॉ. बाबासाहेबांचे नाव घेऊन सत्तेवर येते आणि करीत मात्र काही नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या फोटोबायोग्राफीचे प्रकाशन लवकरात लवकर व्हावे हा माझा उद्देश आहे आणि त्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. सभापती महोदय, मी या सदनामध्ये अनेक विशेष उल्लेख मांडले परंतु त्या विशेष उल्लेखांचे ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:10

श्री.विनोद तावडे........

उत्तर मला कधी आलेच नाही. सन्माननीय मंत्री प्रा.वसंत पुर्के याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत विनंती करतो, यासंबंधी कालबध्द कार्यक्रम सांगावा. हे फोटो खराब होतील, सरकारी खात्यामध्ये ज्याठिकाणी हे फोटो आहेत ते लोकांनी दिलेले दुर्मिळ फोटो असल्यामुळे अमूक दिवसाच्या आत फोटोबायोग्राफी आम्ही प्रकाशित करु एवढे शासनाने सांगावे अशी मी मागणी करतो.

प्रा.वसंत पुर्के : याची निश्चित गांभीर्याने दखल घेण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्रीमती उषाताई दराडे) : शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, लवकरात लवकर या विषयाचा निर्णय शासनाच्यावतीने घेतला जावा.

श्री.मधुकर चव्हाण : मी चार वर्षे या सभागृहात गांभीर्याने 130 विषयावर विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या आहेत. एका महिन्यात उत्तर आलेच नाही. गांभीर्याने काहीच घेतले जात नाही. काल पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देत असताना मंत्रीमहोदय आपापसात अक्षरश: टपल्या मारण्याचे काम करीत होते. शासनाच्या वतीने हे सांगितले पाहिजे, एका महिन्याच्या आत दिल्लीहून फोटो आणू आणि 6 डिसेंबरला फोटोबायोग्राफी प्रकाशित करु.

श्री.विनोद तावडे : मुसलमानांबाबत काही निर्णय घ्यायचा असेल तर लगेच घोषणा केल्या जातात. ठोसपणे सांगावे, 6 डिसेंबरला फोटोबायोग्राफी प्रसिध्द करु. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊनच आपण सभागृहात बसलेले आहात.

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदय, या विषयाच्या संदर्भात पुढील अधिवेशनात हा विषय पुन्हा चर्चेला येणार नाही अशा पध्दतीने शासनाने निर्णय घ्यावा अशी सूचना देण्यात येत आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशी राज्यात लागू करणे.

**मु. शी.** : राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशी राज्यात लागू करणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** (श्रीमती उषाताई दराडे) : मा□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"1961 चा मुंबई पोलीस कायदा बदलण्यासाठी राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशी 31 डिसेंबर, 2006 पर्यंत लागू करा असे सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना दि.22.9.2006 रोजी दिलेले आदेश, मात्र एक वर्ष उलटून गेले असतानाही महाराष्ट्र शासनाने याबाबत कोणताही ठोस निर्णय न घेणे, उलट या शिफारशींना आक्षेप घेत शासन सर्वोच्च न्यायालयात गेले, परिणामी शासनाच्या या निर्णयाबाबत जनतेमध्ये गेलेला चुकीचा संदेश, न्यायालयाने जनहितार्थ दिलेले आदेश शासन पाळत नाही अशी जनतेमध्ये उमटलेली तीव्र प्रतिक्रिया. मात्र याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये पसरलेली अविश्वासाची भावना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करुन आयोगाच्या शिफारशी राज्यात लागू करण्याबाबत शासनाची कोणती अडचण आहे व राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशी का लागू करीत नाही याबाबत राज्य शासनाने तात्काळ निवेदन करावे, ही विनंती."

माननीय सभापती महोदया, 1961 चा मुंबई पोलीस कायदा बदलण्यासाठी राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशी 31 डिसेंबर, 2006 पर्यंत लागू कराव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना 22.9.2006 रोजी आदेश दिले आहेत. त्या निर्णयामध्ये 7 शिफारशी केल्या असून राष्ट्रीय सुरक्षा आयोगाची स्थापना, राज्य सुरक्षा आयोगाची स्थापना, तीन वरिष्ठ पोलीस अधीक्षकांपासून पोलीस महानिरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा कार्यकाळ किमान दोन वर्षांचा राहिल, पोलीस अधिकाऱ्यांचा कार्यकाळ निश्चित करणे, ठाणे प्रभारी निरीक्षक ते पोलीस महानिरीक्षकांचा कार्यकाळ किमान दोन वर्षांचा राहिल, कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रकटीकरण या

..3..





श्री.दिवाकर रावते.........

दोन स्वतंत्र शाखा त्वरित निर्माण करणे, पोलीस आस्थापना मंडळाची निर्मिती व पोलीस तक्रारी प्राधिकरणाची स्थापना या शिफारशी अंमलात आणाव्यात अशा प्रकारचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले असून महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत कोणताही ठोस निर्णय याबाबत घेतलेला नाही. उलट या शिफारशींना आक्षेप घेत महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील केले आहे. परिणामी शासनाच्या या निर्णयाबाबत जनतेमध्ये चुकीचा संदेश गेला असून न्यायालयाने जनहितार्थ दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याने जनतेमध्ये उलट प्रक्रिया निर्माण झाली आहे. त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, जनतेमध्ये सुरक्षेबाबत पोलिसांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या सूचनेच्या अंतर्गत जी शाश्वती मिळणार आहे त्याबाबत शासन दुर्लक्ष करीत असून शासनाने याची ताबडतोब अंमलबजावणी करावी किंवा त्या संदर्भातील आपले म्हणणे त्वरित सदनाच्या माध्यमातून जाहीर करावे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मुसलमानांच्या संदर्भात हे राज्य प्रथम अंमलबजावणी करते अशी शेखी मिरवणाऱ्या सरकारला शिफारशींची अंमलबजावणी करणारे हे देशातील पहिले राज्य असावे, अशा प्रकारे आपले वर्तन करावे असे मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून म्हणणे मांडत आहे.धन्यवाद.

----------

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी रॉकेल एजन्सीच्या नोकराकडून पैसे हिसकावून घेणे.

**मु. शी.** : जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी रॉकेल एजन्सीच्या नोकराकडून पैसे हिसकावून घेणे याबाबत श्री. सुरेश जेथलिया वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी एक विशेष उल्लेखाची सूचनाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुरेश जेथलिया ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मंठा (जि.जालना) येथील मि.वि.क.जे. केरोसिन एजन्सी येथे दिनांक 23.11.2007 रोजी मि.द्वारपोच सेवा योजनेअंतर्गत केरोसिन वाटप करीत असतांना तेथे जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना येऊन त्यांनी केरोसिनचे 20684 रुपये बळजबरीने नोकराकडून हिरावून घे्तले व त्याला मारहाण केली. व उध्दपटपणे शिवीगाळ करुन निघून गेले याबाबत जिल्हासधिकारी, जालना यांच्याकडे तक्रार करुनही यासंदर्भात कोणीही कारवाई झालेली नाही. अशा प्रकारे एका अधिका-याने स्वत: जाऊन एजन्सीच्या नोकराकडून पैस हिसकावून घेणे ही गंभीर बाब आहे . तरी याबाबत तात्काळ चौकशी करुन यावर निवेदन करावे, ही विनंती.

मंठा (जि.जालना) या ठिकाणी एका एजन्सीवर 23.11.2007 रोजी द्वारपोच योजनेअंतर्गत केरोसिन वाटप करीत असतांना तेथील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील कर्मचारी , जिल्हा पुरवठा अधिका-याचे नाव सांगून किंवा मी जिल्हा पुरवठा अधिकारी आहे असे सांगून गाडी खाली करण्यासाठी गेले होते त्यांनी जालना येथून 20684 रुपये बळजबरीने नोकराकडून हिसकावून घेतले व त्याला मारहाण करुन उध्दटपणे शिवीगाळ करुन निघून गेले. याबाबत जिल्हाधिकारी जालना यांना तक्रार करुनही यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही. एजन्सीच्या नोकराकडून पैसे हिसकावून घेणे ही गंभीर बाब आहे. याबाबत तात्काळ चौकशी करुन शासनाने निवेदन करावे अशी विनंती करतो.

----------

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अमरावती जिल्हयातील कौंडिण्यपूरला तीर्थस्थळाचा दर्जा देणे.

**मु. शी.** :अमरावती जिल्हयातील कौंडिण्यपूरला तीर्थस्थळाचा दर्जा देणे याबाबत श्री.उल्हास पवार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. उल्हास पवार ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"अमरावती जिल्ह्यातील कौडिण्यपूर हे तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत समाविष्ट करून हजारो वर्षांची परंपरा व इतिहास असलेलया पूज्य रुक्मिणी मातेच्या माहेर असलेल्या या क्षेत्राचा त्वरित विकास करण्याचा निर्णय घेऊन वारकरी, भजन संप्रदायातील भक्तांना दिलासा द्यावा, दरवर्षी आषाढी वारीमध्ये या ठिकाणी पायी दिंडी पंढरपूरकडे जाते. ह्याही घटनेला 410 वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला आहे. हे जसे रुक्मिणीचे माहेर आहे, तद्वतच अंबरीष ऋषींचे पुत्र कौंडिण्य यांचे नाव या नगरीला आहे. प्रभू रामचंद्राची आजी राजा दशरथची आई इंदूमती, नलरजाची राणी दमयंती, अगस्ती ऋषींची पत्नी लोपभुद्रा, भागीरथ राजाची माता केशनी या पंच सतींचे माहेर तसेच नाथसंप्रदायातील चौरंगीनाथ यांचे जन्मस्थळ सुद्धा व नाथांची समाधीसुद्धा याच ठिकाणी आहे. अलिकडील काळात व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व ह.भ.प.अच्युत महाराजांनी या तीर्थस्थळी आपल्या आयुष्याचा बराचसा भाग कारण लावला आहे. दहिहंडी काल्याची यात्राही या ठिकाणी होते. तरी शासनाने त्वरित विकासाचा निर्णय घ्यावा."

....4



SGJ/ MMP/ प्रथम श्री. भोगले 16:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

सभापती महोदय, मी या विशेष उल्लेखाद्वारे विदर्भ भूमितील कौंडिण्यपूर या नगरीला तीर्थक्षेत्राचा दर्जा द्यावा म्हणून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. कौंडिण्यपूर हे पुरातन शहर आहे. अंबरीष ऋषींचे पुत्र कौंडिण्य यांच्या नावाने ही नगरी या ठिकाणी वसलेली आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे हे शहर रुक्मिणीचे माहेर आहे. या ठिकाणी नल-दमयंतीचा सुध्दा इतिहास आहे. स्कंद पुराणामध्ये, मार्कंड पुराणामध्ये या नगरीचा उल्लेख आहे. कौंडिण्यपूरातून पंढरपूरला पायी दिंडी जाते. यास 410 वर्षापेक्षा अधिक इतिहास आहे. त्रिपुरी पोर्णिमेच्या तिस-या दिवशी दही-हंडी काला आणि किर्तनाची फार मोठी यात्रा कौंडिण्यपूर मध्ये भरते. या ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहण्याची संधी परवा मला मिळाली होती. तेथील पुरातन, आध्यात्मिक, सांस्कृतिक ,ऐतिहासिक केंद्र उपेक्षित राहिलेले आहे हे मला या ठिकाणी अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते. खरे म्हणजे रुक्मिणीचे माहेर असलेले कौंडिण्यपूर ही नगरी, ज्या ठिकाणी श्रीकृष्णाने रुक्मिणीचे पाणीग्रहण केले, रुक्मिणीने लिहिलेले संस्कृतमधील जागतिक किर्तीचे प्रेमपत्र, ज्यामध्ये आध्यात्म आणि प्रेम आहे असे ऐतिहासीक प्रेमपत्र याच नगरीमध्ये लिहिलेले आहे. अलिकडच्या काळामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज, आणि आता हरिभक्त परायण श्री अच्युत महाराज यांचा फार मोठा प्रवचनाचा, किर्तनाचा, अध्यात्मिक प्रवचनाचा आणि प्रबोधनाचा काळ या तीर्थक्षेत्रात गेलेला आहे. छोटया गावातील एका टेकडीवर हे मंदीर आहे. या मदिराची अवस्था आणि मंदिराचा परिसर आणि त्या गावाकडे जाणारे रस्ते यांची दुर्दशा झालेली आहे. त्यामुळे या सर्व सुखसोयी आपण इतर तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता लागू केलेल्या आहेत त्या या नगरीला लागू कराव्यात अशी माझी शासनाला कळकळीची विनंती आहे. कारण 410 वर्षापासून या ठिकाणावरुन पायी दिंडी निघते आणि फार मोठी काल्याची आणि दहीहंडीची यात्रा या ठिकाणी भरते. या परिसरातील असंख्य लोक प्रसाद, मुरमुरे, लाहया, दही एकत्र करतात . ज्या दहीहंडीची आपण आज चर्चा करतो तेव्हाचे ते चित्र त्या ठिकाणच्या जनतेने आपल्या समोर आणून दिलेले आहे. या ठिकाणी सर्व प्रसादाचा एकत्र काला केला जातो, दहीहंडी फोडली जाते व सर्वांना प्रसादाचे वाटप केले जाते. यामध्ये जाती-पंथ-

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

भेद काही न  पाळता या ठिकाणी अनेक वर्षापासून यात्रा सुरु आहे. मी या विषयाच्या संबंधी दुसरा संदर्भ देऊ इच्छितो.  पांडुरंग रुक्मिणीला भेटण्यासाठी कौंडिण्यपूरात येतात, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राचे भावनिक नाते हे पुरातन काळापासूनचे आहे. त्यामुळे भावना,श्रध्दा,संस्कृती,पर्यटन या सर्व दृष्टीने शासनाने कौंडिण्यपूराचा तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत समावेश करुन विकासाच्या योजना मार्गी लावाव्यात.

यानंतर श्री. अजित.......

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...........

सन्माननीय मंत्री महोदय श्री.वसंत पुरके याठिकाणी उपस्थित आहेत. ते स्वत: अध्यात्मिक आहेत, संत वाङमयाचे गाढे अभ्यासक आहेत, उत्तम अभंग म्हणतात, उत्तम गवळणी गातात आणि उत्तम प्रवचन पध्दतीने भाषण करतात विशेष म्हणजे ते विदर्भातील आहेत. सभापती महोदया, तीर्थ विकास योजनेंतर्गत कौंडिण्यपूरचा विकास करावा अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. मी शासनाचे अभिनंदन करतो कारण माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी पंढरपूर, देहू, आळंदी, तुळजापूर व शेगाव इत्यादी भागांचा तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत विकास केलेला आहे. यामध्ये अनेक तीर्थक्षेत्रांची भर पडलेली आहे. तेव्हा या कौंडिण्यपूरचा त्यामध्ये समावेश करावा. तसेच तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळ अशा दुहेरी अर्थाने कसा विकास करता येईल हे पाहिले पाहिजे. भक्तांच्या सुखसोयी, तेथील रस्ते, पाण्याची सोय, आरोग्याची सोय कशी करता येईल यादृष्टीन शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. याबाबत शासनाची काय भूमिका आहे हे सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.वसंत पुरके यांनी सांगावे.

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )**: आता सभागृहाची बैठक 25 मिनिटांकरिता मध्यंतरासाठी स्थगित होईल.

( दुपारी 4.21 ते 4.45 मध्यंतर )

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती, श्रीमती उषाताई दराडे )**

**पृ.शी./मु.शी.** : सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : आता आपण सन 2007-2008 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करुया.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, सभागृहामध्ये काही विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवरील चर्चेस माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्र्यांच्या विभागाने सुरुवात होणार आहे. ते याठिकाणी उपस्थित आहेत. परंतु अन्य विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. काल पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी अशीच परिस्थिती होती, त्यावेळी आपणांस दोनवेळा सभागृह स्थगित करावे लागले होते. काल यासंदर्भात सूचना देऊनही मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित राहत नाही, हे योग्य नाही. पुरवणी मागण्या अतिशय महत्वाच्या असून त्या सरकारला मंजूर करुन घ्यावयाच्या असतात, असे असतानाही मंत्रिमहोदय उपस्थित राहिलेले नाहीत. उद्या आपण विनियोजन विधेयक मांडणार आहात. काल रात्री आम्ही 11.30 वाजेर्यंत सभागृहात थांबलो, हा काय प्रकार चालला आहे ? याठिकाणी सर्वच विभागाचे मंत्री उपस्थित राहणे आवश्यक असून यासाठी आपण 10 मिनिटांकरिता सभागृह स्थगित करावे व माननीय मंत्रिमहोदयांना बोलावून घ्यावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी 10 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4.49 वाजता, 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

-------

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

<u>धान्य घोटाळयाबाबत संबंधित मंत्र्यांनी करावयाच्या निवेदनाबाबत</u>

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. गेल्या अधिवेशनामध्ये धान्य घोटाळयाबाबत चर्चा झाली होती. या चर्चेमध्ये आपण मंत्र्यांना निदेश दिले होते. त्यानंतर विशेष उल्लेखाव्दारा देखील मी हा मुद्दा उपस्थित केला होता. आश्वासन देऊनही अद्याप त्या महसूल कर्मचा-यांना निलंबित केलेले नाही. याबाबत सोमवारी निवेदन करण्यास सांगितले होते. आज बुधवार आहे. तथापि, निवेदन करण्यात आलेले नाही. मंत्री महोदय यासंबंधी निवेदन करणार की नाही ?

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गंभीर आहे. काल सभापतींनी निर्देश दिले त्याची अंमलबजावणी होत नाही. हा काय प्रकार चालला आहे.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उद्या यासंदर्भात निवेदन करावे.

श्री.गिरीष गांधी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला अशी माहिती मिळाली की, विधानसभेचे अधिवेशन सुरु होते. परंतु विधानसभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. त्या मागचे कारण असे आहे की, मस्टरवर खोटया सहया केल्याचा आरोप केला गेला. आपल्याही सभागृहासंदर्भात आम्ही तशी बातमी वाचली. त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जाणून घेण्याची सर्व सन्मानीय सदस्यांची इच्छा आहे. कारण यामध्ये सर्व आमदारांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. सभागृहाचे नेते सभागृहामध्ये उपस्थित आहेत, यासंदर्भात त्यांनी सभागृहाला माहिती द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा माननीय सभापती महोदयांच्या अखत्यारितील प्रश्न आहे. वर्तमानपत्रामध्ये मी सुध्दा वाचले की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांसाठी उपस्थितीबाबत मस्टर ठेवले जाते. जे सन्माननीय सदस्य हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत अशा आमदारांच्या मस्टरवर सहया करुन ते आमदार हजर आहेत असे दाखविलेले आहे. जे सिरीयस आजारी आहेत त्यांच्या लेटर हेडवर सहया घेतल्या जातात आणि आपल्या मतदार संघात आमदार फंडातील रक्कम खर्च केली जाते. जे आमदार ॲडमिट आहेत, त्यांच्यावर हा अन्याय आहे. सभापती महोदय, आपण यासंदर्भात योग्य निदेश दिले पाहिजेत. याची चौकशी झाली पाहिजे. खोटया सहया करुन आमदार फंडातील रक्कम वापरली जात असेल तर त्याची सी.आय.डी. मार्फत चौकशी केली जाईल. ही गोष्ट सभागृहाच्या बाहेरची आहे. ज्यांनी खोटया सहयांचा वापर करुन आपल्या मतदारसंघात कामे करुन घेतलेली आहेत त्यांना आम्ही तुरुंगात घालण्यास मागे पुढे पाहणार नाही. सदस्यांसाठी येथे मस्टर ठेवले जाते त्यावर खोटया सहया केल्या जातात त्यासंदर्भात आपण निदेश द्यावेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा विषय दोन वेळा उपस्थित झाला होता. कामकाज सल्लागार समितीमध्ये या विषयावर साधकबाधक चर्चा झाली. मी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...........

चर्चा उपस्थित केली होती की, या वरिष्ठ सभागृहातील एका आमदाराच्या बाबतीत टी.व्ही.वर अशा प्रकारची बातमी येत असेल तर ती सर्वांना लांच्छनास्पद आहे, अशी गोस्ट घडता कामा नये. याचा शोध घेतला पाहिजे. या सभागृहाच्या दृष्टीने हा प्रश्न फार महत्वाचा आहे. माननीय उपसभापती पुण्याला गेले होते. त्यांनी श्री.नवनाथ आव्हाड यांची भेट घेतली. ते कोमामध्ये आहेत. उपसभापतींनी वस्तुस्थिती जाणून घेतली. त्यामुळे ते यावर जास्त चांगले भाष्य करु शकतात. संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील, सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनी माहिती घेतलेली आहे. जास्तीत जास्त माहिती घेऊन हा विषय सभागृहामध्ये मांडावा, असा मी कामकाज सल्लागार समितीमध्ये आग्रह धरला होता. याची श्री.आर.आर.पाटील साहेबांना माहिती आहे. त्यादृष्टीने या विषयावर चर्चा व्हावी आणि त्यासंदर्भात आपण खुलासा करावा. आजारी माणसाच्या पाठीमागे काही घडत असेल तर ती बदमाशी सभागृहासमोर यावयास पाहिजे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड हे कोमामध्ये आहेत. ते फक्त दोन दिवस सभागृहामध्ये आलेले आहेत. अशा आमदारावर शिंतोडे उडणे योग्य होणार नाही.

यानंतर कु.जयश्री.......

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

हा प्रश्न लवकरात लवकर निर्णयाप्रत येऊ शकतो या दृष्टीकोनातून याकडे बघितले पाहिजे. खोटया सहया करणे, आमदार निधीचा गैरवापर करणे यासंबंधीचा निर्णय करण्याचे काम सन्माननीय सभापती किंवा उपसभापती करतील.

**उपसभापती**: आताच सन्माननीय सदस्य श्री.गिरीश गांधी यांनी जो या सदनाचे सन्मानीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात सभागृमध्ये गोंधळ झालेला आहे.

श्री.गिरीश गांधी : केवळ विधानपरिषदेमध्येच गोंधळ नाही तर आत विधानसभेमध्ये सुध्दा अशा विषयासंबंधी गोंधळ झाला होता.

**उपसभापती** : ठीक आहे. या सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी त्यांच्या निवेदनात श्री.नवनाथ आव्हाड यांचा संदर्भ दिला. तसेच, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी देखील त्यांचा उल्लेख केला. मी याठिकाणी एकच गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, वर्तमानपत्रामध्ये जेव्हा ही बातमी वाचली, त्यानंतर मी स्वत: सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांना भेटण्यासाठी म्हणून खास पुण्याला त्या रुग्णालयात जाऊन आलो व तेथील डॉक्टरांशी मी जवळ जवळ अर्धा पाऊण तास चर्चा केली. या चर्चेमध्ये मी त्यांना विचारले की, सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांना साधारणपणे कधी पासून ॲडमिट केले वगैरे. त्याबद्दल डॉक्टरांनी मला सांगितले परंतु त्या तारखा आता नेमक्या मला येथे आठवत नाहीत. परंतु जवळपास गेले तीन वर्ष ते त्या रुग्णालयामध्ये ॲडमिट आहेत. मध्ये एक दोन दिवस त्यांना घरी नेण्यात आले होते, बाकीचा वेळ ते रुग्णालयातच होते. मी ज्यावेळी त्यांना भेटलो तेव्हा देखील ते कोमामध्ये होते फक्त डोळे उघडून बघू शकत होते. कोणाच्याही हाकेला प्रतिसाद देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नव्हती. मी डॉक्टरांना म्हटले की, ही परिस्थिती किती काळ राहू शकते ते म्हणाले की, ही परिस्थिती कितीही काळ राहू शकते व ते ज्या परिस्थितीत आज आहेत, त्याच परिस्थितीत ते गेल्या तीन वर्षापासून स्टेबल आहेत. त्यांच्या उपचाराविषयी मी माहिती घेतली व साधारणत: महिन्याला किती खर्च येतो अशी चौकशी केली. तसेच शासनाची वैद्यकीय तरतूद त्यांना मिळते की नाही खरे हे सगळे जाणून घेतल्यानंतर मी स्वत: दुस-या दिवशी माननीय

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

मुख्यमंत्र्यांना भेटलो ही सर्व परिस्थिती त्यांना अवगत केली. त्यांच्या सौभाग्यवतींना मी विचारल्यानंतर त्यांच्या डोळयात अश्रू आले व त्या म्हणाल्या की, आमच्याकडे अशी विचारपूस करण्यासाठी आतापर्यंत कोणीही आले नाही. मी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, त्यांची राहती जमीन विकलेली आहे. आता त्यांच्याकडे बाकी काहीच शिल्लक नाही अशा परिस्थितीत त्यांना तातडीने वैद्यकीय मदत उपलबध होणे आवश्यक आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांना वैद्यकीय मदत देण्याचे मान्य केले आहे. त्याचप्रमाणे त्यांचे मेडिकल बिल्स घेऊन त्यांचे चिरंजीव माझ्याकडे आले होते ती सगळी देयके अदा करण्यासाठी विधान भवन कार्यालयात पाठविली आहेत. त्यांच्या आमदार फंडाच्या मुद्याबाबत सन्माननीय गृहमंत्र्यांनी खुलासा केलेला आहे. सहयांच्या बाबतीत म्हटले तर वेगवेगळया तीन मस्टरवर त्यांच्या सहया आहेत त्यातील एक शपथविधीच्या वेळेची असल्यामुळे ती सही त्यांचीच आहे, असे म्हटले जाते परंतु ही माहिती अद्यापि सर्टिफाईड झालेली नाही. उर्वरित दोन सहयांपैकी एक सही त्यांची नाही परंतु सरसकट सहया त्यांच्या आहेत की इतर कोणाच्या असे वर्तमानपत्रातून भासविण्यात आलेले आहे. यासंदर्भात योग्य ती चौकशी करण्याबाबत माननीय सभापतींनी आदेश दिलेले आहेत. ती चौकशी पूर्ण झाल्यानंतर या सभागृहामध्ये त्याचा खुलासा होईल. तोपर्यंत या विषयावरील आताची चर्चा बंद करावी.

------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

28-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3P - 3

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**उपसभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आज दुसरा व शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाची आहे हे सदस्यांनी ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**उपसभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यास येतील.

(1) उपमुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1, बी-4, बी-5,बी-9,एन-2.

(2) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एच-1, एच-3, एच-5,एच-6,एच-7,एच-8,एच-9.

(3) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एल-2, एल-4.

(4) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3,आय-5.

(5) ऊर्जा ( अपारंपारिक ऊर्जा वगळून ) वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7.

(6) आदिवासी मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-2, टी-5, टी-6, टी-8

(7) जलसंपदा मंत्र्यांच्या (महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ ) विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-5.

(8) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास,मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-5, डी-11

(9) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-6

नंतर श्री. गागरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला प्रथम याबाबत माहिती पाहिजे की, आजची कार्यक्रमपत्रिका किती तासासाठी तयार केली आहे. आजची कार्यक्रम पत्रिका पाहिली तर असा प्रश्न पडतो की, खूप मोठी ही कार्यक्रम पत्रिका आहे. या विषयाची माहिती घेण्याची आवश्यकता आहे. काल सुमारे सकाळी 10 ते रात्री 11.30 वाजेपर्यंत कामकाज चालले. काल रात्री 11.30 वाजले, ही सदनाची परिस्थिती आहे. काल काही सदस्यांना रात्रीचे जेवणदेखील मिळाले नाही. येथे कोणतीही कँटीन चालू नव्हती. त्यामुळे त्यांना उपाशी रहावे लागले. लांब धाब्यावर काही तरी खायला मिळाले. यासाठी सदनाचे कामकाज चालविताना वेळेचे बंधन कोणी ठरवायचे ? आपण नेहमी म्हणता की, सदनाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. आपल्याकडे स्पष्ट नियम असताना याची काळजी घेणे आवश्यक आहे. परंतु वेळेच्या नियमावर कोणी लक्ष देत नाही. सकाळी 10.00 वाजता सदस्य येथे येतात, त्यामुळे सायंकाळी 6.00 वाजता सभागृह बंद झाले पाहिजे. परंतु तसे काही घडत नाही. आता 5.00 वाजले आहेत व पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु होणार आहे. पुरवणी मागण्यावर चर्चेस 9 ते 10 वाजतील. कार्यक्रमपत्रिका पाहिली असता त्यानंतरही खूप मोठा कार्यक्रम आहे. तसेच आज काही सदस्यांचा निरोप समारंभ आहे असे सांगितले होते. खरे तर हा समारंभ काल होता परंतु तो आज ठेवला आहे. कार्यक्रमपत्रिकेवरुन असे दिसते की, आजही निरोप समारंभ होणार नाही. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर अर्बन लँड सिलींग चे विधेयक आहे. सभागृह रात्री उशिरापर्यंत चालविले तर ही कार्यक्रमपत्रिका संपणार नाही. आता मी पुरवणी मागण्यावरील चर्चेला सुरुवात करतो.

**उपसभापती** : पुरवणी मागण्या आज मान्य केल्या पाहिजेत हे सर्व माननीय सदस्यांना माहिती आहे. त्यामुळे सुरुवातीस पुरवणी मागण्यावर चर्चा करण्यात येईल. त्यानंतर कार्यक्रमपत्रिकेवरील उर्वरित कामकाज आज घ्यायचे की नाही याचा विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या विनियोजन विधेयक चर्चेला येणार आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, जास्त उशिर झाला तर येथील कँटीन बंद होते.

**उपसभापती** : सभागृह उशिरापर्यंत चालल्यास या सभागृहातील कोणताही सदस्य उपाशी राहणार नाही. आज मी येथे उपस्थित असल्याने कोणावरही उपाशी राहण्याची वेळ येणार नाही.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, परंतु कामकाज पत्रिकेवर 16 तासाचे कामकाज ठेवणे योग्य नाही. रात्रौ 11.30 वाजता नागपूरमध्ये जेवण मिळत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चा सुरु करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आजची कार्यक्रमपत्रिका फार मोठी आहे. पुरवण्या मागण्यानंतर, अर्बन लँड सिलिंग विधेयक, 260 अन्वये प्रस्ताव, विधेयके, अर्धा तास चर्चा इत्यादी कार्यक्रम आहे. त्यानंतर 12 सदस्यांना निरोप समारंभ होणार आहे. हे सदस्य आपल्यासोबत सहा वर्षे असतात, त्यांचा अभिमान वाटावा असे त्यांचे कार्य असते, त्यामुळे त्यांच्या निरोप समारंभासाठी पुरेसा वेळही दिला पाहिजे.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करु या. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी पुरवणी मागण्यांवर आपली मते मांडण्यास सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला एवढेच आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालविण्यात येईल असे काल सांगण्यात आले होते. व काल ते आमच्यावर हे लादले गेले होते. एका वाक्याचा मान राखून आम्ही संपूर्ण वेळ थांबलो होतो. अशाप्रकारे एखाद्या वाक्याचा इतका मोठा आधार घेतला जातो असे कधीही झालेले नाही. काल ते झाले आहे. आम्ही ते मान्य केले व सकाळी 11 पासून रात्रीपर्यंत आम्ही थांबलो.

**उपसभापती** : यामध्येच आपला कामकाजाचा वेळ वाया जात आहे. यानंतर आपल्याला वेळ कमी पडतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझी आपणास अशी नम्र विनंती आहे की, निवृत्त सदस्यांना निरोप देण्यासाठी काल काही सदस्य वाट पहात होतो. आता 5 वाजले आहेत. तरी देखील अजूनही पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करण्यात आलेली नाही. पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी कदाचित 7 वाजतील. उशीरा निरोप देणे हे फारसे संयुक्तिक आहे असे मला वाटत नाही. निवृत्त सदस्यांना निरोप देण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्य वाट बघत आहेत. माझी आपणास अशी विनंती आहे की, आपण निवृत्त सन्माननीय सदस्यांना आता निरोप द्यावा.

**उपसभापती** : आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेण्यात येतील.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इंन्फर्मेशन आहे. आपण निवृत्त सन्माननीय सदस्यांना अनेक वेळा निरोप देतो. परंतु काही काळानंतर त्यांची पुन्हा फेरनियुक्ती होते. त्यांना एकदा दिलेला निरोप परत घेता येत नाही. मग अशा वेळी आपण काय करायचे ?

**उपसभापती** : माझी अशीच परिस्थिती यांनी केली आहे. मला लोकसभेचे तिकिट मिळाले होते. मला वाटले मी जाईन . पण यांनी मला निरोपाच्या वेळी सांगितले तुम्हाला येथे परत यावे लागेल आणि मला येथे परत यावे लागले. हा काही माझा दोष नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, आताच आपण या सदनामध्ये एक गोष्ट स्पष्ट केलेली आहे की, आजच्या पुरवणी मागण्या संपेपर्यंत आजचे कामकाज चालवले जाणार आहे. उर्वरित कामकाज उद्या घेण्यात येणार आहे. असे गृहीत धरून मी माझ्या कामाला सुरुवात करतो. यात काही बदल असेल तर कृपया आपण तसे स्पष्ट करावे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र 12, पृष्ठ क्रमांक 13 वर मी आता बोलणार आहे. सरकारी अभियोक्त्याकरिता विधीविषयक पुस्तके खरेदी करण्यासाठी तरतूद ( रुपये 40,96,000) मला गृह विभागाकडून एवढीच माहिती हवी आहे की, आपण जो अभियोग न्यायालयामध्ये नेमता त्यांचे यासंदर्भात ज्ञान किती अपडेट असते हा माझा प्रश्न आहे. तसेच देवाणघेवाणामुळे किती ठिकाणी हे प्रश्न सोडविले जातात याची आपण माहिती घ्यावी. त्यामुळे न्यायालयांचा दर्जा घसरत आहे काय हे तपासण्याची आवश्यकता आहे. आपण 40 लाख नव्हे तर एक कोटीची पुस्तके त्यांना खरेदी करुन द्या परंतु ही पुस्तके खरेदी करुन त्यांचा अभ्यास करुन त्याचा वापर न्यायालयामध्ये केला जावा. एवढीच माझी अपेक्षा आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

सभापती महोदय, बाब क्र.15 - मंत्रालयात क्लोज सर्कीट कॅमेरे टेलिव्हिजन यांची मांडणी करण्यासाठी अतिरिक्त तरतूद रूपये 40 हजार इतकी केली आहे. मला या निमित्ताने आपल्याकडून अशी माहिती पाहिजे आहे की, मंत्रालयाच्या संरक्षणासाठी, आतमध्ये कोणी अनाहूत व्यक्ती जाऊ नये म्हणून कोणकोणती सुरक्षा यंत्रणा आपण यापूर्वी उभी केली आहे आणि त्यामध्ये आता आणखी हे 40 लाख रूपये खर्च करून अधिक असे काय यंत्रसामग्री बसविणार आहात आणि त्याचा उपयोग काय होणार आहे तसेच आतापर्यंत मंत्रालयातील सुरक्षा यंत्रणेवर आपण किती खर्च केला आहे ?

सभापती महोदय, पृष्ठ 14, बाब क्र.16 - विशेष सरकारी अभियोक्ता यांच्या फी करिता अतिरिक्त तरतूद म्हणून 31 लख 89 हजार रूपयांची तरतूद या पुरवणी मागणीतून करण्यात आली आहे. यात आपण पुढे असे म्हटले आहे की, पोलीस आयुक्त मुंबई यांनी दाखल केलेल्या वेगवेगळ्या खटल्यांसाठी विशेष सरकारी अभियोक्त्यांची नेमणूक करण्यात आली होती. आता इतर सर्व पोलीस खाते सोडून पोलीस खात्याने कोणावर केसेस दाखल केल्या आहेत आणि त्यांचे महत्त्व काय आहे हे आपण आम्हाला सांगू शकाल का ? दुसरे असे की, बेळगाव-कारवारचा सीमा प्रश्नी महाराष्ट्र शासनाने दिल्लीला सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल केलेला आहे. त्या बाबतीतील एकंदर जी काही कायदेशीर माहिती मिळण्याची आवश्यकता आहे, महाराष्ट्र शासनाची त्या संबंधातील भूमिका कोर्टापुढे मांडण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सीमा भागातून माहिती गोळा करून आपल्या वकिलांना ती माहिती देण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्या दृष्टीने कोणत्या सोयी आपण केल्या आहेत ? कारण मी 1 नोव्हेंबरला बेळगाव-कारवारला गेलो होतो तेव्हा मला कळले की, या सीमा प्रश्नी सुप्रीम कोर्टामध्ये महाराष्ट्र सरकारची बाजू मांडताना कमतरता झाली तर त्यामुळे या प्रकरणात धोका होण्याची शक्यता आहे. तेव्हा या प्रकरणामध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की, आपण स्वत: यामध्ये लक्ष द्यावे आणि ही केस चांगल्यात चांगल्या वकिलाकडून कशी चालविली जाईल आणि त्यात आपण यशस्वी कसे होऊ याची काळजी घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18 - दोन बुलेटप्रूफ सफारी मोटार गाड्या खरेदी करण्यासाठी अतिरिक्त तरतूद म्हणून 2 कोटी 20 लाखाची पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. या गाड्या कोणासाठी आहेत ? कोणत्या व्यक्तींसाठी आपण या गाड्या घेत आहात याची

...... 3एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला कल्पना नाही. पण मुंबईमध्ये आधीच अशा गाड्या खूप झाल्या आहेत पण त्या मानाने सामान्य माणसाचे जीवन काही सुरक्षित नाही. शेवटी ऑलवेज प्रिव्हेंशन इज बेटर दॅन क्यूअर असे म्हणतात. या दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. त्यासाठी हे जे अतिरेकी गुन्हेगार सापडतात त्यांच्यावर कोठल्याही प्रकारे खैरात न करता, त्यांना पुढे न सांभाळता, ते सापडल्यानंतर, त्यांच्याबाबत ते गुन्हेगार अतिरेकी आहेत याची खात्री पटल्यानंतर, मुंबईमध्ये ज्याप्रमाणे आपण गुंडांना गोळ्या घालून मारता त्याप्रमाणे त्यांनाही संपविण्यात यावे. जेणे करून अशी अतिरेकी कृत्ये करणाऱ्यांना, त्यासाठी सहयोग देणाऱ्यांना दहशत बसेल आणि साहजिकच अतिरेकी कृत्ये कमी होतील. तुमचे मानवतावादी वगैरे कोणाला काही म्हणावयाचे असल्यास म्हणू द्यात. शेवटी जनतेचे जीवन सुरक्षित ठेवणे हे महाराष्ट्र शासन म्हणून, गृहखाते म्हणून आपली प्रथम जबाबदारी आहे आणि आपण ती पूर्णपणे पार पाडावी असे मला आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 19 - कॉमनवेल्थ यूथ गेम्सकरिता यंत्रसामग्री व साधन सामग्री खरेदी करण्याकरिता अतिरिक्त तरतूद म्हणून 1 कोटी 53 लाख 73 हजाराची पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. फार चांगली गोष्ट आहे. आपला पुणे येथे जो स्टेडियम आहे तेथे या स्पर्धा होणार आहेत. पण ही क्रीडा खात्याची बाब असताना गृह खात्याकडून पूरक मागणी का येत आहे ? मला वाटते सुरक्षिततेच्या संबंधातील ही बाब असावी. कशा पद्धतीने या स्पर्धा होणार आहेत, त्याला कोणतेही गालबोट लागणार नाही याची दक्षता आपण घ्यावी आणि या देशामध्ये देखील चांगल्या प्रकारे आम्ही स्पर्धा भरवू शकतो, पार पाडू शकतो आणि खेळाडू आमच्या देशात पूर्णपणे सुरक्षित राहतील असा मेसेज यातून जगामध्ये जाण्याची आवश्यकता आहे. तरी त्याप्रमाणे आपण यामध्ये काळजी घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे, सूचना आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... 3टी 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, बाब क्रमांक 20 मध्ये राज्यामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव या मोहिमेची सुरुवात 15 ऑगस्ट 2007 पासून करण्यात आली . त्याकरिता आपण 2 कोटी 50 लाख रुपयांची मागणी केली आहे. तंटामुक्त गाव ही कल्पना चांगली असली तरी एकदाही तंटा झालेला नाही असे आपण एखादे तरी गाव शोधून काढावे. याचे कारण प्रत्येक गावामध्ये गट, तट, राजकीय पक्ष एकमेकांची उणी-धुणी काढीत असतात. नळावरील, विहिरीवरील भांडणे होत असतात. शेतजमिनीवरुन भांडणे होत असतात. गावातील तंटे सोडविले जाऊन ते गाव तंटामुक्त होईल यासाठी आपण करीत असलेला प्रयोग चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही. परंतु हा निधी खर्च केल्यानंतर कोर्टातील खटले कमी होतील काय? महाराष्ट्राच्या निरनिराळया कोर्टामध्ये लाखो खटले पडून आहेत. वर्षानुवर्षे हे खटले चालू असतात. माणसे मरुन जातात परंतु त्यांना न्याय मिळत नाही, परंतु केसेस चालू असतात. मेलेल्या माणसाच्या कुटुंबियांना त्या केसेस पुढे चालू ठेवाव्या लागतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आपण करीत असलेला प्रयत्न चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही. करीत असलेले प्रयत्न सत्कारणी लागावेत हीच इच्छा आहे. गावामध्ये अनेक प्रकारचे तंटे-बखेडे निर्माण होणार नाहीत याबाबत शासनाकडून दक्षता घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज सकाळी पोलीस पाटलाच्या विविध प्रश्नांसंबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. पोलीस पाटलांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे किती दुर्लक्ष होत आहे. प्रत्येक खेडयामध्ये आज पोलीस पाटलांशिवाय काहीही चालत नाही. ज्याप्रमाणे गावामध्ये पोलीस पाटील पाहिजे, त्याप्रमाणे शासनाचे सुध्दा त्यांच्याकडे लक्ष असले पाहिजे ते असत नाही. पोलीस पाटलांना आज विविध कामांकरिता तालुक्याच्या ठिकाणी वारंवार जावे लागते, निरनिराळया ठिकाणी जावे लागते. त्याकरिता होणारा खर्च हा त्यांच्या खिशामधून होत असतो. त्याकरिता त्यांच्या मानधनामध्ये वाढ व्हावी याकडे शासनाने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 21 मध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेची स्थापना करण्यासाठी अतिरिक्त तरतूद अपूरी असल्यामुळे रुपये 3 कोटीची पूरक मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, मला आश्चर्य वाटते की, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन 47 वर्षे झाली. तरीसुध्दा कोणता रोग आहे हे जाणून घेण्यासाठी आपल्याला आजही दिल्ली आणि बंगलोरला नमुने पाठवावे लागतात. महाराष्ट्र हे देशामध्ये एक नंबरचे प्रगत राज्य आहे असे आपण म्हणतो. तरमग वैज्ञानिक प्रयोगशाळा निर्माण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यासाठी आपण किती उशीर केला आहे? या प्रयोगशाळा जास्तीत जास्त तत्परतेने व चांगले काम करतील यासाठी आपण काळजी घ्यावी. प्रयोगशाळांच्या निर्मितीनंतर आपल्याला बंगलोरला जावे लागणार नाही याची शासनाने दक्षता घ्यावी एवढेच मला यानिमित्ताने सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 22 मध्ये नाशिक प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेस जमीन व नाशिक मेरी (MERI) इमारत हस्तांतरित करण्याबाबत जलसंपदा विभागास रक्कम प्रदान करण्याकरिता 2 कोटी 48 लक्ष 49 हजार 807 रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, मला याठिकाणी हे समजत नाही की, अदान-प्रदान हे दोन खात्यांमध्ये असते. त्याकरिता याठिकाणी परवानगी मागितली आहे. हा व्यवहार एका दिवसात होत नाही. आपण ही बाब अंदाजपत्रकाव्दारे आणू शकला असता. पूरक मागणीव्दारे ही बाब कां आणावी लागली याबाबत आपण खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 17 व बाब क्र. 26 वर मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील गृह विभागाच्या कार्यालयामध्ये वातानुकूल सुविधा पुरविणे याकरिता रुपये 20 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मला आठवते की, एका अधिवेशनामध्ये माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एक प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर अजूनपर्यंत आले नाही. तो प्रश्न असा होता की, मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर एक खाजगी मशिद चालते, नमाज पडण्याचे काम चालते. त्याकरिता आपण अधिक सुविधा देण्याचे काम करीत आहात काय? यासंदर्भात खूलासा करण्यात आलेला नाही तो आपण करावा. मंत्रालयामध्ये वातानुकूलन यंत्रणा बसविल्यानंतर तेथील कर्मचाऱ्यांकडून व अधिकाऱ्यांकडून जास्त कार्यक्षमतेने काम होणार असेल आणि अनेक लोकांचे प्रश्न मार्गी लागणार असतील तर त्यासाठी आपण अधिक दक्षता घ्यावी. आणि याबाबत आपण खुलासा करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 28 मध्ये 12 कैद्यांना संरक्षण व्यवस्थेत संरक्षकांसोबत मॉरिशसहून भारतात आणण्यासंबंधीच्या परदेश प्रवास खर्चासाठी 4 लक्ष 30 हजार रुपयांची पूरक मागणी केली आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

श्री. मधुकर सरपोतदार .....

मला एकच विचारावयाचे आहे की, मॉरिशसमध्ये आपल्याकडील कोण लोक गेले होते ? कोणाला पकडले ? त्यांची नावे काय आहेत ? त्यांनी कोणता गुन्हा केला म्हणून त्यांना पकडले ? खर्च करुन, बंदोबस्त करुन त्यांना मुंबई शहरात आणणार आहात. त्यांनी त्या ठिकाणी कोणत्या अवैध गोष्टी केल्या होत्या की ज्यामुळे महाराष्ट्र शासनाला हा खर्च करावा लागत आहे ? त्यांची नावे या सदनामध्ये सांगितली तर बरे होईल.

सभापती महोदय, यानंतर मी वन खात्याच्या बाबींच्या संदर्भात बोलणार आहे. काल मी वन विभागाच्या मागण्यांवर बोलणार होतो पण काल सांगण्यात आले की, वन विभागाच्या पुरवणी मागण्या उद्या चर्चेसाठी आहेत. या ठिकाणी वन खात्याचे माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. आपणच काल सांगितले होते की, वन विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी नाहीत म्हणून मी काल त्यावर बोललो नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल आपणच या ठिकाणी सांगितले की, आज वन खात्याच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी नाहीत आणि उद्या या खात्यावर चर्चा आहे.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : वन खाते आज आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, यानंतर मी वन खात्याच्या पृष्ठ क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 39 बाबत बोलणार आहे. यामध्ये विद्यमान बिनतारी संदेश यंत्रणेचे परिरक्षण व मजबुतीकरण करण्यासाठी 1 कोटी 22 लाख रुपये इतक्या रकमेची पुरवणी मागणी केलेली आहे. आपली आधीची जी यंत्रणा होती त्याचे आपण रिनोव्हेशन करीत आहात काय ? त्या ठिकाणी नवीन यंत्रणा आणत आहात काय ? त्या यंत्रणेचे मजबुतीकरण म्हणजे नेमके काय करणार आहात ? या संवेदनशील यंत्रणेचे मजबुतीकरण करावयाचे आहे असा शब्द आपण वापरलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात सदनाला माहिती द्यावी. ही सगळी यंत्रण अतिशय आधुनिक, तत्पर आणि संवेदनशील असली पाहिजे तसेच ती सतत कार्यरत असली पाहिजे यादृष्टीने यासंदर्भात माहिती द्यावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

यानंतर मी बाब क्रमांक 40 बाबत बोलणार आहे. यामध्ये वन क्षेत्रातील पर्यटन व कोयना वन्यजीवन अभयारण्याच्या विकासासाठी 1 कोटी 37 लाख 47 हजार रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. या ठिकाणी माननीय वनमंत्री उपस्थित नाहीत. त्या खात्याचे राज्यमंत्री माननीय श्री. रवीशेठ पाटील उपस्थित आहेत. त्यांनी याकडे लक्ष द्यावे. आपण वन क्षेत्रातील पर्यटन व कोयना वन्यजीवन अभयारण्याच्या विकासासाठी ही तरतूद मागितलेली आहे. त्या ठिकाणी विकास करणार म्हणजे निश्चित काय करणार आहात ? ज्यावेळी अशा प्रकारचा निधी आपणघेतो त्यावेळी त्याचे रिझल्ट काय आहेत, त्यातून काय निष्पन्न झाले हे महाराष्ट्रातील जनतेला कसे कळणार ? हे क्षेत्र जास्त चांगले झाले हे कसे समजणार ? यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात माहिती द्यावी.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 41 बाबत बोलणार आहे. यामध्ये सागरेश्वर अभयारण्याच्या विकासासाठी 1 कोटी 15 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

सभापती महोदय, या ठिकाणी साखळी कुंपण असा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. ही कुंपणे घालण्याच्या बाबतीत मी आज सकाळी प्रश्न विचारला होता. तारेचे कुंपण, सिमेंटच्या भिंती, विटांच्या भिंती इत्यादी कुंपणे घालण्याच्या पध्दती आहेत. साखळी कुंपण करणार म्हणजे नेमके काय करणार आहात ? तारेचे कुंपण असे म्हटले असते तर मी ते समजू शकलो असतो. साखळी या शब्दामुळे संभ्रम निर्माण होतो. तेव्हा याबाबतीत खुलासा व्हावा.

बाब क्रमांक 42, पृ.क्र. 29. राज्यातील व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यातील विकास कामाकरिता 8 कोटी 12 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मी आजच वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचली. एक बिबटया एका रानडुक्कराचा पाठलाग करीत असताना दोघेही विहिरीत पडून मृत्यू पावले. यामधून वन्य प्राणी सुरक्षित कसे राहतील, त्यांचे खाद्य त्यांना कसे मिळू शकेल यासबंधातील व्यवस्था पाहण्याची जबाबदारी ही वन संरक्षक अधिका-याची आणि वन मंत्र्यांची आहे. तेव्हा याबाबतीत कोणती व्यवस्था झालेली आहे याची माहिती मिळू शकली तर बरे होईल.

बाब क्रमांक 43, पृ.क्र. 30. वन्य प्राण्यांमुळे झालेल्या माणसे, पधुधन व पिके यांच्या नुकसानीकरिता नुकसानभरपाईची तरतूद करण्यासाठी 5 कोटी 34 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये माकडांपासून खूप मोठा उपद्रव होतो यासंबंधीची चर्चा या सदनामध्ये मागे झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे आज सभागृहामध्ये उपस्थित नाहीत, त्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि मी, आम्ही सर्वांनी हा प्रश्न या सदनामध्ये उपस्थित केलेला होता. त्यावेळी वन मंत्र्यांनी असे आश्वासन दिले होते की, ज्या माकडापासून आपण बनलो त्या माकडाचा आपण उपद्रवी प्राण्यांमध्ये समावेश करु. त्याबाबतीत काय कार्यवाही झालेली आहे ? माकडे आंब्याची झाडे असोत, भाजीपाला असो, काहीही असो, ते उद्‌ध्वस्त करण्याचे काम करतात. कोकणातील जनता त्यांच्या या उपद्रवामुळे हवालदिल झालेली आहे. तेव्हा याची नोंद घेऊन याबाबतीत आपण कोणती कारवाई केली हे सांगितले तर बरे होईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार.....)

बाब क्रमांक 44. पान क्रमांक 30. मालाड शहर सर्व्हे क्र. 239/1 मधील अतिक्रमण मुक्त जमिनीवरील मानवी वस्ती व रोपणीमध्ये बिबळयाच्या प्रवेशापासून संरक्षण मिळण्यासाठी 31 लाख रुपयाची तरतूद केली आहे. मानवी वस्तीमध्ये हे बिबळे जायला लागलेले आहेत. याचा अर्थ असा होतो की, वनक्षेत्रामध्ये या बिबळयांना त्यांचे खाद्य मिळत नाही. खाद्या मिळेल या हेतूने ते मानवी वस्तीमध्ये शिरतात. तेव्हा वन्य प्राण्यांची भूक भागविण्याची आपण काही व्यवस्था करावी जेणे करुन ते मानवी वस्तीमध्ये शिरणार नाहीत.

बाब क्रमांक 47, पृ.क्र 31 . जंगली हत्तींपासून संरक्षण करण्यासाठी बिनतारी यंत्रणा, सौर उर्जेवर चालणारे कुंपण घालणे, हत्तीच्या कळपाच्या वस्तीच्या प्रदेशात पाण्याची तळी निर्माण करणे इत्यादीसारख्या व्यवस्था करण्यासाठी 40 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. सभापती महोदय. 100 टक्के केन्द्रीय अनुदान योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्हयामध्ये हत्तीपासून संरक्षण करण्यासाठी सौर उर्जेवर चालणारी कुंपणे घालणे, हत्तीच्या कळपाच्या वस्तीत पाण्याची तळी निर्माण करणे इत्यादी सारख्या व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहेत ही चांगली गोष्ट आहे. परंतु मुळात हत्ती येऊ नये म्हणून आपण काय करणार आहात ? सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हत्तींचा उपद्रव फार मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. ते संपूर्ण शेती उद्‌ध्वस्त करतात. त्यांच्यासाठी पाण्याची, त्यांच्या खाण्याची व्यवस्था करा. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये हत्तीपासून शेतीचे नुकसान होणार नाही आणि शेतकरी उद्‌ध्वस्त होणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र शासनाची आहे आणि ती आपण पार पाडाल अशी  अपेक्षा मी व्यक्त करतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ 17:35

श्री.मधुकर सरपोतदार..........

सभापती महोदय, बाब क्रमांक-48 संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील विकास कामाकरीता रु.38 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. ही विकास कामे कोणती? संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये कोणती विकास कामे करणार आहात? केवळ विकास कामे म्हटले म्हणजे प्रश्न मिटत नाही. कोणती कामे निश्चित करणार आहात याची माहिती सदनाला मिळणे आवश्यक आहे. जो निधी खर्च होतो तो सत्कारणी लागेल, याचा उपयोग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला भेट देणाऱ्या पर्यटकांना होईल याची काळजी शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धविकास या विभागांच्या मागण्यांवर मी बोलणार आहे. कृषि विभागाच्या मागण्यांसंबंधी कोण नोंद घेणार आहे? संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात अनुपस्थित आहेत. कॅबिनेट मंत्री नसले तरी राज्यमंत्री उपस्थित असणे आवश्यक होते.

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.गिरीश गांधी यांनी माहिती दिली की, विधानसभा सभागृह तहकूब झालेले आहे. याठिकाणी होणाऱ्या चर्चेला जर गांभीर्याने घेणार नसाल तर तसे सांगा. काल पुरवणी मागण्यांवर उत्तराचे भाषण सुरु असताना सभागृहातील वातावरणाचे शूटींग करुन जनतेला दाखविले असते तर काय झाले असते? सन्माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी काल उत्तर देताना असे सांगितले, तुम्ही मघाशी काय सांगितले ते आम्ही पूर्ण करु. हे काय चालले आहे? तुम्ही स्वत:ची किंमत करुन घ्या. आम्हाला आमची किंमत करायची नाही.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार जे मुद्दे मांडतील त्या मुद्यांना समर्पक आणि परिपूर्ण उत्तर मिळेल. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित असते तर अधिक बरे झाले असते. शासनाने याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

श्री.मधुकर चव्हाण : याठिकाणी सन्माननीय सदस्य आपल्या भावना मांडत असताना शब्द हे व्याकरणातील नसतात. भावनांसह आपले विचार मांडले जातात. भावनांची तुम्ही नोंद करुन घेऊ शकता का?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बाब क्रमांक-66, पृष्ठ क्रमांक-41 याठिकाणी असा उल्लेख केला आहे की, अठराव्या पंचवार्षिक योजनेसाठी पशुधन क्षेत्र यासाठी अतिरिक्त तरतूद करणे. अठरावी पंचवार्षिक योजना कोणती? आता अकरावी योजना सुरु झालेली आहे. ही अठरावी योजना कोणती आहे? मंत्रीमहोदयांनी पुरवणी मागण्यांचे पुस्तक काढून पहावे म्हणजे

..2..

श्री.मधुकर सरपोतदार..........

लक्षात येईल. मी पृष्ठ क्रमांक आणि बाब क्रमांक याचा उल्लेख केला आहे. कोणी पहात नाही? खात्याचे सचिव आहेत, अधिकारी आहेत ते काय करीत असतात? हा काय पोरखेळ चालला आहे?

**तालिका सभापती** : प्रिंटिंग मिस्टेक आहे. अकरावी योजना असा उल्लेख असावयास हवा होता.

श्री.मधुकर सरपोतदार : काँग्रेस पक्षाची तीच तर खासियत आहे. प्रिंटिंग मिस्टेक नेहमीच होते.

श्रीमती सुधा जोशी : शुध्दीपत्रक आले आहे का?

**तालिका सभापती** : त्याची कल्पना नाही. परंतु प्रिंटिंग मिस्टेक आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : यासाठीच संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित असणे आवश्यक असते. यासाठीच आम्ही आग्रह धरीत असतो. शासनाची कल्पना आहे की, आम्ही कोणी वाचतच नाही. ठीक आहे. जो काही द्यावयाचा असेल तो खुलासा द्यावा. चुका दाखवून देणे हे आमचे काम आहे, ते आम्ही केले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 67,पृष्ठ क्रमांक 41 वर शासकीय दूध योजना, पुणे येथे दूध पाश्चरायझींग संयत्र उभारण्यासाठी 18.50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महानंद डेअरीमध्ये अगोदर रोज 9 लक्ष लिटर दुधाचे पॅकिंग होत होते. आज या ठिकाणी फक्त 5 ते 5.50 लाख लिटर दुधाचे पॅकिंग केले जात आहे. महानंद डेअरीमध्ये अगोदर जवळपास 1000 ते 1200 कर्मचारी काम करीत होते. आज दुधाच्या व्यवसायाचे व्यापारीकरण झालेले आहे. एवढेच मी या निमित्ताने बोलू इच्छितो.

सभापती महोदय, मी आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 90, पृष्ठ क्रमांक 73 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. गृहनिर्माण व नगरविकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जावरील व्याजासाठी अतिरिक्त तरतूद 4,43,30,000/- रुपयांची करण्यात आलेली आहे. त्यामुळे या अतिरिक्त व्याजाचा दर काय आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 91, पृष्ठ क्रमांक 73 वर माझे विचार मांडणार आहे. शासकीय निवासी इमारतींचे परिरक्षण व दुरुस्ती करण्यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मला आपण सांगा शासकीय इमारतींची आपण केव्हा पासून दुरुस्ती करीत आहोत? मुंबईतील वांद्रे येथील शासकीय वसाहतीमध्ये 55 इमारती आहेत. शासकीय वसाहतीच्या दुरुस्तीवर शासन प्रत्येक वर्षी करोडो रुपये खर्च करीत असते. एवढया मोठया प्रमाणात रक्कम खर्च होऊन त्याचा काही सुध्दा फायदा होतांना आम्हाला दिसत नाही. शासकीय इमारती आज पडायला आलेल्या आहेत, या सर्व इमारती पडण्याच्या स्थितीत आलेल्या आहेत, या इमारतींमधून पाणी गळायला लागले आहे त्यामुळे आपण शासकीय इमारतीवर मोठया प्रमाणात खर्च न करता त्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधल्या तर तें जास्त चांगले होईल व आपला निधी सुध्दा वाचेल. आज ज्या जुन्या शासकीय वसाहती आहेत त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नाही, सांडपाण्याची सोय नाही, सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे अशा ठिकाणी दुरुस्तीवर रक्कम खर्च न करता त्या ठिकाणी नवीन इमारती बांधाव्यात. आपण शासकीय इमारतीच्या दुरुस्तीसाठी 30 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे हे पैसे आपण कोण कोणत्या

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....
वसाहतींवर खर्च करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 92, पृष्ठ क्रमांक 73 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. पोलीस अधिका-यांचे निवास्थान, कार्टर रोड, वांद्रे, मुंबई येथील इमारत क्रमांक 1 मधील दोन जुन्या उद्वाहनांच्या जागी नवीन उद्वाहन बसवण्यासाठी 11.81 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी पूर्वी जी उद्वाने बसवण्यात आली होती ती केव्हा बसवण्यात आली होती ? आता जी उद्वाहने बसवण्यात येणार आहेत ती कोणत्या कंपनीची आहेत ? या उद्वाहनासाठी किती रक्कम लागणार आहे? या सर्वांची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. कारण मलिदा मिळाल्या शिवाय आता कोणतेही काम होत नाही अशी सगळीकडे भ्रष्टाचाराने थैमान घातलेले आहे. पोलीस अधिका-यांच्या निवास्थानाला लिफ्ट बसविणे आवश्यक आहे कारण त्यांना रात्रंदिवस जनतेसाठी काम करावे लागते. पोलीस सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये येते त्यामुळे येथे लिफ्ट बसवण्यास हरकत नाही परंतु या ठिकाणी पूर्वी जी उद्वाने बसवण्यात आली होती ती केव्हा बसवण्यात आली होती? आता जी उद्वाहने बसवण्यात येणार आहेत ती कोणत्या कंपनीची आहेत ? या उद्वाहनासाठी किती रक्कम लागणार आहे? यासंदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 97, पृष्ठ क्रमांक 75 मध्ये नागपूर येथील कार्यालयीन इमारतीच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधीसाठी 50.56 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे पुरवणी मागण्यांमध्ये एवढया मोठया रक्कमांची तरतूद करणे योग्य नाही. परंतु बजेट सेशनमध्ये अभ्यास करुन रक्कमा मागावयास पाहिजे त्या मागितल्या जात नसल्यामुळे आपल्याला पुरवणी मागण्यांमध्ये मोठया प्रमाणात रक्कमांची तरतूद करावी लागत आहे .

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे..... 17:50

श्री.मधुकर सरपोतदार.........

आकस्मिकता निधी किती मंजूर झाला त्यापैकी किती खर्च झाला याची माहिती मंत्रिमहोदयांनी आम्हाला द्यावी अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 108, पृष्ठ क्रमांक 82 - सार्वजनिक बांधकाम विभाग - राज्यातील विविध शासकीय इमारतींची विविध बांधकामे व दुरुस्त्यांच्या कामासाठी 20 लाख रुपयांची मागणी मांडण्यात आलेली आहे. वांद्रे (पूर्व) मुंबई येथील प्रतिक्षा निवासस्थानांचे शासकीय विश्रामगृहात रुपांतर करण्यासाठी ही पुरवणी मागणी मांडण्यात आलेली आहे. या प्रतिक्षा निवासस्थानाची सद्य:स्थिती काय आहे, या निवासस्थानाचा वापर कोण करतो व याचा कंट्रोल कोणाकडे आहे याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी. पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित राहत नाहीत. आम्हाला सांगण्यात येते की, तुमचे मुद्दे लिहून घेण्यात येतील. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आम्ही विचारलेल्या प्रश्नांची नीट उत्तरे मिळत नाहीत. काही तरी थातूरमातूर उत्तरे देऊन वेळ निभावून नेली जाते. एकदा विनियोजन विधेयक मंजूर झाले की अधिवेशन गुंडाळायला मोकळे झालो अशाप्रकारची भावना झालेली आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मागे एकदा डी.पी.डी.सी.ची बैठक झ ाली होती. त्या बैठकीमध्ये महानगरपालिकेचे अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि एमएमआरडीएचे अधिकारी व आमदार उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये वांद्रे (पूर्व) येथील भुयारी मार्गाची देखभाल कोणी करावी यावर चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात यावे. या विभागाने देखभाल, स्वच्छता, झाडलोट, मेटेनन्स इत्यादी कामे करावीत. हा निर्णय आपल्याला माहीत आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. या भुयारी मार्गाची कशाप्रकारे देखभाल करणार आहात याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी.

आता मी अपांरपारिक ऊर्जा विभागाकडे वळतो. या विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. पुरवणी मागण्यांवरील चर्चा गांभीर्याने घेतली जात नाही असे मला वाटते..

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असताना संबंधित विभागाच्या मंत्रिमहोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, काल सुध्दा पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नव्हते. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित राहत नसतील तर मग आम्ही चर्चा कशाला करायची ? आम्हाला चर्चा करायची नाही.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना माझी विनंती आहे की, त्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे. याठिकाणी पशुसंवर्धन मंत्री श्री.अनीस अहमद उपस्थित झालेले आहेत....( अडथळा )

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे गृह खात्यावरील बोलणे झाल्यानंतर माननीय गृहमंत्री बाहेर गेलेले आहेत. अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांना, सभागृहात उपस्थित राहण्यासाठी निरोप दिलेला आहे.

**तालिका सभापती** : आपण दुसऱ्या विभागावर बोला. तोपर्यंत ते येतील.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आम्ही अपारंपारिक ऊर्जा खात्याच्या मागण्यांची नोंद घेत आहोत. पशुसंवर्धन मंत्र्यांनाही आम्ही बोलावून घेतलेले आहे.

डॉ.सुनील देशमुख : मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांना सांगू इच्छितो की, आपण अपारंपारिक ऊर्जा खात्यावर बोलत आहात, परंतु खर्चाच्या पूरक विवरणपत्रामध्ये त्या खात्याची एकही बाब नाही. ज्या खात्याची बाबच नसेल त्यावर आपण कसे बोलता ? आपण खर्चाचे पूरक विवरपत्र पहावे. पूरक मागणी नसल्यामुळे त्या खात्याचे मंत्री येथे उपस्थित नसतील.

(गोंधळ)

श्री.मधुकर सरपोतदार : इतर विभागांच्या बाबतीतही तशीच परिस्थिती आहे.

डॉ.सुनील देशमुख : यामध्ये अपारंपारिक ऊर्जा विभागाची बाबच नसल्यामुळे त्या खात्याचे मंत्रिमहोदय येथे उपस्थित नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : मग, आपण कामकाजपत्रिकेवर त्या खात्याच्या मंत्र्यांचा उल्लेख कशाला केला ? आजच्या कामकाजत्रिकेत अपारंपारिक ऊर्जा विभागाचा उल्लेख आहे.

डॉ.सुनील देशमुख : कामकाजपत्रिकेत तसा उल्लेख का नाही, याची मला कल्पना नाही.

(गोंधळ)

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे.

श्री.मधुकर चव्हाण : बाकीच्या खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत का ?

(गोंधळ)

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. पहिली गोष्ट म्हणजे, या संपूर्ण पुरवणी मागण्यांमध्ये अपारंपारिक ऊर्जा खात्यासंबंधीची बाब नसेल तर त्यावर बोलण्यात काय अर्थ आहे ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत :  सभापती महोदय, आपण असे कसे म्हणता ?  आम्ही त्या खात्यावर बोलू शकतो.  कामकाजपत्रिकेत एखाद्या मंत्र्यांचे खाते आलेले असेल परंतु त्या खात्याची बाब नसेल तर आम्ही असे म्हणू शकतो की, त्या खात्यासंदर्भात आपण कुठल्याही प्रकारची पुरवणी मागणी सादर केलेली नाही, आपण अपारंपारिक ऊर्जा खात्याबाबत उदासीन आहात, असे आम्हाला या खात्यावर बोलता येते.  त्यामुळे याठिकाणी आपण आम्हाला रोखू शकत नाही.  आम्ही या खात्यावर बोलू शकतो.

श्री.जयंत प्र. पाटील :  सभापती महोदय, याठिकाणी खर्चाचे पूरक विवरणपत्रामध्ये पान क्रमांक 134 वर "के-6, 2810, अपारंपारिक ऊर्जा साधने" अशी खर्चाची पूरक मागण्यांच्या वर्गवारीची अनुसूची दिलेली असून त्यावर आम्हाला याठिकाणी चर्चा करावयाची आहे.

श्री.अरविंद सावंत :  आता आपल्या अंगाशी आले का ?

**तालिका सभापती** :  परंतु कामकाजपत्रिकेवर आयटम नंबर 7 मधील क्रमांक 5 वर ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून)... असे म्हटलेले आहे.

श्री.अरविंद सावंत :  दोन्ही विभाग आहेत.  क्रमांक 5 वर ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री असे आहे व क्रमांक 9 वर अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्री असे आहे.  त्यामुळे त्या विभागाचा उल्लेख आहे.

डॉ.सुनील देशमुख :  सभापती महोदय,....

श्री.मधुकर सरपोतदार :  माझा आपेक्ष यासाठी आहे की,....

**तालिका सभापती** :  सन्माननीय सदस्य याठिकाणी जे मुद्दे उपस्थित करीत आहेत, त्याची नोंद उपस्थित मंत्र्यांनी गांभीर्याने घ्यावी व सन्माननीय सदस्य ज्या खात्यासंबंधीचे प्रश्न उपस्थित करीत आहेत, त्याची नोंद घेऊन त्या प्रश्नांस समर्पक उत्तर संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडून मिळेल याची उपस्थित मंत्रिमहोदयांनी ग्वाही द्यावी.

डॉ.विजयकुमार गावित :  सभापती महोदय, होय.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण ज्या तालिकेवर बसला आहात, त्याठिकाणाहून केवळ उजव्या बाजूच्या सदस्यांना संरक्षण देऊ नये.

**तालिका सभापती** :  मी त्यांना संरक्षण देत नाही.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. आम्ही कालपासून पाहतो आहोत की, आम्हाला संरक्षण देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाची काळजी घेतली जात आहे, त्यांचे समर्थन केले जात आहे. आपण त्यांना विचारले पाहिजे की, मंत्री गैरहजर का आहेत ? विधानसभा लवकर संपली असतांना या सभागृहात मंत्री उपस्थित रहात नाहीत. आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य रात्रभर जागे राहून वाचन करतो. एकतर या सभागृहाचे कामकाज 10/12 तास चालते, वाचन करण्यास वेळ मिळत नाही. रात्र-रात्र आम्ही हे सर्व वाचून काढतो आणि सत्ताधारी पक्ष एवढे लाईटली घेतो ? एवढा बेजबाबदारपणा आहे ? काल हाच अनुभव, आज तोच अनुभव, जनतेला एकदा कळू द्या, महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य, नंबर एकचे राज्य कसे आहे, ते बघू द्या. आम्हाला कामकाज चालवावयाचे नाही, असे नाही. किंबहुना आम्ही एवढया जिद्दीने येथे उभे राहतो तेवढे सहकार्य आम्हाला मिळत नाही.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो निश्चितपणे गंभीर आहे. कार्यक्रम पत्रिकेवर विषय आल्यानंतर, क्रमवारी ठरल्यानंतर संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी किंवा राज्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. सन्माननीय सदस्य उपस्थित करीत असलेल्या सर्व मुद्यांची नोंद घ्यावी आणि त्या मुद्यांना आपल्या भाषणात समर्पक उत्तरे द्यावीत. याची काळजी मंत्रीमहोदयांनी घ्यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी केवळ दोन बाबींवर बोलून माझे बोलणे संपवणार आहे. बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे की नाही हे मी त्यांना सांगणार नाही. आपण पुरवणी मागण्या मंजूर करण्यासाठी बसलो आहोत. यामध्ये विरोधी पक्षाचा फार मोठा रोल असतो. आंधळेपणाने तरतूद केली तर ती लक्षात आणून देण्याची जबाबदारी ही विरोधी पक्षाची असते, हे लोकशाहीचे सूत्र आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 210, बाब क्रमांक 252, अन्वये सहकारी साखर कारखान्यांच्या समभागांच्या खरेदीसाठी आदिवासी सभासदांना व्याजमुक्त कर्जे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मला याबाबतीत माहिती विचारावयाची आहे की,

....2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

आदिवासीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अशा प्रकारे त्यांना शेअर होल्डर करण्यासाठी वित्तीय सहाय्य करीत आहेत. आदिवासींचे ज्ञान वाढवून सहकारी क्षेत्रात त्यांनी काम करावे, त्याची त्यांना माहिती व्हावी, असे कोणते प्रयत्न आपण करीत आहात. याची माहिती कृपया आपण आम्हाला द्यावी.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...........

पुरवणी मागणीमध्ये 6 लाख 13 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. आदिवासी समाजाची प्रगती काय आहे ? अनेक वर्षापासून हे सुरु आहे. जो आदिवासी आहे, तो तेथेच आहे. त्याच्या अंगावरील कपडे सुध्दा सुधारलेले नाहीत, कुपोषण संपलेले नाही, भुकबळी संपलेले नाहीत. तुम्ही आदिवासींसाठी काय करता ? तुम्ही आदिवासी भागातून आलेले आहात. तुम्ही शिकलेले आहात. आदिवासी विकास भागाचे मंत्रीपद तुमच्याकडे आहे. मंत्री झाल्यानंतर तुम्ही आदिवासींसाठी कोणती कामे केली, हे जनतेसमोर यावयास पाहिजे. ज्यांना तुम्ही शेअर होल्डर बनविले त्यांना माहीत सुध्दा नाही की, त्यांना शेअर होल्डर कशासाठी बनविले. काल सभागृहामध्ये मुस्लिम समाजावर चर्चा सुरु होती. मुस्लिम समाज मागासलेला राहिला, त्याr जनतेचा काय दोष आहे ? आदिवासींवर कोटयावधी रुपये खर्च झाले तरी सुधारणा होत नाही. ही जबाबदारी कोणाची आहे ? ही जबाबदारी राज्यकर्त्यापक्षाची आहे. आदिवासींसाठी अर्थसंकल्पामध्ये निधी मंजूर केला जातो. परंतु त्या निधीचा उपयोग चांगल्या कामासाठी होत नाही. आदिवासी समाज पुढे येत नाही. आदिवासी समाजाला पुढे आणावे, अशी माझी आपल्याला विनती आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, काल सभागृह उशिरापर्यंत चालले. परंतु आम्हाला बोलण्याची संधी मिळाली नाही. तसे आज होऊ नये, अशी माझी विनंती आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज गुंडाळायचे असेल तर माझी बसण्याची तयारी आहे. मी पूरक मागण्यांचे संपूर्ण पुस्तक वाचलेले आहे. मी सर्व बाबींचा अभ्यास केलेला आहे म्हणून मी बोलत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांची काय तक्रार आहे ? सरकारी पक्षाच्या बाजूने काही बोलावयाचे नसते. कारण सर्व चांगलेच चाललेले आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर आणि बिलावर बोलण्यासाठी वेळेचे बंधन नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत.**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता 6.00 वाजलेले आहेत आणि मी आता मुद्दाम बोलण्यासाठी उभा राहिलेलो आहे. आता संध्याकाळ संपलेली आहे. आता रात्रीचा प्रहर सुरु झालेला आहे. सभापती महोदय, सकाळी सभागृह सुरु होण्यापूर्वी आपण येथे उपस्थित होतात. माननीय पंतप्रधानांनी शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना दिल्लीला बोलाविले होते, असे काल खालच्या सभागृहात सांगण्यात आले. 27 तारखेच्या बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला ? सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्र्यांनी आज संध्याकाळपर्यंत निवेदन करावे, असे आपण निदेश दिले होते. आता 6.00 वाजलेले आहेत. अद्याप निवेदन आलेले नाही. शेक-यांच्या कर्ज माफीचा प्रश्न संवेदनशील आहे. आम्ही सभागृहामध्ये शैतक-यांच्या व्यथा मांडलेल्या आहेत. 27 तारखेच्या बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला हे आम्हाला समजले पाहिजे. सभापती महोदय, आपण 10 मिनीट सभागृहाचे कामकाज स्थगित करुन संसदीय कार्य मंत्र्यांना सभागृहात बोलवावे. हे चटावरचे श्राद्ध आहे. आज पुरवणी मागण्या झाल्यानंतर उद्या विनियोजन विधेयक येईल. म्हणजे सरकारचे काम झाले. सभापती महोदय, आपण शासनाला निर्देश द्या. शासनाने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MMP/ प्रथम श्री.बोरले.... 18:10

श्री.हर्षवर्धन पाटील : दिनांक 27 नोव्हेंबर,2007 रोजी दिल्लीला बैठक झाली,त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री उपस्थित नव्हते कारण माननीय मुख्यमंत्री महोदय हे नाशिकला राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाला उपस्थित होते, आजही ते नाशिकमध्येच आहेत. काही वर्तमानपत्रांमध्ये अशी बातमी आलेली आहे की, माननीय मुख्यमंत्री नवी दिल्ली येथे होणा-या शेतक-यांच्या आत्महत्येसंदर्भातील बैठकीस उपस्थित राहणार आहेत. दिल्ली येथे झालेल्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री यांना बोलाविले नव्हते आणि ते काल दिल्लीला उपस्थित नव्हते, हे रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. यासंदर्भामध्ये जी बैठक दिल्लीला झाली त्या बैठकीला कोण होते, ही माहिती माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही. त्या बैठकीमध्ये काय झाले, यासंदर्भात अद्यापि आपल्याकडे ऑफिशियल कम्युनिकेशन आलेले नाही. ते आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावरील चर्चेला ज्यावेळी सभागृहामध्ये उत्तर देतील त्यावेळी खुलासा करतील. आपले आधी ठरल्याप्रमाणे प्रथम कृषीमंत्री, नंतर सहकार मंत्री आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आता या ठिकाणी जे निवेदन केले त्याबद्दल मला एवढेच म्हणावयाचे आहे की, मी माझ्या भाषणामध्ये माननीय महामहीम राष्ट्रपती महोदया ज्यावेळी अमरावती येथे आल्या होत्या त्यावेळी त्यांनी पण शेतक-यांच्या आत्महत्येविषयी आत्मीयतेने चौकशी करुन चिंता व्यक्त केली होती. मी असे म्हणालो होतो की, राष्ट्रपतींनाही शेतक-यांच्या आत्महत्येविषयी चिंता आहे. हा प्रश्न कोणत्याही प्रश्नाच्या पलिकडे व प्रोटोकॉलच्या पलिकडे जाऊन महत्वाचा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये शेतक-यांची आत्महत्या या विषयावरील चर्चेला उत्तर देतांना असे अधिकृतपणे जाहीर केले होते की, दिनांक 27 नोव्हेंबर, 2007 रोजी नवी दिल्ली येथे होणा-या शेतक-यांविषयीच्या केंद्राने आयोजित केलेल्या बैठकीला ते उपस्थित राहणार आहेत. त्या बैठकीचे त्यांना निमंत्रण आहे, हेही त्यांनी त्यांच्या घोषणेमध्ये सांगितले होते. तरीही ते या बैठकीला उपस्थित न राहता नाशिक येथे माननीय राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाला हजर राहिले आणि सदर बैठकीचे निमंत्रण नसल्याचे आम्हाला याठिकाणी सांगितले गेले.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार ):** सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय मुख्यमंत्री नवी दिल्ली येथे दिनांक 27 नोव्हेंबर,2007 रोजी होणा-या बैठकीला उपस्थित राहण्याबाबतचा मुद्दा प्रथम उपस्थित केला होता. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी आताच सविस्तर खुलासा केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी त्या मुद्दयापुरतेच याठिकाणी बोलत आहे. तुम्ही मला समजून घ्या. यासंबंधी जे निवेदन माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी केलेले आहे ते अत्यंत विरोधी आहे व त्यांनी ते रेकॉर्डवर आणलेले आहे. म्हणून मलाही या ठिकाणी असा मुद्दा मांडावयाचा आहे की, मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देत आहे. त्यांनी सरकारची बाजू रेकॉर्डवर येण्यासाठी उपरोक्त खुलासा केलेला आहे. परंतु माननीय राष्ट्रपती महोदयांनी या महाराष्ट्रातील शेतक-यांबद्दल चिंता व्यक्त केलेली असतांना शेतक-यांच्याबाबत असलेल्या दिल्लीच्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री गेले नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राष्ट्रपतींना दिल्ली येथील बैठकीला उपस्थित राहण्याबद्दल जर विनंती केली असती तर बरे झाले असते कारण शेतक-यांची आत्महत्या हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. परंतु यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांच्याबाबतीतील दिल्ली येथील बैठकीला उपस्थित न राहून व नाशिक येथील माननीय राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून शेतक-यांचा प्रश्न महत्वाचा मानला नाही, एवढे आमच्या लक्षात आणून दिल्याबद्दल मी मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येवरील चर्चेला उत्तर देतांना मी उपस्थित होतो. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री असे बोलले की, दिनांक 27 नोव्हेंबर,2007 रोजी नवी दिल्ली येथे केंद्राने शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावर एक बैठक आयोजित केलेली आहे. माननीय मुख्यमंत्री या बैठकीला जाणार आहेत किंवा तेथे त्यांना बोलाविले आहे, वगैरे असे काही ते बोलले नाही. हे रेकॉर्डवर येणे महत्वाचे आहे, याकरिता मी हा खुलासा केलेला आहे.

**तालिका सभापती** : पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी आता माझ्याकडे एकूण 20 सन्माननीय सदस्यांची नावे आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांनी कमीत कमी वेळ घेतला तरी पाच तास लागतील. पुन्हा आपल्या निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना द्यावयाचा निरोप समारंभ राहून

...3



JPK/ MMP/ प्रथम श्री.बोरले.... 18:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाईल. म्हणून माझी आपणा सर्वांना एक नम्र विंनती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांना पूरक मागण्यांवर बोलण्याचा हक्क आहे परंतु मुद्यांची पुनरावृत्ती न करता नेमक्या बाबीसंबंधी काय बोलावयाचे आहे तेवढेच बोलून सभागृहाचा वेळ योग्य कारणी लावावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवृत्त होणा-या सदस्यांकरिता जो निरोप समारंभ आहे तो अतिशय सन्मानाने करण्यात आला पाहिजे. अशा प्रकारे घाईधाईत नव्हे, हे आम्हाला पटत नाही आहे. पुरवणी मागण्या झाल्यानंतर आपण त्यांच्या निरोप समारंभाविषयी बोलणे उचित नाही. निवृत्त होणा-या सदस्यांच्या निरोप समारंभाकरिता उद्या सकाळी स्पेशल सिटींग घेण्यात यावे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ MMP/ SBT/ पूर्वी कु.खर्चे 18:15

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे की, नागपूर येथील अधिवेशन दोन आठवडयात गुंडाळले जाते. ही बाब सभागृहाच्या वैधानिक कामकाजाला धक्का देणारी आहे. सर्व कामकाजाला आपण न्याय देऊ शकत नाही. परिणामी 10-12 तास सदनामध्ये बसावे लागते. निरोप समारंभाबाबत कै.प्रमोद नवलकर यांच्याबाबत जे घडले आहे ते आम्हाला माहिती आहे. त्याची पुनरावृत्ती पुन्हा या सदनात होऊ नये. या सदनाच्या प्रथा व परंपरा सांभाळल्या जात नसल्याची खंत त्यांनी शेवटच्या लेखात व्यक्त केली होती. हे कोणाला झोंबत नाही का ? सर्व संवेदना संपल्या आहेत का ? जाता-जाता त्यांच्या शेवटच्या आर्टीकलमध्ये त्यांनी याबाबतचा उल्लेख केला होता.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ क्र.233 बाब क्रमांक 283 वर मी बोलू इच्छितो. परंतु या विषयाशी सबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाही, त्यामुळे मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

PNG/ MAP/ MMP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधा पक्ष नेता) : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नुकतीच मला एका विषयाची माहिती मिळाली आहे. खामगाव तालुक्यात ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. तेथे बुलढाणा जिल्हयात बहुतेक ठिकाणी महाराजा नेटवर्क नावाचे स्थानिक चॅनल आहे. याद्वारे देशातील व महाराष्ट्रातील सर्व वाहिन्यांचे कार्यक्रम उदा.आयबीएन-7, सहारा न्यूज वगैरे टी.व्ही.वर दाखविले जातात. यासाठी तेथील नागरिक महाराजा नेटवर्कला पैसे देतात. परंतु महाराजा नेटवर्क हे त्यांच्या मालकीचे असून त्यांच्याविरुध्द बातमी आल्यामुळे त्यांनी आज पूर्ण चॅनल बंद करुन टाकले आहे. अनेक लोकांचे मला फोन आलेले आहेत. लोकशाहीमध्ये लोकांना हे अपेक्षीत नाही. अशा पध्दतीने जर पैसे ग्राहकांना देऊनही चॅनलची सोय मिळत नसेल मोठ-मोठे चॅनल, इलेक्ट्रॉनिक मिडीया न्यूज प्रसारीत करु शकणार नाही. सध्या बुलढाणा जिल्हयात महाराजा नेटवर्कने प्रसारण बंद केलेले आहे. दुसऱ्या न्यूज चॅनलवरील बातम्या लोकापर्यंत प्रसारीत होत नाहीत. या नेटवर्कवर गुन्हा रजिस्टर होत नाही. या चॅनलची किती दादागिरी चालणार आहे, सभागृहात उपस्थित असलेले माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी याची दखल घेतली पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबत जिल्हाधिकारी यांना चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येतील, कायद्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे अधिकार आहे. संबंधितांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.

यानंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

Dr.M.A.Aziz (Nominated): Sir, I am supporting the Supplementary Demands presented by the Government in this august House today. Sir, firstly, I will express my views on the demands of the Home Department. Sir, I would draw the attention of the Hon. Minister to Item No.4, Page No.12. Sir, a provision of Rs.40, 99,000/- is made for the purchase of Law Books for Public Prosecutors. The Government has decided to provide Law Books to all Public Prosecutors to update and keep knowledge of various Acts. सभापती महोदय, याप्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाला असावा असे मला वाटते.

Sir, then, I would draw the kind attention of the Hon. Minister for Home to Item No.13, Page No.12. The Item 13 is about to make additional provision for expenditure incurred for publishing advertisement for recruitment of Class III and Class IV posts. The provision is of Rs.32, 00,000/-. सभापती महोदय क्लास 3 आणि क्लास 4 याकरिता एका वर्षामध्ये 2 ते 3 वेळा जाहीरात देण्यात येते त्यामध्ये 32 लाख रुपयांचा खर्च झालेला आहे.

Sir, Item No.14, Page No.12. A Supplementary demand of Rs. 1, 00, 00,000/- is made for providing service charges to the third party Administrator of Maharashtra Police Kutumb Arogya Yojana. ही योजना ठीक आहे.

Sir, then I would like to draw your kind attention to Item No.15, Page 12. This item contains an additional provision for installation of Close Circuit Cameras Televisions in Mantralaya. The provision is of Rs. 40, 00,000/-. सभापती महोदय, यासंदर्भात मला काही सांगावयाचे नाही. पोलीस ठाणी अप टू डेट करण्यासाठी क्लोज सर्कीट कॅमेरा बसविण्यात आले आहे. आपण पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर आपल्याला दिसून येईल की, एका भिंतीवर अजनेर दर्ग्याचा, फोटो आहे तर दुसऱ्या भिंतीवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हाजीअली यांचा फोटो आहे. काही ठिकाणी आपल्याला भगवान श्रीराम, हनुमान, लक्ष्मीदेवी यांचे देखील फोटो दिसून येतील. असे फोटो पोलीस स्टेशनमध्ये लावणे योग्य नाही. पोलीस स्टेशनमध्ये वेगळे वातावरण निर्माण होते. आपले राज्य हे सेक्युलर आहे. त्यामुळे हे सर्व फोटो आपण काढून टाकण्यासंबंधी कार्यवाही करावी अशी माझी गृह मंत्र्यांना विनंती आहे.

Sir, now, I will express my views on the demands of the Medical Education Department. Sir, with your kind permission, I would like to draw the kind attention of the Hon. Minister for Medical Education and Drugs Department to Item No.220, Page No.179. Sir, in this item, an additional provision is made for purchase of various Machineries and equipments for Government Medical and College Hospital, Miraj (Rs.4, 00, 00,000/-.) This provision has been made for the purchase of following essential materials and equipments i.e. 400 Beds, 400 Bed Lockers, 30 Big Tables, 10 Chairs and 30 cupboards for Nursing Station. The next item of purchase is about 36 and 20 Special Cots and other Heavy materials for Intensive Care Unit Surgery and Medicines, P.I.C.U and N.I.C.U. respectively.

सभापती महोदय, एका युनीट करीता 5 लेक्चरर्सची प्रोव्हीजन होती. यासाठी 4 कोटी रुपयांचे मटेरियल खरेदी करण्यात आले. आपण एवढया मोठया प्रमाणामध्ये मशिनरी खरेदी केलेली आहे परंतु ती मशिनरी उपयोगात आणणाऱ्या लोकांचा आपण कधीच विचार करीत नाही. सर जे.जे. हॉस्पीटलमध्ये मोठमोठी मशिनरी अशीच पडून आहे. तेव्हा मिरज वैद्यकीय रुग्णालयासाठी ही जी तरतूद केलेली आहे त्यामध्ये ही मशिनरी कोण वापरणार आहे ? त्यासाठी लेक्चरर्स, टेक्निशिअन्स इ.चा कोठेही उल्लेख यात आपण केलेला नाही. तेव्हा याबाबत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे एवढेच मला सांगावयाचे आहे. धन्यवाद.

............

यानंतर श्री. सुंबरे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात काही ठराविक मुद्यांबाबत 5-7 मिनिटे बोलणार आहे. सभापती महोदय, बाब क्रमांक 15 व 20 - आता आपण जे मांडले त्यात दोन विषय महत्त्वाचे मी मानतो. या सगळ्या व्यवस्थेची गरज आहे परंतु त्याचबरोबरदुर्दैवाने गृहखात्याचा कारभार किती बेदरकार चालला आहे, किती दादागिरीने चालला आहे ते मी येथे सांगणार आहे.

सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यामध्ये काल परवाकडे ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या. आपण तंटामुक्त गाव करायला निघाला आहात म्हणून मी आपल्याला मुद्दाम हे सांगत आहे. या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये तेथे राष्ट्रवादी काँग्रेसची मंडळी पराभूत झाली आणि म्हणून तेथील श्री.प्रमोद केंदाळे यांनी दोन अनुसूचित जातीच्या माणसांची, कार्यकर्त्यांची हत्या केली. श्री.विलास लवदे, वय 28 आणि श्री.ज्ञानेवर नामदेव मायंदळ अशी त्या दोघांची नावे आहेत. मी या दोघांच्याही घरी गेलो. त्यातील एक धनगर समाजातील आहे तर दुसरा अनुसूचित जातीमधील आहे. अतिशय गरीब कुटुंबातील हे दोघेही होते. त्यांच्या कुटुंबियांनी मला काय सांगितले ? तर ते म्हणाले की, आम्हाला कोठलीही मदत नको. पण ज्यांनी ही हत्या केली आहे त्यांना शिक्षा झाली पाहिजे. म्हणजे तुमच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर त्यांचा विश्वास राहिलेला नाही, हत्या करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होईल का याचीच त्यांना चिंता होती. सभापती महोदय, कोणाच्या आशीर्वादाने हे सारे चालले आहे ? काल परवा राहूरीमध्ये श्री.पोपट पवार आणि खुळे या दोघांनाही मारहाण करण्यात आली. वाळू उत्खननाच्या प्रकरणातून हे झाले. खरे तर वाळूचे उत्खनन दिवसा उजेडी करावयाचे असते पण तेथे दिवस रात्र हे काम केले जाते आणि 500 ब्रास वाळू काढण्याची परवानगी असली तरी प्रत्यक्षात 5 हजार ब्रास वाळू काढली जाते आणि म्हणूनच हे काम रात्री केले जाते आणि हे सारे राज्यकर्त्यांच्या पाठिंब्याने चालले आहे. गृह खात्याचा कारभार उघड्या डोळ्याने आंधळ्यासारखा सुरू आहे. म्हणून मी या बाबीकडे आपले या निमित्ताने लक्ष वेधतो आहे. सभापती महोदय, अहमदनगर शहरापासून जवळच भिंगार हे गाव आहे. तेथे श्रीमती इंदूबाई बोरकडे हिच्या घरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री.जाकीर शेख दिवसा घरामध्ये शिरले आणि तिला मारहाण केली. तिला धमक्या दिल्या. त्या धसक्याने त्या बाईचे निधन झाले आहे पण आजही तो माणूस गावात मान ताठ करून फिरतो आहे. सभापती महोदय, नेवासे

....... 4एफ 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

गावात कोहाते नावाचा एक कार्यकर्ता आहे. त्याला निवडणुकीत पराभव झाला म्हणून प्रचंड मारहाण केली. चांगदेव माधव कोहाते याच्यावर तलवारीचे वार आहेत. पण तरीही तीन दिवस त्याची तक्रार लिहून घेतली गेली नाही. जिल्हा हॉस्पिटलमध्ये त्याला भरती करण्यात आले आहे, तेथे मी त्याला भेटण्यास गेलो असता त्याची एकूण स्थिती पाहून आणि माहिती घेतल्यानंतर रात्री 12 वाजता तेथील एस.पीं. ना मी फोन लावला. त्यावेळेस ते नेमके नेवासे पोलीस ठाण्यामध्येच होते. मी त्यांना म्हटले की, तुमच्या नेवाशामध्ये या श्री.कोहकांची तक्रार घेतली गेली नाही, त्यांना बरीच मारहाण झाली आहे, त्यांच्यावर तलवारीने वार झाले आहेत आणि आज तो माणूस मरणासन्न स्थितीत आहे. पण त्याची जबानी देखील अजून घेतली नाही, ही कोठली आपली कायदा व सुव्यवस्था आहे ? ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

त्याला इतके बेधुंदपणे मारले आहे तरीसुध्दा त्याची जबानी घेतली जात नाही. असे असतांना आपण राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे असे म्हणता? त्यानंतर एस.पी.यांनी दखल घेतल्यानंतर त्याची रात्री जबानी घेण्यात आली. त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला नाही. कुठे आहे आपली कायदा व सुव्यवस्था? अशाप्रकारची दादागिरी करणारे कोण आहेत? अशाप्रकारे श्री. चांगदेव महादेव कोहत यांच्यावर वार केले असतांना, त्यांची हत्या करणारा हल्ला झालेला असतांना कलम 306 चा गुन्हा दाखल करण्यात आला. आता तो बरा झाला असून अजून उभाही राहू शकत नाही. गृह खात्यामार्फत क्लोज सर्किट टी.व्ही. लावणार आहात. काय करावयाचे आहेत? संजय उवाच, त्याठिकाणी काय चालले आहे ते आपल्याला दिसले पाहिजे. प्रत्येक पक्षाची दादागिरी चालली आहे, इतका बेदरकारपणे कारभार चालला आहे. मी कॉंग्रेसमधील माणसांबद्दल बोलत नाही. सभापती महोदय, आपण पुण्यामध्ये त्यांची दादागिरी ऐकत असाल, त्याविषयी मी भाष्य करीत नाही.सभापती महोदय, मी फक्त नगर जिल्हयापुरते बोलतो. नगर जिल्हयातील रहाते येथील शिवसेनेच्या तालुका प्रमुखांचे घर जाळण्यात आले. त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी कारवाई करावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 29 वर पोलीस गृहनिर्माणाकरिता मागणी करण्यात आली आहे. या मागणीच्या निमित्ताने वरळीच्या बी.डी.डी. चाळीचे वर्णन करता येईल. त्या संदर्भात मी आयुक्तांना पत्र लिहिले की, या चाळींची दुरुस्ती माझ्या स्थानिक विकास निधीमधून करावी. परंतु आजपर्यंत कारवाई झालेली नाही. या कामासाठी जर आम्ही आमचा आमदार निधी वापरण्यासाठी देत आहोत तर त्याचा आपण वापर करावा अशी माझी सूचना आहे. सभापती महोदय, बाब क्र. 67 मध्ये शासकीय दूध योजना पुणे येथे दूध निर्जंतुकीकरण सयंत्र बसविण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. शासकीय दूध योजनेमध्ये रोजंदारीवर काम करणारे तरुण कायम सेवेत घेण्याकरिता गेल्या तीन-चार वर्षापासून सतत मागणी करीत आहेत. याबाबत माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांनी असे उत्तर दिले की, "जैसे ही मंजूरी मिलेगी इन सब को हम नियमित कर देंगे". 25 वर्षे सेवा झाली तरी आज सुध्दा नागपूरच्या दूध योजनेतील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेतले जात नाही. यानिमित्ताने मी ही मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 108 मध्ये शासकीय विश्रामगृहांच्या बांधकामांकरिता मागणी करण्यात आली आहे. आपण नेहमी पुण्यात असता, तेथील इन्सपेक्शन बंगल्याची काय अवस्था



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. अरविंद सावंत...

आहे हे आपणास माहीत आहे. पुण्याला एक सर्किट हाऊस मंत्र्यांकरिता राखीव आहे तर दुसरे सर्किट हाऊस हे कायम जज्जेसच्या नावावर असते. त्याठिकाणी चार वातानुकूलित कक्ष असून त्यामध्ये कायम मंत्र्यांचे नातेवाईक मुक्कामाला असतात. आणि आमदारांना मात्र इन्सपेक्शन बंगल्यामध्ये आरक्षण दिले जाते. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनाही इन्सपेक्शन बंगल्यामध्ये घाणीत पाठविण्यात आले.त्या बंगल्यामध्ये एकही कक्ष वातानुकूलित नाही. या प्रश्नामध्ये आपण तातडीने लक्ष घालावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 122 व 123 मध्ये ग्रामीण रुग्णालयांकरिता मागणी करण्यात आली आहे. काल वर्ध्याला जात असतांना एका महिलेला रस्त्यामध्ये अपघात झाला. त्यावेळी त्या महिलेला उचलून तळेगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेले. तेव्हा त्या प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था इतकी वाईट होती. याठिकाणी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना विनंती करतो की, आपण राज्यात जी काही बांधकामे करणार आहात त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींच्या नूतनीकरणाची कामे प्राधान्याने करावीत आणि ही केंद्रे सुंदर बनवावीत अशी मागणी करतो. सभापती महोदय, बाब क्रमांक 143 मध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळास आपण 64 कोटी 80 लाख रुपये दिले आहेत त्याबद्दल मी धन्यवाद देतो. या निधीचा विनियोग आपण कसा करणार आहात ते आम्हाला सांगावे? सभापती महोदय, बाब क्रमांक 149 मध्ये साठवण बंधारा आणि कोल्हापूर बंधाऱ्यासाठी तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 180 मध्ये बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतु कोकणातील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी एक दमडीही दिली जात नाही. याठिकाणी कोल्हापूर बंधारे एकेक कोटींचे बांधले जातात. आणि आमच्याकडे कोकणात तर 10 ते 20 लाखांचे असतात. ते सुध्दा आपण बांधण्यास तयार नाहीत. आपण कोकणावर आणखी किती अन्याय करणार आहात ते तरी एकदा जाहीर करुन टाका.

सभापती महोदय, बाब क्रमांक 228 च्या निमित्ताने मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो की, ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील सर्व अंगणवाडयांना गॅसचे कनेक्शन देण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व अंगणवाडयांना गॅस कनेक्शन दिल्यास जंगलातील लाकूड तोड थांबेल, प्रदूषण थांबेल. याकरिता आपण प्रयत्न करावेत अशी मागणी करतो.

(यानंतर श्री. बरवड)

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

आपण ती पूर्ण कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मला आधी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. चंद्रकांत रघुवंशी ( धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. प्रथम मी आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 196 वरील बाब क्रमांक 227 बाबत बोलणार आहे. यामध्ये डहाणू नगरपरिषदेच्या संदर्भात 2 कोटी 63 लाख 45 हजार रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, नंदूरबार नगरपालिकेचा प्रस्ताव सुध्दा राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. तो 2 कोटी 64 लाख रुपयांचा प्रस्ताव आहे. त्याचा समावेश या पुरवणी मागण्यांमध्ये व्हावयास पाहिजे होता परंतु तो झालेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी त्याचा समावेश करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 210 वरील बाब क्रमांक 252 बाबत बोलणार आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या समभागांच्या खरेदीसाठी आदिवासी विकास विभागातर्फे 6 लाख 13 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. नंदूरबार येथील पुष्पदंतेश्वर सहकारी साखर कारखान्याची 83 लाख रुपयांची मागणी शासनाकडे प्रलंबित आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी जनतेला आश्वासन दिले होते की, आम्ही तात्काळ एक महिन्याच्या आत ती रक्कम उपलब्ध करुन देऊ परंतु त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. त्याचा सुध्दा यामध्ये समावेश करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेला असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे. प्रथम मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 224 वरील बाब क्रमांक 271 बाबत बोलणार आहे. प्रत्येक तालुक्यात एक आय.टी.आय. ही शासनाची संकल्पना आहे. ही अतिशय स्तुत्य संकल्पना आहे. परंतु आता लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे किमान 15 लाख लोकसंख्येच्या तालुक्याला, मोठ्या शहरांसह किमान 5 आय.टी.आय. असले पाहिजे. प्रत्येक तालुक्यामध्ये ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने लोकसंख्या असेल त्या ठिकाणी जर पाच पाच आय.टी.आय. असतील तर जास्त योग्य होईल. ग्रामीण भागामध्ये त्याची जास्त आवश्यकता आहे. सध्या राज्यातील अनेक संस्थांमध्ये तसेच शासनाच्या कॉलेजेसमध्ये आय.टी.च्या शिक्षणाची सोय आहे. अनेक विद्यार्थ्यांचा त्याकडे कल आहे. त्यामध्ये सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरचे इंजिनियर्स तयार होतात. तशी महाविद्यालये सुध्दा आहेत. परंतु इलेक्ट्रॉनिक्स वस्तू काही कालावधीनंतर स्क्रॅपमध्ये जातात. त्यांची विल्हेवाट कशी लावावी आणि त्यातून नवीन वस्तू कशा तयार करावयाच्या याचे शिक्षण अद्याप कोठेही दिले जात नाही. याबाबत नवीन टेक्निक विकसित करावे आणि तसे कोर्सेस सुरु करावेत अशी माझी सूचना आहे. सध्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये सी.ई.टी परीक्षा देऊन विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शाखांमध्ये वेगवेगळ्या कॉलेजेसमध्ये प्रवेश दिले जातात. त्यांना मेरिटप्रमाणे प्रवेश दिले जातात. मेरिटप्रमाणे पहिली यादी, दुसरी यादी, तिसरी यादी अशा याद्या लावल्या जातात. पहिल्या यादीमध्ये जी शाखा मागितली असेल ती मिळतेच असे नाही. अशा वेळेला दुसऱ्या यादीमध्ये त्या विद्यार्थ्याला ती शाखा मिळते. दुसऱ्या यादीमध्ये ती शाखा मिळाल्यानंतर तो विद्यार्थी त्या शाखेमध्ये प्रवेश घेतो. तसेच त्या विद्यार्थ्याने पहिल्या यादीप्रमाणे दुसऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला असतो व त्यासाठी फी भरलेली असते. पण संबंधित संस्थाचालक फी रिफंड करत नाहीत. ते ताबडतोब फी परत देत नाहीत. अतिशय विनवणी केल्यानंतर 40 ते 80 टक्के पैसे कापून तुटपुंजी फी परत करतात. याबाबतीत माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यानी जरुर लक्ष घालावे. अशा विद्यार्थ्यांना पाच ते दहा दिवसांमध्ये फी परत करण्याचे आदेश माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावेत अशी मी माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना विनंती करते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:40

(श्रीमती सुधा जोशी...)

या मागणीद्वारे मी शासनाला आणखी एक विनंती करणार आहे की, आय.टी.आय.प्रमाणे प्रत्येक तालुक्यामध्ये शासनाचे पॉलिटेक्निक्स सुरु करणे गरजेचे आहे, त्या शिवाय सामान्य कुटुंबातील मुलगा इंजिनिअर होणार नाही. म्हणून प्रत्येक तालुक्यामध्ये पॉलिटेक्निक्स सुरु करावे अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र. 74 वरील बाब क्रमांक 93कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधते. राज्यातील मार्ग व पुलांच्या परिरक्षण आणि दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या ठिकाणी मला राज्यातील रस्त्यांबाबत बोलायचे आहे. या राज्यातील एकेका रस्त्यावर अनेक वेळा कोटयवधी रुपये खर्च होत असतात कारण त्या रस्त्यांची कामे इतकी निकृष्ट असतात की नाईलाजास्वत त्या रस्त्यांवर पुन्हा पुन्हा खर्च करावा लागतो. अशा प्रकारचे निकृष्ट रस्ते तयार होतात, परंतु त्यांची बिले मात्र ठेकेदारांना नियमितपणे आणि ताबडतोबीने पाठविली जातात. तेव्हा या बाबतीत तपासणी होते की नाही असा प्रश्न उद्‌भवतो. सांगली जिल्ह्यातील मिरज ते सलगरे हा रस्ता एक वर्षापूर्वी तयार करण्यात आला. तरी देखील या रस्त्याची अतिशय दुर्दशा झालेली आहे. या रस्त्यावर खूप खड्डे पडलेले आहेत. हे खड्डे पडलेले आहेत की नाहीत, हे अधिका-यांनी तपासून घ्यावे. हे खड्डे कंबरडे मोडणारे स्पीड ब्रेकर्स आहेत असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. एका महिन्याच्या आत या रस्त्यावरील खड्डे भरावेत अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करते.

सभापती महोदय, महत्वाची बाब अशी की, अनेक ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर रस्ते केलेले आहेत. त्या रस्त्यांवर टोल घेतले जातात. ते टोल किती वर्षे घेतले जाणार आहेत ? त्यामध्ये पारदर्शकता येण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत नागरिकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. सध्या रस्त्यांवर घेतला जाणारा टोल हा सामान्य माणसांना परवडत नाही. त्यामुळे हा टोल कमी करण्याची आवश्यकता आहे.

पृ.क्र. 82 वरील बाब क्रमांक 108कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधित आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक बांधकाम विभागाची विश्रामगृहे ही अतिशय दुर्लक्षित आणि बिकट अवस्थेत आहेत. त्यांच्या देखभालीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यामध्ये आवश्यक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती सुधा जोशी...)

अशी सुधारणा होत नाही. तेव्हा याबाबतीत देखील विचार झाला पाहिजे. मागे मी मुरुड-जंजि-याच्या शासकीय विश्रामगृहाबाबत बोलले होते. आता त्या ठिकाणी थोडीशी सुधारणा झालेली दिसत असली तरी एकंदरीत अवस्था बिकट आहे.

पर्यटन विभागाच्या पृ.क्र. 242 वरील बाब क्रमांक 294कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी निधीची तरतूद केलेले आहे. ऐतिहासिक वास्तुंचे जतन करणे आवश्यकच आहे. त्यासाठी निधी देखील आहे. परंतु या निधीतून एखादे जुन्यात जुने असे पर्यटन स्थळ जतन करणे आवश्यक आहे. माथेरानची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.........

सभापती महोदय, बाब क्र.294, पृ.क्र.242 वर राज्यातील अनेक ठिकाणी पर्यटन स्थळांचा दर्जा देऊन विकास केला जात आहे ही गोष्ट चांगली आहे. माथेरानच्या पर्यटन स्थळाला वेगळे आकर्षण आहे. त्याठिकाणी म्हणावा तसा विकास झालेला नाही. तेथील झाडी नष्ट होत आहे. माथेरानला चांगले पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याची आवश्यकता आहे. सांगली जिल्हयातील दंडोबाचा डोंगर हे एक ठिकाणी आहे. त्या ठिकाणाला पर्यटनाचा दर्जा देऊन या डोंगराला पर्यटन स्थळ म्हणून जाहीर करावे आणि योग्य तो विकास करावा अशी मी मंत्रीमहोदयांना विनंती करते.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्र.26 मंत्रालयातील सातव्या मजल्यावर वातानुकूलित कार्यालय करण्याबाबत पुरवणी मागणी सादर केली आहे. या संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबईतील झोपडपट्टी विभागांमध्ये अनेक पोलीस स्टेशन्स आहेत. त्या पोलीस स्टेशन्सची दुरावस्था झालेली आहे. पुरेशी जागा नाही अशी स्थिती आहे. ही सर्व पोलीस स्टेशन्स सुधारण्याची आवश्यकता आहे. पुरेशी जागा उपलब्ध करुन देऊन तेथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. पोलीस स्टेशनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चहापानाची सोय नाही. आसपास चहाच्या टपऱ्या असतात. त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये चहापानाचे स्टॉल्स असणे आवश्यक आहे. असे स्टॉल्स अपंगांना किंवा निवृत्त पोलीस कर्मचा-यांना चालविण्यास द्यावेत एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक-15, बाब क्रमांक-20 संबंधी मी बोलू इच्छिते. महात्मा गांधी तंटामुक्त गाव हा विषय आहे. तंटामुक्ती गाव पातळीवर करण्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे. नागपूरमधील आणि महाराष्ट्रातील इतर महिला संघटनांची निवेदने माझ्याकडे आलेली आहेत. ज्यामध्ये शासनाने जाहीर केले होते की, तंटामुक्ती कुटुंबामध्ये देखील व्हावी या दृष्टीकोनातून हेतू चांगला आहे. परंतु कलम 498 अ यासंबंधी आपण म्हटले आहे की, या केसीस तंटामुक्ती गाव मोहिमेमध्ये हाताळण्यात येऊ नयेत. महिला विकास परिषद, विदर्भ प्रदेश यांनी दिलेले निवेदन माझ्याकडे आहे. त्याकडे मी माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. तंटामुक्ती गावाच्या संकल्पनेमध्ये गाव पातळीवर महिला जरुर असाव्यात. महिला-महिलांमधील तंटे सोडविण्यास काहीच हरकत नाही. परंतु कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भात कलम 498 अ नॉन कम्पाऊंडेबल असल्यामुळे त्याच्यात बदल करुन केंद्राकडे परवानगी मागण्याचा निर्णय कॅबिनेटने घेतला. त्यामध्ये बदल करावा अशी मागणी आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

अन्यथा महिला संघटनांच्या आंदोलनाला माननीय गृहमंत्र्यांना सामोरे जावे लागेल व या आंदोलनाची सुरुवात सांगलीतून होईल. याचे कारण असे आहे की, पुरुष मुक्ती संघटनेने सांगलीत माननीय गृहमंत्र्यांना दीड वर्षापूर्वी बोलावले होते. त्यावेळी आपले निवेदन आम्ही वाचले होते व त्या निवदेनावर आम्ही विश्वास ठेवला होता. दैनिक लोकसत्तेमध्ये आपण असे सांगितले होते की, मी कुठल्याही परिस्थितीत 498 (ए) रद्द करण्यासाठी काहीही करणार नाही. परंतु आता कॅबिनेटने निर्णय घेतल्यामुळे आम्ही साशंक झालेलो आहोत त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी स्पष्टीकरण द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पोलीस रिफॉर्मच्या संदर्भात फार मोठया प्रमाणात समर्थनशी संबंधित 50 पत्रकारांनी एक मोठे अभियान केलेले आहे. त्यानुसार आपण कोर्टात जाऊन कुठले कुठले पोलीस रिफॉर्म्स करणे आम्हाला शक्य नाही यासंदर्भात शासनाने स्वतःचे म्हणणे मांडलेले आहे. शासनाच्या अडचणी आम्ही समजू शकलो तरी देखील पोलीस रिफॉर्म्स मध्ये राज्य सुरक्षा आयोगाची स्थापना, पोलीस महासंचालकांचा कार्यकाल निश्चित करणे, तसेच कायदा सुव्यवस्था आणि गुन्हे प्रकटीकरण या दोन स्वतंत्र शाखा असाव्यात या पध्दतीच्या ज्या सूचना समर्थन संस्थेने तसेच 50 पत्रकारांनी केलेल्या आहेत त्याचा अहवाल आपल्याकडे पोहचला असेल तरी सुध्दा मी माननीय सभापतींच्या मार्फत अभिव्यक्ती समर्थनचा जनमित्र पोलीस अभियान, 2007-2008 हा अहवाल आपल्याला सुपूर्द करते. माननीय गृहमंत्री या अहवालाचा उपयोग करतील अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 96 वरील पुलांची सोय यासंदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबीमध्ये जेथे जेथे पुलांची आवश्यकता आहे त्या त्या संदर्भात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. संबंधित मंत्री जर पुण्याहून इंदापूर मार्गे सोलापूरला गेले असतील तर इंदापूर येथील जो पूल आहे तो भीषण अवस्थेत आहे. हा पूल संपूर्णतः डगा-डगा हालतो आहे. या पुलावर एखादे वाहन जर अडकले तर संपूर्ण पूल मोडकळीस येऊ शकतो. सोलापूरला जोडणारा पुण्यातून जाणारा इंदापूर हा एकमेव पूल आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

हा पूल नसेल तर जेजूरी मार्गे ये-जा करावी लागेल व त्यामुळे 50 कि.मी. ने अंतर वाढू शकेल. सोलापूरकडे जाणा-या रस्त्यावरील इंदापूरचा जो पूल आहे त्याची त्वरित पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता आहे. हा पूल पडला तर फार भयानक दुर्घटना होऊ शकते त्यामुळे या पुलाची त्वरीत पुनर्बांधणी करावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, अनेक ठिकाणी शासनाने राज्य महामार्ग चांगल्या प्रकारे बांधलेले आहेत. परंतु पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे वर जशी आपण 100-150 कि.मी. अंतरावर आपण महिला आणि पुरुष यांच्यासाठी स्वच्छता गृहे बांधलेली आहेत तशाच प्रकारची स्वच्छता गृहे पुण्यापासून कोल्हापूर पर्यंत, पुण्यापासून सोलापूरपर्यंत , पुण्यापासून संभाजी नगर पर्यंत बांधावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नेवासा फाटयापाशी राज्य रस्त्याची दर दोन तीन महिन्यानी दुरुस्तीचे काम काढलेले जाते. एवढया मोठया प्रमाणात या रस्त्याची दुरुस्ती निघण्याचे कारण काय आहे याचा आपण शोधा घ्यावा व एकदा कायमची काय ती नेवासा फाटयाजवळील राज्य रस्त्याची दुरुस्ती करुन टाकावी.

सभापती महोदय, ग्रामविकास आणि पर्यटन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 174 वर आपण ज्या बाबी घेतलेल्या आहेत त्या पाहून मला आश्चर्य वाटले. विदर्भातील जी सर्व देवस्थाने आहेत त्यांना तीर्थस्थळाचा दर्जा द्यावा अशा प्रकारची मागणी विदर्भाच्या जनतेकडून सातत्याने होत आहे. यासंदर्भात आतापर्यंत काय प्रगती झाली हे कळण्यास मार्ग नाही. यामध्ये श्री क्षेत्र रिध्दपूर, शिरपूर जैन (जि.वाशिम), नांदगाव खंडेश्वर, श्री क्षेत्र डव्हा, सालबर्डी, नागझरी( जि.बुलढाणा), आमगावचे महाकाली देवस्थान, देऊरवाडा या तीर्थस्थळांना शासनाकडून पॅकेज मिळावे अशी जनतेची आशा आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात भाविक येतात त्यामुळे त्यांना मदत मिळाली पाहिजे तसेच भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. गजानन महाराजांच्या शेगावमध्ये जाण्या-येण्यासाठी चांगले रस्ते होण्याची आवश्यकता आहे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

स

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

भापती महोदय, आज वन विभागाच्या पुरवण्या मागण्यां चर्चेला आहेत. आज नागपूरमध्ये वन कामगार मोठया संख्येने धरणे धरण्यास बसलेले आहेत. माननीय वनमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी नुकतीच या धरण्याला भेट दिलेली आहे. गेल्या अधिवेशनामध्ये मी अर्धातास चर्चेच्या अनुषंगाने वन राज्यमंत्री श्री. रविशेठ पाटील यांनी सांगितले होते की, आम्ही ॲडव्होकेट जनरलचे मत मागितलेले आहे व यासाठी लवकरात लवकर आर्थिक तरतूद करु.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे............

व जे 9500 रोजंदारीवर काम करीत आहेत त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करु. हे कामगार गेल्या 15 वर्षापासून रोजंदारीवर काम करीत आहेत. या पुरवणी मागण्यांमध्ये वन कामगारांना न्याय मिळाला असेल अशी माझी अपेक्षा होती. सोलापूर येथील कोळी नावाच्या एका वन कामगाराने आत्महत्या केलेली आहे. त्यामुळे वन कामगारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून लक्ष घालून त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद करावी अशी मागणी करीत आहे.

जलसंपदा विभाग लक्ष वेधण्यासाठी चांगली उदाहरणे शोधत असतो. अण्णा हजारे वनराई महाराष्ट्राला दिलेली आहे. विदर्भात यवतमाळ जिल्ह्यातील घाटणी येथील श्री.मधुकर धस यांनी जलसंधारणाच्या बाबतीत केलेल्या कार्याची माहिती मी आपणाकडे पाठविते. त्यांनी मला सांगितले की, जवळ जवळ 15 वर्षे जलसंधारणाच्या बाबतीत ते काम करीत आहेत. पण त्याची दखल जिल्हाधिकारी वा इतर कोणत्याही अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही वा त्यामध्ये रस दाखविलेला नाही. तेथील गावात गेल्या पाच वर्षात एकाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली नाही. तेव्हा माझी सभागृहाला विनंती आहे की, जलसंधारणाच्या बाबतीत श्री.धस करीत असलेला प्रयोग सर्व ठिकाणी करुन पहावा.

ऊर्जा, वैद्यकीय शिक्षण व तंत्र शिक्षण - मला विद्यापीठासंबंधी सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. मुंबई, पुणे व कोल्हापूर विद्यापीठांनी कामांच्या ठिकाणी मुलींचा छळ होऊ नये, प्राधापिकांचा छळ होऊ नये म्हणून विशाखा समिती नेमलेली आहे. परंतु नागपूर विद्यापीठाने ही समिती नेमण्यास नकार दिलेला आहे, आमच्या विद्यापीठाला हा नियम लागू नाही असे सांगितलेले आहे आणि ही बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे. युजीसीने सर्व विद्यापीठांमध्ये ही समिती स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. पुणे विद्यापीठाच्या समितीवर मी अध्यक्ष म्हणून काम करीत आहे. सर्व विद्यापीठांमध्ये ही समिती स्थापन झालेली आहे. शिवाजी विद्यापीठाने नियम केलेले आहेत. असे असताना नागपूर विद्यापीठाने अशाप्रकारची समिती करावी यासाठी मंत्रिमहोदयांनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.............

लक्ष घालावे. महिला व बाल विभागाने महिलांच्या प्रशिक्षणासाठी समित्या नेमलेल्या आहेत. तेव्हा या संदर्भात उद्याच्या उद्या निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी अशी माझी मागणी आहे. आपण महिलांना प्राधान्य दिल्याबद्दल मी आपले आभार मानते व यापुढेही असेच प्राधान्य मिळेल अशी आशा बाळगते आणि माझे भाषण पूर्ण करते.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 13- गृह विभाग - प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला कस्टडी रुम आहे. परंतु त्याठिकाणी टॉयलेट व बाथरूमची सोय नाही. ज्याठिकाणी टॉयलेट व बाथरुम्स आहेत त्याची अवस्था अतिशय वाईट आहे. तेव्हा याची दखल मंत्रिमहोदयांनी घ्यावी. माझी दुसरी सूचना आहे की, पोलिसात महिला कॉन्स्टेबल व महिला पी.एस.आय.ची मोठ्या प्रमाणावर भरती होत आहे. परंतु पोलीस स्टेशनमध्ये काही ठिक्राणी स्वतंत्र लेडीजरुमची व्यवस्था नाही. काही ठिकाणी व्यवस्था आहे परंतु ती असून नसल्यासारखी आहे. तेव्हा याकडे लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, माझे लहानपण पोलीस कॉलनीमध्ये गेलेले आहे. पूर्वी पासूनच पोलीस कॉलनीची अवस्था वाईट आहे, आताही वाईटच आहे. तेव्हा याकडेही लक्ष दिले पाहिजे.

बाब क्रमांक 138, पृष्ठ क्रमांक - जलसंपदा विभाग- साठवण तलाव, कासारी, ता.धारूर,जिल्हा बीड या तलावास पाणी उपलब्धी प्रमाणपत्रासाठी एन.ओ.सी.मिळत नाही. तसेच साठवण तलाव, मैंदा, ता.धारूर, जिल्हा बीड या तलावासही पाणी उपलब्धीसाठी एन.ओ.सी.मिळत नाही. साठवण तलाव, कपीलधारवाडी, ता. बीड, जिल्हा बीड या तलावासही पाणी उपलब्धी प्रमाणपत्रासाठी एन.ओ.सी.मिळत नाही तेव्हा या सर्व साठवण तलावास एन.ओ.सी. दिली जावी अशी माझी मागणी आहे. माजगाव जायकवाडी कालवा, ता.माजलगाव जिल्हा बीड याठिकाणी कोणाताही साठवण तलाव होत नाही.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

त्यादृष्टीने पुढे कार्यवाही होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, अरणवाडी, ता.धारुर येथील साठवण तलाव मंजूर होऊन व त्याचे टेंडर देऊनही त्याचे काम सुरु होत नाही. त्यामुळे याबाबतचीही आपण नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. आमच्याकडे डीपीडीसी नाही. तेथे अनेक गावांचे तीर्थक्षेत्र केलेले असून त्याबाबतीतील प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहे, तो ताबडतोबीने मंजूर करावा व पर्यटनाला चालना द्यावी, ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 288 च्याबाबतीत मला एकच विनंती करावयाची आहे की, माजलगांव येथील जायकवाडी कालव्यातील वाण धरण, ता.परळी, कुंडलीका प्रकल्प, ता.धारुर, सिंदफणा धरण, ता.शिरुर, जि.बीड या धरणांचा पर्यटन स्थळांमध्ये समावेश करावा.

सभापती महोदय, रस्त्याच्या बाबतीत मला एकच विनंती करावयाची आहे की, जायभाये वाडा, ता.धारुर येथील रस्याने जर आपल्याला त्याठिकाणी जीपने जावयाचे म्हटले तर 5 मिनिटे लागतात, बैलगाडीने जावयाचे म्हटले तर 15 मिनिटे लागत होते. परंतु आता त्या गावामध्ये गाडीने जावयाचे म्हटले तर त्याठिकाणी जाण्यास आपल्याला दीड तास लागतात. अशाप्रकारे आज त्या रस्त्याची अवस्था झाली असून रस्त्यांमध्ये फार मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्याचप्रमाणे कुंदेवाडी, ता.चिखली हे गाव अजूनही रस्त्यास जोडलेले नाही, देठेवाडी, ता.धारुर याही गावाची अवस्था तशीच आहे. मोहा ते महादेव तांडा रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरणाचे काम झालेले नाही, ते लवकरावत लवकर व्हावे, तागडगांव ते पाडळी, ता.धारुर याही रस्त्याची अवस्था वाईट असून याबाबतीतही आपण लक्ष द्यावे, मुंडेवाडी ते खरमाटा पवार वाडी ते नांदूर रस्त्याचे काम अजूनही होत नाही, ते लवकरात लवकर व्हावे. परळी-तेलगांव रोड ते तपोवण ता.परळी या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम अजून झालेले नाही, त्याकडे आपण लक्ष द्यावे. सिरसाळा-मोहा, ता.परळी या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम झालेले नाही, तेही लवकररात लवकर व्हावे. आमला ते कोयाळ रस्त्याच्या डांबरीकरणाचे व मलबुतीकरणाचे कामही होणे आवश्यक आहे. मोहा ते गर्देवाडी-अंबाजोगाई रोडवर वंजारवाडी, ता.परळी रस्त्याजवळ तलावाच्या बाजूने संरक्षण भिंतीचे काम करणे आवश्यक असून त्याठिकाणी आज कुठल्याही प्रकारचा पूल बांधलेला नाही. त्याचबरोबर मोहा-आसरडोह (बोंबल्या मारुती मार्ग)

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

रस्त्याच्या डांबरीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम करणे आवश्यक आहे. तांबवा ते चिंचपूर, ता.केज, जि.बीड या रस्त्याची परिस्थितीही वाईट असून याही रस्त्याकडे आपण लक्ष देऊन लवकरात लवकर सदरचे काम करावे, ही विनंती. याठिकाणी मी ज्या ज्या रस्त्यांचा उल्लेख केलेला आहे, त्यासंबंधी नोंद घेऊन त्याप्रमाणे लवकरात लवकर कामे करावीत, ही विनंती. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद !

-------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 29, पृष्ठ क्रमांक 18- गृह विभागाच्या बाबीवर मी बोलणार आहे. याठिकाणी मी सर्वप्रथम शासनाचे अभिनंदन करते, कारण नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांसाठी आपण 3 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या दोन अधिवेशनापासून मी या बाबीचा पाठपुरावा करीत होते. आता आपण यासाठी तरतूद केली आहे याचा मला आनंद आहे. परंतु हा आनंद व्यक्त करत असतानाच या प्रश्नाचे गांभीर्यही आपण समजून घ्यावे, अशी मी विनंती करते. मी ज्या सीबीडी बेलापूर परिसरात राहते त्याच परिसरात पोलिसांची फार मोठी वसाहत आहे. त्या वसाहतीची झालेली दयनीय अवस्था मी अनेकवेळा पाहिली आहे. अतिशय खुराडयासारखी झालेली ती अवस्था जनतेची सेवा करणा-या पोलिसांचे निवासस्थान आहे, यावर विश्वास बसत नाही. दिवसभर अविश्रांत परिश्रम करुन घरी जाणाऱ्या या वसाहतीतील पोलिसांना खरी विश्रांती मिळत असेल की नाही शंकाच आहे. छप्पर गळके असल्यामुळे चार महिने पावसाळयात प्रत्येक घरात पाणी असते. तुटलेल्या खिडक्या, इलेक्ट्रीक फिटींगची झालेली दुरावस्था आणि एकूणच वसाहतीला आलेले गोठयाचे स्वरुप पाहता, या वसाहतीसाठी केलेली 3 कोटी रुपयांची तरतूद ही अगदीच तुटपूंजी आहे. त्या रक्कमेतून एक-दोन इमारतींचे बांधकामही पूर्ण होणार नाही, त्यामुळे याबाबतीत माझी नम्र विनंती आहे की, आपण यासाठी कमीत कमी दहा कोटी रुपयांची तरतूद करावी. मी जास्त मागत नाही. या पोलीस वसाहतीला नवे रुप देण्यासाठी आवश्यक दहा कोटी रुपयेच मागते आहे. आपण माझ्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार कराल, अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, दक्षता समितीबद्दल मी बोलणार आहे. राज्यातील सर्व जिल्हा व तालुक्यात आपण दक्षता समित्या स्थापन केल्या आहेत. त्या समित्यांचे अध्यक्षपद महिला आमदारांकडे द्यावे. मग ती आमदार विधान परिषदेची असो किंवा विधानसभेची असो. शासन माझ्या मागणीचा विचार करेल, अशी मला आशा आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..........

सभापती महोदय, आज नवी मुंबई परिसरात मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि त्यामुळे पोलीस खात्यावर अतिरिक्त भार पडत आहे. पनवेल, खारघर, उरण, असा परिसर नवी मुंबईमध्ये समाविष्ट असल्यामुळे व या भागाचा वेगाने विकास होत असल्यामुळे त्या ठिकाणी चो-या, दरोडे, खून, मारामा-या होत आहेत. परंतु, पोलिसांचे संख्याबळ कमी पडत आहे. मी वारंवार पोलिसांची संख्या वाढविण्याबाबत शासनाला विनंती केली आहे. गुन्हेगारी स्वरुपाची पार्श्वभूमी असलेले लोक नवी मुंबईत येत आहेत, तडीपार लोक गुपचूप नवी मुंबईचा आश्रय घेत आहेत. अशावेळी संख्याबळ वाढविणे, चांगली वाहने देणे, हत्यारे देणे, पोलीस चौक्या सर्व सुविधांनी सज्ज करणे, अशाप्रकारच्या उपाययोजना योजणे आवश्यक आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नव्हते, ते आता आले आहेत. त्यामुळे मी माझी मागणी पुन्हा मांडते. नवी मुंबईतील सी.बी.डी.येथील वसाहतींसाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, या वसाहतींची दुर्दशा पाहता, हे तीन कोटी रुपये पुरणार नाहीत. त्यामुळे ही तरतूद 10 कोटी रुपये करावी, अशी विनंती करते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानते व थांबते.

-----------------

....2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 25, पान क्रमांक 16 अन्वये देशांतर्गत जलवाहतुकीसाठी तरतूद करण्यात आली आहे. हडी, ता.मालवण येथे एल आकराच्या प्रवासी धक्याचे बांधकाम करणे यासाठी 24 लक्ष 85 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सागरी महामार्गावरील ब-याच खाडयांमध्ये पर्यटनाच्या माध्यमातून जलवाहतूक चालू झाली तर पर्यटनाला चालना मिळेल. तसेच पूर्वी जशी मुंबई-गोवा जलवाहतुक होती तशी चालू केली तर लोकांची चांगली सोय होईल.

सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 40, पान क्रमांक 29 अन्वये कोकणात वन-पर्यटन विकासाला संधी आहे. तसेच, सिंधुदूर्गात पक्षी अभयारण्य होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 43, पान क्रमांक 31 यामध्ये सिंधुदूर्गात सन 2002 पासून हत्तींनी बागायती, शेती यांचे प्रचंड नुकसान केले आहे. आतापर्यन्त 7 माणसे मारली गेली आहेत तर कितीतरी जखमी झाले आहेत. त्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणे आवश्यक आहे. त्यांना नुकसान भरपाई वेळेवर मिळत नाही. ज्यांच्याकडे बंदुक परवाना आहे अशा 35 बागायतदारांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, ती मिळावी, अशी मी यानिमित्ताने विनंती करतो. बागायतीचा विमा उतरावा. त्याचप्रमाणे गव्हरेडे, माकड यांच्यापासून होणारे नुकसान आता मोठया प्रमाणावर आहे. त्यासाठी देखील नुकसान भरपाई द्यावी, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 42, पान क्रमांक 29 यासंदर्भात बोलतांना एकच विनंती करावयाची आहे की, सिंधुदूर्गात इको टुरिझमला मोठया प्रमाणावर संधी आहे. त्यांच्यासाठी देखील निधीची तरतूद करावी, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, कृषि विभागाच्या बाब क्रमांक 54, पान क्रमांक 37 या मागणीव्दारा मी अशी विनंती करतो की, ऊसाला, कापसाला जशी पीक विमा योजना लागू केली आहे तशीच ती कोकणातील आंबा, काजू, कोकम, नारळ यांना देखील लागू करावी.

सभापती महोदय, कृषि विभागाच्या बाब क्रमांक 60, पान क्रमांक 39 बाबत मला अशी मागणी करावयाची आहे की, मृद व जलसंधारणाची कामे करतांना कोकणासाठी मापदंड बदलण्याची नितांत गरज आहे. तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे तेथे काम करतांना अडचणी येतात, याचाही विचार व्हावा.

...3.........

श्री.राजन तेली.........

सभापती महोदय, कृषि विभागाच्या बाब क्रमांक 61, पान क्रमांक 39 अन्वये डॉ.पतंगराव देशमुख कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान 90 लक्ष रुपयाचे देण्यात येणार आहे. माझी अशी विंनती आहे की, सिंधुदूर्गात कोकण विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करावे. तसेच त्या ठिकाणी पर्यटनावर आधारित व्यवसायक्रम सुरु करावेत. नर्सरीधारकाकडून रोप घेऊन त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करावा. तसेच वन औषधी संदर्भात प्रबोधन करुन त्यावर आधारित केरळासारखे व्यवसाय करावेत. मच्छ विद्यापीठ सुरु करावे, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 66 पान क्रमांक 41 अन्वये मला अशी विनंती करावयाची आहे की, मच्छिमारांसाठी मत्स्य दुष्काळ जाहीर करावा, डिझेलचा परतावा वेळेवर व्हावा, मच्छिमारांसाठी डिझेल रॉकेल मिळावे, कायमस्वरुपी मच्छ संचालकपद मिळावे, जे तीन वर्षे रिक्त आहे, मच्छिमारांसाठी पॅकेज जाहीर करावे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 91 पृष्ठ क्रमांक 73 यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, जिल्हयातील न्यायालयाच्या जुन्या इमारती दुरुस्त करुन मिळणे आवश्यक आहे. देवगड, मालवण, कणकवली येथील न्यायालयांच्या दुरुस्तीसाठी देखील निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच त्या ठिकाणी न्यायाधीशांना राहण्यासाठी जागा नाही, त्याचीही व्यवस्था करावी, अशी विनंती आहे. न्यायालयात पाणी, स्वच्छतागृह याची देखील सोय व्हावी.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 101, पृष्ठ क्रमांक 78 अन्वये अधिका-यांच्या निवासाचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ओरोस मुख्यालयातील अपूर्ण विश्रामगृहासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. 1982 ला या जिल्हयाचे विभाजन झाले आहे. मालवण, वेंगुर्ले, सावंतवाडी, कणकवली येथील विश्रामगृहांचे नुतनीकरण करण्यासाठी तरतूद करावी, अशी विनंती आहे. जर शासनाला तरतूद करणे शक्य नसेल तर बी.ओ.टी.तत्वावर हे नुतनीकरण करावे, अशी विनंती आहे.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ...........

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र.104, पृष्ठ क्र.80 बाबत मला असे सांगावयाचे आहे की, कोकणातील मार्ग व पूल बांधण्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये दर वर्षीपेक्षा या वर्षी 800 एम.एम. पाऊस जास्त झालेला आहे. मागच्या वर्षी 2400 एम.एम. पाऊस झाला होता. पाऊस जास्त झाल्यामुळे रस्ते खराब झालेले आहेत. बांधकाम विभागाने या जिल्हयातील आणि कोणातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी 50 कोटी रुपये द्यावेत, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, तंत्रशिक्षण विभाग, बाब क्र.112, पृष्ठ क्र.85 बाबत मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यटनाच्या दृष्टीकोनातून आय.टी.आय. मध्ये ट्रेड निर्माण करण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी शिक्षकांची पदे भरणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पाटबंधारे विभाग, बाब क्र.113, पृष्ठ क्र.115 बाबत मला असे सांगावयाचे आहे की, कोकणात विशेष करुन सिंधुदुर्ग जिल्हयात 1 मोठे, 13 लघु, 4 मध्यम प्रकल्प आहेत. आता पर्यंत या प्रकल्पांसाठी निधी द्यावयास पाहिजे होता. अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पांसाठी निधी देण्याबाबत कोणतेही नियोजन केलेले नाही. या प्रकल्पांसाठी 706 कोटी रुपये लागणार आहेत. आता पर्यंत या प्रकल्पांवर 13 कोटी 38 लाख रुपये खर्च झालेले आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, कोकणातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बैठक बोलवावी. सभापती महोदय, मला दोन मिनीट द्यावेत, अशी माझी विनंती आहे. कोकणातील पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी बैठक बोलाविली पाहिजे. माझ्या माहिती प्रमाणे भुसंपादन झालेले नाही, भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. मग अधिका-यांनी टेंडर का काढले ? कोकणातील कालवे, रस्ते, जागा शासनाच्या ताब्यात नाही. लोकांना पैसे दिलेले नाहीत तरीही अधिका-यांनी टेंडर काढलेले आहेत, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पर्यटन विभाग, बाब क्र.288, पृष्ठ क्र.241 बाबत मला असे सांगावयाचे आहे की, पर्यटन विभागाला चालना देण्यासाठी सन 1997-98 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. गेल्या सात वर्षापासून शासन फसवणूक करीत आहे. एक रुपयाची सुद्धा तरतूद केलेली नाही. पर्यटनासाठी शासन पैसे देणार आहे की नाही ? शासनाने गेल्या सात

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ...........

वर्षात येथील पर्यटनाचे नियोजन केलेले नाही, अशा प्रकारे शासनाने कोकणाची जी चेष्टा चालविलेली आहे ती बंद करावी. नाही तर सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून रद्द करावा.

सभापती महोदय, पुरातत्व विभाग, बाब क्र.294, पृष्ठ क्र.242 मुंबईपासून कोकणापर्यंत 60 ऐतिहासिक किल्ले आहेत. त्या किल्ल्यांची परिस्थिती बघितली तर, मी आपल्याला एक उदाहरण देतो. पूर्वी युती शासनाच्या काळात सिंधुदुर्ग किल्ल्यावर माननीय श्री.नारायण राणे साहेबांनी भगवा झेंडा लावला होता. तो झेंडा आता पडलेला आहे. माझी अशी विनंती आहे की, झेंडा लावण्यासाठी आम्ही खर्च करु. परंतु किल्ल्याच्या तटावर झेंडा लावण्यासाठी पुरातत्व विभागाची परवानगी मिळणे आवश्यक आहे. हा लोकांच्या भावनांचा प्रश्न आहे. विजयदुर्ग सारखे असे बरेच किल्ले आहेत त्या किल्ल्यांची दुरुस्ती करावी. शासनाने या किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी कोणतेही नियोजन केलेले नाही. पर्यटन, पाटबंधारे प्रकल्प आणि किल्ल्यांसाठी खास करुन निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.17, पृष्ठ क्र.14 बेस्ट बेकरी प्रकरणामध्ये नियुक्त केलेल्या विशेष सरकारी वकील व अभियोक्त्यांच्या व्यावसायिक फीसाठी 42 लाखाची तरतूद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण पोटनिवडणुकीत दिनांक 10 एप्रिल, 2005 रोजी रमेश गोवेकर बेपत्ता झालेले आहेत. दिनांक 10 एप्रिल, 2007 रोजी या प्रकरणाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. या प्रकरणाचा सी.बी.आय. कडून तपास न झाल्याने रमेश गोवेकर यांना शोधण्यासाठी भरीव तरतूद करण्यात यावी, अशी माझ ी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभाग, बाबक्र.22, पृष्ठ क्र.15 सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यात झालेल्या वासनाकांडाच्या मोबाईल चित्रफिती काढून त्या पोलिस विभागाने ताब्यात घेऊन तपासासाठी ......

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

सायबर फोरेन्सिक लॅब विभागाकडे देऊन देखील अद्यापही त्याचा अहवाल न आल्यामुळे तपास झ ाालेला नाही. तो अहवाल मिळण्याकरिता शासनाकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

पान क्रमांक 242 बाब क्रमांक 294 पर्यटन विभाग, सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. सिंधुदूर्ग जिल्हयाच्या पर्यटन विभागाला चालना देण्यासाठी शासकीय स्तरावर बैठका घेऊन आराखडा तयार करण्याची कारवाई सुरु असतांना पुरवणी मागणीमध्ये त्याकरिता भरीव तरतूद केलेली नसल्यामुळे त्या आराखडयांची अंमलबजावणी होऊ शकली नाही. सिंधुदूर्ग जिल्हयातील सिंधुदूर्ग किल्ल्यावरती माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्या हस्ते शासकीय कार्यक्रमातून भगवा झेंडा उभारण्यात आला होता, हा झेंडा खा-या हवेने जीर्ण झाल्याने केंद्राची परवानगी घेऊन पडलेला झेंडा पुन्हा उभारण्याकरिता शासनाने तरतूद करुन त्याकरिता उपाययोजना करावी.

पान क्रमांक 146,बाब क्रमांक 178 सिंधुदूर्ग जिल्हयातील टाळंबा प्रकल्पातील बुडीत क्षेत्रात माननीय पंतप्रधान सडक योजनेअंतर्गत दुकानवाड ते आंजिवडे येथे चार कोटी रुपयांचा रस्ता झालेला आहे. ही सर्व ठिकाणे बुडित क्षेत्रात जात असतांना पण त्या ठिकाणी रस्ते झालेले आहेत. ग्रामविकास खात्यामध्ये वसोली उपवडे,साकिर्डे आणि आंजिवडे या चौदा ठिकाणी सुमारे एक कोटी रुपयांच्या 14 विहिरींची मंजुरी देऊन बुडीत क्षेत्रात अधिसुचित झालेल्या ठिकाणी कोणतीही कामे घेण्याची परवानगी नसतांना देखील तेथे ही सर्व कामे घेतली जातात व त्यामध्ये शासनाने लक्ष घालून तेथे होणारा खर्च वाचविण्याची आवश्यकता आहे.

पान क्रमांक 147,बाब क्रमांक 181,सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील नांदोस गावाच्या पंचक्रोषीच्या ठिकाणी 12 गावांना फायदेशीर ठरणारा गोळवण देवणे नांदोस या ठिकाणी ग्रामस्थांनी केलेल्या पाझर तलावाचे सर्वेक्षण होऊन,सर्वेक्षणासाठी भरीव निधीची तरतूद करणे.

पान क्रमांक 149,बाब क्रमांक 186,जलसंधारण विभाग खार जमिनीमुळे पिण्याचे पाणी आणि शेती नष्ट होण्यापासून वाचविण्याकरिता व त्याचा विकास होण्याकरिता मालवण तालुक्यातील कोळंब बंधारा व वेंगुर्ला तालुक्यातील कोचरे म्हापण या ठिकाणी खा-या पाण्याने शेतीचे नुकसान होऊन या ठिकाणी जमिन विकास करण्यासाठी भरीव तरतूद करण्यासाठी मी शासनाकडे विनंती करीत आहे.

....2

श्री.परशुराम उपरकर......

पान क्रमांक 119,बाब क्रमांक 139 जलसंपदा विभाग सिंधुदूर्ग जिल्हयातील एक मोठा,चार मध्यम,लहान आठ बंधा-यांचे प्रकल्प सुरु असून सदर प्रकल्पांना निधी नसल्याने ते अर्धवट स्थितीत आहेत. या ठिकाणी जास्तीत जास्त भरीव तरतूद करण्याची गरज आहे. सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये जे 30 वर्षापासून जे पाटबंधारे प्रकल्प सुरु झालेले आहेत ते 80 टक्के पूर्ण झालेले आहेत परंतु ते उरलेले 20 टक्के पूर्ण करण्यासाठी निधीची गरज आहे. हा निधी मिळाल्यावर जर तेथील एक तरी प्रकल्प पूर्ण झाला तर तेथील नागरिकांना दिलासा मिळेल. यासाठी शासनाकडून तरतूद होण्याची गरज आहे.

पान क्रमांक 31 बाब क्रमांक 47 हत्तींमुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी शासनाने केलेली तरतूद अपूरी आहे. याबाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा बोलले जाते. हे हत्ती आता बेळगावापासून दोडामार्गातून सावंतवाडी,वेंगुर्ला,मालवण,कुडाळ येथे आलेले आहेत व शेतीचे अतोनात नुकसान करीत आहेत. ज्यावेळी हे हत्ती मंत्रालयापर्यंत येतील त्यावेळी तरी माननीय मंत्रिमहोदयांना जाग येईल का ? हे हत्ती शेतीचे एवढे नुकसान करीत आहेत की, नुकसान केलेल्या शेतक-याला भरपाई दिली जात नाही. ज्या शेतक-यांकडे बंदूक आहे त्यांना या हत्तींना मारता येत नाही आणि ज्यांच्याकडे बंदूक आहे त्यांना नुकसान भरपाई देखील मिळत नाही. शासनाकडून हत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची गरज आहे.

पान क्रमांक 75,बाब क्रमांक 97 सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर अधिवेशनाकरिता देखभाल दुरुस्तीसाठी एकूण 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर .....

50 कोटी रुपयाची पुरवणी मागणी यासाठी केलेली आहे. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन आयोजित केले जाते त्यावर सुमारे 150 कोटी रुपये खर्च होतो. नागपूर येथील अधिवेशन न घेता ही रक्कम विदर्भातील शेतकऱ्यांना दिली तर खऱ्या अर्थाने अधिवेशनाचा पैसे सार्थकी लागल्याचे या शेतकऱ्यांना समाधान मिळेल. हिवाळी अधिवेशन घेतले नाही तरी चालेल परंतु शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्यावी. त्यातून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. कर्जमुक्ती न मिळाल्यास ते नाराज होतील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पृष्ठ क्र.14, बाब क्रमांक 13 गृह विभागाच्या मागण्यावर मी बोलू इच्छितो. ऐरोली जि.ठाणे येथे महाराष्ट्र बँकेवर दरोडा पडला आहे. तसेच नवी मुंबई पनवेलमधील अनेक बँकावर दरोडे पडले असून त्याचा तपास लागला नाही. मी अनेक वेळा सभागृहात बोललो. दोन पोलीस उपनिरीक्षक श्री.बाबासाहेब आढाव व श्री.भिकू मारुती करंडे हे गोळीबारामध्ये मृत्यूमुखी पडले. श्री.भिकू मारुती करंडे हे सुरुवातीस गंभीर जखमी झाले, तरीही वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना ड्युटीवर बोलावले. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला व त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यांची विधवा पत्नी आज तीन मुलांसह भीक मागत आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी ते मला भेटायला आले. माझी गृहमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांच्या पत्नीला शासनाकडून काहीतरी मदत द्यावी किंवा अनुकंपा तत्वावर नोकरी द्यावी. कारण 2, 3 व 7 वर्षाची अशी 3 मुले त्या महिलेस आहेत. माणुसकीच्या दृष्टीने त्यांच्याकरिता काहीतरी करावे, अशी मी या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, राजकीय व्यक्तींना पोलीस संरक्षण व बंदोबस्त दिला जातो, त्याचे मुल्यमापन केले पाहिजे. आम्ही अनेक आंदोलने केली परंतु आम्हाला कधीही कोणता बंदोबस्त घेण्याची आवश्यकता पडली नाही. राजकीय व्यक्तींचे स्टेटस पाळण्यासाठी हे केले जात आहे. त्यांच्या संरक्षणासाठी असलेले पोलीस त्यांना पाणी आणून देतात, कपबशा उचलतात, डबे आणून देतात, त्यांच्या चपला उचलतात, बुट पॉलीश करतात हे मी माझ्या डोळयाने बघितले आहे. त्यामुळे माझ्यासह कोणत्याही राजकीय व्यक्तींना बंदोबस्त हवा असेल तर त्यांना चार पट पैसे लावावेत म्हणजे कोणी बंदोबस्त मागणार नाही. राजकीय व्यक्तींना खरोखर धोका आहे का ? याचे कोठेतरी मुल्यमापन केले पाहीजे. हे मुल्यमापन करावे, अशी मी विनंती करतो.

नंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ......

ज्यांच्या जिवाला धोका आहे अशांना संरक्षण दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना संरक्षणाची आवश्यकता आहे काय याचे मुल्यमापन आपण करावे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या जीवाला धोका आहे काय ? आम्ही कधीच पोलीस संरक्षण घेत नाही.

**उपसभापती** : खरे तर आपल्यापासून इतरांनाच धोका आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय,माझ्याविरुध्द कोणीही अशी तक्रार केलेली नाही. मी येथे बाब क्रमांक 66 पान क्रमांक 41 यावर एकच मुद्दा मांडू इच्छितो की, मच्छिमारांना परतावा देताना 6 महिन्याचा किंवा एका वर्षाचा कालावधी लागतो. यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी केल्या गेल्या. मत्स्य अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आपण पंधरा दिवसाच्या आत परतावा दिला पाहिजे असे नियोजन शासनाने करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

4 R-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): माननीय सभापति महोदय, आपने मुझे यहां पर बोलने का मौका दिया इसके लिए आपका बहुत आभारी हूं.पुरवणी मांगों पर बोलते समय सबसे पहले मैं आपको याद दिलाना चाहूंगां कि नागपुर में सेशन होने के पीछे मुख्य राज यह था कि नागपुर और विदर्भ का जो भाग पहले मध्य प्रदेश में था और वह भाग बाद में महाराष्ट्र में मिलाया गया उस भाग के लोग यहां पर अपनी मांगों को रख सकें इसीलिए यहां पर यह सेशन रखा जाता है. मैं यहां पर कहना चाहूंगा कि पुरवणी मांगों पर आज यहां पर विदर्भ का एक भी माननीय सदस्य नहीं बोला है. सामने बैठे हुए हमारे कुछ माननीय सदस्य दादागिरी करते हैं लेकिन हम यहां पर कभी दादागिरी नहीं करते हैं. यहां पर विदर्भ के पेपर्स के अंदर पिछले दो दिनों से यह बात आ रही है कि विदर्भ के माननीय सदस्य यहा पर अपनी मांग नहीं रख रहे हैं. पेपर में यह बात आ रही है कि विदर्भ के आमदार सो रहे हैं. आप यहां के पेपर पढिए तो आपको यह बात पता चलेगी. लेकिन वास्तविक स्थिति यह है कि हमारे प्रश्न कामकाज के अंदर पीछे चले जाते हैं. यहां के जंगलों से संबंधित एक भी प्रश्न सदन में चर्चा के लिए नहीं आ रहा है.

उपसभापति : आप सप्लीमेंट्री डिमांड पर बोलिए.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मैं यहां पर दो बार बोलने के लिए खड़ा हुआ और मुझे दोनों बार बैठा दिया गया. इसलिए मुझे यह बात बोलनी पड़ी. इस बात पर ज्यादा न बोलते हुए अब मैं पेज क्रमांक 30 पर बाब क्रमांक 43 पर अपनी बात रखना चाहूंगा. मुझे कहना है कि चंद्रपुर जिले में फारेस्ट बहुत है. आप वहां के लिए बजट प्रोवीजन करते हैं वह अच्छी बात है लेकिन गडचिरोली और चंद्रपुर जिले में जंगली जानवर फसल का नुकसान करते हैं. हमारे यहां पर सिंचाई के साधन नहीं हैं. भगवान के भरोसे जो बारिश होती है, उसी भरोसे पर हमारे किसान खेती करते हैं. लेकिन वहां पर जो धान और सोयाबीन की खेती होती है, उसमें जंगली सूअर तथा दूसरे जंगली जानवर घुसकर फसल को खराब कर देते हैं. वहां पर तार लगाने के लिए भी फारेस्ट विभाग पैसे नहीं देता है.वहां पर जो

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DD/

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

नुकसान होता है उनका पंचनामा नहीं होता है और उनकी नुकसान भरपाई नहीं की जाती है. यहां का किसान पहले ही परेशान है और आत्म हत्या कर रहा है मेरी विनती है कि फारेस्ट विभाग के असहयोग की वजह से किसान आत्म हत्या कर रहा है, इस तरह की बात नहीं होनी चाहिए. मंत्री महोदय से मेरी विनती रहेगी कि इस बारे में सरकार कोई प्रावधान जरुर करे.. इस विभाग के बारे में दूसरी बात मैं यह बोलना चाहूंगा कि यहां पर आये तूफान की वजह से जंगलों में बड़े-बड़े झाड़ गिर गए और वे झाड़ वहां पर वैसे ही पड़े हुए हैं. यह करोड़ों की सम्पत्ति है. लेकिन फॉरेस्ट विभाग इन झाड़ों को नहीं उठा रहा है. वे झाड़ वहां पर पड़े-पड़े सड़ रहे हैं और सरकार का करोड़ों रुपए का नुकसान हो रहा है. फारेस्ट विभाग का करोड़ों रुपए का माल आंध प्रदेश् में जा रहा है.इस बारे में भी सरकार को ध्यान देना चाहिए.

एक बात मैं यहां पर तेंदू पत्ता मजदूरों के बारे में कहना चाहूंगा कि वहां पर जो गरीब मजदूर को बोनस नहीं दिया जा रहा है उस बारे में तीन साल का बोनस फारेस्ट डिपार्टमेंट ने चंद्रपुर के कंजरवेटर को दे दिया है लेकिन मजदूरों को पैसा नहीं दिया जा रहा है. वहां पर इस तरह की बात की जा रही है कि यह पैसा नकद देना है या चैक से देना है,अभी देना है या बाद में देना है, यह पैसा कमेटी बनाकर देना है या कलेक्टर के माध्यम से देना है या डीपीडीसी के माध्यम से देना है. वहां पर करीब 14-15 करोड़ रुपए ऐसे ही पड़े हुए है....

4 एस...1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

वह पैसा सरकार ने तो दिया है लेकिन वेसे ही पड़ा हुआ है. उन मजदूरों को सिर्फ एक हजार या दो हजार रुपए ही मिलने वाले हैं. उनको ज्यादा पैसा मिलने वाला नहीं है. ये मजदूर तेंदू पत्ते के सीजन में ही आते हैं और मिलते हैं. लेकिन उनका पैसा बांटा नहीं जा रहा है. ये गरीब लोग हैं. मैं कहना चाहूंगा कि उन मजदूरों को उनका पैसा दिया जाये.

माननीय सभापति जी, उर्जा के बारे में बोलते समय मैं कहना चाहूंगा कि चंद्रपुर में थर्मल पावर स्टेशन सन् 1975 में आया. माननीय स्वर्गीय इंदिरा गांधी जी ने उस प्रोजेक्ट की नींव रखी थी. पिछले दो महीने से वहां के प्रकल्प ग्रस्त लोग आंदोलन कर रहे हैं लेकिन उनका पैसा अभी तक नहीं मिला है. उसके लिए बजट में प्रोवीजन की जानी चाहिए.एक सवाल उनकी नौकरी के बारे में है, जिन लोगों ने अपनी जमीन दी थी वे लोग अब बूढ़े हो गए हैं लेकिन उनको नौकरी नहीं दी गयी अब उनके बच्चे भी बूढ़े हो रहे हैं लेकिन अभी तक उनको भी नौकरी नहीं दी जा रही है. तीस साल बाद भी उनको नौकरी नहीं मिलती है. पिछले दो महीने से वहां पर सभी पक्ष के आमदार और खासदार वहां के कलेक्टर के सामने आंदोलन कर रहे हैं, धरना दे रहे हैं. लेकिन उनको नौकरी नहीं मिल रही है. उनसे यही कहा जा रहा है कि हम बैठेंगे, देखेंगे और करेंगे. लेकिन उस दिशा में कोई ठोस काम नहीं किया जा रहा है. प्रकल्प ग्रस्त लोगों को आप कितने दिन तक रुलायेंगे. इसलिए मेरा कहना है कि उस संबंध में भी बजट प्रोवीजन की जाये. वहां के काश्तकार ने 1200 रुपए एकड़ के हिसाब से जमीन दी है और आज उस जमीन का भाव चंद्रपुर में 12 लाख रुपए एकड़ हो गया है. आज उस काश्तकार के मन में कितना दुख हो रहा होगा. मैं उम्मीद करता हूं कि सरकार इस बारे में जरुर ध्यान देगी.

मैं अब पेज क्रमाक 194 पर बाब क्रमांक 221 और 222 तथा बाब क्रमांक 231 पर अपनी बात रखना चाहूंगा. यह बाब आदिवासी विभाग से संबंधित है.. मेरा कहना है कि

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DD/

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

आप आदिवासियों के उद्धार के लिए करोड़ों रुपए की बजट प्रोवीजन कर रहे हैं आप उनके लिए सामान उपलब्ध करा रहे हैं. जो सामान आप उनको उपलब्ध करा रहे हैं, वह सामान मुंबई से आ रहा है.पंप भी आप मंबई से उपलब्ध करा रहे हैं. इस बारे में सरकार का एक जी.आर. है कि जो बड़ी कंपनी हैं जैसे क्रॉम्टन ग्रीव्हज, टाटा मोटर्स इत्यादि उनसे डायरेक्ट प्राइस लो और उस हिसाब से कलेक्टर, म्युनिसिपॅलीटीज तथा जिला परिषद के प्रेजीडेंट परचेज कर सकते हैं. हमारा कहना है कि उनको जो सामान दिया जा रहा है वह ऐसा हो जो कि आय.एस.आय. मार्क का है और जो सामान उन लोगों के काम आ सके.

अब मैं सार्वजनिक बांधकाम विभाग के पेज क्रमांक 74 पर बाब क्रमांक 93,94 और 95 पर अपनी बात रखना चाहूंगा. मैं कहना चाहूंगा कि नागपुर से चंद्रपुर एक रोड जाता है. वहां की जो डिजाइन की गयी है वह बहुत पुराने ढंग से की गयी है उन्होंने वहां पर एक हजार ट्रक की लोडिंग कॅपेसिटी के हिसाब से डिजाइन की है जबकि. वहां पर 10 हजार और 20 हजार गाड़ियां तक रोज चल रही हैं. जो रोड़ 5 साल तक चलने चाहिए वे रोड सिर्फ 2 साल में ही खराब हो रहे हैं. मेरा कहना है कि उन सड़कों का सुधार किया जाये. वहां पर अच्छी क्वालिटी के रोड बनाए जाने चाहिए.

मैं पेज क्रमांक 183 पर बाब क्रमांक 215 और 216 पर बोलना चाहूंगा यह बाब वैद्यकीय शिक्षण के बारे में है. हमारा कहना है कि हमारे चंद्रपुर में मेडिकल कॉलेज होना चाहिए क्योंकि यह एरिया नागपुर से 150-200 किलोमीटर दूर है. यदि किसी व्यक्ति का एक्सीडेंट हो जाता है तो यहां तक लाते लाते ही वह आदमी मर जाता है. वहां पर रहने वाले लोग गरीब आदिवासी लोग हैं. उनके बारे में कुछ सोचा जाए, यही मैं कहना चाहता हूं. अब वहां पर बड़े बड़े उद्योग आने लगे हैं लेकिन अभी तक वहां पर मेडिकल कॉलेज नहीं है. वहां के लोग एक्सीडेंट की वजह से न मरें और वहीं पर उनका इलाज हो सके. इसलिए मेडिकल कालेज की वहां बहुत जरुरत है. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृह विभागाच्या पान क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 20 मध्ये राज्यामध्ये "महात्मा गांधी तंटामुक्त गाव" या मोहिमेची जाहिरात व प्रसिध्दी याकरिता 2 कोटी 50 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. आपण हा निधी जाहिरात आणि प्रसिध्दीसाठी वापरीत असतांना याबाबत आपण खऱ्या अर्थाने दूरदर्शन आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली तर हा निधी कमी पडेल. आपल्याला जर खऱ्या अर्थाने तंटामुक्त गाव करावयाचे असेल तर गावात रहाणाऱ्या प्रत्येक नागरिकांपर्यंत ती जाहिरात आणि प्रसिध्दी पोहोचली पाहिजे. त्याचप्रमाणे तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षांची नेमणूक करण्यापूर्वी तेथील पोलीस स्टेशनमधून त्या अध्यक्षांच्या चारित्र्याचा अहवाल आपण मागविला पाहिजे. नाही तर तंटामुक्त गाव समितीचा अध्यक्षच वाईट असेल, तोच तंटा करीत असेल तर या योजनेची शोकांतिका होईल. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण यासंबंधी पोलीस स्टेशनकडून अहवाल मागवून घ्यावा. नेमण्यात येणारा अध्यक्ष हा चांगल्या चारित्र्याचा असावा, सामाजिक संबंध चांगले असणारा पाहिजे अशी मला सूचना करावयाची आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 62, 63 आणि 66 च्या संदर्भात बोलावयाचे आहे. पशुसंवर्धन विभागाच्या दवाखान्यांकरिता 40 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. औषधांचा पुरवठा हा त्यातील प्रमुख भाग आहे. परंतु प्रत्यक्षात पशु संवर्धन विभागाच्या दवाखान्यामध्ये नगण्य स्वरुपामध्ये औषधे सापडतात. गावातील प्रत्येक शेतकऱ्याला बाहेरुन औषधे खरेदी करावी लागतात. ज्या ज्याठिकाणी औषधांची आवश्यकता आहे त्याठिकाणचा अहवाल सरकारने मागविला पाहिजे. दवाखान्यात येणाऱ्या पायखूरी, टोणखूरी, घटसर्प झालेल्या आजारी जनावरांवर उपचार करण्यासाठी औषधे असणे आवश्यक आहेत. सभापती महोदय,गावामध्ये पॅकेज अंतर्गत जनावरांचे वाटप केले जाते. त्यामध्ये 50 टक्के केंद्राची मदत, 25 टक्के राज्य सरकारची मदत आणि 25 टक्के लाभार्थ्यांच्या सहभागाने ही जनावरे घेतली जातात. वाटप करण्यासाठी आजूबाजूच्या दोन-चार जिल्हयातून जनावरे आणली जातात व त्यांचे वाटप केले जाते. खऱ्या अर्थाने वाटप करण्यात आलेली जनावरे भाकड असल्याचा उल्लेख केला गेला आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, वाटप करण्याकरिता परप्रांतामधून जनावरे आणली पाहिजेत. आणि ती चांगल्या दर्जाची जनावरे असली पाहिजेत. जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये दुधाची गंगा वहायला लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, बाब क्र. 66 मध्ये फार मोठया निधीची तरतूद केली आहे. याठिकाणी आपण पशुधन क्षेत्र, साधनसामग्री केंद्र आणि मत्स्य क्षेत्र केंद्र गणना यांसाठी तरतूद केली आहे. याकरिता करण्यात आलेल्या भरीव तरतुदीचा आपण चांगल्या प्रकारे उपयोग केला पाहिजे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 90 बाबत बोलावयाचे आहे. गृहनिर्माण व नगर विकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जावरील व्याजासाठी या ठिकाणी 4 कोटी 43 लाख 30 हजार रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील मार्ग व पुलांच्या बांधकामाकरिता हे कर्ज घेतलेले होते. एकूण किती कर्ज घेतले होते ? कोणत्या व्याजदराने कर्ज परत करणार यासंबंधीचा खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 92 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये पोलिसांच्या निवासाकरिता 11 लाख 81 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. मला माननीय उपमुख्यमंत्र्यांना विचारावयाचे आहे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जे पोलीस आहेत त्यांच्या निवासाची व्यवस्था झालेली आहे काय ? जर व्यवस्था झाली नसेल तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्यांच्या निवासाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. कारण पोलीस मुख्यालयी राहात नसेल तर प्रसंगी पोलीस उपलब्ध होत नाहीत तसेच कायदा व सुव्यवस्था ठेवण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. ज्याला निवासस्थान नाही असा एकही शिपाई राहू नये तसेच ते निवासस्थान पोलीस स्टेशनच्या जवळ असले पाहिजे जेणेकरुन कायदा व सुव्यवस्था ठेवण्याच्या दृष्टीने योग्य होईल. या पुरवणी मागणीमध्ये शासनाने वांद्रे, मुंबई येथील विचार केलेला आहे. अन्य ठिकाणांचा सुध्दा विचार व्हावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 74 वरील बाब क्रमांक 93 बाबत बोलावयाचे आहे. मुसळधार पावसामुळे मार्ग व पुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आमच्या गोंदिया जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसाने नुकसान झालेल्या रस्ते व पुलांचे पैसे कोठे गेले हे कळत नाही ? नदीकाठावर असलेल्या गावांमध्ये पूर आला परंतु त्या ठिकाणी पैसे मिळाले नाहीत. तीन चार वर्षे झाली तरी रस्ते दुरुस्त झाले नाहीत, पूल दुरुस्त झाले नाहीत. तिरोडा तालुक्यामध्ये पूर आला. त्या ठिकाणी पैसे मिळाले नाहीत. डीपीडीसीमध्ये मी याबाबत उल्लेख केला होता. असा अन्याय हे सरकार करीत असेल तर ते बरोबर नाही. नदी क्षेत्रामध्ये महापूर आला त्या ठिकाणी एकही दुरुस्तीचे काम झालेले नाही, ही खेदाची बाब आहे. बाब क्रमांक 93 मध्ये अमरावती जिल्ह्यातील महापुराच्या अनुषंगाने पुरवणी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिकासभापती श्रीमती उषाताई दराडे )**

श्री. केशवराव मानकर ......

मागणी करण्यात आलेली आहे, ही फार चांगली बाब आहे. परंतु ज्या ठिकाणी नदीकाठावर महापूर येऊन रस्ते व पूल खराब झालेले आहेत त्यांदर्भात मला माननीय बांधकाम मंत्र्यांना आग्रहाची विनंती करावयाची आहे. वाटल्यास अधिक निधीची गरज असेल तर तो निधी पुरवला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 97 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये हिवाळी अधिवेशनासंबंधी 50 कोटी 56 लाख रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. हा खर्च कशावर झ ाालेला आहे यासंबंधीची माहिती पटलावर ठेवली पाहिजे. कारण ही रक्कम मोठी आहे. एवढा मोठा निधी खर्च झाला असेल असे वाटत नाही. जो निधी खर्च झालेला आहे त्या खर्चाचे विवरण बांधकाम विभागाने पटलावर ठेवले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला ग्रामविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 145 वरील बाब क्रमांक 175 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये मराठवाडा व विदर्भ पाणलोट विकास मिशनसाठी मोठ्या रकमेची पुरवणी मागणी केलेली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर निधी दिलेला आहे. प्रत्यक्षात हा निधी खर्च होईल काय ? या पुरवणी मागणीमध्ये ही अतिरिक्त तरतूद केलेली आहे तसेच जुनी तरतूद व ही तरतूद मिळून जो निधी उपलब्ध होणार आहे तो खर्च करण्याच्या दृष्टीने पाणलोट क्षेत्राच्या विकासाच्या बाबतीत जी गती असावयास पाहिजे ती दिसत नाही. एवढ्या मोठ्या निधीच्या बाबतीत नियोजन कसे असणार आहे ? कामे जलद गतीने व्हावयास पाहिजेत. कारण विकासाची कामे जदल गतीने न होता संथ गतीने होतात. त्यामुळे कामाची किंमत वाढत असते. माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हा जो निधी मागितलेला आहे तो निधी प्रत्यक्षात कसा खर्च होईल आणि जलद गतीने विकास कसा होईल या दृष्टीने काळजी घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय यानंतर जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 133 बाबत मला बोलावयाचे आहे. यामध्ये डांगुर्ली उपसा सिंचन योजनेचा विस्तार व सुधारणा विषयक बांधकामे हाती घेण्यासाठी 1 कोटी 46 लाख रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...)

या उपसा सिंचन योजनेमुळे 264 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. सन 2007-2008 या वर्षासाठी 74 लाख 75 हजार रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. हा माझ्या गोंदिया जिल्ह्यातील प्रश्न असल्यामुळे, विदर्भातील हा प्रश्न असल्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळालेला अंदाजित खर्च संपूर्णपणे देण्यात यावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या संदर्भात एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. सामान्य माणसाला ग्रंथालये आणि वाचानालयांची आवश्यकता आहे. ग्रंथालयासाठी शासनाकडून 90 टक्के निधी दिला जातो. त्यातील 10 टक्के निधी हा सार्वजनिक वाचनालयासाठी खर्च करावा लागतो. माणसाला ख-या अर्थाने सुशिक्षित आणि सुसंस्कृत करण्यासाठी ग्रंथालये आणि वाचनालयांची नितांत गरज आहे. समाजातील सर्व स्तरातील साहित्य या ग्रंथालयातून उपलब्ध होते. ग्रंथालये ही ज्ञानाची भांडारे आहेत. म्हणून या ग्रंथालयांसाठी 90 टक्के अनुदान न देता ते 100 टक्के द्यावे अशी मागणी करुन आणि सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपणाला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मला एकाच बाबीवर बोलायचे आहे. कृषी, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाच्या पृ.क्रमांक 40 वरील बाब क्रमांक 64कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधित आहे.

सभापती महोदय, शासनाने पंतप्रधान पॅकेज आणि विदर्भ पॅकेजच्या माध्यमातून विविध योजनांच्या घोषणा करुन आत्महत्या करणा-या शेतक-यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु या दिलासा देणा-या सर्व योजनांचा बट्टयाबोळ करण्याचे काम खालचे अधिकारी करीत आहे. त्यांच्यावर कसे नियंत्रण ठेवायचे याचे उत्तर आपणाकडे नाही. या पॅकेज अंतर्गत दुभत्या जनावरांच्या वितरणासाठी 5 कोटी 25 लाख रुपयाची पुरवणी मागणी याठिकाणी करण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये 25 टक्के राज्याचा आणि 50 टक्के केन्द्राचा हिस्सा राहाणार आहे. एका गायीमागे 7 हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. एका जिल्ह्यात साधारणत: 1 हजार गायींचे वाटप महाराष्ट्र शासन आणि जिल्हा दूध संघाच्या वतीने करण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यासाठी याकरिता 1 कोटी रुपयाचा निधी मंजूर झालेला आहे. त्यातील 70 लाख रुपयाचा निधी जिल्हा दूध संघाला प्राप्त झाला आहे. 1 हजार गायींचे वाटप झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आलेले आहे. परंतु किती लाभार्थ्यांना गायी मिळालेल्या आहेत आणि किती लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत याचा तपास कोणी केलेला नाही. नागपूर आणि नंदूरबार मधून गायी आणून त्या लाभार्थ्यांना दिल्याचे सांगण्यात येते. या योजनेतील बहुसंख्य लाभार्थी बोगस आहेत. एका प्रकाणामध्ये 5 गायी दिल्याचे दाखविण्यात आले. परंतु प्रत्यक्षात दोनच गायी लाभार्थीला दिलेल्या आहेत. नियमाप्रमाणे या योजनेअंतर्गत दिलेल्या गायी लाभार्थ्याला 5 वर्षे विकता येत नाहीत. काही प्रकरणात फक्त गायी घेतल्याच्या पावत्या दाखविण्यात आल्या, काही प्रकरणामध्ये गायी मृत झाल्याचे दाखविण्यात आले. नियमाप्रमाणे या योजनेअंतर्गत गायींचा विमा काढावा लागतो. म्हणून या योजनेअंतर्गत साधारणत: 300 ते 400 गायीचा विमा उतरविण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मी जबाबदारीने बोलतो. परवाच्या "तरुण भारत" या वर्तमानपत्रामध्ये या संदर्भात स्पष्ट विवेचन आलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, अकोला जिल्ह्यामध्ये 1 हजार गायीचे वाटप करण्यात आले. 1 कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला. त्यातील 70 लाख रुपये

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

अनुदानापोटी जिल्हा दूध संघाला प्राप्त झाले. 1 हजार गायींचे वाटप झाल्याचे रेकॉर्डवर दाखविण्यात आले. परंतु प्रत्यक्षात 300 ते 400 गायींचेच वाटप करुन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. या प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी आणि त्यांच्याकडून रक्कम वसूल करावी अशी मागणी त्यातील एका सेवकाने आपल्याकडे केलेली आहे. गायींचे टेंडर काढले जाते.

...नंतर श्री. भोगले...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ 19:50

श्री.पांडुरंग फुंडकर....

ज्याचे टेंडर मंजूर झाले अशा व्यापाऱ्यांना दूध संघाने ड्राफ्टने पैसे द्यायचे असा नियम आहे. परंतु दूध संघाने 25 टक्केही खरेदी ड्राफ्टने पैसे देऊन केलेली नाही. यातच सर्व गुपित आहे. संस्था चालकांनी गैरव्यवहार केल्यामुळे हे घडले आहे. अनेक ठिकाणी लाभार्थ्यांची नावे बोगस असल्याचे आढळले आहे. यामध्ये काही सोसायटया देखील आहेत. माझी मागणी आहे की, 5 कोटी रुपये या माध्यमातून पुरवणी मागणीद्वारे मागण्यात आले आहेत. फक्त एकाच जिल्हयात नव्हे तर ज्या सहा जिल्हयात पंतप्रधान पॅकेज लागू करण्यात आले आणि दुभत्या जनावरांचे वाटप झाले याची सखोल चौकशी केली तर अनेक बोगस प्रकरणे यातून उघडकीस येऊ शकतात. यामध्ये डॉक्टर्स सहभागी आहेत, अधिकारी सहभागी आहेत. एक नवीन रॅकेट तयार झाले आहे. या रॅकेटची उच्चस्तरीय चौकशी करावी. माननीय पंतप्रधान महोदयांनी विदर्भातील आत्महत्या करीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी 3700 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. ते पॅकेज बदनाम करण्याचा प्रयत्न चालू आहे. माननीय पंतप्रधानांना बदनाम करण्याचे कट कारस्थान चालू आहे, ते रोखण्याची गरज आहे. या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करणार का हे मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगावे एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्र.14, पृ.क्र.13 महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही चांगली योजना आहे. त्यासाठी करोडो रुपये खर्च करावयाचे आहेत. ही रक्कम आपण खर्च करीत असताना योजना राबविणाऱ्या यंत्रणेमध्ये त्रुटी असता कामा नये अशा प्रकारची मी मागणी करीत आहे. योजना चांगली आहे. परंतु त्यातील ज्या त्रुटी आहेत, त्या दूर करुन खरोखरच पोलिसांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी या योजनेचा उपयोग व्हावा. या बरोबरच ही योजना पोलिसांबरोबर होमगार्ड आणि नागरी संरक्षण दलासाठी सुध्दा लागू करावी.

सभापती महोदय, बाब क्र.20, पृ.क्र.15 तंटामुक्ती गाव मोहीम यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. महाराष्ट्रातील पोलीस दलातील हुशार आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना गावोगावी तंटे कोणामुळे होतात आणि शांतता कोणामुळे भंग पावते याची कल्पना असते. त्याचा गुप्त अहवाल मंत्रीमहोदयांनी घेतल्यास त्यानुसार कारवाई केल्यास तंटामुक्त गाव मोहीम राबविण्याची गरज भासणार नाही. परंतु योजना राबवित असताना त्यातील त्रुटींमुळे गावोगावी नव्हे तर गल्लोगल्लीत तंट्यांची संख्या वाढत असते. मी रत्नागिरी जिल्हयातील एका गावात गेलो होतो. तंटामुक्त गावाचे जे प्रमुख होते तेच मोठे भांडखोर होते. मी ग्रामस्थांना प्रश्न विचारला, या व्यक्तीला कशाकरीता अध्यक्ष केले? त्यांनी उत्तर दिले की, हा भांडखोर आहे म्हणूनच अध्यक्ष केले आहे. या अशा काही त्रुटी आहेत. खऱ्या अर्थाने पोलीस दलाच्या अहवालानुसार तंटामुक्तीसाठी पक्षभेद विसरुन योग्य माणसांची निवड केल्यास गाव तंटामुक्त होऊ शकते. शासनाने या बाबीचा गंभीरपणे विचार करावा.

सभापती महोदय, बाब क्र.23, पृ.क्र.16 इतर प्रशासनिक सेवा यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. मोठया आणि संवेदनशील शहरामध्ये होमगार्डबरोबर नागरी संरक्षण दल जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असते. हे दल देखील आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये पोलीस दलाला मदत करीत असते. त्यांच्यामार्फत आपत्ती निवारणासाठी प्रशिक्षण दिले जाते. निरनिराळ्या प्रकारची प्रशिक्षण शिबीरे घेतली जातात. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात हे दल उपलब्ध आहे. तेथे त्यांचे कार्यालय असते. त्या कार्यालयांची भूमिका ही पोलीस दलास उपयुक्त अशीच आहे. नागरी संरक्षण दल होमगार्डप्रमाणेच उपयुक्त दल आहे. गेली अनेक वर्षे या नागरी

..3..

श्री.संजय केळकर.............

संरक्षण दलासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली जात नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, होमगार्डसाठी तरतूद केली जाते त्याप्रमाणे नागरी संरक्षण दलासाठी देखील तरतूद केली पाहिजे. त्यांना वाहनाची आवश्यकता असते, स्ट्रेचरची आवश्यकता असते, निरनिराळ्या साहित्यांची गरज असते. जेणेकरुन ते पोलीस दलाला मदत करु शकतात. म्हणून नागरी संरक्षण दलासाठी देखील निधी उपलब्ध करुन दिला जावा अशी मी मागणी करतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 24, मोटार अपघात न्याधिकरण. महोदय, ठाणे शहर व जिल्हयात प्रचंड वेगाने होणारे नागरीकरण पाहता मोटार अपघाताचे प्रमाणही प्रचंड वाढलेले आहे. ठाणे शहरात असलेल्या मोटार अपघात दावा न्यायाधिकरण अधिक सक्षम करणे तसेच न्यायाधिकरण इमारतीचे नुतीनीकरण व रुपान्तरण करणे गरजेचे आहे. त्यासाठीही निधीची तरतूद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 25- खाडी बंदरावर प्रवासी सुविधा देण्याबाबत. महोदय, मुंबई बंदरानजीक एलिफंटा केव्हज (घारापुरीची लेणी) येथे दररोज हजारो प्रवासी कॅटमरान सर्व्हीसने जातात तेथे बोटीसाठी व्यवस्थित धक्का नाही तसेच स्त्रीया व पुरुषांकरिता असलेले प्रसाधनगृह पडक्या अवस्थेत आहेत. तेथे प्रवासी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे.

तसेच मुंबईहून अलिबाग-मांडवा रेवस अशी जलवाहतुक व प्रवासी वाहतूक सुरु असते तेथे जुन्या बुडालेल्या बोटींचे अवशेष या वाहतुकीत त्रासदायक ठरुन अपघातांची शक्यता वाढते त्यासाठी या परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून जुन्याबुडालेल्या बोटींचे अवशेष तेथून हटवण्यासाठी तरतुद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय,10 वर्षात 15 ते 20 पर्यटकांचे बळी घेणारी पिरवाडी जेट्टी काढून टाकणेबाबात. महोदय, ओएनजीसी ने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे गत 10 वर्षात पाठपुरावा करुनही बोर्डकडुन सहकार्य न मिळाल्याने अर्धवट पडकी जेट्टी तशीच आहे व पर्यटकांचे बळी जात आहे. सदर जेट्टी काढून टकाणेबाबात शासनास खर्चही करावयाचा नाही तो खर्च ओएनजीसी करणार असून फक्त परवानगी देण्याचा प्रश्न प्रलंबित आहे त्यामुळे या विषयाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्रमांक 108. मी दो-यावर गेलो असतांना राजापूर जि. रत्नागिरी येथील विश्रामगृहावर थांबण्यासाठी गेलो असता तेथे पाणी वीज आदीची काहीच व्यवस्था नव्हती त्यामुळे मला तेथून रत्नागिरी येथे यावे लागले माझी आपणास

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

विनंती आहे की, ग्रामीण भागातील आदिवासी डोंगरी भागातील जी विश्राम गृहे आहेत त्यांचे सुध्दा दुरुस्ती रूपांतरण करणे महत्वाचे आहे. तसेच या विश्रामगृहामध्ये किमान सोयी सुविधा पुरविणे गरजेचे आहे. गणपुतीपुळे येथील विश्रामगृहाची अस्था देखील वाईट आहे. या ठिकाणी पाणी नसल्यामुळे येथील विश्रामगृह वर्षातून 3-3 महिने बंद असते. त्यामुळे या विश्रामगृहाला पाण्याची सोय उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 115- नागरी आरोग्य सेवा. कोकण आरोग्य सेवा केंन्द्रे व रुग्णालये इतकी जीर्ण अवस्थेत आहेत की, त्या ठिकाणी संबंधित आरोग्य अधिकारी कोणालाही जाऊ देत नाही. कारण ते केव्हा कोसळतील याचा भरवसा नाही. मी कोकणातील अनेक रुग्णालयांना भेटी दिलेल्या आहेत. पनवेल येथील रुग्णालयाला मी भेट देत असता तेथील डॉक्टरांनी सांगितले की, साहेब आपण पुढे जाऊ नका. कालच स्लॅब कोसळून एक माणूस जखमी झालेला आहे आपण जर पुढे गेलात तर आपल्याही अंगावर स्लॅब कोसळू शकतो. त्यामुळे एका बाजूला आरोग्य सेवा नाही तर दुस-या बाजूला रुग्णालयांच्या दुरुस्तीसाठी निधी नाही अशी परिस्थिती आहे त्यामुळे या आरोग्य केंद्रांना निधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.संजय केळकर.........

बाब क्रमांक 118, पृष्ठ क्रमांक 89- राज्यात विविध ठिकाणी सुरु असलेले नुतनीकरण व बांधकाम - हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांचे नुतनीकरण, विद्युतीकरण, नवीन इमारत बांधणीसाठी आदिवासी विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग केलेला आहे. परंतु अद्यापर्यंत आश्रमशाळांची कामे सुरु झालेली नाहीत. या आश्रमशाळांची दुरुस्ती न झाल्यामुळे आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची फार मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. मी एका आश्रमशाळेला भेट दिली त्यावेळी तेथील विद्यार्थी-विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी विचारल्या. त्यांनी सांगितले की, आमची साधी पिण्याच्या पाण्याची सोय नाही. मुलींना प्रसाधनासाठी आश्रमशाळेच्या बाहेर जावे लागते. मुला-मुलांनी बाहेर आंघोळ करावी लागते. तेव्हा माझी विनंती आहे की, आदिवासी विभागाने वर्ग केलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने आश्रमशाळांच्या दुरुस्तीसाठी व नवीन इमारत बांधण्यासाठी खर्च करावा.

बाब क्रमांक 126, पृष्ठ क्रमांक 95 - राज्य महामार्ग व पूल- डिंगणी-फुसगुस, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी, येथील पुलाचे बांधकाम 1998 साली सुरु करण्यात आले. आजही त्या पुलाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. पुलाच्या ठेकेदाराचे जिल्ह्यात इतरत्र कामे सुरु असल्याने व सार्वजनिक बांधकाम विभागाने उदासीन व ठेकेदाराला पूरक असे धोरण ठेवल्यामुळे मागील चार वर्षापासून या पुलाचे काम ठप्प आहे. वारंवार पाठपुरावा केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने नवीन ठेकेदाराचा शोध घेण्याचे सुरु केल्याचे पत्र दिलेले आहे. पुरेशी आर्थिक तरतूद असतानाही केवळ ठेकेदाराचे हित पहायचे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या परिसरातील जनतेस वाऱ्यावर सोडले आहे. आता 2007 साल सुरु आहे. तेव्हा या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 139, पृष्ठ क्रमांक 119- जलसंपदा विभाग- मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च - ठाणे जिल्ह्यातील भातसा व सूर्या हे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. परंतु अद्यापपर्यंत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर........

कालव्यासाठी लागणाऱ्या वनजमिनीबाबत मान्यता न मिळाल्याने कालव्याची कामे झालेली नाहीत. वन जमीन मिळविण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले, वन जमिनीचा प्रस्ताव कोठे अडकला आहे याची काहीही माहिती मिळत नाही. या त्रुटी दूर केल्यास पालघर व शहापूर तालुक्यातील जवळपास 18 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. पण त्यासाठी शासनाची इच्छा शक्ती पाहिजे. तेव्हा शासनाने याबाबत पाठपुरावा करावा अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 218, पृष्ठ क्रमांक 185-नागरी आरोग्य सेवा- कोकणासारख्या अतिदुर्गम भागात असलेले सावंतवाडी येथील भाईसाहेब सावंत आयुर्वेदिक महाविद्यालय ग्रामीण भागातील जनतेस अतिशय उत्कृष्ट सेवा देत आहे. त्या संस्थेचे कार्य पाहता त्यांना अतिरिक्त अनुदान द्यावयास पाहिजे. परंतु त्याऐवजी शासन त्यांच्या वेतनेतर अनुदानात कपात करीत आहे. तेव्हा या बाबींचा पुनर्विचार करुन त्या संस्थेच्या वेतनेतर अनुदानात कपात न करता या संस्थेस अतिरिक्त वाढीव अनुदान देण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 265, पृष्ठ क्रमांक 222 - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, जिल्हा रायगड येथील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करावा अशी मागणी मी मागील अधिवेशनात केली होती. त्यावेळी मला आश्वासन देण्यात आले होते की, आम्ही लवकरच पाचवा वेतन आयोग लागू करू. परंतु या आश्वासनाची पूर्तता अद्यापपर्यंत झालेली नाही. पाचवा वेतन लागू करुन सात वर्षे झाली, परंतु अद्यापपर्यंत या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता त्यांनी लवकरात लवकर करावी अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 266, पृष्ठ क्रमांक 222 - विविध विद्यालयात व विद्यापीठांत संगीत विषय शिकविला जातो. शासनाच्या आकृतिबंधामध्ये तबलावादकाचे पद मंजूर नसल्याने संगीत शिक्षकाला साथ देण्यासाठी तबला वादकाची कला अवगत असणाऱ्या अन्य पदावरील कर्मचाऱ्याकडून ही गरज भागविली जाते. तबलावादकांना एकसमान वेतनश्रेणी देऊन ती पदे भरण्यात यावीत अशी मी मागणी करीत आहे.

यानंतर श्री.पुरी.....

श्री.संजय केळकर...

बाब क्रमांक 221, पृष्ठ क्रमांक 194 (आदिवासी आश्रमशाळा आहार खर्च)--सभापती महोदय, ठाण्यामध्ये आदिवासी मुलींसाठी वसतीगृह आहे. तेथील आश्रमशाळेस मी स्वत: भेट दिली असून तेथील मुलींना जे अन्न खायला दिले जाते, ते मी स्वत: त्यांच्यासोबत बसून खाल्ले आहे. त्याठिकाणी अन्नाची फारच दुरावस्ता आहे. तेथील दुरावस्था पाहिल्यानंतर कुठल्याही संवेदनशील माणसाच्या डोळयात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. अशाप्रकारे तेथील आश्रमशाळेत खाद्यपदार्थांची व्यवस्था होत आहे. "खूप खूप शिक ग पोरी, ताठमानेने जगशील तरी" असे आपण आदिवासी भागातील मुलींना म्हणतो. परंतु त्या मुलींना जर आपण अशाप्रकारचे अन्न देत असाल तर त्या मुली तेथे येणार नाहीत व शिक्षणही घेणार नाहीत. त्यामुळे माझी आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांना विनंती आहे की, यासाठी आपण त्यांना पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा व त्यांना चांगल्याप्रकारचे अन्न वेळेवर द्यावे. सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे माझे भाषण येथेच थांबवतो.

धन्यवाद !

-----

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागंण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 20, पृष्ठ क्रमांक 15 वर मी बोलणार आहे. जणसामान्यांचा वाली म्हणून उभ्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस ज्यांचे आदराने नांव घेतो ते राज्याचे गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांनी, सत्य व अहिंसेचे तत्व स्वीकारले ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नांवाने तंटामुक्त गांव करण्याची योजना सुरु केली, त्याबद्दल प्रथम मी त्यांचे शतश: हार्दिक अभिनंदन करतो. त्या योजनेचा प्रचार करण्याच्या दृष्टीने व ही योजना तळागाळातील शेवटच्या माणसांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने त्यांनी याठिकाणी जी अडीच कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याबद्दलही मी त्यांचे हार्दिक अीिनंदन करतो.

बाब क्रमांक 96, पृष्ठ क्रमांक 74 (सार्वजनिक बांधकाम विभाग)--सभापती महोदय, मराठवाडा विभागासामध्ये म्हणजे माझ्या मतदारसंघात बीओटी तत्वावर विशेष करुन लातूर जिल्हयामध्ये रस्ते आणि पूलांसाठी 500 कोटी रुपयांची तदतूद केलेली आहे, त्याबद्दलही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रिमहोदयांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. परंतु त्याचबरोबर बीओटी तत्वावर जे पूल व रस्ते बांधले जातात, त्या माध्यमातून टोलनाके उभारले जात आहेत. याबाबत माझी अशी सूचना आहे की, भविष्यकाळात आपण अशाप्रकारे बीओटी तत्वावर बांधकाम करीत असताना या टोलची रक्कम अमुक अमुक तारखेपर्यंत, अमुक अमुक वर्षापर्यंत आहे, अशाप्रकारचा लोकांना स्पष्टपणे दिसेल असा एक बोर्ड लावावा. टोलची मुदत संपल्यानंतरही व रस्ता खराब झााल्यानंतरही आपण टोल घेता, हे योग्य नाही. म्हणून माझ्या सूचनेची नोंद घ्यावी, ही विनंती.

बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 77--जून्या निकामी वाहनांच्या बदलीत 70 नवी वाहने खरेदी करण्यासाठी सुध्दा याठिकाणी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण नवीन वाहने जरुर घ्या, ती घेतलीच पाहिजेत. परंतु आम्ही तालुका-जिल्हयाच्या ठिकाणी फिरत असताना पाहतो की, शासनाच्या बऱ्याच गाडया एकाच जागी गंजलेल्या अवस्थेत धूळ खात पडलेल्या आहेत. त्या गाडया आपण प्रथम निकाली काढून त्या विकल्या पाहिजेत की जेणेकरफन शासनास त्यातून महसूल मिळेल.

..3....

श्री.विक्रम काळे......

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे एकत्रितपणे बाबींवर मी बोलणार आहे, बाब क्रमांक 100, 111, 113, 114, 117, 118,121 आणि 125 वर मी एकत्रितपणे बोलणार आहे. यामध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण, शासकीय वाङ:मय इमारतीचे बांधकाम, शासकीय तंत्रनिकेतन उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, नांदेड तसेच शासकीय औषण निर्माण महाविद्यालय इमारत औरंगाबाद, लातूर शासकीय महाविद्यालय इमारत, शासकीय दंत महाविद्यालयाची इमारत, शासकीय आयटीआय, जालना आणि विजापूर तसेच आयटीआय वसतीगृह अंबाजोगाई, आष्टी, कळमेश्वर, गंगापूर या ठिकाणच्या इमारतींच्या बांधकामासाठी जवळपास 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.......

यामुळे त्या ठिकाणी शिक्षकांची सुविधा होणार आहे, शिक्षणाला चालना मिळालेली आहे, त्यामुळे मी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 135, पृष्ठ क्रमांक 118 यामध्ये बीड जिल्हयातील जलतळयांची दुरुस्ती करण्यासाठी, नुतनीकरणासाठी 13 कोटी 83 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी मी जलसंपदा मंत्री श्री.अजितदादा पवार तसेच राज्यमंत्री श्री.सुनिल देशमुख यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 147, पान क्रमांक 123 यामध्ये गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने माझ्या मतदारसंघामध्ये जे अपूर्ण प्रकल्प आहेत ते पूर्ण करण्यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यामुळे शेतक-यांना उशिरा का होईना न्याय मिळालेला आहे, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 176, पृष्ठ क्रमांक 146 याव्दारे पंचायत राज संस्थांचे आद्यप्रवर्तक स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्राम पंचायतींना पारितोषिके देण्यात येणार आहेत. एकप्रकारे स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्याचा अभिनंदनीय उपक्रम शासनाने हाती घेतला त्याबद्दल ग्राम विकास विभागाच्या मंत्री महोदयांचे तसेच राज्यमंत्री महोदयांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 215, पृष्ठ क्रमांक 183 यामध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांमध्ये शिकणा-या प्रथम वर्षातील मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरुपात वैद्यक शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे ठरविण्यात आले आहे व त्यासाठी 82 लक्ष 26 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मला वाटते हे काम दरवर्षी केले पाहिजे, अशी सूचना या माध्यमातून करतो.

...2.......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे........

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 222, पृष्ठ क्रमांक 194 मध्ये अनुदानित आश्रमशाळा व मुंलोद्योगोत्तर आश्रमशाळांना महागाई भत्यात वाढ झाल्याने अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 224 व 229 यामध्ये आदिवासी क्षेत्रातील ज्या शाळा 50 टक्के आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण पूर्ण करतात त्यांना अनुदान देण्यासाठी 80 कोटी 86 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. माझी अशी सूचना आहे की, आदिवासी विभागात ज्या शाळा आहेत त्या सगळयांना अनुदान दिले पाहिजे. ज्या शाळांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थी शिकतात त्यांनाच अनुदान द्यावयाचे हा निकष चुकीचा आहे. आदिवासी विभागामध्ये ज्या शाळा चालतात त्या 100 टक्के शाळांना अनुदान दिले पाहिजे, अशी सूचना या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 234, पृष्ठ क्रमांक 198 अन्वये आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी जो चांगला निर्णय शासनाने यावर्षी घेतला आहे, तो स्तुत्य आहे. परदेशामध्ये आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षण घेतील, उच्चशिक्षण घेतील त्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 10 विद्यार्थ्यांसाठी 1 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी शासन कशा पद्धतीने निर्णय घेत आहे याचे मुर्तीमंत उदाहरण या निमित्ताने पहावयास मिळत आहे. त्यांचे अभिनंदन करीत असतांना मला अशी सूचना करावयाची आहे की, 10 विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न रहाता जे आदिवासी विद्यार्थी परदेशात जाऊन शिक्षण घेतील त्या सर्वांना पुढच्या कालखंडात शिष्यवृत्ती द्यावी.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 266, पृष्ठ क्रमाक 222 अन्वये खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन देण्यासाठी जेवढे काही वरिष्ठ महाविद्यालये अनुदानासाठी पात्र ठरतील असे 128 महाविद्यालये आहेत. आपण 8/8 शाळांसाठी अनुदान मिळावे म्हणून ओरडतो. या ठिकाणी मात्र पाठपुरावा न करता सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी 128 महाविद्यालयांसाठी 47 कोटी 84 लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. त्यांचे आणि राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

...3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.......

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 267, पृष्ठ क्रमांक 222 अन्वये कर्मचा-यांना महागाई भत्ता देण्यासाठी 62 कोटी 70 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. महागाई भत्ता प्रलंबित होता तो एका झटक्यात देऊन टाकला आहे. त्यांचेही अभिनंदन करतो.

यानंतर श्री.बोरले..........

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ........

सभापती महोदय, बाब क्र.272, पृष्ठ क्र.224 विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी खाजगी विनाअनुदानीत व कायम स्वरुपी विनाअनुदानीत असलेल्या तंत्र शिक्षण संस्थांमध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक फीच्या 50 टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी 31 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, शासनाने शंभर टक्के तरतूद मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केली पाहिजे, एवढी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.16, पृष्ठ क्र.14 विशेष सरकारी अभियोक्ता यांच्या फीसाठी तरतूद केलेली आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, शासन जे सरकारी अभियोक्ते नियुक्त करते त्यांचा दर्जा एकदा तपासून बघितला पाहिजे. ज्या पद्धतीने त्यांना पैसे दिले जातात त्याप्रमाणात त्यांचे रिटर्नस येतात किंवा नाही हे तपासून बघितले पाहिजे. तुम्ही त्यांना जी फी देता त्यापेक्षा जास्त फी समोरचा आरोपी देतो त्यामुळे त्यांच्या दर्जाचे मुल्यमापन व्हावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र. 12, पृष्ठ क्र.13 सरकारी अभियोक्त्यांकरिता विधिविषयक पुस्तके खरेदी करण्यासाठी 40 लाख 90 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. ही अभिनंदनीय बाब आहे. कारण सरकारी वकिलांच्या पुस्तकांची परिस्थिती अशी आहे की, तुमच्या पैकी कोणी ग्रंथालयात जाऊन तेथील पुस्तकांची परिस्थिती बघितली तर तेथे कोणतेही रेफरन्स मिळत नाहीत आणि असले तरी ते वाचण्याची तसदी कोणी घेत नाही. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, आपण इंग्रजी भाषेची पुस्तके घेतली असली तर ते शिकण्यासाठी एखाद्या कोचिंग क्लासची सुध्दा तरतूद करा. कारण मॅजिस्ट्रेट लोक जे जज्जमेंट देतात ते जज्जमेंट सुप्रिम कोर्टाचे जज्ज फेकून देतात. हे मी स्वत: माझ्या डोळयांनी बघितलेले आहे आणि तेथे आपल्या जजेसवर असे ताशेरे आढलेले आहेत की, यांना आधी इंग्रजी शिकवा, यांचा व्यवस्थित क्लास घ्या अशा प्रकारचे रिमार्कस पास केले जातात. आपण पुस्तकांसाठी जी तरतूद केलेली आहे त्याचा योग्य वापर केला जातो की नाही हे बघितले पाहिजे. त्या पुस्तकांचा योग्य तो वापर व्हावा, अशी माझी इच्छा आहे.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.20, पृष्ठ क्र.15 न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यामध्ये पुरवठा हे नेमके काय आहे, याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.26, पृष्ठ क्र.17 मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील गृह विभागाच्या कार्यालयामध्ये वातानुकूलन सुविधा पुरविणेसाठी तरतूद केलेली आहे. मंत्रालयातील सातव्या माळयावर पत्रे लावलेले होते. ते पत्रे एवढे तापत होते की, तेथे कोणी काम करीत नव्हते. आता तेथे ए.सी. लावल्यानंतर हे कर्मचारी थंड होणार नाहीत याची कृपया काळजी घ्यावी, एढेच मी या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, पृष्ठ क्र.40, बाब क्र.63 राज्यस्तरीय श्रेणी एक व श्रेणी दोनच्या 270 पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करण्यासाठी 40 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. पशुधन वाचविण्यासाठी आणि जनावरांना औषध पुरवठा, शस्त्रक्रिया इत्यादीसाठी शेतक-यांकडून पैसे घेतले जातात. पशुवैद्यकीय दवाखान्यात एक जनावर जरी नेले तरी औषधांसाठी 100 ते 150 रुपये खर्चशेतक-यांकडून घेतले जातात. पर्यायाने शेतकरी आपले पशुधन तेथे घेऊन जात नाहीत. त्यामुळे पशुधनाचा नाशही होतो. औषधी मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिल्यास निश्चितपणे पशुधन वाचविण्यासाठी आपण शेतक-याला मदत केल्यासारखे होईल.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे.....

मी याठिकाणी औषाधांसाठी अधिक निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करीत आहे. लसीकरण,संसर्गजन्य असाध्य रोग जे आहेत त्यांच्या संदर्भामध्ये जास्तीत जास्त औषधांच्या संदर्भामध्ये मदत झाली तर पशुधन आपल्यला वाचविता येईल,असे मला वाटते.

पान क्रमांक 194,बाब क्रमांक 221 माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पादत्राणे,पायमोजे,हाफ पँट व टी-शर्ट पुरविण्यासाठी अतिरिक्त निधी रुपये 27,14,23,000 रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो, परंतु या आदिवासी विभागातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथालये,ग्राऊंड,वाचनालये,संगणक यासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर त्यांच्या सर्वांगीण विकास साधता येईल.

पान क्रमांक 195,बाब क्रमांक 224 आदिवासी क्षेत्रातील 22 माध्यमिक शाळांना सहायक अनुदान रुपये 80,86,000 एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. आदिवासी क्षेत्रामध्ये एकूण 51 माध्यमिक शाळा आहेत. तथापि यामध्ये जी काही अट टाकलेली आहे की, त्या शाळेतील प्रत्येक तुकडीमध्ये 50 टक्के विद्यार्थी हे आदिवासी असले पाहिजे तरच त्या शाळांना 100 टक्के अनुदान जाहीर करण्यात येईल. आदिवासी भागामध्ये एकूण 29 आश्रम शाळांना 100 टक्के अनुदान मिळालेले नाही. या 29 शाळांना ती अट शिथिल करुन 100 टक्के अनुदान जाहीर केले तर गेल्या पाच -सहा वर्षांपासून तेथील शिक्षकांना वेतन नाही व त्या शाळांमध्ये ज्या सोयीसुविधा नाहीत, या सर्व गोष्टी पूर्ण करता येतील. याकरिता शासनाकडून तरतूद व्हावी,अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

पान क्रमांक 197,बाब क्रमांक 231 ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत आदिवासींची वस्ती सुधारिण्यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळण्यासाठी गावांची निवड व्हावी,याकरिता शासनाकडून प्रयत्न केले जावेत.

बाब क्रमांक 234,पान क्रमांक 198 आदिवासी विभागाने उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्या-या 10 आदिवासी विद्यार्थ्यांसाठी एक कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आदिवासी भागातील सर्वच विद्यार्थ्यांना म्हणजे ज्यांना उच्चशिक्षणासाठी परदेशात जायची इच्छा असलेल्यांना पाठविण्यासाठी शासनाने तरतूद करावी,असे मला या ठिकाणी सुचवावेसे वाटते.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे.....

पान क्रमांक 199,बाब क्रमांक 235 अक्कलकुवा व धडगाव तालुका,जिल्हा नंदुरबार येथे विशेष कृती कार्यक्रमांतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाचे बळकटीकरण करण्याकरिता चार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, जळगावं जिल्हयातील रावेर,चोपडा तालुक्यातील काही दुर्गम भागातही शासनाने रोजगार निर्मितीसाठी तरतूद करावी,असे या ठिकाणी मला शासनाला सुचवावेसे वाटते,एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3



JPK/ SBT/ प्रथम श्री.बोरले.... 20:20

श्री.उल्हास पवार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, अनेक बाबींवर मला बोलावयाचे होते पण या ठिकाणी वेळ कमी असल्यामुळे मी फक्त दोन बाबींवरच बोलणार आहे.

पान क्रमांक 241 बाब क्रमांक 288 व 289,दर्जेदार मराठी चित्रपटांसाठी 2 कोटी रुपयांचे अतिरिक्त सहायक अनुदान शासनाने जाहीर केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दाला 150 वर्ष पूर्ण झाले, म्हणून सुप्रसिध्द अभिनेते श्री.रमेश देव यांनी वासूदेव बळवंत फडके यांच्या जीवनावर केवळ मराठीतूनच नव्हे तर इंग्रजी आणि इतर भाषांमधून चित्रपट काढण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे विनंती केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी 50 लाख रुपयांची यासाठी तरतूद करुन त्याचा पहिला हप्ता श्री.रमेश देव यांना दिला. त्याबद्दलही मी शासनाचे अभिनंदन करतो. या चित्रपटाकरिता वेगवेगळया स्थानिक स्वराज्य संस्थांनी देखील किमान अनुदान मंजूर केले,त्याचेही समर्थन करुन शासनाने त्यालाही मान्यता द्यावी. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दाला 150 वर्ष पूर्ण होत असतांना शासनाने हा एक उत्तम निर्णय घेतलेला आहे. मराठी चित्रपटसृष्टीला भविष्यात ऊर्जितावस्था येईल आणि मराठी चित्रपटसृष्टीची जागतिक स्तरावर किर्ती होईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्या बाबीवर बोलत आहेत, त्या बाबीवर कालच या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री.गागरे....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, नांदेड येथील गुरुगोविंदसिंग यांच्या समाधीला 400 वर्षे पूर्ण होत असताना हे जागतिक तीर्थस्थान विकसित केले जाणार आहे. यासाठी तसेच पुरातन वास्तूसाठी केंद्र सरकारने व राज्य सरकारने खास तरतूद करुन विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. याबाबत माझी विनंती आहे की, पंढरपूर या तीर्थक्षेत्राच्या ठिक्राणी लाखो भाविक आषाढी व कार्तिकी एकादशीला येतात. तसेच प्रत्येक एकादशीलाही लाखो भाविक येतात त्यामुळे पंढरपूर शहराचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी पाच मिनिटात माझे भाषण संपविणार आहे.

पान क्रमांक 222 बाब क्रमांक 266 : मान्यताप्राप्त अशासकीय महाविद्यालयांना 47 कोटी, 84 लाख रुपये वेतन अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव आहे. राज्य शासनाने निर्णय घेतला आहे की, ग्रामीण भागामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एकतरी महाविद्यालय अनुदानित स्वरुपाचे असले पाहिजे. कल्याण तालुक्यात ग्रामीण भागात एकही महाविद्यालय अनुदान तत्वावर नाही. टिटवाळा येथे केवळ ज्ञानदीप संस्थेचे एकमेव महाविद्यालय सुरु आहे. कष्टकऱ्यांची 1500 मुले या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. एक रुपया भरुन येथे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या महाविद्यालयाच्या अनुदानाचा प्रश्न मी मागील 3-4 अधिवेशनापासून मांडत आहे. अद्याप त्यांना अनुदान मिळालेले नाही. याबाबत शासनाने विचार करावा.

पान क्रमांक 226 बाब क्रमांक 274 : आय.टी.आय. चा दर्जा वाढविण्यासाठी 17 लाख 76 हजार रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद करणे आवश्यक होते. या आय.टी.आय. चा दर्जा वाढविण्याबरोबर येथे काम करणारे कर्मचारी, अधिकारी यांचाही गुणात्मक दर्जा वाढविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, गडचिरोली येथे एका आदिवासी महिलेचा दोन वर्षापासून छळ होत आहे. त्याबरोबरच येथील प्राचार्य अनेक कर्मचाऱ्यांचा छळ करीत आहेत. येथील कर्मचाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना याची पत्रे पाठविली आहेत, या प्राचार्यांवर पोलीस केस करुनही कोणतीही कारवाई झ ालेली नाही. येथील एक बातमी अत्यंत धक्कादायक आहे. त्याच संस्थेमध्ये जवळपास दीड तासाची एक ब्ल्यू फिल्म आढळून आलेली आहे व ती जप्त केलेली आहे. कोणावरही गुन्हा दाखल झालेला नाही. गडचिरोली येथील प्राचार्यांची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

पान क्र.223, बाब क्रमांक 270 : शासकीय तंत्र माध्यमिक शाळांमध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्याकरिता 28 लाख 74 हजार रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. तंत्र माध्यमिक विद्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. याबाबत दीड महिन्यापूर्वी एक बैठक झाली होती. संबंधित अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले होते, त्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही झ ालेली नाही. याबाबत शासनाने निवेदन करणे आवश्यक आहे.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

पान क्रमांक 194, बाब क्रमांक 221 : शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहाच्या आहार खर्चासाठी तसेच शासकीय आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालांमधील विद्यार्थ्यांना पादत्राणे, पायमोजे, हाफ पॅंट व टी-शर्ट पुरविण्यासाठी अतिरिक्त निधी म्हणून 27 कोटी 14 लक्ष 23 हजाराची तरतूद केली आहे. आवश्यक त्या वस्तु विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. माननीय आदिवासी मंत्री महोदयांना मी जाणीव करुन देऊ इच्छितो की, आदिवासी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आपण मोठी तरतूद करीत असून त्यांच्यावर खर्च करीत आहात. त्यामुळे खरेदी करताना चांगल्या व दर्जात्मक वस्तुंची खरेदी करुन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात. यासाठी खरेदी व वाटपावर योग्य ते नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अनुदानित आश्रमशाळा, शासकीय आश्रमशाळा यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे खर्चासाठी मिळणाऱ्या रकमेतील तफावत दूर करण्याची आवश्यकता आहे.

पान क्रमांक 195, बाब क्रमांक 222 : अनुदानित आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रमशाळांना वेतन अनुदान देण्यासाठी अतिरिक्त तरतूद 21 कोटी 63 लाख, 77 हजार रुपये केलेली आहे. ही तरतूद आवश्यक आहे. आदिवासी विभागाच्या ज्या प्राथमिक शाळा आहेत, तेथील शिक्षकांना वेठबिगारासारखे राबविले जाते.

यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. गागरे..... 20:30

श्री. रामनाथ मोते.....

12 रुपये घडयाळी तास या दराने शिक्षकांना राबवून घेतले जात आहे. शिक्षकांना घडयाळी तासावर नेमण्याची प्रथा शासनाने नवीनच सुरु केलेली आहे. ही प्रथा शासनाने एक तर बंद तरी करावी किंवा त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनामध्ये तातडीने वाढ तरी करावी अशी माझी शासनाकडे विनंती आहे.

सभापती महोदय, शेवटच्या एका मुद्दयावर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. बाब क्रमांक 224, पान क्रमांक 195 यावर मी आता बोलणार आहे. 22 माध्यमिक शाळांना अनुदान देण्यासाठी 80 लाख 86 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी विभागातील शाळांना मान्यता देण्याचे काम शिक्षण विभाग करीत असते. एखादी शाळा अनुदानास पात्र आहे किंवा नाही याचे निकष शिक्षण विभागाने ठरवून दिलेले आहेत. त्याचे मुल्यांकन शिक्षण विभाग करीत असते. ही शाळा अनुदानास पात्र आहे किंवा नाही याचा निर्णय शिक्षण विभाग घेत असते. पात्र शाळांना आदिवासी विभागाकडून अनुदान मिळत असते. परंतु याठिकाणी आदिवासी विभागाने पात्र शाळांना अनुदान मिळू नये यासाठी या शाळांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थी असावेत अशी अट घातलेली आहे. ही अट अत्यंत चुकीची आहे. त्यामुळे ही अट आपण काढून टाकावी. शासनाच्या जीआर मध्ये यासंदर्भात कोणताही उल्लेख नाही. अशा प्रकारचा नवीन क्लॉज त्यामध्ये टाकलेला आहे. खरे म्हणजे आदिवासी विभागातील शाळांना पाचव्या वर्षापासून 100 टक्के अनुदान मिळू शकते. यासंदर्भात न्यायालयामध्ये प्रकरण गेलेले आहे. आदिवासी शाळांना अनुदान देण्याबाबत आपला जर हट्टच असेल तर मग आम्हाला न्यायालयात जावे लागेल. याबाबतीतील एक प्रकरण यापूर्वीच घडलेले आहे. पेण तालुक्यामधील, एका आदिवासी विभागामधील शाळेमध्ये 50 टक्के विद्यार्थी नाहीत. ही केस शेवटी न्यायालयामध्ये गेली व या शाळेस 100 टक्के अनुदान देण्यात यावे असा निर्णय न्यायालयाने दिला. आता पुरवणी मागण्यांमध्ये या शाळेला अनुदान देण्यासाठी आपल्याला तरतूद करावी लागेल. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आदिवासी विभागातील शाळांना 50 टक्के विद्यार्थ्यांची जी अट आहे ती आपण काढून टाकावी. आपण याठिकाणी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

..................





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मागील नागपूर अधिवेशनामध्ये मला शेवटी बोलण्याची संधी मिळाली होती व यावेळी देखील कदाचित मला बोलण्यासाठी शेवटची संधी दिलेली आहे. मी मुद्दयांची पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 220, पान क्रमांक 186 याविषयावर मी आता बोलणार आहे. मिरज रुग्णालयामध्ये काही इक्वीपमेंट व इंफ्रास्ट्रक्चर खरेदी करण्याकरिता तरतूद करण्यात आली होती. मी डॉक्टर नसलो तरी देखील मेडीकल कॉलेज चालविण्याचा मला अनुभव असल्यामुळे मी याबाबत बोलणार आहे. क्रमांक 7 मध्ये आपण एमआरआय मशिनसाठी दीड कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आज टेक्नॉलॉजी खूप अपग्रेड झालेली आहे. आपण 0.5 ची एम.आर.आय मशिन खरेदी करत आहोत. कलर ड्रॉपलर 70 लाख रुपयांचे घेत आहोत व डायलेसीस मशिन 40 लाख रुपयांचे घेत आहोत. 0.5 चे एमआरआय मशिन घेण्याऐवजी त्यापेक्षा चांगल्या टेक्नॉलॉजीचे मशिन अधिक पैसे देऊन खरेदी केले तर चांगले मशीन आपल्याला मिळू शकेल. सभागृहामध्ये आता सन्माननीय डॉ. सुनिल देशमुख आहेत ते दखील ही गोष्ट मान्य करतील. कलर ड्रॉपलर 70 लाख रुपयांना कोठेही मिळत नाही. हे मशिन जास्तीत जास्त 20 ते 25 लाख रुपयांमध्ये मिळू शकते. डालेसीस युनिट करता 40 लाख रुपये दिलेले आहे परंतु ते युनिट देखील 20 लाख रुपयांना मिळू शकते. हे पैसे वळते करुन आपण चांगल्या दर्जाचे एमआरआय मशिन घेऊ शकतो. नागपूरमधील गव्हर्मेंट मेडीकल कॉलेजमध्ये आयजीएम संदर्भात प्रश्न निर्माण झाला होता. शासकीय रुग्णालयाच्या इंफ्रास्ट्रक्चरची अतिशय वाईट अवस्था आहे. तेथे वाचनालयातील जर्नल बंद झाले आहे. माननीय मंत्री महोदय, डॉ. सुनील देशमुखांनी तेथे भेट दिली, त्यावेळी त्यांनी हे पाहिले आहे. आपले पी.जी चे विद्यार्थी व यु.जी. चे विद्यार्थी तेथून पास आउट होतात. परंतु या वाचनालयाला एकही रुपयाची तरतूद शासनाने केलेली नाही. तेथील जर्नल देखाील शासनाने बंद केलेले आहे. नवीन जर्नलची माहिती न घेता तेथील विद्यार्थी कसे काय शिक्षण घेऊ शकतील व कसे काय डॉक्टर होतील हा एक मोठा प्रश्न आहे. आपले बजेट मोठे आहे. केंद्र शासनाकडून देखील 120 कोटी रुपये राज्य शासनाला मिळणार आहे. या वाचनालयासाठी 25-50 लाख रुपयांची तरतूद आपण केली तर तेथील विद्यार्थ्यांचे भले होईल.

यानंतर श्री. सुंबरे...

श्री.सागर मेघे ....

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न हा तंत्रशिक्षणासंबंधातील आहे. आज मी यामध्ये इंजिनिअरींग कॉलेजांसाठीची तरतूद पहात होतो. त्यात आयटीआयसाठी तरतूद आहे, त्याबद्दल मी जरूर सरकारचे अभिनंदन करीन, परंतु इंजिनिअरींगसाठीच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी मात्र काहीही तरतूद यात नाही. आपल्याला माहिती असेल की, आता एआयसीटीइचे चेअरमन युएसएला असताना आपला युएसएच्या ॲक्रिडिशन कौन्सिलसोबत आपला करार झाला. प्रोव्हिजनल ॲक्रिडिशनसाठी भारताला त्यांनी प्रोव्हिजनल नंबर दिला. दोन वर्षात आपल्याला पर्मनंट ॲक्रिडिशन आणि ॲफिलिएशन मिळू शकते. आज आपण इंजिनिअरींग कॉलेजेस्चे इन्फ्रास्ट्रक्चर्स बरोबर बनविले नाही आणि एआयसीटीइ कडून आपल्या शासकीय इंजिनिअरींग कॉलेजेसनी ॲक्रिडिशन करून घेतले नाही तर उद्या आपली इंजिनिअरींग कॉलेजातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्याय मुलांना त्याचा काहीही फायदा मिळणार नाही. आज जेवढी खाजगी कॉलेजेस आहेत, त्यातील 80 टक्के कॉलेजेसना आणि तुम्ही म्हणजे डायरेक्टरनी आता जीआर काढून सर्व खाजगी इंजिनिअरींग कॉलेजेसना ॲक्रिडिशन करून घेण्याचे बंधन घातले आहे. ही चांगली गोष्ट आहे. सर्व कॉलेजेसनी ॲक्रिडिशन करून घेऊन आपले स्टँडर्ड वाढविले पाहिजे. माझी आपल्याला विनंती आहे की, शासनाची देखील इंजिनिअरींग कॉलेजेस आहेत त्याचेही इन्फ्रास्ट्रक्चर वाढवून त्यासाठी देखील आवश्यक ती पैशाची तरतूद करून या येणाऱ्या दोन वर्षामध्ये, समजा या पुरवणी मागणीतून नाही जमले तरी पुढील बजेटमधून आपण त्यासाठीची तरतूद करून आपल्या सर्व इंजिनिअरींग कॉलेजेस्ची इन्फ्रास्ट्रक्चर्स चांगली करून आपण केंद्र सरकारच्या एआयसीसी कडून आपली कॉलेजेस अपटूडेट केले तर येत्या भविष्यकाळामध्ये, दोन वर्षामध्ये त्यातून उत्तीर्ण होणाऱ्या सर्व मुलांना परदेशामध्ये, यूएसमध्ये चांगली संधी मिळू शकेल. सभापती महोदय, आपण मला या चर्चेत भाग घेऊन बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

***

..... 5एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेताना प्रथमत: मी पृ.15 वरील बाब क्र.20 वर बोलणार आहे. शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त गाव ही योजना सुरू केली आहे आणि या मोहिमेची जाहिरात व प्रसिद्धी करण्यासाठी अडीच कोटी रूपयांची पूरक मागणी येथे केलेली आहे. आता याबाबत मला येथे तंटा करावयाचा नाही. पण अगदी गाव पातळीवर देखील सरकारची अगदी सरपंच, तलाटी, पोलीस पाटील पासून अगदी वर पर्यंतची यंत्रणा असताना इतका खर्च या योजनेची प्रसिद्धी करण्यासाठी करण्याची आवश्यकता नव्हती असे मला वाटते. त्यापेक्षा हा पैसा सरळ अनुदानसाठी गेला असता तर आणखी गावे तंटामुक्त झाली असती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 25 - देशांतर्गत जलवाहतूक या शीर्षाखाली रूपये 24 लाख 85 हजाराची ही पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. मोरा बंदर, तालुका उरण येथे प्रसाधनगृहाचे बांधकाम तसेच हाडी व पानखोल, तालुका मालवण जिल्हा सिंधुदुर्ग येथे प्रवासी धक्क्याचे बांधकाम करण्यासाठी ही पूरक मागणी केलेली आहे. सभापती महोदय, प्रवासी जल वाहतूक वाढविण्यासाठी आतापर्यंत या सरकारला पूर्णपणे अपयश आलेले आहे. मुंबईमध्ये चारही बाजूने पाणी असताना देखील प्रवासी जलवाहतूक सुरू करण्याची मोठी संधी या सरकारला होती. पण हे सरकार याबाबतीत काहीच का करू शकले नाही हा प्रश्न आहे. मध्यंतरी हॉवरक्राफ्ट सेवा सुरू झाली होती पण तीही थोड्याच काळात बंद पडली. तेव्हा सरकारने यासाठी सबसिडी दिली तर ही सेवा चांगल्या प्रकारे सुरू होऊ शकते तरी याबाबत शासनाने जरूर विचार करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 92, पृष्ठ 73 - पोलीस अधिकाऱ्यांचे निवासस्थान, कार्टर रोड, वांद्रे-पश्चिम,मुंबई येथील इमारतीत जुन्या लिफ्ट काढून नवीन लिफ्ट बसविण्यासाठी 11.80 लाख रूपये प्रस्तावित केलेले आहेत. परंतु मुंबईतील पोलिसांच्या चाळींमध्ये राहणाऱ्या पोलीस आजही हलाखीमध्ये दिवस काढत आहेत. मग त्या चाळी बीडीडी,वरळी येथील असोत वा वरळी पोलीस कॅम्पमधील असोत वा दादरच्या बीआयटी चाळी असोत, त्यांची डागडुजी करण्यासाठी आपण काही निधी देणार आहात की नाही ? मुंबईतील पोलिसांसाठी मुंबईमध्ये चांगली घरे मिळावित यासाठी आपल्या काही योजना आहेत काय ? असल्यास, त्याची माहिती आपण द्यावी.

...... 5एफ 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेंडगे .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 104, पृष्ठ क्र.80 - नाबार्डच्या कर्ज सहाय्यातून मार्ग व पूल बांधण्यासाठी 90 कोटीचा निधी या पूरक मागणीतून प्रस्तावित केलेली आहे. या ठिकाणी मी आपले लक्ष सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील अकले ते ढालगाव या रस्त्याकडे वेधू इच्छितो. हा रस्ता मला आठवते तसे गेली 30 वर्षे नादुरूस्त अवस्थेत आहे. प्रत्येक 5-10 वर्षांनी त्या रस्त्यावर दोन्ही बाजूंनी खडी आणि दगड आणून टाकले जातात परंतु 2-3 वर्षातच ते सारे गायब होतात आणि पुन्हा 5-10 वर्षांनी तेथे खडी, दगड आणून टाकले जातात. असा खेळ गेली 30 वर्षे सुरू आहे. तेव्हा ह्या रस्त्याचे डांबरीकरण, खडीकरण होण्यासाठी आणखी किती वर्षे तेथील जनतेला वाट पाहावी लागणार आहे ?

सभापती महोदय, त्यानंतर मी पर्यटन विभागाच्या पुरवणी मागणीवर बोलणार आहे. युती शासनाने चोंडी येथे पर्यटन विभागामार्फत 2 कोटी रूपये खर्चून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे स्मारक उभारले, त्यासाठी त्यावेळी 1 कोटी 70 लाख रूपये खर्च करण्यात आले. परंतु त्यानंतर आघाडी शासनाने गेल्या 7-8 वर्षामध्ये वारंवार मागणी करूनही निधी उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे या स्मारकाची अवस्था आज दयनीय झालेली आहे. आता संध्याकाळी तर तेथे गुराढोरांची, डुकरांची सभा भरलेली असते. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 5जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

संपूर्ण परिसरामध्ये कॉंग्रेस नावाचे गवत उगविले आहे. त्या गवताला माणसाने हात लावला किंवा जनावराने तोंड लावले तर ते चावते. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी स्वत: जाऊन चार वर्षापूर्वी चौंडीच्या विकासाकरिता निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी घोषणा केली होती. प्रत्येक वर्षी शासनातील कुणी तरी मंत्री त्याठिकाणी जातात आणि भाषणे ठोकून जातात. परंतु आश्वासन देण्यापलिकडे काहीही करीत नाहीत. आतापर्यंत आमच्या हाती काहीही पडलेले नाही. या स्मारकाच्या विकासाकरिता गेल्या पाच वर्षापासून आम्ही मागणी करीत असून आता तरी आपण निधी देऊन त्या स्मारकाचा विकास करणार आहात की नाही याचे उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 63 मध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करण्यासाठी 40 लाख रुपयांची तरतूद केली आहे. परंतु ज्यावेळी या जनावरांमध्ये साथ आलेली असते, आणि त्यामुळे जनावरे मरत असतात त्यावेळी दवाखान्यामध्ये औषधे उपलब्ध नसतात. त्यामुळे ही जनावरे साथीच्या रोगांनी दगावतात. साथीच्या रोगांनी दरवर्षी हजारो शेळया-मेंढया मृत्युमुखी पडत असतात. त्यामुळे अनेक नवीन प्रश्न मेंढपाळांपुढे आणि सरकारपुढे उभे रहातात. दगावलेल्या शेळया-मेंढयांना प्रत्येकी एक हजार रुपयांची भरपाई देण्याबाबत शासनाकडे मागणी करुन देखील शासनाने ही मागणी अजून मान्य केली नाही.

सभापती महोदय, 1974 साली माननीय वसंतदादा पाटील यांनी धनगरांच्या विकासाकरिता शेळी-मेंढी विकास महामंडळ स्थापन केले. परंतु आतापर्यंत गेल्या 30 वर्षात एकाही धनगराचा विकास न होता हे महामंडळ अजूनही कार्यान्वित आहे. गेल्या तीन वर्षातील प्रत्येक अधिवेशनामध्ये या महामंडळासाठी निधीची मागणी करीत आहोत. माननीय मंत्र्यांनी सन 2002 मध्ये 20 कोटी रुपये देण्याची घोषणा केली, त्यानंतर सन 2005 मध्ये 25 कोटी देण्याची पुन्हा घोषणा केली, आणि आता सन 2007 मध्ये त्यांचे कोटी बाजूला राहिले आणि पॅकेजची घोषणा जाहीर केली. सुरुवातीला 20 कोटी, त्यानंतर 25 कोटी आणि धुळे येथील भाषणामध्ये पॅकेज जाहीर केले. हे पैसे नक्की केव्हा मिळणार आहेत? नाहीतर लबाडाचे आवताण जेवल्याशिवाय खरे नाही असे आपल्याला जाहीरपणे म्हणण्याची वेळ आली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

सभापती महोदय, दुग्ध व्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 67 मध्ये शासकीय दूध योजना पुणे येथे पाश्चराईजिंग युनिट बसविण्याकरिता 18.50 लाखांची तरतूद केली आहे. हे शासन दूध योजना चालविण्याकरिता खरेच गंभीर आहे काय? हा खरा प्रश्न आहे. महानंद दूध योजना कधी बंद पडेल आणि तेथील भूखंडाचे श्रीखंड आपल्याला खायला कधी मिळेल यासाठी बरेच डोमकावळे डोळा ठेवून टपून बसले आहेत. सभापती महोदय, मिरज येथील डेअरीची अवस्था आज आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी ऐकली आहे. तसेच, वरळी येथील दूध डेअरीला सुध्दा अखेरची घरघर लागली आहे. सभापती महोदय, कवठे महांकाळच्या सहकारी दूध संघाची अजब कहाणी आहे. गेल्या 5 वर्षापासून या सहकारी दूध संघात प्रचंड घोटाळा झालेला आहे. ऑडिट रिपोर्टमध्ये तसे ताशेरे ओढले गेले आहेत. परंतु दुग्ध व्यवसाय खात्याने या दूध संघावर प्रशासकाची नियुक्ती आजतागायत केली नाही. आणि हा संघ पुन्हा सुरु करण्यासाठी कसलाही प्रयत्न केला नाही. यानिमित्ताने मला शासनाला विचारावयाचे आहे की, या संघावर आपण प्रशासक नेमून पुढील सहा महिन्यात त्याठिकाणी नव्याने निवडणुका घेऊन हा संघ पुन्हा नव्याने सुरु करणार काय?

सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 40 मध्ये वन क्षेत्रातील पर्यटनासाठी 1 कोटी 36 लक्ष 47 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे ही बाब जरी चांगली असली तरी माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी देखील याबाबत मागणी केली आहे याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातील दंडोबाच्या डोंगराचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास होणार आहे असे मी गेली दहा-बारा वर्षे ऐकत आहे. या बाबतीत फक्त घोषणा करण्यात येत आहे, परंतु निधीची तरतूद होत नाही. माननीय वित्त मंत्री श्री. जयंत पाटील साहेब हे सांगली जिल्हयाचे असूनसुध्दा दंडोबाच्या डोंगराचा निधीअभावी विकास होत नाही. त्याकरिता येत्या अर्थसंकल्पामध्ये निधीचा सहभाग व्हावा अशी सांगलीच्या जनतेच्या वतीने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 41 मध्ये सांगली येथील सागरेश्वर अभयारण्यासाठी 1.15 कोटी रुपयांचे तारेचे कुंपण घालण्यासाठी तरतूद केली आहे. आतापर्यंत आपण कुंपणाने शे्त खाल्याच्या गोष्टी ऐकल्या आहेत. तेव्हा आता हे सव्वा कोटींचे कुंपन हे जंगल तर खाणार नाही ना? याची काळजी घेतलेली बरी. सभापती महोदय, बाब क्र. 168 मध्ये अपारंपारिक ऊर्जा खात्यामार्फत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

चिपाडाव्दारे वीज निर्मिती करण्यासाठी जवाहर सहकारी साखर कारखान्यास अर्थसहाय्य देण्यासाठी 64.30 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राला अंधारातून बाहेर काढण्यासाठी अपारंपारिक ऊर्जेचा महत्वाचा वाटा आहे. परंतु ज्या पवन चक्क्या महाराष्ट्रातील सांगली, सातारा इत्यादी ग्रामीण भागात उभ्या रहात आहेत, त्यामध्ये शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. त्याच्या आयुष्यात मात्र अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. तो भूमिहीन होत आहे. त्याच्या जमिनीला योग्य भाव मिळत नाही. त्याच्या कुटुंबियांना प्रकल्पामध्ये नोक-या मिळत नाहीत.

(यानंतर श्री. बरवड)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

या शेतकऱ्याला हे शासन न्याय देणार की नाही हा प्रश्न आहे. पुन्हा त्यांच्या आत्महत्या सुरु झाल्यानंतर त्याच भाकड गाई आणि म्हशींचे पॅकेज देणार काय असा माझा प्रश्न आहे. आज शेतकऱ्यांची 400 मुले उपोषणाला बसलेली आहेत. 200 मुलांना कामावरुन काढलेले आहे. शासनाने त्वरित याबाबत काही तरी करावे.

सभापती महोदय, ऊर्जा खात्याविषयी बोलावयाचे झाले तर धनगर समाजाच्या आणि इतर भटक्या समाजाच्या वस्त्यांना विजेचे कनेक्शन आजतागायत देण्यात आलेले नाहीत. प्रत्येक अधिवेशनात मी ही मागणी करीत असतो. परंतु माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे फक्त राजीव गांधी ग्रामीण ऊर्जा योजनेच्या बाबतीत सांगतात. पण त्या वाड्या-वस्त्यांना कनेक्शन्स कोठेही दिलेली नाहीत.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 178, पृष्ठ क्रमांक 146 बाबत मला बोलावयाचे आहे. मागास भागासाठी अनुदान निधी यासंदर्भात ही पुरवणी मागणी आहे. अशा प्रकारच्या मागास भागाच्या विकासासाठी आलेल्या निधीतून सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ या दुष्काळी भागासाठी काही वाटा दिला आहे का ? हा माझा खरा प्रश्न आहे. कोकणातील धनगर समाजाच्या वाड्या-वस्त्या ह्या अतिदुर्गम भागात असून त्यांचा विकास केव्हा होणार ? आज वीज, पाणी, रस्ते, शाळा इत्यादी मूलभूत सोयींपासून ह्या वस्त्या वंचित आहेत. येत्या अर्थसंकल्पात किंवा केंद्राच्या योजनेतून त्यांचा विकास करावा अशी मागणी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 181, पृष्ठ क्रमांक 147 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये लहान पाटबंधारे कामासाठी 44 कोटी 47 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, खानापूर, आटपाडी या दुष्काळी भागाची जीवनदायी असणारी ताकारी-म्हैशाळ व टेंभू योजना कधी पूर्ण करणार ? हा माझा शासनाला सवाल आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांची एक पिढी उद्ध्वस्त झालेली आहे. दुसरी पिढीही त्याच मार्गावर आहे. या योजना ताबडतोब पूर्ण करणार काय असा माझा शासनाला सवाल आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या पुरवणी मागण्यांवरील सन्माननीय सदस्यांची भाषणे आता संपलेली आहेत. मला या ठिकाणी फक्त दोन मुद्दे सांगावयाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी ठाण्याच्या पोलीस वसाहतीबद्दलचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी जवळपास दोन वर्षापूर्वी याच सभागृहामध्ये चर्चा केलेली होती. त्या विषयाच्या बाबतीत मी या ठिकाणी थोडक्यात एवढेच सांगतो की, सध्या ठाण्यातील पोलीस कर्मचारी ज्या वर्तकनगर विभागात राहतात त्या इमारती 30 ते 40 वर्षापूर्वी गृह विभागाने म्हाडाकडून घेतलेल्या होत्या. आता त्याचे भाडे पोलीस भरत आहेत. परंतु त्या इमारतीच्या भाड्यापोटी जी देय्य असलेली रक्कम पोलिसांनी म्हाडाकडे भरावयाची होती ती रक्कम गेल्या तीन वर्षापूर्वी 72 लाख रुपये होती. आजही पोलिसांकडून ते भाडे भरले गेलेले नाही. त्या इमारतींची सध्याची जी अवस्था आहे ती पाहता त्या इमारती केव्हा कोसळतील याचा पत्ता नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने असे सर्टिफाय केलेले आहे की, या इमारती आता राहण्यायोग्य नाहीत. त्या इमारतींची दुरुस्ती करावयाची असेल तर तेवढा निधी उपलब्ध नाही. या सगळ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी मागणी केलेली आहे की सध्या आम्ही ज्या इमारतीमध्ये राहतो ती आम्ही म्हाडाकडून खरेदी करतो, आम्ही सोसायट्या स्थापन करतो. म्हाडाने अशा प्रकारच्या बऱ्याच इमारती त्याच भागात ज्यांनी सोसायट्या स्थापन केल्या त्यांना दिलेल्या आहेत. हा सगळा प्रस्ताव मी सांगतो त्याप्रमाणे मंत्रालयात येऊन जवळपास दोन ते अडीच वर्षापासून प्रलंबित आहे. माझी विनंती आहे. गृह विभागाकडे त्यांना देण्यासाठी पैसे नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे की, त्या इमारती दुरुस्ती योग्य नाहीत आणि दुरुस्ती करावयाची झाली तर त्यासाठी पैसे नाहीत. त्यांच्या जीवावर टांकती तलवार आहे. त्यांची जी मागणी आहे त्यामध्ये त्याचे जे काही मूल्य ठरविले जाईल ते शासनाला आणि पर्यायाने म्हाडाला भरण्यास तयार आहेत. यामध्ये नवीन काही करावयाचे नाही. त्याच भागात बऱ्याचशा सोसायट्या स्थापन करुन म्हाडाने इमारती हस्तांतरित केलेल्या आहेत. आपण कृपया यासंदर्भात तातडीने एक बैठक बोलवावी. गेली तीन वर्षे हा विषय या सभागृहामध्ये बऱ्याचदा आलेला आहे आणि आज या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने हा विषय परत या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. आपण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

**उपसभापती** ......

ताबडतोब पोलीस महासंचालक, ठाण्याचे पोलीस आयुक्त आणि आपल्याला हवे असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे त्या ठिकाणचे अधिकारी याची एक संयुक्त बैठक बोलवावी. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर आणि मी त्या बैठकीला येऊ. अशी संयुक्त बैठक घेतली तर त्यातून निश्चितपणे चांगला मार्ग निघू शकेल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती...)

अनेक पोलीस आणि त्यांची कुटुंबे आज त्या ठिकाणी जीव मुठीत धरुन राहात आहेत. त्यांना दिलासा मिळावा म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या संदर्भात आपण एक तातडीने बैठक घेऊन आपणास योग्य वाटतेल तो निर्णय घ्यावा.

जलसंपदा विभागाच्या पान क्रमांक 106 वरील बाब क्रमांक 190 कडे मी माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. आपणाला कल्पना आहे की, पुणे जिल्हयात चासकमान धरण आहे. या धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु 0 ते 72 कि.मी. प्रयन्त अस्तरीकरणाचे जे काम आहे त्यासाठी 80 ते 86 कोटी रुपये खर्च येणार आहे. आजमितीला हे अस्तरीकरणाचे बरेचसे काम निधी अभावी रखडलेले आहे. धरण झाले, कालवा झाला. परंतु लिकेजेसमुळे उपलब्ध असलेले पाणी शेवटच्या टेलएण्डला मिळू शकत नाही. परिणामी शिरुर तालुक्यातील जनता या पाण्यापासून वंचित राहिली आहे. या ठिकाणी माननीय वित्त राज्यमंत्री आणि माननीय जलसंपदा मंत्री आहेत. यासंदर्भात माझी त्यांना विनंती आहे की, कृष्णा खोरे विकास महामंडळासाठी 193 कोटीचा जादा निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणार आहे. त्यापैकी महामंडळाच्या हाती असलेल्या शिल्लक ठेवी मधून 20 कोटी रुपयाचा निधी तातडीने या कामासाठी उपलब्ध करुन देणे्याची गरज आहे. पुढच्या कामासाठी 2008-2009मध्ये तरतूद करता येईल. पुढचे काम व्हावे असे वाटत असेल तर ही तरतूद तातडीने करावी अशी मी आजच्या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने आपणास विनंती करीत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 12 ते 29 ह्या मागण्या सदनाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

मागण्यांचे स्वरुप बघितले तर मूळ बजेटच्या तुलनेमध्ये आणि पूर्वी एकंदरीत ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या तुलनेने अल्प स्वरुपाच्या मागण्या गृह विभागाने सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. सरकारी अभियोक्त्यासाठी, राज्यभरातील 40 लाख पुस्तके खरेदी करणे, जाहिरातीवरील खर्च देणे, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेसाठी तरतूद देणे, मंत्रालयामध्ये 40 टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, बेस्ट बेकरी प्रकरणामध्ये विशेष सरकारी वकील व अभियोक्त्यासाठी फीची तरतूद करणे आणि ती गुजराथ सरकारकडून परत घेणे, दोन बुलेटप्रुफ सफारी गाड्या खरेदी करणे, राज्यामध्ये अभिनव उपक्रम सुरु केलेला आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना सुरु केलेली आहे. त्यावरील जाहिरातीच्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे आणि वाढीव खर्च मागणे, राज्यामधील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा परिपूर्ण करणे, जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस मुख्यालये बांधणे, अशा या मूळ बजेटच्या तुलनेत छोट्या स्वरुपाच्या मागण्या गृह विभागाने सदनासमोर सादर केलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांसह जवळ जवळ 23 सन्माननीय सदस्यांनी या मागण्यांवर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत असताना सभापती महोदय, आपणासह सर्वांनीच काहीना काही सूचना करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी अनेकांची भाषणे अगदी लक्षपूर्वक ऐकलेली आहेत. मी सदनाला मनापासून धन्यवाद देतो. कारण या मागण्यांना आमचा विरोध आहे अशा प्रकारची भूमिका कोणी घेतलेली नाही. संरक्षणावरचा खर्च हा उत्पादनावरील खर्च आहे आणि त्यामुळे ही उत्पादकता आणि विकास सुरक्षित वातावरणामध्ये होऊ शकतो ही एक मानसिकता नवी जागतिकीकरणाची भूमिका स्वीकारल्यानंतर दिवसेंदिवस व्हायला लागलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 20:55

श्री.आर.आर.पाटील..........

मी दोन्ही सदनाचा आभारी आहे. पोलिसांवरील कामाचा ताण कमी व्हावा, त्यांना चांगल्या सुविधा प्राप्त व्हाव्यात, आधुनिक यंत्रसामुग्री आणि शस्त्रे त्यांना उपलब्ध व्हावीत म्हणून अलिकडच्या काळामध्ये थोडेसे अन्य योजनांना बाजूला ठेवून या कामाला अधिक प्राधान्य दिले जात आहे ही मी या खात्याचा मंत्री म्हणून निश्चितच समाधानाची बाब मानतो. अर्थात आज लगेचच या राज्याला आवश्यक असणारे सगळे पोलीस दल आणि बळ आपल्याला उपलब्ध होईल अशा निष्कर्षाप्रत येऊ शकत नाही. राज्यातील सगळ्याच पोलीस स्टेशनच्या इमारतींचा दर्जा हा निश्चितच चांगला नाही. काही ठिकाणचा दर्जा हा चिंता व्यक्त करावी इतका खराब आहे. पोलिसांची संख्या कमी आहे. राज्यामध्ये सागरी आयुक्तालयासह नक्षलवाद्यांविरुध्द प्रभावी उपाययोजना करण्यासाठी तेथील दल सक्षम करणे, आपले इनपुट चांगले रहावे, इन्फॉर्मेशन चांगल्या मिळाव्यात म्हणून एस.आय.टी. आणखी चांगली मजबूत करणे या सगळ्या उपाययोजना आपण करावयास घेतल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून आज त्यातील काही पुरवणी मागण्या आपल्यासमोर आलेल्या आहेत. ज्या मागण्या विशेषत: पुरवणी मागण्या म्हणून आणल्या जातात, ज्या मुख्य मागण्या बजेटमध्ये समाविष्ट झालेल्या नसतात आणि आज करण्याची तातडी त्यामागे असते. आता बाबी सांगितल्यानंतर याठिकाणी सूचना करण्याची संधी सन्माननीय सदस्यांना प्राप्त होत असते. अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत आवश्यक त्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, मंत्रालयामध्ये आणखी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता आहे की, आजची असलेली संरक्षण यंत्रणा पुरेशी आहे? हा महत्वाचा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला. मंत्रालयातील सुरक्षेसाठी विविध संवर्गातील 400 पदे आपण निर्माण केलेली आहेत. 70 लाख रुपये किंमतीचे दोन अंडर व्हेईकल कॅमेरे बसविले आहेत. 32 सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. परंतु एकंदरीत ज्यावेळी आय.बी. किंवा अन्य यंत्रणांकडून आपल्याला इन्फॉर्मेशन मिळते त्यावेळी मंत्रालय हे नेहमीच संवेदनशील राहिले आहे. म्हणून ऑलप्रूफ यंत्रणा करण्यासाठी आणखी 64 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आवश्यकता आहे. हे तज्ज्ञांनी सांगितल्यामुळे या तरतुदी केलेल्या आहेत.

सभापती महोदय, परदेशामध्ये जे प्रिझनर्स आहेत त्या संदर्भात माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी उल्लेख केला. मॉरिशसमध्ये अंमली पदार्थाच्या व्यवहारात जे भारतीय पकडले गेले आहेत आणि आंतरराष्ट्रीय करारानुसार त्या आरोपींना या देशात आणण्याची आवश्यकता आहे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

अशा 12 आरोपींसाठी खर्चाची मागणी केली आहे. त्यांची नावे आवश्यकता असेल तर पटलावर ठेवण्याची माझी तयारी आहे. परंतु यामुळे आपले पटल खराब होईल. म्हणून मी ती नावे ठेवणे आवश्यक मानत नाही. कराराप्रमाणे आरोपींना आणणे आणि त्यांना सांभाळण्याची आवश्यकता आहे म्हणून त्यांना आणून त्यासाठी आवश्यक असलेला खर्च आपण करु. खूप चांगल्या पध्दतीच्या सूचना करीत असताना काही बाबतीत चांगल्या सूचनाही केलेल्या आहेत.

सभापती महोदय, महात्मा गांधी तंटामुक्ती योजनेबाबत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. एक तर या योजनेच्या हेतूबद्दल कोणी शंका व्यक्त केलेल्या नाहीत. ही योजना यशस्वी होईल अशाच पध्दतीची सगळ्यांची धारणा आहे. परंतु गुन्हेगारी स्वरुपाची माणसे त्यामध्ये येऊ नयेत. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गावामध्ये तंटेबखेडे वाढविणारे असू नयेत याची पूर्णपणे दक्षता घेतली जाईल. पण कुठेतरी एखादी तक्रार घडते आणि तीच बातमीचा विषय बनते. शासनाने अनेक योजना आजपर्यंत सुरु केलेल्या आहेत. परंतु योजना एखादी सुरु केल्यानंतर 98.30 टक्के ग्रामपंचायतींनी पहिल्या दोन महिन्यामध्येच ठराव करुन या योजनेमध्ये आम्ही सहभागी होत आहोत अशा पध्दतीची भूमिका घ्यावी आणि गावामध्ये तंटामुक्ती समिती स्थापन करणे इतका उत्स्फूर्त प्रतिसाद आजपर्यंत शासनाच्या अन्य कोणत्याही योजनांना मिळाला नव्हता. त्याचे फायदे आपल्याला दिसायला लागले आहेत. यावर्षी 9500 गावांमध्ये एक गाव एक गणपती हा उपक्रम राबविण्यात आला.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

महोदय, या 9.5 हजार गावांना एक सुध्दा पोलीस कॉन्स्टेबल देण्यात आला नव्हता, कोणत्याही प्रकारचे पोलीस संरक्षण देण्यात आले नव्हते. या साडेनऊ हजार गावात एक गाव एक गणपती अशा प्रकारे गणपती उत्सव साजरा करण्यात आलेला होता. निवडणूक आयोगाच्या संदर्भात मी वाद करु इच्छित नाही, ती एक घटनात्मक संस्था आहे. या राज्याचा गृहमंत्री म्हणून मी निवडणूक आयोगाचा सन्मान राखला पाहिजे. निवडणूक प्रक्रियेला बाधा येणार नाही या गोष्टीला सरकारने सहमती दिलेली आहे. जेथे आचारसंहिता असेल त्या काळात तेथे तंटा मुक्ती अभियानाचे काम पूर्णपणे थांबविण्याची भूमिका राज्यसरकारने घेतलेली आहे. शेवटी निवडणूकीवर नियंत्रण ठेवण्याचे काम निवडणूक आयोगाचे असून त्यांची ती जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केलेला आहे असे असले तरी महाराष्ट्रातील अनेक गावामध्ये तंटामुक्तीला प्रत्यक्षात सुरुवात झालेली आहे. यासंदर्भात मी जी माहिती घेतली ती आपण ऐकली तर आपल्याला आनंदच होईल. आजच्या तारखेला 18627 तंटयांची मुक्तता झालेली आहे. जे दावे ऑलरेडी कोर्टात होते 18627 दावे मिटवण्याचा निर्णय गावच्या तंटा मुक्ती समिती समोर घेण्यात आले. एका बाजूने असलेले दावे गाव समिती समोर मिटत आहेत आणि दुस-या बाजूने गेल्यावर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर 2006 च्या तुलनेने यावर्षीच्या सप्टेंबर-ऑक्टोबरच्या दाखल होणा-या दाव्यांच्या संख्येच्या प्रमाणात जवळ जवळ 3 हजाराने घट महाराष्ट्रात झालेली आहे. खरे म्हणजे ही एक मोठी उपलब्धीच मानली पाहिजे. सदनाच्या माध्यमातून मी दोन बाबींचे स्पष्टीकरण करु इच्छितो की, काही जणांना भिती वाटते की, गावात पुन्हा गावातील प्रमुखांचा वचक निर्माण होईल का ? गरीब माणसांचा न्याय मागण्याचा हक्क काढून घेतला जाईल का? गरीब माणसावर गावाचे निर्णय लादले जातील काय ? अशा प्रकारच्या शंका उपस्थित केल्या जात आहेत. सभापती महोदय, या शंका उपस्थित करतांना पहिल्यांदा दलित माणसांच्या संदर्भात भूमिका वेगवेगळया पध्दतीने व्यक्त केली जाते की, दलितांना न्याय मिळेल का ? मी यासंदर्भात वारंवार स्पष्ट केले आहे की, अॅट्रॉसीटीच्या केसेस मिटवण्याचा अधिकार अधिकार तंटा मुक्त समितीला देण्यात आलेला नाही. त्यामुळे अॅट्रॉसीटी खाली कोणी गुन्हा नोंद केला तर त्याची तडजोड करण्याचा प्रश्नच तंटा मुक्त समिती समोर उद्‌भवत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

नाही. दलित माणसावर अन्याय होण्याचा प्रश्नच या योजनेच्या मार्फत प्रश्नच उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, कलम 498 (अ) हा नॉन कम्पाऊन्डेंबल ऑफेन्स, कम्पाऊन्डेबल केल्यानंतर महिलांवर बंधने आणली जातील, सभापती महोदय, या संदर्भात मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतल्यानंतर तातडीने याचा संबंध तंटा मुक्तीच्या अभियानाशी जोडला गेला. तंटामुक्तीच्या संदर्भात जो जी.आर. आहे. तो जी.आर. मी आपल्याला देण्यास तयार आहे. कुठेही हा नॉन कम्पाऊन्डेबल ऑफेन्स कंम्पाऊंडेबल करावा अशी भूमिका गृह विभागाने घेतली नव्हती. हा विधी व न्याय विभागाचा स्वतंत्र आलेला प्रस्ताव होता. हा प्रस्ताव सुप्रिम कोर्टाने दिलेले निदेश, देशातील काही राज्यानी याबाबतीतील घेतलेल्या भूमिका आणि होत असलेले अनुकूल परिणाम हे सगळे लक्षात घेऊन हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर विधी व न्याय विभागाने आणला होता व त्याला मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या राज्याने महिलांना दिलेले हक्क आणि अधिकार काढून घेण्याची भूमिका या राज्यामध्ये कधीही स्वीकारली जाणार नाही. डॉ. नीलमताई विधी व न्याय विभागाच्या बाबतीत आपली एक बैठक आयोजित केली जाईल महाराष्ट्रामध्यें महिला क्षेत्रात प्रभावीपणे काम करणा-या महिलांची यादी आपण माझ्याकडे दिली तर मी त्यांना यासंदर्भात माझ्या दालनात चर्चेसाठी पाचारण करीन . विधी व न्याय विभागाची भूमिका जर आपल्याला पटत असेल तरच ही बाब पुढे आणली जाईल. महिलांना पाठीमागे नेण्याचा, त्यांना दिलेले संरक्षण काढून घेण्याचा कोणताही प्रश्न आज राज्यसरकार समोर नाही आणि कधीही असणार नाही. याबाबतीत खुले पणाने चर्चा करु, दोन्ही बाजू तपासून बघू आणि या बाबतीतील योग्य ती भूमिका आपल्या राज्यात आपण घेऊ.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, कलम 498 (अ) च्या केसेसचा अभ्यास करुन 498(अ) हा जो नॉन कम्पाऊन्डेबल आहे तो कम्पाऊन्डेंबल करणे हे कसे योग्य नाही उलट त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी काय करावयास पाहिजे यासंदर्भात त्यांच्याकडे स्टडी आहे. त्यांनाही या बैठकीला बोलावून घेऊ आणि महिला संदर्भात काम करणा-या महिलांची यादी निश्चितपणे आम्ही आपल्याला देऊ शकू. धन्यवाद.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, म्हणून मी सन्माननीय सदस्यांकडे यादी मागितली. विधी व न्याय विभागाने दोन्ही भूमिका डोळ्यासमोर ठेवून महिलांना अधिक फायदा कसा मिळेल याचा प्रयत्न करु.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील प्रश्न उपस्थित केला. त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, बांधकामासाठी तीन कोटी रुपये उपवलब्ध झालेले आहेत. हे पुरवणी बजेट आहे. मुख्य बजेटमध्ये निधी कमी पडत असेल तर भविष्यात तरतुदी केल्या जातील. केंद्र सरकारनेसुध्दा चांगल्या प्रकारच्या तरतुदी केलेल्या आहेत. मला सांगण्यास आनंद वाटतो की, आज आपले पोलीस दल स्वंयपूर्ण होत आहे. पूर्वी पोलीस दलास एखाद्या आरोपिची नार्को टेस्ट करायची असल्यास त्यासाठी बंगलोर येथे जावे लागायचे, डी.एन.ए.टेस्ट करण्यासाठी कलकत्ता येथे जावे लागायचे, साऊंड ॲनालिसीस टेप्ससाठी चंदीगड येथे जावे लागायचे. महाराष्ट्र राज्य अन्य राज्यांच्या तुलनेत पुढे असतानाही अशाप्रकारच्या टेस्ट करण्यासाठी महाराष्ट्राला दुसऱ्या राज्याची मदत घ्यावी लागत असे. पण मला सांगण्यास आनंद वाटतो की, आपण आपली फॉरेन्सीक लॅब केलेली आहे. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत सक्षम व समृध्द अशी ही लॅब आहे. त्यामुळे आता आपणास कोणत्याही टेस्ट करण्यासाठी अन्य राज्यात जावे लागणार नाही. परंतु आता आपण अन्य राज्यांना मदत करु अशाप्रकारची अत्याधुनिक लॅब आपल्याकडे उपलब्ध आहे. आज आपण सायबर क्राईमसाठी सायबर सेल निर्माण केलेला आहे. संपूर्ण देशात हा सेल उत्कृष्ट म्हणून ओळखला जातो. या सेलमध्ये चांगले तज्ज्ञ काम करीत आहेत. किंबहुना अन्य राज्यांना मार्गदर्शन करण्याचे काम आपल्या सायबर सेलकडून केले जात आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील पोलिसांना नक्षलवाद्यांशी, आतंकवाद्यांशी व अंडरवर्ल्डशी मुकाबला करावा लागतो. त्याच बरोबर राज्यात दरोड्यांचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे असे सांगण्यात आले. मी वारंवार सांगत आलो आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

दरोड्यांच्या संख्येत वाढ झालेली नाही. दरोड्यात लुटण्यात आलेल्या अमाऊंटमध्ये वाढ झालेली नाही. परंतु हे दरोडे शहरालगत पडल्यामुळे त्यास मोठ्या प्रमाणावर व्यापक प्रसिध्दी मिळालेली आहे. तरी सुध्दा पोलिसांनी डोळ्यात तेल घालून काम करण्याचा संदेश या दरोडेखोरांनी पोलिसांना दिला होता. मला सांगण्यास अभिमान वाटतो की, गेल्या चार महिन्यात जवळजवळ 4600 आरोपिंना पोलिसांनी अटक केलेली आहे. यासाठी आपण 61 पथके निर्माण केली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हे काम सोपविले होते. या दरोडेखोरांची पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी पोलिसांनी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून काम केल्यामुळे त्यांना दरोडेखोरांचा पत्ता लावण्यात यश आलेले आहे. या दरोडेखोराची पाळेमुळे कानपूर व मध्य प्रदेशातील झालुआ येथे असल्याचे आढळून आले. हे दरोडेखोर रेल्वेने यायचे आणि पाचच्या दरम्यान दरोडा टाकून रेल्वेने पळून जायचे. त्यांची ही मोडस ऑपरेन्डी पोलिसांच्या उशिरा लक्षात आली. पण ज्यावेळी लक्षात आली त्यावेळी त्या दरोडेखोरांना पकडण्यात पोलिसांना यश आलेले आहे. या वर्षी पडलेल्या दरोड्यांची संख्या पाहिली तर पोलिसांनी दरोडेखोरांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यात यश मिळविलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे सभागृहात उपस्थित नाहीत. अनेक वेळेला नक्षलवाद्यांशी, आतंकवाद्यांशी संघर्ष करताना काही पोलीस शहीद होतात. त्यावर 4-6 महिने दु:ख व्यक्त केले जाते व नंतर त्यांच्या कुटुंबियांना वाऱ्यावर सोडले जाते. घर खाली करण्यासाठी नोटीस पाठविली जाते. त्यांना कोणाचाच आधार राहत नाही असे त्यांनी सांगितले. नक्षलवादी एरियामध्ये संघर्ष करताना कोणीही पोलीस शहीद झाला तर त्याच्या वारसाला नोकरी दिली पाहिजे अशी भूमिका आहे. परंतु यापुढील काळात आतंकवादी व दरोडेखोरांबरोबर संघर्ष करताना पोलीस शहीद झाला,

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

तर त्यांच्या नातेवाईकांच्या बाबतीतही अशीच भूमिका घेतली जाईल व कुठेही वेटींग लिस्ट न ठेवता त्यांच्या एका नातेवाईकाला तातडीने नोकरी देण्याची भूमिका आपल्या राज्यात स्वीकारली जाईल आणि उभे राष्ट्र त्यांच्या कुटुंबियांच्या बरोबर असल्याचा विश्वास दिला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सांवत यांचे भाषण मी ऐकले असून त्यांचे मुद्देही मी लिहून घेतलेले आहेत. नगर जिल्हयामध्ये राजकीय कार्यकर्त्यांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या संदर्भातील काही प्रश्न त्यांनी उपस्थित केले. या राज्यातील पोलीस दलाला कायद्याने काम करता आले पाहिजे. गुन्हा करणारा माणूस कुठल्या पक्षाचा आहे हे न पाहता त्यांनी कोणत्या प्रकारचा गुन्हा केला आहे हेच बघण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही पक्षाच्या राजकीय कार्यकर्त्यावर झालेले हल्ले हे राज्यामध्ये सहन केले जाणार नाहीत. मी याठिकाणी विनम्रपणे सांगू इच्छितो की, गेल्या वर्षभरातील रेकॉर्ड आपण पाहिले तर राजकीय कार्यकर्त्यांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये घट झालेली आहे. त्याचप्रमाणे दलितांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये घट झालेली आहे, आदिवासींवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये घट झालेली आहे. समाजामधील जे विकर सेक्शन आहेत, त्यांच्यावरील हल्ल्यांमध्ये तर घट झालेलीच आहे. पण राजकीय कार्यकर्ते आणि माध्यमं यांच्यावरील हल्ल्यांमध्येही घट झ ालेली आहे. परंतु तरीसुध्दा आणखी काही बाबतीत सक्षम उपाययोजना करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, आज स्टेटस सिम्बॉल म्हणून काही नेते आणि पुढारी पोलिसांना बरोबर घेऊन फिरत आहेत. कुठेतरी याचा फेरविचार होण्याची आवश्यकता होती, थोडेसे हे कटू काम होते. वेगवेगळया राजकीय नेत्यांना, अधिकाऱ्यांना, कारखानदारांना, हॉटेल मालकांना दिलेल्या संरक्षणामधून 1100 लोकांचे मनुष्यबळ कमी करण्यात आम्हाला यश आलेले आहे. ही संख्या खूप मोठी असून यातून कोटयावधी रुपये वाचलेले आहेत. परंतु काही जणांना पदांमुळे संरक्षण द्यावे लागत आहे व ते मिळतही आहे. जे विविध पदावर आहेत, त्यांनी संरक्षण मागितले तर त्यांना द्यावे लागते. परंतु नेत्यांना, अधिकाऱ्यांना आणि विविध उद्योजकांना जे संरक्षण दिले गेले, त्याचे पुन्हा एकदा सर्व्हेक्षण करण्यात येईल. जर आवश्यकता असेल तर त्यांना शासकीय खर्चाने संरक्षण ठेवण्यात येईल. परंतु ज्यांना संरक्षणाची आवश्यकता

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

नाही त्यांच्या पुढे-मागे फिरण्यासाठी पोलीस दलाचा वापर केला जाणार नाही, ही ग्वाही मी याठिकाणी देतो. चुकीच्या ठिकाणी जर संरक्षण दिले गेले असेल तर ते कमी तरी केले जाईल, अथवा ज्यांना संरक्षणाचे व्यसन आणि सवय झालेली आहे अशा लोकांना जर संरक्षण पाहिजेच असेल तर आज एका कॉन्सिस्टेबला 22 हजार रुपये घेतले जातात, त्यात आणखी भरीव वाढ करुन त्यांच्या व्यसनाची पूर्तता केली जाईल. त्यामुळे सुशिक्षित बेकारांना तेवढयाच नोकऱ्या मिळू शकतील. त्यामुळे यामध्ये भरीव वाढ करुन अशा लोकांना संरक्षण दिले जाईल. अनेक ठिकाणी 30 टक्के महिला पोलीस दलामध्ये येत आहेत. याठिकाणी सांगण्यात आले की, अनेक ठिकाणी प्रसाधनगृहे नाहीत, चेंजिंग रुम्स् नाहीत, ही गोष्ट खरी आहे. यापुढील बजेटमध्ये या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी एक मागणी आणली जाईल आणि पुढील वर्षभरात प्रसाधनगृहा सारख्या जीवनावश्यक बाबी पोलीस स्टेशनमध्ये नाहीत ही त्रूटी पूर्णपणे दूर केली जाईल. पोलीस दलात 30 टक्के महिला येत आहेत, म्हणून काही वेगळी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. आणखी एक चांगली मागणी याठिकाणी करण्यात आली. नाशिकला प्रायोगिक तत्वावर महिला पोलीस स्टेशन करण्यात आले होते. त्याठिकाणी महिलांच्या संदर्भातील गुन्हे एकत्रित केले जात होते. त्याचे अनुकूल परिणाम येताना दिसत आहेत. टप्प्याटप्प्याने याची व्याप्ती वाढवली जाईल आणि जी महानगरे आहेत, तेथील महिलांच्या संदर्भातील महत्वपूर्ण केसेस महिला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येतील व महिलांच्या विंगचे सक्षमीकरण करण्यात येईल. अनेक बाबींचा उल्लेख याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. एक गोष्ट मात्र गांभीर्याने घेण्याची परिस्थिती राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. एका बाजूने दरोडेखोरांना रोखणे खूप सोपे आहे, कारण त्यांनी वर्षभरात घातलेल्या दरोडयांची किंमत फक्त 21 कोटींची आहे. व्हाईट कॉलरवाले गुन्हेगार आहेत.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर...

श्री.आर.आर.पाटील........

यांनी घातलेले दरोडे बघितले तर दोन कोटी रुपयांचे आहेत. आता जो प्राथमिक अंदाज हाती आला आहे त्यानुसार व्हाईट कॉलर दरोडेखोरांचे दरोडे 500 कोटी रुपयांपेक्षा कमी नाहीत. हे लोक मोठया माणसांमध्ये वावरतात. लोकांना फसविण्याच्या वेगवेगळया क्लुप्त्या काढतात, कुठे झाडे लावण्याची स्किम, कुठे कोळसा निर्यात करण्याची स्किम तर कुठे कारची स्किम सुरु करुन गोरगरीब लोकांना लुबाडत आहेत. रिझर्व बँक ऑफ इंडिया व कंपनी अॅक्टमुळे पोलिसांकडे खूप कमी अधिकार आहेत. परंतु, तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईल व हे जे पांढ-या वेशात वावरणारे दरोडेखोर आहेत त्यांच्या बाबतीत कठोर पावले उचलली जातील, अशी ग्वाही मी आज सदनाला देतो.

सभापती महोदय, महात्मा गांधी तंटामुक्त अभियान ही एक चांगली योजना आहे. सुरुवातीलाच कुणी या योजनेबद्दल फार शंका घेण्याचे कारण नाही. कारण, पहिले तीन महिने देखील अद्याप पूर्ण झालेले नाहीत. अनेकांनी आताच त्याबद्दल लिहिण्यास सुरुवात केली आहे. पण सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्याची आवश्यकता आहे. न्यायालयातील दाव्यांची संख्या बघितली तर वर्षानुवर्षे दाव्यांचा निकाल लागत नाही, अशी स्थिती आहे. न्यायालयात झालेला विलंब हा एक प्रकारे अन्याय आहे. एका बाजुला न्यायाला विलंब होत आहे आणि दुसरीकडे पूर्वी सुरु असलेली व्यवस्था बंद करुन टाकलेली आहे. गावामध्ये सुध्दा समजुतदारपणा असतो. गावामध्ये न्यायप्रवृत्तीने निकाल आणि निवाडा देणारे लोक असतात, त्यांचा वापर करुन घेण्याचे ठरविले. निश्चितपणे मला खात्री आहे की, ही योजना सुध्दा सर्वोच्च न्यायालय आणि केंद्राने सुरु केलेल्या 'लोक अदालत' आणि 'लोक न्यायालय' या योजनेचे व्यापक स्वरुप आहे. त्यामुळे संपूर्ण देशात ही योजना राबविली जाईल, याची मला खात्री आहे. 40 लाख दावे वेगवेगळया न्यायालयात प्रलंबित आहेत. या योजनेमध्ये दावे कमी करण्याचे सामर्थ्य आहे.

सभापती महोदय, एका बाजुला ही सर्व कामे करीत असतांना नवीन आव्हाने पोलीस दलासमोर उभी राहत आहेत. महाराष्ट्रामध्ये दुर्दैवाने 2400 खून होत आहेत तर दुसरीकडे 11700 माणसे रस्त्यावरच्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडत आहेत. हे अपघात टाळावयाचे असतील तर लायसन्स देण्याची प्रक्रिया आणखी क्लिष्ट करावी लागेल, कडक धोरण स्वीकारावे लागेल.

....2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

मागेल त्याला लायसन्स मिळत आहे. बेधुंदपणे, दारु पिऊन वाहने चालविली जातात. मुंबई शहरामध्ये ट्रॅफिक विभागाने एक कॅम्पेन राबविले. दारुशोधक यंत्र जे धूळ खात पडले होते ते बाहेर काढले. 2 कोटी 70 लक्ष रुपयांचा दंड सरकारला मिळाला पण 7500 माणसे दारु पिऊन वाहने चालवित होती त्यांना अटक करण्याची भूमिका या विभागाने स्वीकारली. त्यामुळे अपघातात मृत्युमुखी पडणा-यांमध्ये कमालीची घट झालेली आहे. दारु पिऊन वाहने चालविण्यास निर्बंध आणण्यासाठी टप्प्याटपप्याने महाराष्ट्रातील महामार्ग, मोठी शहरे यामध्ये मुंबई वाहतुक शाखेने राबविलेल्या कार्यक्रमाच्या धर्तीवर सगळीकडे ही मोहिम सुरु केली जाईल व रस्त्यावरील प्रवास अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने योग्य पावले राज्यामध्ये उचलली जातील.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या. शांतपणे ऐकून त्या सूचनांची नोंद मी केलेली आहे. सगळयाच उपस्थित केलेल्या मुद्यांना भाषणामध्ये उत्तरे देणे शक्य नाही. त्याबद्दलची जी कृती करावी लागेल ती निश्चितपणे विभागाकडून सकारात्मक दृष्टीकोन ठेवून केली जाईल. आपल्या मतदारसंघातील काही धोरणात्मक अडचणी आणि सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत, त्याबद्दल निश्चितपणे उपाययोजना केली जाईल. गृह विभागाच्या मागण्यांना सदनाने पाठिंबा द्यावा, अशी विनंती करतो. धन्यवाद.

--------------

....3........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास व वन विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, प्रामुख्याने सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी हुडकोबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. हुडकोबाबतच्या कर्जाच्या व्याजाचा दर साडेआठ टक्के फ्लोटिंग असून आता तो 10.75 टक्के झालेला आहे.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील .......

ही बाब नुकतीच झालेली असल्याने अतिरिक्त तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी दुसरा एक प्रश्न उपस्थित केला की, वांद्रे येथील संक्रमण निवासस्थाने सध्या रिक्त आहेत. मुंबईत बाहेरुन येणारे शासकीय अधिकारी, पाहुणे यांच्यासाठी आम्ही त्याचे रुपांतर विश्रामगृहात करीत आहोत आणि तसा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यानंतर क्वॉर्टर रोड वांद्रे येथील लिफ्ट विषयी त्यांनी माहिती विचारली. मुंबई-अहमदाबाद पश्चिम द्रुतगती मार्गावर सबवेच्या देखभालीबाबतची माहिती घेऊन ती त्यांना कळविण्यात येईल. हत्तींच्या उपद्रवासंदर्भात त्यांनी प्रश्न उपस्थित केला. हत्तीमुळे शेतीचे जे नुकसान झाले असेल त्याची नुकसान भरपाई देण्याचा शासनाने निर्णय घेतला. शेतीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई ताबडतोब दिली जाते. माकडांमुळे किंवा इतर वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान झाले तर त्यासाठी देखील आपण नुकसान भरपाई देतो. माकडांना पळवून लावण्यासाठी बुलेटप्रुफ रबरी गोळयांची खरेदी करण्यात आलेली आहे. त्या गोळया आपण तेथील वनपालांना दिलेल्या आहेत आणि शेती संरक्षणासाठी आपण त्याचा वापर करीत आहेत. तसेच, पोलीस क्वॉर्टर्सच्या सात मजली इमारतीतील दोन उद्वाहने 26 वर्षापूर्वीची आहेत. ती उद्वाहने आर्थिक दृष्टया दुरुस्त करणे किफायतशीर नाहीत.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी पुणे येथील विश्रामगृहातील आरक्षणाबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. आरक्षणाबाबत संबंधित अधिका-यांना सूचना देण्यात येतील आणि पुणे विश्रामगृहामध्ये प्रथम आमदारांना आरक्षण दिले जाईल, याची दक्षता घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मिरज रस्त्याबाबत मुद्दा उपस्थित केला. त्याची तपासणी करण्यात येईल आणि नोव्हेंबरपर्यंत या रस्त्यावरील सर्व खड्डे भरले जातील. रस्त्यावर कोठेही खड्डे राहणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल. तसेच त्यांनी बी.ओ.टी. संदर्भात प्रश्न उपस्थित केला. टोलबाबत त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची आम्ही दखल घेऊ आणि चुकीचे असेल तर त्याबाबत कारवाई करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी पुणे-सोलापूर मार्गावरील इंदापूर जवळील पुलाची तपासणी करण्याबात सूचना केलेली आहे. त्या सूचनांची दखल घेऊन

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील .......

ताबडतोब अधिका-यांना सूचना दिल्या जातील. बी.ओ.टी. तत्वावरील सर्व रस्त्यांवर प्रत्येक 100 किलोमीर अंतराव स्वच्छता गृह बांधण्याबाबत सूचना केलेली आहे. या सुचनेचा निधीच्या उपलब्धतेनुसार निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी त्यांच्या मागण्यांची यादी माझ्याकडे दिलेली आहे. त्यानी दिलेली मागण्याची यादी ताबडतोब तपासून बघितली जाईल आणि त्यावर कारवाई केली जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, वन कामगार धरणे धरुन बसलेले आहेत त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदय काय कारवाई करणार आहेत ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, वन कामगारांच्या प्रश्नाबाबत बैठक घेण्यात येईल आणि त्या बैठकीला सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना बोलविण्यात येईल आणि मार्ग काढण्यात येईल. वन कामगारांचा विषय कोर्टामध्ये प्रलंबित आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी ओरस विश्रामगृहाबाबत आणि सिंधुदुर्ग विश्रामगृहाबाबत सूचना केलेली आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयासाठी आपण सात कोटी रुपये निधी दिलेला आहे. ज्या रस्त्यांची कामे करावयाची आहेत ती कामे या निधीतून केली जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी असे सांगितले की, नागपूर येथील इमारतीसाठी 550 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु ती तरतूद 550 कोटीची नसून त्यातील 40 कोटीची तरतूद राज्यातील इतर भागातील इमारतींसाठी करण्यात आलेली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, बी.ओ.टी. तत्वावर रस्ते आणि पूल बांधले जातात. त्या रस्त्यावरील टोल नाक्यावर टोल आकारला जातो. त्या टोलची मुदत केव्हा संपणार आहे, याबाबतचा फलक तेथे लावला पाहिजे. माझ्या या सूचनेची शासनाने दखल घेतलेली नाही.

यानंतर कु.जयश्री ........

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : या टोल नाक्यावर आमदारांची अब्रू काढली जाते.

श्री.रविशेठ पाटील :यासंदर्भात एक विशेष मिटींग बोलाविली जाईल, व संबंधित सन्माननीय सदस्यांना त्या बैठकीकरिता बोलाविले जाईल. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे फलक लावले जातील.

श्री.अरविंद सावंत : मंत्रिमहोदय,या टोल नाक्यावर आमदारांची अब्रू काढली जाते. प्रोटोकॉल बॅचसाठी मी अनेक वेळेला पत्र पाठविले,यासंदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.रविशेठ पाटील : ठीक आहे. आपण यासंदर्भात दिलेल्या सर्व सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.रविशेठ पाटील :सन्माननीय सदस्य श्री.जवेरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे चंद्रपूर जिल्हयातील रस्त्यांची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी हुडकोबाबत विचारले होते, हुडकोकडून मंजूर कर्ज 992 कोटी रुपये आहे. आतापर्यंत त्यांच्याकडून 783 रुपये मिळालेले आहेत व त्याचा व्याज दर साडे आठ टक्के असा आहे,या निधीमधून आतापर्यंत 8,000किलोमीटर रस्त्यांची सुधारणा केलेली आहे,एकूण 720 पूल बांधले गेलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितले की, हिवाळी अधिवेशनाकरिता नागपूर येथील इमारतीच्या देखभालीसाठी फक्त 5.50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे ती वाढविण्यात यावी. नागपूर प्रमाणे राज्यातील इतर शहरांसाठी मिळून अशी ही 40 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी नंदुरबार नगरपालिकेसाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत येत्या आर्थिक वर्षात भरीव तरतूद करण्यात यावी,असे सांगितले होते,त्यासाठी तरतूद केल्या जातील. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी मोखाडा भागात गॅसचा प्रश्न त्यांनी विचारला होता. आदिवासी भागात गॅसचे मोफत वाटप शासनातर्फे केले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी कोकणातील राजापूर जिल्हयातील विश्रामगृहाच्या असुविधेबाबत प्रश्न उपस्थित केला होता. राजापूरप्रमाणेच,गणपतीपुळे आणि कोकणातील इतर जिल्हयातील विश्रामगृहाच्या असुविधेबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात येतील. डेंगणी फुंगणूस पूलाच्या बाबतीत आपण जर आम्हाला पत्र दिले तर आम्ही त्यावर

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील.....

निश्चितपणे कारवाई करु. आदिवासी आश्रमशाळांचा खाद्यपदार्थांच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर ती नेहमी चेक केली जातात, परंतु तरीही आपल्याला त्यामध्ये काही आक्षेपार्ह आढळले तर आम्हाला सांगा त्याबाबत चौकशी करुन ताबडतोब कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी दिलेल्या बी.ओ.टी.च्या टोलच्या संदर्भातील सूचनांची शासनातर्फे दखल घेण्यात आलेली आहे. नवीन वाहनांची खरेदी व जुन्या वाहनांचे राईट अप् करण्यासाठी वेळोवेळी कारवाई ताबडतोब केली जाईल,त्यासंदर्भातील अन्य महत्वाच्या सूचनांचा विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी सांगली जिल्हयातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या बाबतीत शासनातर्फे नक्की कारवाई केली जाईल. आदिवासी विकास विभागाबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार,अरविंद सावंत,चंद्रकांत रघुवंशी,संजय केळकर,मोते यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत, त्या सर्व सूचना विचारात घेऊन त्यासंदर्भात निश्चितपणे कारवाई केली जाईल. वनविभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग,आदिवासी विकास विभागाच्या मागण्या मान्य करण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

श्री.रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी असा प्रश्न विचारला होता की, बॅकवर्ड रिजन ग्रँटमध्ये सातारा जिल्हा आहे का ? याचे उत्तर असे आहे की, बॅकवर्ड रिजन ग्रँटमध्ये सातारा जिल्हा समाविष्ट होत नाही,याचे निकष प्लॅनिंग कमिशन ठरविते. सभापती महोदय,मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो की, ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....4

डॉ.सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : जलसंपदा विभागाच्या एकूण 27 पुरवण्या मागण्या आहेत. बाब क्रमांक 127 ते 153 या सर्व पुरवणी मागण्यांची एकंदर किंमत 1,761.62 कोटी रुपये आहे. आपले विचार व्यक्त करतांना सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोकणासाठी एक विशेष बैठक बोलावून प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सुध्दा यासंदर्भात हेच मत व्यक्त केलेले आहे.

यानंतर श्री.गागरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख .....

मी आपल्या माध्यमातून त्यांना सांगू इच्छितो की, कोकणासंबंधी 15 डिसेंबरपूर्वी एक बैठक सिंधुदुर्ग येथे आयोजित करुन या विषयावर सविस्तर चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल. त्यांनी उल्लेख केलेल्या उपसा जलसिंचन योजनेसाठी 1 कोटी 46 लाख रकमेची तरतूद यापूर्वी केली आहे. त्यातील 75 लाख रुपये शासनाने दिलेले आहेत. ही रक्कम संपल्यानंतर राहिलेले काम करण्यासाठी मार्च महिन्यात आणखी रकमेची तरतूद करुन उपसा सिंचन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

माननीय सदस्य श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश शेंडगे यांनी जलसंधारणाबद्दल मागण्या मांडलेल्या आहेत. खरे तर हा विषय जलसंपदा विभागाचा नसून जलसंधारण विभागाचा आहे. जलसंधारणावरील चर्चा आज नव्हती. तरीही त्यांनी पाझर तलाव व लघुपाटबंधारेबद्दल ज्या सूचना मांडल्या आहेत. त्या जलसंधारण खात्याकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिलासा" या संस्थेबाबत एक लिफलेट दिलेले आहे ते जलसंधारण विभागाशी संबंधित असल्याने त्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन योग्य ते निर्देश दिले जातील. मी सभागृहाला विनंती करतो की, जलसंपदा विभागाच्या सर्व मागण्या आपण मान्य कराव्यात.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, पर्यटन, विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण या विभागाच्या पुरवणी मागण्यावर 11 सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला आहे. प्रथम मी या सर्व सदस्यांचे आभार मानतो. माननीय सदस्य डॉ.एम.ए.अजीज यांनी मिरज येथील हॉस्पीटलमध्ये इक्वीपमेंट, टेक्नीशियन व मॅनपॉवरसंबंधी प्रश्न विचारला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही पदे भरण्याकरीता एम.पी.एस.सी. द्वारे जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. डिसेंबर अखेरपर्यंत सर्व टेक्नीशियनची पदे भरण्यात येतील. बाकीच्या पदांची मान्यता फायनान्स डिपार्टमेंटकडे पेंडींग आहेत, त्याची परवानगी आल्यानंतर भरती करण्यात येईल. माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी चंद्रपूर जिल्यात एक नवीन मेडीकल कॉलेज सुरु करण्यासंबंधी मागणी केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, सध्या महाराष्ट्रात जी मेडीकल कॉलेजेस आहेत, त्यांना बजेटरी प्रोव्हीजन करणे कठीण होत आहे. त्यामुळे नवीन मेडीकल कॉलेज उघडणे अवघड होईल. युनिव्हरसिटीचा नवीन प्रॉस्पेक्टीव्ह प्लॅन येणार आहे, त्या प्लॅनमध्ये या सूचनेचा विचार करण्यात येईल. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नागपूर विद्यापीठातील महिला समितीबाबत प्रश्न विचारला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, महिला समितीची लवकरात लवकर स्थापन करण्यात यावी याकरिता विद्यापीठाच्या कुलगुरुंना उद्या सूचना देण्यात येतील. माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी तबला वादकाच्या स्केलसंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे, याबाबत मी सांगू इच्छितो की, तबला वादकांचा स्केल लवकरच ठरविण्यात येईल.

माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी दोन महत्वाचे प्रश्न येथे उपस्थित केले आहेत. त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, इंजिनिअरींग कॉलेजचे ॲक्रिडीशन एन.बी.ए. द्वारे झाले पाहिजे यासंबंधी आम्ही प्रयत्न सुरु केलेले आहेत. वर्ल्ड बँक प्रोजेक्टमध्ये इक्वीपमेंट आणि अपग्रेडेशनचा कार्यक्रम घेतला आहे. पुढील दोन वर्षात महाराष्ट्रातील सर्व इंजिनिअरींग कॉलेजचे अपग्रेडेशन होईल व ॲक्रिडिशन होईल. त्यांनी दुसरा प्रश्न कलर ड्रॉपलर, एम.आर.आय. मशीनबाबत मांडला आहे. माझी अशी माहिती आहे की, थ्री-डी कलर ड्रॉपलर वुईथ इको सिस्टम या मशीनची किंमत सुमारे ७० लाख रुपये आहे. याबाबत मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही स्वत: एक

.....३

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्री.सुरेश शेट्टी .....

संस्था चालविता, संस्थेसाठी तुम्ही ही इक्वीपमेंट विकत घेता. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना मी सांगेन की, तुमच्यासोबत उद्या परवा बैठक घेऊन लेटेस्ट नवीन मशीनचे मॉडेल ठरविण्यात यावे. कारण मेडीकल क्षेत्रात जे काही साईटींफिक मशीन असतात, त्यामध्ये प्रत्येक महिन्यामध्ये नवनवीन सुधारीत मॉडेल येत असतात. याबाबत मी मोबाईलचे उदाहरण देतो. १५ दिवसात मोबाईलचे दोन नवीन मॉडेल बाजारात येतात. याप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात एम.आर.आय. मशीनचा प्रकार आहे. तुमच्याकडे जी अधिक माहिती असेल ती आमचे अधिकारी तपासून पाहतील व लेटेस्ट मशीन घेण्याचा प्रयत्न नक्की करण्यात येईल.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी..

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी रायगड जिल्हयामधील डॉ. बाबासाहेब टेक्निकन युनिव्हर्सिटी यासंबंधी चर्चा केली. आम्ही यापूर्वीच त्या विद्यापीठामधील कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी काही सूचना केल्या होत्या. एका ट्रेड इंन्स्ट्रक्टर याने एक ब्ल्यू फिल्म त्याच्या कॉम्प्युटरमध्ये डाऊनलोड केली होती याप्रकरणी जे दोषी सापडले आहेत त्यांच्यावर पोलीस कारवाई करण्यात आले आहे. त्यांच्या विरुध्द एफआयआर देखील दाखल केलेला आहे. डेप्यूटी डायरेक्टरांनी यासंबंधी चौकशी केलेली असून त्याच्या विरुध्द देखील कारवाई करण्यात येईल. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये एका महिला कर्मचारीने एका प्रिंसीपल यांच्याविरुध्द तक्रार केली होती. त्यासंबंधी डेप्युटी डायरेक्टरांनी चौकशी केली व त्यावेळी असे आढळून आले की, त्या दोघांचे आपापसात काही वाद असल्यामुळे, त्यांनी खोटी तक्रार केली होती. याप्रकरणी प्रिंसीपल दोषी असल्याचे आढळून आले नाही. यासंबंधातील अहवाल पुन्हा मागवण्यात येईल व अधिक तपास करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : याप्रकरणी दोषी असलेला इंन्स्ट्रक्टर कोण होता ?

श्री. सुरेश शेट्टी : यासंबंधी एफआयआर दाखल करुन इन्व्हेस्टीगेशन चालू आहे. चौकशीचा अंतिम अहवाल आल्यानंतर त्यासंबंधी कार्यवाही करण्यात येइ्ल. आम्ही कोणाही दोषी व्यक्तीला सोडणार नाही. आपण चिंता करु नये.

सभापती महोदय, येथे दोन ते तीन सन्माननीय सदस्यांनी पर्यटनाविषयी प्रश्न विचारले आहे. आज पर्यटनाविषयी कोणत्याही मागण्यांचा विषय सभागृहामध्ये नव्हता तरी मी यासंदर्भात आपणास सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये, एका किल्ल्यामध्ये भगवा झेंडयासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी प्रश्न उपस्थित केला होता. हा भगवा झेंडा 70 फूट खाली होता तो आता 40 फूटांवर लावण्याची परवानगी केंद्र शासनाकडून हवी आहे. ही परवानगी एएसआय मुंबई मधील जे अधिकारी आहेत त्यांच्याशी चर्चा करुन याबाबत कार्यवाही करुन तेथे भगवा झेंडा लावण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी कोकणातील पर्यटनासंबंधी प्रश्न उपस्थित

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी..

केला होता. आज वेळ कमी असल्यामुळे येथे मी प्रत्यक्ष भेटून शासनाची याबाबत काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्यात येईल. केंद्र शासनाकडून राज्य शासनास 250 कोटी रुपयाचे पॅकेज मिळालेले आहे. ते पैसे कसे खर्च करावेत यासाठी एक क्रीसील एजन्सी नेमण्यात आली आहे. त्याचा अहवाल आताच पंधरा दिवसामध्ये शासनास प्राप्त होणार आहे. यासंदर्भात आपणाला भेटून मी संपूर्ण माहिती आपल्याला देईन. मी आपणा सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांना आपण सहमती द्यावी. कोकणातील पर्यटन विषयाच्या चर्चेसाठी सन्माननीय सदस्य श्री. नारायण राणे यांनी दोन बैठका घेतलेल्या आहेत. आपली इच्छा असेल तर अधिवेशन संपल्यानंतर कोकणातील सर्व आमदारांची मंत्रालयात एक बैठक घेऊ व या बैठकीत क्रिसील एजन्सी आणि बाकीच्या अधिका-यांना बोलावून आपल्यासाठी एक प्रेझेंटेशन ठेवू. लायब्ररी संदर्भात या ठिकाणी एक महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सन 2004-2005 मध्ये शासनाने लायब्ररीसाठी दुप्पट निधी दिलेला आहे. जे लायब्ररी चाळवतात ते 10 टक्के सुध्दा खर्च करीत नाही मग शासनाने किती अनुदान द्यावयाचे? शासनाने काय अनुदान देण्याचेच काम करावयाचे काय? ज्या लायब्ररीज आहेत त्यांनी स्वत: सेल्फ फायनान्स उभा केला पाहिजे. अजून सुध्दा बरेच लोक पुस्तके वाचत असतात. कॉम्प्युटर इंटरनेट आल्यानंतर नवीन टेक्नॉलॉजी आपल्याकडे आलेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी ....

सभापती महोदय, आपण प्रत्येक संस्थेला दोन तीन वेळा भेट दिली आहे आणि त्यांना सांगितले आहे की, त्यांनी सेल्फ फायनान्स निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. कारण प्रत्येक केसमध्ये मग अगदी ऊसापासून वाचनालया पर्यंत सगळ्यांनाच शासनाने अनुदान दिले पाहिजे असे म्हटले तर ते तेवढे सोपे नाही. हे मी येथे सांगू इच्छितो.

( काही विरोधी पक्ष सदस्य एकदम बोलू लागतात ...अडथळा ... )

श्री. अनिस अहमद ( पशु संवर्धन,दुग्ध विकास, मत्स्यव्यवसाय औकाफ मंत्री ) : माननीय सभापति जी, मैं बाब क्रमांक 63,64 और 65 की मांगों का उत्तर देने के लिए यहां पर खड़ा हुआ हूं. यहा पर माननीय सदस्य श्री जयंत पाटील, श्री मधु चव्हाण, श्री सावंत तथा अन्य माननीय सदस्यों ने अपनी बात रखी ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर जो भगवा ध्वज लावण्यात आलेला आहे तो शासनाने अधिकृतरित्या लावलेला आहे. पण सध्या तो खराब झाला असल्याने तो काढून नवीन ध्वज लावण्यात यावा अशी तेथील लोकांची मागणी आहे.

**तालिका सभापती** : याबाबत राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची विनंती तेथे नवीन झेंडा लावण्याची आहे. आता असलेला झेंडा खरा झालेला आहे आणि तो पडलेलाआहे त्यामुळे तेथे नवीन झेंडा लावण्यात यावा तसेच त्याची उंची देखील वाढवून घ्यावी, कारण सध्याचा झेंडा थोडा खाली लावण्यात आलेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे., त्यासाठी एएसआयची परवानगी घ्यावी लागेल आणि ते शासन करणारच आहे.

( काही सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ... )

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, झेंडा तेथे नव्याने लावावयाचा असेल तर त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल. परंतु अगोदर लावलेला झेंडा पडला असेल, खराब झाला असल्यामुळे तेथे नवीन झेंडा उभारण्याचेच केवळ काम असेल तर हे काम केले जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण मला एकच प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. मी गेल्या तीन अधिवेशनापासून हा विषय या सभागृहात मांडत आहे. शासनाने असे धोरण जाहीर केले आहे की, एका जिल्हयामध्ये, एका तालुक्यामध्ये किमान एक तरी महाविद्यालय अनुदानित असलेच

...... 5एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

पाहिजे. आमच्याकडील कल्याण तालुक्यामध्य टिटवाळा येथे ग्रामीण भागातील एकमेव असे महाविद्यालय आहे आणि हे विनाअनुदान तत्त्वावरील महाविद्यालय आहे. तेव्हा त्याला आपण अनुदान दिले पाहिजे. वाटल्यास आपण याबाबत चौकशी करा आणि खरोखरी या महाविद्यालयाला अनुदान दिले पाहिजे की नाही, त्याला ते पात्र आहे की नाही हे आपण पहावे आणि मगच त्याला अनुदान देण्यात यावे एवढीच माझी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारचे धोरणच आहे की, प्रत्येक तालुक्यात एक तरी अनुदानित महाविद्यालय द्यायचे. आता कल्याणच्या महाविद्यालयाचा प्रस्ताव त्या साठी आला तर जरूर त्याचा विचार करून पुढील शैक्षणिक वर्षापासून त्यांना अनुदान देण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी चोंडी येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकाचा प्रश्न येथे मांडला होता. त्यांचे म्हणणे असे आहे की, या स्मारकासाठी शासनाने पैसे दिलेले आहेत पण नंतर मात्र त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे तरी त्याबद्दल आपण काही सांगावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री तेथे गेले होते आणि या वर्षी मी देखील तेथे गेलो होतो. सगळ्याच धनगर समाजाचे ते श्रद्धास्थान आहे आणि मोठ्या संख्येने इतर समाजाचे लोक देखील त्या ठिकाणी येत असतात. म्हणून या बाबतीत शासनाने जो आराखडा तयार केला होता त्यासाठी आवश्यक तो निधी जरूर उपलब्ध करून दिला जाईल. पुरवणी मागण्यांतून त्यासाठी तरतूद नसेल तर सीएफ ॲडव्हान्स मधून पैसे घेतले जातील आणि याबाबत वित्त मंत्र्यांबरोबर चर्चा करून हे पैसे त्यांना उपलब्ध करून दिले जातील.

***

( यानंतर श्री.अनिस अहमद यांचे हिंदी भाषण श्री.देवदत्त यांचेकडे ..)

( यानंतर श्री.सरफरे ....5टी 1 ..

अस्थापित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : मैं कहना चाहूंगा कि यहां पर सोनिया गांधी जी ने आदेश दिया है कि प्रधानमंत्री जी का जो पॅक्ेज है...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, गेल्या दहा वर्षापासून हा विषय उपस्थित होत आहे. हे कर्मचारी गेली 25 वर्षे नोकरी करीत आहेत. आता हे कर्मचारी निवृत्तीला आले आहेत. या कर्मचाऱ्यांना नियमित करावयाच्या प्रस्तावाला वित्त विभागाकडून विरोध होत आहे. म्हणून या प्रकरणी निर्णय होत नाही. याकरिता आपण या प्रश्नामध्ये लक्ष घालावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, दुग्ध विकास विभागाकडून प्रस्ताव आला तर या प्रकरणामध्ये मी मध्यस्थी करुन वित्त विभागाला सांगण्याचे काम करीन.

श्री अनिस अहमद : मेरा कहना है कि यह पॅकेज 6 जिलों में शुरु हुआ है. ये 6 जिले अमरावती, बुलढाणा, यवतमाल, वर्धा,वाशिम और अकोला हैं. इसमें प्रधानमंत्री महोदय और मुख्यमंत्री महोदय के पॅकेज से ं7025 और 9264 यानी लगभग 16290 गाय वहां पर दी गयी हैं जिसकी वजह से वहां के किसानों को जोड़ धधा करने का मौका मिला है और उासकी वजह से वहां के लोगों की आत्म हत्या काफी कम हो चुकी हैं.जिन 6 जिलों की बात मैंने की है वहां पर पहले कुल 25 से 30 हजार लिटर दूध का कलेक्शन होता था लेकिन सन् 2006 में लगभग 44 हजार और 2007 में लगभग 61200 लिटर तक दूध का उत्पादन वहां हो गया है. वहां पर पहले कम अधिकारी थे लेकिन अभी वहां पर एस.सी., एस.टी. के 3 सौ लोगों को एक्जाम के माध्यम से नौकरी दी गयी है. इन तीन सौ डाक्टरों को महाराष्ट्र के अलग-अलग इलाकों में पोस्टिंग दी है. आने वाले दो महीने में एमपीएससी के माध्यम से और दो सौ डाक्टरों की भर्ती की जाएगी. इस प्रकार कुल 5 सौ डाक्टरों को महाराष्ट्र में मौका मिलने वाला है. विदर्भ के 6 जिलों में हम 10 करोड़ रुपए की गांय बांटने वाले हैं जिसके लिए प्रधानमंत्री पॅकेज से 2007-2008 के लिए 14 हजार गाय दी जाएंगी उसके लिए कलेक्टर के माध्यम से 7 हजार लाभार्थियों के सेलेक्शन का काम शुरु हो गया है. प्रत्येक किसान को 2 गाय दी जायेंगी. मेरा विश्वास है

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ MAP/ DD/ 21:45

श्री अनिस अहमद...

कि जिस इलाके में माननीय सदस्य घूम कर आये हैं उन इलाकों  में गाय बांटी जायेंगी और उसके लिए किसान खुद बाजार में जाएगा, खुद गाय का सेलेक्शन करेगा और उसके लिए 75 प्रतिशत पैसा सरकार देगी और 25 प्रतिशत पैसा किसान से लिया जाएगा. ं3 साल के अंदर हम 18 हजार गाय बांटने वाले हैं. इस इलाके में आर्टिफिशियल इन्सीमीनेशन का काम हम बहुत जोर से कर रहे हैं. वहां पर जो बछडे पैदा होंगे उसके लिए हम किसान को 10 हजार रुपए देने वाले है. 2 हजार रुपए हम फॉडर के लिए देने वाले हैं. वहां पर ट्रेनिंग भी देंगे कि गाय का पापुलेशन कैसे बढ़ सकता है और जो एल.डी.ओ.आर्टिफिशयल इन्सीमीनेशन करेंगे उनको हम 450 रुपए देने वाले है. यह पैसा उनको इनाम के तौर पर दिया जाएगा. इन 6 इलाकों में यदि किसान का जोड़ धंधा  बढ़ गया तो आत्म हत्या का प्रमाण काफी कम हो जाएगा. इसके लिए मैं प्रधानमंत्री जी को, सोनिया जी को और शरद पवार साहब को धन्यवाद देना चाहूंगा क्योंकि वे इस कार्यक्रम में खास ध्यान दे रहे हैं

माननीय सभापति जी बाब क्रमांक 66 के बारे में कहना चाहूंगां कि यह सेंट्रेलाइज स्पॉन्सर्ड स्कीम है इसमें लगभग 8 करोड़ रुपए मांगे गए हैं  पूरे महाराष्ट्र में कितनी गाय हैं उसका सेंसस करने का काम भी हमने शुरु किया है.

(इसके बाद श्री तालेवार के पास...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद ......

सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत जी ने नागपुर स्थित डेअरी डिपार्टमेंट के अस्थायी कर्मचारियों को नियमित करने संबंधी मुद्दा उठाया है.मैं सम्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत जी को बताना चाहूंगा कि पश्चिम महाराष्ट्र के डेअरी डिपार्टमेंट के अस्थायी कर्मचारियों, डेली वेजेस पर काम करने वाले कर्मचारियों को नियमित कर दिया है. अब केवल नागपुर और चंद्रपुर स्थित डेअरी डिपार्टमेंट के डेली वेजेस के कर्मचारियों को नियमित करना बाकी रह गया है.एक महीने के अंदर केबिनेट के सामने हम यह विषय रखेंगे तथा सम्माननीय वित्त मंत्री जी की भी इस विषय में मदद लेकर इन कर्मचारियों को नियमित करने का काम करेंगे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, गेल्या दहा वर्षापासून हा विषय उपस्थित होत आहे. हे कर्मचारी गेली 25 वर्षे नोकरी करीत आहेत. आता हे कर्मचारी निवृत्तीला आले आहेत. या कर्मचाऱ्यांना नियमित करावयाच्या प्रस्तावाला वित्त विभागाकडून विरोध होत आहे. म्हणून या प्रकरणी निर्णय होत नाही. याकरिता आपण या प्रश्नामध्ये लक्ष घालावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, दुग्ध विकास विभागाकडून आला तर या प्रकरणामध्ये मी मध्यस्थी करुन वित्त विभागाला सांगण्याचे काम करीन.

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, महाराष्ट्र में एमएलडीपी के माध्यम से अलग अलग कार्यक्रम लिए जा रहे हैं. इस कार्यक्रम में केन्द्रीय सरकार भी आर्थिक मदद कर रही है. सम्माननीय श्री शरद पवार के साथ बैठक हुई है. दूसरे राज्यों में जिस प्रकार से केन्द्रीय सरकार आर्थिक सहायता कर रही है, उसी प्रकार से महाराष्ट्र के 6 जिलों में सरकार इस कार्यक्रम पर 40-50 करोड़ रुपये खर्च करने वाली हैं और आने वाले सालों में 100 करोड़ रुपये खर्च करेंगे. इन कार्यक्रमों के माध्यम से सरकार किसानों की मदद करेगी. हम जनवरी में एक दिंडी निकालने जा रहे हैं, इस दिंडी को सम्माननीय उप मुख्यमंत्री श्री आर. आर. पाटील जी झंडी दिखाकर शुरु करने वाले हैं. 26 जनवरी से हम यह काम शुरु करने वाले है. इस माध्यम से हम किसानों को यह बताने जा रहे हैं कि किसानों को जोड़ धंधा करना चाहिए.

सभापति महोदय, मुंबई-गोवा समुद्र तट 720 किलोमीटर का है. महाराष्ट्र सरकार समुद्र में फिशरीज करने वाले लोगों को मदद करने वाली है. 28 बड़े हार्बर है. वहां डिसिल्टिंग का

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद...

काम नहीं हो रहा है. वहां हाईड्रोग्राफी सर्वे शुरु किया है. एक महीने के अन्दर केन्द्रीय सरकार से मदद लेकर रत्नागिरी में डिसिल्टिंग का काम किया जाएगा. इस कार्यक्रम पर 7 करोड़ रुपये खर्च किए जाएंगे. इस कार्यक्रम के द्वारा बोट को समुद्र के किनारे आने में मदद हो सकेगी.

सभापति महोदय, फिशरमैन को लाभ पहुंचाने के लिए महाराष्ट्र को छोड़ देश के किसी भी राज्य में डीजल पर सब्सिडी नहीं दी गई है. महाराष्ट्र सरकार ने डीजल पर सब्सिडी देना शुरु किया है. कोंकण विभाग में फिशरमैन को डीजल में सब्सिडी देने का काम कर रहे हैं. 200 से ज्यादा सोसायटी को डीजल में सब्सिडी देने का काम हो रहा है. इस साल महाराष्ट्र सरकार इस संबंध में 80 करोड़ रुपये दे रही है. पिछले साल भी महाराष्ट्र सरकार ने इस कार्य के लिए 80 करोड़ रुपये दिए थे. इस कार्यक्रम के माध्यम से कोंकण के फिशरमैन को काफी मदद होगी. कोंकण में 10240 बोट डीजल के कोटे के लिए पात्र हो गई है. इस प्रकार से सरकार फिशरमैन को मदद कर रही है. साथ ही साथ फिशरमैन की शिकायत सुनने के लिए रत्नागिरी, सिंधुदुर्ग और रायगढ़ में बैठक लेंगे और उनकी समस्या दूर करने का काम करेंगे. दूसरी बात यह है कि फिशरीज युनिवर्सिटी का सम्माननीय मुख्यमंत्री जी के द्वारा उद्घाटन किया गया है.इस युनिवर्सिटी में फिशरी साईंस, सीड्स, प्रॉन कल्चर इत्यादि की जानकारी दी जाएगी. इस माध्यम से फिशरीज उद्योग के विकास के लिए काम किया जा रहा है और इसके द्वारा रोजगार भी उपलब्ध हो सकेगा.इसके माध्यम से हम प्रशिक्षण देने का काम शुरु करने वाले है.

मैं अंत में सम्माननीय सदस्यों से यह अनुरोध करना चाहूंगा कि वे मेरे विभाग की मांगों को अपना समर्थन दें. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

**तालिका सभापती** : सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभा□ृहापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या गुरुवार, दि□ां□ 29 नोव्हेंबर, 2007 रोजी स□ाळी 10.15 वाजता पु□: भरेल. उद्या सकाळी 10.15 ते दुपारी 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. त्यात वन विषयक प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ रात्री 9 वाजू□ 54 मि□िटां□ी, गुरुवार, दि□ां□
29 नोव्हेंबर,2007 रोजीच्या स□ाळी 10.15 वाजेपर्यं□ स्थगि□ झाली )

---------

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही